म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

...ाजाविरचित

# रुक्मिणीहरण



संपादक

... तुळपुळे, एम्. ए.

REFBK-0002845

किंमत १-४-०

সং ক্রমাংক ৪২

২০।৭।৭৮

सामराजकविविरचित

# रुक्मिणीहरण.

[ उपोद्घात, शब्दकोश, अर्थनिर्णायक व अवांतर टीपांसहित. ]

संपादक

गोपाळ विष्णु तुळपुळे, एम्. ए.,

इंग्रजी व मराठी विषयांचे अध्यापक—फर्ग्यूसन कॉलेज.

आवृत्ति पहिली

१९२४

REFBK-0002845

किंमत १। रुपया

प्रकाशक
गोपाळ विष्णु तुळपुळे,
८४४ सदाशिव पेठ, पुणें.

[ सर्व हक्क स्वाधीन ]

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

नं. ...... मा. ...... ठाणे.

# प्रस्तावना.

सामराज कवीचें 'रुक्मिणीहरण' प्रथम शके १८२७ सालीं प्रख्यात वाङ्मयसेवक रा० विनायक लक्ष्मण भावे यांनीं आपल्या 'महाराष्ट्रकवीं'त छापून प्रसिद्ध केलें. परंतु तेव्हां त्याची व्हावी तितकी प्रसिद्धी झाली नाहीं. हल्लीं 'महाराष्ट्रकवी'चे अंकही दुर्मिळ झाले आहेत. सामराज हा वामनाच्या तोडीचा किंबहुना कित्येक वेळां त्याच्यापेक्षां सरस वाटणारा कवि मागें पडून अज्ञातवासांत लोपून जावा हें त्या बिचाऱ्याचें दुर्भाग्यच होय! त्याला या अज्ञातवासांतून काढून मराठी वाचकांच्या नजरेपुढें आणण्याचा प्रयत्न होणें अवश्य आहे असें वाटल्यावरून मी त्याच्या 'रुक्मिणीहरणा'ची ही पुनरावृत्ति काढीत आहें. आज पांच चार वर्षें मनांत असलेला हा हेतु कोणत्याना कोणत्या कारणांनीं मागें पडला. मागील सालीं बी. ए.च्या परीक्षेला मराठी विषयाच्या अभ्यासाकरितां नेमलेल्या कालखंडांत सामराजाचा अंतर्भाव होत असल्यामुळें त्या कवीची विद्यार्थ्यांना ओळख करून देतांना त्याच्या प्रस्तुत काव्यांतील कांहीं ठळक वेंचे वाचून दाखवावे लागले. ते ऐकून विद्यार्थ्यांनाही हें काव्य साग्र वाचावेंसें वाटलें. या कारणांनीं पहिली इच्छा दुणावून हें काव्य पुनर्मुद्रित करण्याचें काम मीं अधिक विलंब न लावतां हातांत घेतलें. हें पुनर्मुद्रण 'महाराष्ट्रकवीं'तील प्रतीबरहुकूम आहे. क्वचित् स्थलीं काव्याला दुर्बोधता आली आहे. मूळ हस्तलिखित प्रत मिळाली असती तर त्यांपैकीं कांहींच्या अर्थाचा उलगडा झाला असता, कांहीं ठिकाणीं 'महाराष्ट्रकवीं'तील प्रतींत छापण्यांत आलेल्या चुकाही दुरुस्त करतां आल्या असत्या. पण आयत्या वेळीं रा० भावे यांना हस्तलिखित प्रत सांपडली नाहीं त्यामुळें नाइलाज झाला. दुर्बोध स्थलांचा उल्लेख टिपांत त्या त्या ठिकाणीं प्रश्नचिन्ह घालून केला आहे. 'महाराष्ट्रकवीं'त हें काव्य छापतांना रा० भाव्यांनीं लिहिलेली प्रस्तावना जशीच्या तशीच खालीं देत आहें.

"या 'रुक्मिणीहरण' काव्याच्या आम्हांस दोन प्रती मिळाल्या. दोन्ही प्रती रा० रा० जगन्नाथ रघुनाथ अजगांवकर यांजकडून आल्या. यांपैकीं पहिली प्रत सुमारें दीड वर्षांपूर्वीं मिळाली. हिची लांबी ८¼ इंच व रुंदी ४ इंच असून पानें १३९ आहेत व दरएक पानावर ८ ओळी असून त्या स्पष्ट व सुट्या अक्षरांनीं लिहिल्या आहेत. या प्रतींतला पहिला सर्ग—पहिलीं आठ पानें—गहाळ झाला आहे, व दुसऱ्या सर्गापासून पुढें शेवटपर्यंत पोथी शाबूत आहे. प्रतीचे शेवटीं 'शके १६६६॥ रक्ताक्षी-नामसंवत्सरे पौष शुद्ध प्रतिपदा तद्दिनी समाप्तं ॥' असा प्रतीच्या काळाचा उल्लेख केला आहे. याच प्रतीवरून आम्हीं हा ग्रंथ छापण्यास सुरवात केली व दोन ते आठ सर्ग छापून पुरे केले. आठव्या सर्गाचे शेवटीं सर्गसंख्या १७९ असे शब्द आहेत. ते तसे नसून १७९ हा या आठव्या सर्गाच्या पद्यांचा वाचक असा आंकडा आहे. १८० वा श्लोक केवळ उपसंहारात्मक आहे.

या प्रतीवरून ग्रंथ छापल्यावर रा० अजगांवकर यांस दुसऱ्या प्रतीचा शोध लागला, व ही प्रत थोड्याच दिवसांत आमचे हातीं आली. ही प्रत ८½ इंच लांब व ४ इंच रुंद असून हींत १४३ पानें आहेत व हीवर दर पृष्ठास ८, क्वचित् ९, याप्रमाणें ओळी लिहिल्या आहेत. हीहि प्रत पहिल्या प्रतीप्रमाणेंच स्पष्ट आहे. दोन्ही पूर्तकाली खर्चीं कागदावर पोथीवजा लिहिल्या आहेत. दुसरींत शेवटीं 'शके १७२४ दुंदुभीनामसंवत्सरे श्रावणकृष्णत्रयोदश्यां तद्दिनी समाप्तं हस्ताक (!) क्षर स्मार्तोपनामक धोंडभट्टेन लि(खि)तं शुभं भवतु' असा उल्लेख आहे. या दोन्हीही तिसऱ्या एकाच प्रतीवरून केलेल्या नकला असाव्या असें दिसतें.

या येवढ्या मोठ्या काव्यांत कवीनें आपल्या स्वतःबद्दलची माहिती किंवा ग्रंथरचनेचा कालही कोठेंच दिला नाहीं. इतकेंच नव्हे, तर आपल्या नांवाचाही तो उल्लेख करीत नाहीं. 'सामराज' अथवा 'साम्राज्य' या नांवान्ना एक कवि महाराष्ट्र-काव्यवाचकांच्या परिचयाचा आहे. हा वामनाचा शिष्य असून आपणास 'साम्राज्यवामन' म्हणवितो. 'बापु', 'विश्वनाथ', 'साम्राज्य' हे सर्व वामनाचे शिष्य, आपल्या गुरूचा उल्लेख काव्यांत स्पष्टपणें करतात. परंतु 'रुक्मिणीहरणाचा'

कर्ता जो 'सामराज' यानें आपल्या सबंध ग्रंथांत वामनाचा उल्लेख कोठेंही केलेला नाहीं. यावरून हा 'सामराज' वामनशिष्य जो 'साम्राज्य' याहून भिन्न पुरुष असावा असें वाटतें.

काव्याच्या भाषेवरून व दुसऱ्या अंतःप्रमाणांवरून हा वामनाचा समकालीन असून याचा वामनाच्या काव्यांशीं चांगला परिचय असावा असें दिसतें. कोल्हापूरप्रांतीं पुढेंमागें याचे आणखी कांहीं ग्रंथ व माहिती मिळण्याचा संभव आहे."

शेवटीं रा० भावे यांनीं हें काव्य पुनर्मुद्रित करण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. त्याप्रमाणेंच ठाण्याच्या 'मराठीग्रंथ-संग्रहालया'चे चिटणविसांनीं 'महाराष्ट्रकवीं'तील 'रुक्मिणीहरणा'ची एक प्रत देऊन माझें काम सुलभ केलें याकरितां मी त्यांचा ऋणी आहें. परिशिष्टांत दाखविलेल्या संस्कृत काव्यांतील समानार्थक स्थलांपैकीं बरींच माझे मित्र प्रो० नरहर गोविंद सुरु, एम्. ए. यांनीं काढून दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतों. 'विजय' छापखान्याचे मालक रा० अनंत सखाराम गोखले यांनीं पुस्तकछपाईचें काम मनासारखें सुबक करून दिलें हें त्यांस भूषणास्पद आहे.

पुणें, ८४४ सदाशिव पेठ,
विजयादशमी शके १८४६.

**गोपाळ विष्णु तुळपुळे.**

---

२८६५

ग्रंथ संग्रहालय नं. ... ता. ... ठाणे.

# उपोद्घात.

मराठी काव्य म्हटलें कीं विद्वानांनीं त्याच्याकडे पाहून नाकें मुरडावीत व त्याला नांवें ठेवीत सुटावें असा एक काळ नुकताच येऊन गेला. या काळाचें यथार्थ वर्णन 'निबंधमालें'तील 'मोरोपंतांची कविता' या निबंधांत पहावयास सांपडतें. मराठी काव्याला सर्वस्वीं प्रतिकूल असलेलें तें अनिष्ट वातावरण अनेक कारणांनीं हळुहळू निवळूं लागलें. 'काव्येतिहास संग्रह', 'काव्यसंग्रह' वगैरे नियतकालिकांतून जुनीं काव्यें प्रसिद्ध होऊं लागल्यामुळें तीं लोकांच्या वाचनांत येऊन इंग्रजी काव्यवाचनानें मराठी काव्याविषयीं उत्पन्न झालेले विपरीत ग्रह नाहींसे होत चालले. पुढें सुदैवानें मराठी भाषेचा मुंबई विश्वविद्यालयांत प्रवेश झाला, व त्यायोगें अलीकडे या पंधरावीस वर्षांत मराठी काव्य लोकांच्या वाचनांत अधिकाधिक येऊं लागल्यामुळें तत्संबंधीं मनांत वावरणारे पूर्वग्रह बरेचसे कमी होऊन या भाषेच्या वाङ्मयाला अनुकूल काल उत्पन्न झाला आहे. अशा अनुकूल परिस्थितींत-सुद्धां जुन्या मराठी काव्यावर ठराविक आक्षेप घेणारी मंडळी दृष्टीस पडतात. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें जुन्या मराठी कवींत प्रतिभा, स्वातंत्र्य, निसर्गाचें प्रेम वगैरे खऱ्या कवींत वास करणारे गुण मुळींच दिसून येत नाहींत. नाहीं म्हणावयाला नामदेव-तुकारामादि संत मंडळी मात्र आक्षेपकांच्या तडाक्यांतून वांचलेली दिसते. या आक्षेपांचें खंडन कांहीं विद्वानांनीं उत्तम प्रकारें केलें आहे. तथापि हा विषयच असा आहे कीं प्रसंगीं पुनरुच्चाराचा दोष पत्करून सुद्धां तो पुन्हां हातांत घेण्याची इच्छा होते.

काव्याच्या अनेकांनीं अनेक व्याख्या केल्या आहेत, त्या सर्वांत 'रसात्मकं काव्यं' ही व्याख्या विशेष योग्य दिसते. काव्याचा मुख्य हेतु मनोरंजन. दुसरे आणखी हेतु असले तरी ते गौण होत. अंतःसृष्टि किंवा बाह्यसृष्टि यांपैकीं एखादा हृदयंगम प्रसंग किंवा देखावा पाहून आपल्या स्वतःच्या मनांत ज्या आनंदलहरी किंवा दुःखावेग, भीति किंवा आश्चर्य

वगैरे विकार, विचार व भावना उत्पन्न झाल्या असतील त्या तशाच शब्दचित्रांनीं वाचकांच्या मनांत उत्पन्न करणें हा कवीचा मुख्य हेतु असतो. हा हेतु साध्य होण्यास त्याच्यामध्यें अनेक गुण असावे लागतात. पण त्या सर्वांत प्रसाद, प्रतिभा व प्रेम हे तीन मुख्य होत. प्रासादिक कवींची कविता आबालवृद्धांना सहज वाचतां वाचतां समजण्यासारखी असते. तिचा अर्थ लावण्यास त्यांना कष्ट पडत नाहींत. काव्यविषयाशीं कवीचें मन तादात्म्य पावून त्याच्या वृत्ती प्रबळ झाल्या म्हणजे स्वाभाविकपणें त्या काव्यरूपानें मुखावाटें बाहेर पडतात. अशा सहज स्फूर्तीनें उत्पन्न झालेल्या काव्यांत उत्तान अर्थ नसल्यास नवल? कवीचा दुसरा गुण 'प्रतिभा'. कवीच्या मनांत नाना प्रकारचे नवीन नवीन विचार उत्पन्न करून त्याला प्रत्यहीं आपलें हें नश्वर जग सोडून काल्पनिक जगांत वावरावयास लावणारी अद्वितीय शक्ति ती प्रतिभा. 'प्रज्ञा नवनवोन्मेष-शालिनी प्रतिभा मता', अशी 'प्रतिभा' शब्दाची संस्कृतांत व्याख्या आहे. तिसरा गुण 'प्रेम'. हा गुण काव्याला प्रसाद व प्रतिभा यांच्या इतकाच अवश्यक आहे. किंबहुना प्रेमाचा जिवंत झरा कवीच्या हृदयांत वहात असल्याशिवाय खरा प्रसाद व खरी प्रतिभा यांचा वास त्याच्यांत संभवणार नाहीं. दीर्घाभ्यासाच्या जोरावर कदाचित् हे गुण एखाद्याला कांहींसे हस्तगत करून घेतां येतील, पण स्वाभाविक दैवीतेजाच्या अभावीं त्यांची कृत्रिमता त्याच्या काव्यांत जागोजाग उघडकीस येईल.

उपरीनिर्दिष्ट तीन मुख्य गुण उच्च दर्जाच्या कविश्रेष्ठांत पहावयास सांपडतात. याशिवाय इतरही अनेक गुण कवीच्या ठिकाणीं असावे लागतात, पण ते गौण होत. कोणत्याही कवीच्या काव्यांतील गुणावगुण पाहून त्याची योग्यता ठरवितेवेळीं या तीन गुणांकडेच प्रथम लक्ष जातें. जुन्या मराठी कवींचें व त्यांच्या काव्यांचें परीक्षण करतांना हीच दृष्टि ठेविली पाहिजे.

कवीची योग्यता ठरवितांना आणखी एका गोष्टीचा विचार करावा लागतो. प्रत्येक जनतेचे, व कवी हे जनतेचे घटक असल्यामुळें त्या जनतेंतील कवींचे, देशकालामानाप्रमाणें कांहीं विशेष असतात. भिन्न भिन्न देशांतील व कालांतील आचारविचार व भावना भिन्न भिन्न असतात. अनेक कारणांनीं त्यांच्या

मनोरचनाच वेगवेगळ्या बनतात. अशा स्थितींत एका देशांतील किंवा कालांतील कवींच्या काव्यांतून येणारे विषय, वर्णनें, कल्पना, अलंकार इत्यादि गोष्टी दुसऱ्या देशांतील किंवा कालांतील कवींच्यापेक्षां निराळ्या असल्या तर त्यांत आश्चर्यकारक किंवा दूषणीय असें कांहींच नाहीं. एकाच देशांतील पण भिन्न भिन्न कालांतील कवींत सुद्धां हा भिन्नभाव दिसून येतो. आंग्ल कवींतील एकीकडे सोळाव्या शतकांतील स्पेन्सर व शेक्स्पीअर घ्या, व दुसरीकडे एकुणिसाव्या शतकांतील वर्डस्वर्थ, बायरन, शेले वगैरे नाणावलेल्या कवींपैकीं कोणतेही घ्या. यांच्या काव्यविषयांत किंवा विषयवर्णनांत कितपत साम्य आढळतें? तथापि हे सर्व कवी आपआपल्या परीनें श्रेष्ठ दर्जाचे आहेत. ह्याचें कारण एकच कीं, त्यांचीं काव्यें प्रतिभासंपन्न असल्यामुळें त्यांत मुख्य मुख्य काव्यगुण बाहुल्यानें पहावयास सांपडतात. त्यांचे काव्यविषय, विचार व कल्पना भिन्न भिन्न असल्या तरी त्यांच्या काव्यगुणांत व त्यामुळें श्रेष्ठपणांत त्यांचें साम्य असते. स्पेन्सर व शेक्सपिअर यांच्या काव्यांत वर्डस्वर्थची सृष्टीची कल्पना व तिचीं तदनुरूप वर्णनें आढळणार नाहींत, तर वर्डस्वर्थमध्येंही स्पेन्सरच्या मध्ययुगीन 'रोमॅन्सेस्' दृष्टीस पडणार नाहींत. पण याबद्दल त्यांचे भिन्न भिन्न काल व तत्कालीन परिस्थित्या जबाबदार आहेत. काव्याचा विषय, त्यांतील निरनिराळे प्रसंग किंवा स्थलें हीं काव्याला अनुकूल अशीं असावींत; परंतु काव्याची पारख करतांना त्यांच्याकडे विशेष लक्ष न देतां कवीनें आपला विषय आणि त्यांतील प्रसंग व स्थळें कशीं रंगविलीं आहेत हें मुख्यतां पाहिलें पाहिजे. कवि हा चित्रकार असून तो आपलें चित्र शब्दांनीं रंगवीत असतो. एखादें चित्र पहात असतांना तें कशाचें आहे हें न पहातां आपण तें मुळाबरहुकूम साधलें आहे कीं नाहीं हें मुख्यत्वेंकरून पहातों, व त्या मानानें त्या चित्रकाराची योग्यता ठरवितों. पाश्चिमात्य चित्रांत पुष्कळदां दिसून येणारे जलपर्यटणाचे, नौकाविहाराचे किंवा समुद्रावरील युद्धाचे प्रसंग आपल्या इकडील चित्रकलेंत फारसे दृष्टीस पडणार नाहींत; त्यांच्याकडील भव्य व सुंदर इमारतींची घाटणी आपल्या मोठमोठ्या देवळांत, गोपुरांत किंवा मुसलमानी अमदानींत बांधलेल्या मशिदींत आढळणार नाहीं; त्यांचें गायनवादन आपल्यापेक्षां भिन्न तऱ्हेचें असेल; परंतु येवढ्यावरून

जर कोणी असें म्हणूं लागला कीं इकडचे चित्रकार, शिल्पकार किंवा गवई व बजवय्ये ही मंडळी कुचकामाची आहेत तर त्याचें हें विधान बरेंच धाडसाचें होईल.

इतर देशांतील कवींप्रमाणें आमच्या भारतीय कवींमध्येंही स्वाभाविकपणें कांहीं गुणावगुण आहेत. आमच्या कवींच्या—विशेषें करून जुन्या कवींच्या—काव्यसरितेचा ओघ परमेश्वरगुणवर्णनाकडे वहात असल्यामुळें तिच्यांत भक्ति, निवृत्ति व परमार्थ यांनाच स्वाभाविकपणें प्रमुखस्थान मिळालें आहे. मराठी कवींनीं हा दहावा भक्तिरस निर्माण केला असें म्हणण्यांत अतिशयोक्ति मुळींच नाहीं. जसा कवीचा स्वभाव तसें त्याचें काव्य. आधिभौतिक विषयांपेक्षां पारमार्थिकांकडे अधिक कललेल्या मनांत आधिभौतिक विषयांना गौणपद मिळणें अगदीं स्वाभाविक आहे. या दृष्टीनें मराठी काव्याकडे पाहिलें म्हणजे त्या काव्यांत दिसून येणाऱ्या गुणावगुणांचा उलगडा होतो. मानवी कृतींत गुणांबरोबर दोष रहाणारच. या नियमानें मराठी काव्यांत कांहीं दोष नाहींत असें नाहीं. पण कोणत्या देशांतील काव्य अगदीं निर्दोष आहे? शिवाय दुसरें असें कीं, आमच्या कवींत दिसून येणारे दोष सर्वच यथार्थ आहेत कीं नाहींत हें पाहिलें पाहिजे. मराठी काव्य पूर्वग्रह बाजूला ठेवून नीट काळजीपूर्वक वाचलें व त्यांत दिसणाऱ्या दोषांची छाननी केली म्हणजे असें आढळून येईल कीं, त्यांतील बराच अंश आभासात्मक व काल्पनिक आहे. इतकें करूनही कांहीं दोष रहातील व ते केव्हांही सरळमनानें कबूल केले पाहिजेत. पण तेवढ्यावरून जुने मराठी कवि येथून तेथून टाकाऊ, परभृत, अरसिक वगैरे दोषांस पात्र होतात असें नाहीं.

सदर प्रस्तावना विस्तृत स्वरूपाची नसल्यामुळें वर प्रदर्शित केलेले विचार अत्यंत संक्षिप्तपणें व्यक्त केले आहेत. प्रस्तुत काव्यांत त्यांचें समर्थन करण्यासारखीं अनेक उदाहरणें असल्यामुळें आणखी निराळीं उदाहरणें देऊन प्रस्तावना लांबविली नाहीं. किंबहुना हें सरस मराठी काव्य वाचकांच्या पुढें आणून तद्द्वारें मराठी काव्यावरील आक्षेपनिरसन अंशतः तरी झालें तर पहावें याच हेतूनें हें पुन्हां एकदां छापून काढण्याचें मनांत आणलें. मराठी कवींच्या समर्थनार्थ चिपळूणकर, पांगारकर, भावे, आजगांवकर वगैरे विद्वानांनीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत. रा० भाव्यांच्या

'महाराष्ट्र-सारस्वतां'तील उदाहरणें वाचलीं तरी सुद्धां पुष्कळसें काम भागणार आहे. रा० पांगारकरांचें 'मोरोपंती वेंचे' हें छोटेंसें पुस्तक काळजीपूर्वक वाचल्यास पंतांच्या काव्याची थोरवी उत्तमप्रकारें दिसून येईल. रा० आजगांवकरांच्या 'महाराष्ट्र-कविचरित्रा'च्या तिन्ही भागांत प्रत्येक कविचरित्राच्या शेवटीं त्या कवीच्या काव्याचे निवडक उतारे दिले आहेत. त्यांचाही या कामीं चांगला उपयोग होईल. या दोन पुस्तकांत सामराजाच्या काव्याची भर पडल्यास तें मराठी कवींची बाजू चांगली सांवरून धरील असा अंदाज आहे.

सामराजकवीची आजतागायत उपलब्ध असलेली माहिती रा० भावे यांनीं आपल्या 'महाराष्ट्र—सारस्वतां'त दिली आहे. ती अशी—

"निरंजनमाधवाप्रमाणेंच कांहींशी नानाविध रचना करणारा दुसरा एक कवि या काळीं ( शाहूमहाराजांच्या काळीं ) हयात होता असें दिसतें. याचें नांव सामराज. या सामराजासंबंधें एक मोठी अडचण अशी आहे कीं, यानें आपली चरित्रात्मक अशी माहिती आपल्या ग्रंथांत फारशी दिलेली नाहीं. यामुळें 'सामराज' किंवा 'शामराज' या नांवाचा एकच ग्रंथकार असून त्या नांवावर उपलब्ध असलेले सर्व ग्रंथ त्या एकाचेच आहेत, किंवा हे भिन्न ग्रंथकारांचे ग्रंथ आहेत हें कळण्यास मार्ग नाहीं. 'कोकशास्त्रा' पासून 'भागवतटीके'पर्यंतचे निरनिराळे दर्जाचे विषयांवरील ग्रंथ सामराज कवीनें लिहिलेले आढळतात. एका संस्कृत ग्रंथाच्या आधारें 'मी ही कामशास्त्रटीका रचितों' असें कवि त्या ग्रंथाचे प्रारंभीं लिहितो. भागवताच्या दशमस्कंधावरही एक टीका आहे. हींत कवि आपलें नांव 'शामराज', 'शाम' व 'सामराज' असें तीन तऱ्हेनें लिहितो. या टीकेचे ९० अध्याय असून हिची ग्रंथसंख्या जवळजवळ साडेचार हजार आहे. हा ग्रंथ यानें एका वर्षांत लिहिला.* हा ग्रंथ अगदीं साधारण आहे. यावरून ही रचना

---

* या भागवतटीकेचे प्रारंभीं—संवत सत्राशें साठीं (१७६०) भरितां। ... मीच शामराज कथा वदितां।...इ॰ (अ. १-ओं. ५) व शेवटीं संवत सत्राशें एक सष्टींत। श्रावण वद्य सप्तमी भरत। त्यांत हें पुराण-पूर्ण-होत-।... ( अ. ९०—ओं. ५६ ) असे उल्लेख आहेत.

अगदीं प्रारंभींची असावी किंवा हा कवि पुढील 'रुक्मिणीहरण'कर्त्या कवीहून भिन्न असावा असें वाटतें."

"सामराजानें रचिलेलें एक 'मुद्गल आख्यान'ही उपलब्ध आहे. या प्रकरणावरून कवीचें कुलदैवत 'मुद्गल' हें होय असें दिसतें. या मुद्गल आख्यानांत कवीनें आपलें गोत्र, मातापिता व बहीण यांचा उल्लेख पुढील-प्रमाणें केला आहेः—

शाकल्यान्वय सागरीं जनिं असे ज्याची मना शुद्धता ।
आल्हादीं द्विजराज लक्ष्मण सुधी जाणा जयाचा पिता ॥
काशी हे विमळा जयास जननी मंदाकिनी सोदरी ।
केली मुद्गलदैवतस्तुति पहा त्या सामराजें बरी ॥

हें मुद्गल क्षेत्र दौंडापासून चार कोसांवर भीमा नदीचें कांठीं आहे, व येथील जोशीपण साताऱ्च्या राजोपाध्यांकडे आहे."†

—महाराष्ट्र–सारस्वत. आवृत्ति पहिली. पृष्ठ २२१–२२.

'रुक्मिणीहरणां'तही सामराजानें आपल्याविषयीं कांहीं माहिती दिलेली नाहीं. फक्त पहिल्या सर्गांतील एक दोन श्लोकांवरून त्याच्या मातृ-भाषेची व स्वभावाची ओळख होते. तो म्हणतोः—

असे मऱ्हाटी निजदेशभाषा,। नयेत उक्ती बहुशा विशेषा, ॥
तथापि जे कीं निजभक्त तूझे। न पाहती ते गुण दोप माझे. ॥
अगत्य नाहीं जनरंजनाचें। लागे तुझें ध्यान निरंजनाचें. ॥

प्रस्तुत पुस्तकांत छापलेलें काव्य रा०भावे यांनीं आपल्या 'महाराष्ट्रकवि' या मासिक पुस्तकांत शके १८२७ सालीं छापलेल्या प्रतीबरहुकुम आहे. या प्रतींत कांहीं थोड्या ठिकाणीं चरणांचा अर्थ लागत नाहीं, व केव्हां केव्हां मूळ हस्तलिखित प्रतींत लिहितांना किंवा भाव्यांच्या प्रतींत छापतांना कांहींतरी चुका झाल्या असाव्या असें वाटतें. त्या शुद्ध करण्याकरितां जर

† "भा. इ. सं. मं. ग्रं. पृ.५–या राजोपाध्यांकडे एक सामराजानें लिहिलेली रुक्मिणीस्वयंवराची पोथी मिळाली होती. यावरून हा व रुक्मिणीस्वयंवराकर्ता हे तरी भिन्न नसावेत असें वाटतें."

भाव्यांच्या जवळील मूळ हस्तलिखित प्रत सांपडती तरी फार चांगलें झालें असतें. पण ती प्रत त्यांना सांपडली नाहीं.

सामराजाच्या 'रुक्मिणीहरणा'चे ८ सर्ग असून त्यांत एकंदर ११०० वर श्लोक आहेत. हें काव्य वाचीत असतां याचे एकदोन विशेष तेव्हांच दृष्टीस पडतात. यांतील बराचसा भाग संस्कृत काव्याच्या धर्तीवर असून पुष्कळ वेळां या कवीचा संस्कृत काव्य व साहित्यशास्त्र यांच्याशीं चांगलाच परिचय असला पाहिजे असें स्पष्ट दिसून येतें. एकंदर काव्याची अंतर्बाह्य रचना, त्याची ठेवण, सर्गांचीं नांवें व त्यांची मांडणी, निरनिराळ्या प्रसंगांचीं संस्कृत काव्यांतील त्या त्या प्रसंगाशीं मिळणारीं वर्णनें, दुसऱ्या सर्गांतील आरंभींचें भीमकराजाचें वर्णन, त्याची प्रजापालनतत्परता, त्या नंतरचें गर्भिणीचें वर्णन, हीं वाचलीं म्हणजे कवीचा 'रघुवंशा'दि काव्यांशीं उत्तम परिचय असला पाहिजे अशी खात्री वाटूं लागते. इतकेंच नव्हे, तर रुक्मिणीच्या आईचें गर्भारपणांतील वर्णन करीत असतांना कालिदासाचें 'रघुवंशा'च्या तिसऱ्या सर्गांतील वर्णन कवीपुढें खास असलें पाहिजे. त्याचप्रमाणें तृतीय सर्गांतील रुक्मिणीचा भाऊ रुक्मी यानें केलेल्या कृष्णनिंदेवरून 'कुमारसंभवां'तील बटूच्या शिवनिंदेची आठवण होते. तसेंच पांचव्या सर्गांतील १०७ व त्या पुढील श्लोकांत आलेलें रुक्मिणीचें प्रत्यवयववर्णन पाहून 'कुमारसंभवां'तील पार्वतीच्या वर्णनाचा भास होतो. अशीं समानार्थाचीं आणखी कितीतरी स्थलें सांपडतील. यांपैकीं कांहीं पुढें परिशिष्टांत दाखविलीं आहेत.

सामराजाचा संस्कृत ग्रंथांशीं असलेला परिचय दुसऱ्याही एका कारणानें चांगला व्यक्त होतो. या काव्यांत पुष्कळसे संस्कृत शब्द, संस्कृत भाषेच्या धर्तीवर लांब लांब समास व कित्येक ठिकाणीं संस्कृत पद्धतीची वाक्यरचना दृष्टीस पडतात. तसेंच उपमा, दृष्टांत वगैरे कवीनें योजिलेल्या अलंकारांपैकीं बरेचसे नेहमीं संस्कृत काव्यांतून आढळून येणारे असे आहेत. या काव्यांत आलेल्या अनेक अलंकारांवरून या कवीचें अलंकार व साहित्य या शास्त्रांतील प्राविण्य दिसून येतें.

अशा प्रकारें या काव्यांत संस्कृताचें वर्चस्व जरी सर्वत्र दिसत असलें

तरी त्यांत अशींही कांहीं स्थळें आहेत कीं, त्या ठिकाणीं जुन्या मराठी काव्याची आठवण होते. मातापितरांना न जुमानतां कृष्णद्वेषी रुक्मी आपल्या बहिणीच्या लग्नाची तयारी करीत असतां त्या वर्णनांत येणाऱ्या वस्त्रपात्र, दागदागिने, जडजवाहीर, लग्नसाहित्य इत्यादिकांच्या लांब लांब याद्या इतर मराठी कवींप्रमाणें यांतही पहावयास सांपडतात. या याद्या वाचूं लागलें म्हणजे आपण संस्कृत काव्यवातावरण अगदीं विसरून जाऊन अनंतकवि, आनंदतनय, नागेश, विठ्ठल अशासारख्यांचें एखादें काव्य वाचीत आहों असा भास होतो. तसेंच पहिल्या सर्गाच्या आरंभींचें भवार्णव व त्याचें दुस्तरत्व यांचें वर्णन, मराठी भाषेंत काव्यग्रथनाचा उल्लेख, कवीचा परमेश्वरकथावर्णनाकडे ओढा, जुने प्राकृत शब्द, तशींच जुनीं अपरिचित अशीं शब्दांचीं रूपें, अक्षरांच्या ऱ्हस्वदीर्घाकडे कांहींसें दुर्लक्ष, क्वचित्प्रसंगीं अशुद्ध शब्दरूपांची योजना वगैरे मराठी काव्यांत दिसून येणारे बरेवाईट विशेष सामराजांत सर्वत्र दिसून येतात.

सामराजाच्या काव्यांतील मुख्य गुण प्रसाद. पुस्तकाचें साधारणपणें कोणतेंही पान उघडून वाचूं लागलें म्हणजे हा गुण उत्कटत्वानें दृष्टीस पडतो. जुने अपरिचित शब्द योजल्यानें क्वचित्प्रसंगीं काव्याला दुर्बोधत्व आलें आहे; कांहीं श्लोक ऱ्हस्वदीर्घांच्या दुर्लक्षामुळें कर्णकटु होतात; वस्त्रपात्रादिकांच्या लांबलचक काव्यहीन याद्या नीरस व कंटाळवाण्या वाटतात, हें खरें. पण अशा प्रकारचे दोष एकंदर काव्याच्या मानानें फार थोडे आहेत. एकंदरीनें पहातां प्रस्तुत काव्य वाचकांना प्रासादिक व सुरस वाटेल यांत शंका नाहीं. प्रसादाला प्रतिभेची जोडही उत्तम प्रकारें मिळाली आहे. पहिल्या सर्गांतील संसारसमुद्राचें उत्कृष्ट रूपक, दुसऱ्या सर्गांतील रुक्मिणीचा जन्म, तिची बाल्यावस्था व त्यानंतर तिसऱ्या सर्गांत वर्णिलेली तारुण्यदशेंत श्रीकृष्ण वियोगामुळें उत्पन्न झालेली विरहावस्था, चवथ्या सर्गांतील सुदेव ब्राह्मण व त्याबरोबर पाठविलेली प्रणयपत्रिका, सुदेवाचें प्रवासवर्णन, त्याचा मनास उपदेश वगैरे कवीच्या प्रतिभेची साक्ष देतात. सामराजाचा सृष्टिवर्णनाचा नमुना म्हणून खालीं कांहीं श्लोक देतों, त्यांवरून त्याच्या अंगचे प्रतिभा व प्रसाद हे गुण स्पष्टपणें दृष्टीस पडतील.

## सायंकालवर्णन.

वदत वदत ऐसें सांज होयास आली,
दिनकरकरलक्ष्मी सर्व संक्षीण झाली. ।
मुखकमल तयेचें म्लान अत्यंत देखे
म्हणवुनि कमलांचा बंधु बांधव्य राखे. ॥ १ ॥

सहज दिनमणी हा अस्त होतांच, एकी
प्रिय-तम-विरहानें क्रंदती चक्रवाकी ।
विधि-विहित-नियोगें वारुणी आदरीली,
म्हणुनि चरम संध्या काय आरक्त झाली. ॥ २ ॥

तदुपरि उगवे हा चंद्रमा पौर्णिमेचा;
अनभिलषित अर्थी होय हा उत्तमेचा, ।
द्विजपति विसरेना सर्वथा स्वीय दीक्षा ।
कर पसरुनि मागें वक्त्र-लावण्य भीक्षा. ॥३॥ (सर्ग २)

## चंद्रोदयवर्णन.

हिमकरकर जैसे कांतिपूर स्रवेती,
हलुच तसतसे ते चंद्रकांत द्रवेती. ।
क्षुधिततर चकोरां पारणें थोर जालें,
मुकुलित कुमुदांला जन्मसाफल्य आलें. ॥ १ ॥

❀ ❀ ❀

तुहिनकर नव्हे, हें बीज चिंता लतेचें,
विकसित अथवा हें पुष्प उद्वेगतचें, ।
अभिनव मदनाचें छत्र किंवा उभारें,
युवतिजन जयाच्या दर्शनें मात्र भारें. ॥ २ ॥

नभ धवलित केलें, विश्व आंनदवीलें,
परि विरहजनाचें चित्त उन्मादवीलें, ।
क्षणभरि मज बाई याकडे पाहवेना,
प्रलय-दहन-कल्प स्पर्श हा साहवेना. ॥ ३ ॥ (सर्ग २)

अशाच तऱ्हेचें पुढें एक प्रातःकालवर्णन आलें आहे. मराठी काव्यांत सृष्टि-वर्णन मुळींच नसतें असा आक्षेप घेणाऱ्या मंडळींनीं हीं वर्णनें अवश्य वाचून पहावींत. या ठिकाणीं एक गोष्ट कबूल केली पाहिजे कीं, इंग्रजी कवींप्रमाणें किंवा तदनुयायी आधुनिक मराठी कवींप्रमाणें स्वतंत्रपणें सृष्टिविषयक वर्णनपर अशी कविता जुन्या मराठी कवींनीं केली नाहीं; पण मुख्य काव्यविषयांत ओघाओघानें जर अशीं वर्णनें करण्याचा प्रसंग आला तर तो ते वायां जाऊं देत नाहींत. मुक्तेश्वरांत अशीं कांहीं वर्णनें पहावयास सांपडतात. त्यांपैकीं कांहीं उत्तम मासले हवे असल्यास महाभारतांतील आदिपर्व, अध्याय २७ यांतील हिमाचलाचें वर्णन, अध्याय ३६ मधील रात्रीचें वर्णन, वगैरे पहावींत.

स्थल, काल व प्रसंग यांचीं यथायोग्य वर्णनें करण्याची हातोटी सामराजास चांगली साधते, व तितक्याच सफाईनें तो मानवी स्वभावाचें यथार्थ चित्रही काढतो. रुक्मिणीच्या आईला आपल्या लाडक्या लेकीच्या लग्नाविषयीं लागलेली काळजी, तिनें तेवढ्याकरितां निरनिराळ्या देवतांस केलेल्या प्रार्थना व नवस, मुलीशीं श्रीकृष्णाच्या होणाऱ्या लग्नामुळें झालेला आनंद, रुक्मिणी आजपासून दुसऱ्याची होऊन आपल्याला कायमची अंतरणार म्हणून तिच्या मातृहृदयाला होणारें वियोगजन्म दुःख, व शेवटीं देवीच्या देवालयाकडे जाण्याकरितां निघालेल्या रुक्मिणीला तिनें मातृप्रेमानें प्रेरित होऊन केलेला बिनमोल उपदेश वगैरे वाचून पाहिलीं म्हणजे खऱ्या प्रेमळ मातेची मूर्ति आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते. त्याप्रमाणेंच श्रीकृष्णाकडे रुक्मिणीची पत्रिका नेणारा सुदेव ब्राह्मण आणि त्याची खाष्ट पत्नी यांचीं स्वभाववर्णनेंही फार सरस वठलीं आहेत. एखाद्या प्रसंगाचें किंवा व्यक्तीचें वर्णन करतांना बारीक सारिक गोष्टीसुद्धां सामराजाच्या निरीक्षणांतून सुटत नाहींत, हें पाहिलें म्हणजे त्याचा अनुभव व सूक्ष्म

निरीक्षण हीं व्यक्त होतात. श्रीकृष्णाला देण्याकरितां सुदेवाजवळ लिखित प्रेमपत्रिका देऊन व तोंडीं निरोप सांगून शेवटीं श्रीकृष्ण—

'कार्यांतरीं सक्त असेल जेव्हां
करूं नको गोष्टि मदीय तेव्हां,'। तर
'त्याचे नीं हा मज ठाव व्हावा,
प्रसंग ऐसा बरवा पहावा'.।

असें बजावून सांगते. सहाव्या सर्गांत रुक्मिणीच्या विवाहाकरितां निरनिराळ्या देशांहून आलेल्या वऱ्हाडी मंडळींचीं विनोदी व मार्मिक वर्णनें केलीं आहेत. ह्या वर्णनांत निरनिराळ्या देशांतील रहिवाशांचें स्वभाववैचित्र, नैय्यायिक, वेदान्ती वगैरे मंडळींचा आपआपल्या पंथाविषयीं अभिमान व वादविवाद वगैरे वर्णनें मनोरंजक आहेत. सामराज मधून मधून विनोदाचीही झुळूक दाखवितो. विवाहसाहित्याकरितां पडलेल्या तळणांचें वर्णन करतांना तो विनोदानें म्हणतो—

बसेत जेव्हां तळणें तळाया । तैं अर्भकें धांवति आंतळाया ॥
आकांत होती बहु लेंकरांचे । वाजेत तेथें धबके करांचे. ॥ १ ॥

प्रस्तुत काव्यांत अलंकारांची इतकी रेलचेल झाली आहे कीं, पुष्कळदां आपण एखादें संस्कृत काव्यच वाचीत आहोंत असा भास होतो. संस्कृत काव्यांचा सामराजावर किती परिणाम झाला होता हें मागें सांगितलें आहे. व पुस्तकाच्या शेवटीं संस्कृत काव्यांतील समानार्थक उतारेही दिले आहेत. मोरोपंतांच्या 'केकावलीं'त व रघुनाथपंडितांच्या 'नलदमयंती स्वयंवराख्यानां'त असाच अलंकारांचा यथास्थित भरणा आहे. रघुनाथ पंडितांचें काव्य पुष्कळअंशीं सामराजासारखें आहे. पण सामराजांत पंडितांपेक्षां प्रसाद अधिक असल्यामुळें 'रुक्मिणीहरणा'ची रचना 'नलदमयंती स्वयंवराख्याना'पेक्षां अधिक स्वाभाविक व मनोहर वाटते. 'नलदमयंती' काव्यांतील कृत्रिम रचनेमुळें तें काव्य कांहींसें क्लिष्ट झालें आहे.

रुक्मिणीहरण किंवा रुक्मिणीस्वयंवर या विषयावर सोळा कवींनीं ग्रंथरचना केली आहे. त्यांत सामराजाच्या 'रुक्मिणीहरणा'ची पायरी फार

वरची आहे. मूळ कथा जरी एकच असली तरी तिला काव्याचा पेहेराव चढवितांना कवीनें आपलें कौशल्यसर्वस्व खर्चिलें आहे. आधीं मूळ कथानक फार गोड व काव्यविषय होण्यास अत्यंत अनुकूल असून त्यांत शृंगारादि नवरस व स्वभाववैचित्र्य यांस पूर्ण अवसर आहे. शिवाय सामराजानें कांहीं प्रसंग अगदीं स्वतंत्रपणें घातल्यामुळें या काव्याचें सौंदर्य दुणावलें आहे. उत्तम सुपीक जमीन पाहून एखाद्या कुशल बागवानानें मोठ्या चतुराईनें तिच्यावर सुंदर बगीचा उठवावा त्याप्रमाणें काव्याला सर्वतोपरी युक्त असा रुक्मिणीहरणाचा प्रसंग निवडून प्रतिभादि गुणांच्या जोरावर त्यानें हें उत्कृष्ट काव्य निर्माण केलें आहे. यांतील वर्णन-सौंदर्य मागें दाखविलेंच आहे; याचप्रमाणें स्वभाववर्णनांत कवीची दिसून येणारी चतुराईही आपण पाहिली आहे. त्याचें कल्पनास्वातंत्र्य व्यक्त करणारे बरेच प्रसंग व अनेक वर्णनें प्रस्तुत काव्यांत आहेत; पण त्यांची लांबलचक यादी न देतां त्यांतील जे विशेष बहारीचे प्रसंग आहेत त्यांपैकीं कांहीं थोड्यांचा या ठिकाणीं उल्लेख करतों.

पहिल्या सर्गांत कथेची प्रस्तावना करतांना आलेलें संसारार्णवाच्या दुस्तरत्वाचें वर्णन सरस असून त्यांत रूपकांची योग्य योजना केली आहे.

आयुः पयाचा अति गोड प्याला।
हळू हळू काळ बिडाला प्याला. ॥

ही सुंदर कल्पना अगदीं नवीन दिसते. चवथ्या सर्गांत रुक्मिणीची प्रेमपत्रिका सुदेवनामाब्राह्मण श्रीकृष्णास नेऊन देतो. हा सर्ग 'शाकुंतल' नाटकाच्या चवथ्या अंकाप्रमाणें साग्र मनोहर झाला आहे. त्यांत लिखितपत्रिकेशिवाय रुक्मिणीनें कृष्णाला पाठविलेल्या तोंडी निरोपांत आपल्याला सत्वर घेऊन जाण्याविषयीं केलेली प्रार्थना वाचनीय आहे. यांत कवीचें साहित्यनैपुण्य उत्कृष्ट प्रकारें दृष्टीस पडतें, व त्याबरोबरच त्याचें रुक्मिणीच्या स्वभावचित्रांतील तिची कृष्णभेटीविषयींची मनाची आतुरता, लीनता, प्रेमळपणा, सारासारविचार, चातुर्य वगैरे गुणनिदर्शन पाहिलें म्हणजे त्याचें स्वभाववर्णनांतील कौशल्यही चांगलें व्यक्त होतें. या तोंडी निरोपांत रुक्मिणी शेवटीं कृष्णाला विनवून सांगते,

तूं सोडवी जीव विहंग माझा, ।
होईल येणें पुरुषार्थ तुझा. ॥
त्वन्नाममुक्ताफळमात्र चारा ।
तुझे पदीं केवळ यास थारा. ॥ १ ॥

जैसें तुला मी नवरी न मानें, ।
करूं नको ज्येष्ठ कदापि मानें. ॥
मी धाकटी होईन धाकटीची; ।
दासी करीं, रे, मज शेवटीची. ॥ २ ॥

व शेवटीं सुदेवासही अनुकूल काल पाहून कृष्णाला पत्रिका देण्याविषयीं सुचविते. इतक्यांत प्रभातसमय प्राप्त झाल्यामुळें सुदेवाला निरोप देऊन ती मंचकावर पडली असतां तिचा किंचित् डोळा लागतो व स्वप्नांत तिला कृष्णभेट होते. इकडे सुदेव द्वारकेचा मार्ग आक्रमण करीत असतांना यदुपति-भजनाची गोडी लागून त्याच्या मनांत पारमार्थिक विचार उद्भवतात. या प्रसंगीं त्यानें आपल्या मनाला गोड व परिणामकारक असा उपदेश केला आहे. पांचव्या सर्गांत रुक्मिणीनें पाठविलेली प्रेमपत्रिका आपल्याला वाचावयास सांपडते. या एका पत्रिकेंत प्रसाद, शब्दसौष्ठव, अलंकार वगैरे काव्य-गुण एकवटलेले दृष्टीस पडतात; तसेंच रुक्मिणीचें एकनिष्ठ प्रेम व भक्ति हींही चांगलीं व्यक्त होतात. श्रीकृष्णाची प्रार्थना करतांना ती म्हणते,

"विज्ञापना परिस यादव वंशवीरा,
योगींद्रहृत्कमलपंजरगर्भकीरा, ॥
हातास ये त्वरित आजि उडोन माझ्या,
वार्ता मला श्रवणगोचर होति तुझ्या. ॥ १ ॥

माझा मनोमधुप लुब्ध बहूत झाला,
तूझे पदांबुजयुगीं रहिवास केला. ॥
काकूलती बहुत याजनिमित्त येते,
कृष्णा तुझे चरणपल्लव हे धरीते. ॥ २ ॥

या श्लोकांच्या तोडीचे या काव्यांत अनेक श्लोक जागोजाग दृष्टीस पडतात. आतांपर्यंत वर निदर्शित केलेल्या प्रसंगवर्णनांत कवीचें काव्य-स्वातंत्र्य व कल्पनाशक्ति उत्तम तऱ्हेनें व्यक्त होतात. आतां आणखी अशाच प्रकारच्या एका प्रसंगाचा उल्लेख करून हें प्रकरण संपवितों.

सातव्या सर्गांत रुक्मिणी कुलरिवाजाप्रमाणें देवीच्या दर्शनाला जावयास निघाली असतां तिची आई तिला पतिगृहीं कशी वागणूक असावी याविषयीं उपदेश करते. हा बिनमोल उपदेश इतका सरस व सुबोध आहे कीं तो प्रत्येक मुलीकडून पाठ करून घ्यावा. 'केरळकोकीळ'चे संपादक रा० कृष्णाजी नारायण आठल्ये यांनीं मागें 'सासरची पाठवणी' म्हणून एक लहानसें सुंदर काव्य रचिलें होतें. त्याच्यासारखीच पण त्यापेक्षां फार सरस अशी ही सामराजाची 'पाठवणी' आहे.

जाऊन तूं नांदसि सिंधुगर्भीं, ।

* * *

मी येकली राहिन ये विदर्भीं. ॥

* * *

मागेल आतां मज कोण जेऊं, ।

* * *

कठीण आहे स्थिति सासुऱ्याची. ।

यासारख्या मातेचें प्रेम-वियोगदुःख व चिंता व्यक्त करणाऱ्या शब्दांनीं या 'पाठवणी'चा आरंभ होतो. या विस्तृत उपदेशांत बोधप्रद अशा कितीतरी गोष्टी आल्या आहेत. यांत

'घालाघाली घालती नित्य सासा, ।
टाकूं बाई नेदिती हा उसासा'. ॥

अशा सास्वांपासून सासरच्या गडीमाणसांपर्यंत प्रत्येकाशीं कसें वागावें हें उत्तम प्रकारें सांगितलें आहे. 'सासू, दीर, नणंदा, जावा या सर्वांशीं नीट वागून व पतीच्या अर्ध्या वचनांत राहून त्याचें मन हस्तगत करून घे';

'त्वा आपुलीं आवरिजेत मूलें । जें नित्य होती कलहास मूळें. ।।
टाकून बाई अभिमान द्यावा । संसार हा गोड करून घ्यावा. ।।
मिळोन जातें मन दंपतीचें । तरीच घेती सुख संपतीचें. ।।
'सर्वांपुढें सत्वर त्वां उठावें । ते नीजल्या नंतर त्वां निजावें'. ।।
'आदासपर्यंतही अन्न द्यावें, । त्यानंतरें भोजन त्वां करावें. ।।

वगैरे गोष्टी कोणत्या प्रेमळ आईला आपल्या प्रथम सासरीं जाण्यास निघालेल्या कन्येस सांगाव्याशा वाटणार नाहींत? रुक्मिणीची आई मात्र येवढेंच सांगून थांबत नाहीं. शेवटीं—

'दुपाराची सायी समज अवघी संपति असे ।
शहाणे हे कोणीं धरितिच न यीचे भरवंसे. ।।

हा पारमार्थिक उपदेश करण्यास ती विसरत नाहीं. याच्यापुढें येणारे,

अये, ये लक्ष्मीची तिळभरिहि तृष्णा न धरिजे ।
यिच्या त्वां वेचें करुनच यिची वृद्धि करिजे ।।

हे उपदेशामृताचे शब्द किती अमोल आहेत? अशाप्रकारचा सुंदर उपदेश करून रुक्मिणीची आई शेवटीं तिला सांगते;

हा तूज शिक्षाविधि मात्र केला, । सर्वांस बाई उपदेश जाला; ।।
वर्तोत ऐशाच समस्त मूली, । घरोघरीं मृण्मय जाण चूली. ।।

या पुढील रुक्मिणीचें भाषणही मजेदार आहे. ती आईला म्हणते,

" जें जें मला तूं सिकवीस, कांहीं । वर्तेन तैसी अनुमान नाहीं; ।।
तूं सर्व माते समजेसि तत्त्वें, । नसेत तूझीं वचनें कवित्वें. ।।१।।
माते चमत्कार अपूर्व पाहे । जगामधें वर्तत एक आहे; ।।
मूर्खा पुढें काढुनि ठेवियेला । तथापि नाहीं यश ये सुनेला. ।। २ ।।
सासू सुनेला सिकवीत आहे । वर्ते कशी आपण हें न पाहे; ।।
कार्पण्य कारुण्य कटाक्ष लेशी, । पांडित्य हें सर्व परोपदेशीं ।। ३ ।।

हें 'पाठवणी' प्रकरण थोडेंसें लांबलें आहे हें खरें, पण वाचकांचें त्याकडे विशेष लक्ष वेधावें या हेतूनेंच तें लांबविलें आहे.

आतांपर्यंत या काव्याचें थोडक्यांत विवेचन केलें. हें काव्यच असें आहे कीं, वाचकांस त्याचें वेड लागावें व याच्या कांहीं भागाची तरी दुसऱ्यास केव्हां ओळख करून देऊं असें होऊन जावें. हें सर्व काव्य वाचलें म्हणजे सामराजाच्या आंगचे काव्यगुण लक्षांत येऊन त्याची योग्यता व दर्जा किती आहेत याचा अंदाज बांधता येतो. या काव्यांत कांहीं लहान सहान दोष आहेत. त्यांचा उल्लेख मागें केलाच आहे. शिवाय ते गुणांच्या मानानें इतके थोडे आहेत कीं, त्यांचा विशेष विचार करण्याचें कारण नाहीं. कल्पना-स्वातंत्र्य, पदलालित्य, प्रतिभा, सहृदयता, विनोद, भाषाप्रभुत्व, संस्कृति, बहुश्रुतपणा वगैरे अनेक गुण सामराजाच्या अंगीं वसत होते. इतक्या उच्च दर्जाचा कवि मराठी वाचकांपुढें यापूर्वींच यावयास पाहिजे होता. रा० भाव्यांनीं वीस वर्षांपूर्वीं हें काव्य 'महाराष्ट्रकवी'त छापून काढलें, पण त्यावेळीं त्याला मिळावी तशी प्रसिद्धि मिळाली नाहीं. रघुनाथ पंडितांचें 'नलदमयंती-स्वयंवर' हें एकच अशाप्रकारचें काव्य उपलब्ध आहे, व तें आबालवृद्धांच्या तोंडीं राहून वामनमोरोपंतादि इतर थोर कवींच्या काव्याप्रमाणें सर्वांच्या आदरास पात्र झालें आहे. त्याप्रमाणेंच सामराजाच्या रुक्मिणीहरणाशीं सर्वांचा परिचय व्हावयास पाहिजे अशी फार दिवस मनांत प्रबल इच्छा असल्या-मुळें हें साग्र काव्य व त्याचीच शालोपयोगी संक्षिप्तावृत्ति प्रसिद्ध करीत आहें. यांच्या योगानें मराठी वाचकांचा व विद्यार्थ्यांचा एका उत्कृष्ट काव्याशीं परिचय होऊन या विद्वान् व रसिक कवीचा अज्ञातवास अंशतः तरी संपेल अशी आशा आहे.

सामराजकविविरचित

# रुक्मिणीहरण.

## सर्ग पहिला.

वंदीं, मना, पाय गजाननाचे, । जे सिंधु कल्पद्रुमकाननांचे, ॥
जे वंदिल्या विघ्न पळोन जाती, । स्फुरेतही फार कवित्वजाती. ॥ १ ॥
जे घेय हातीं बरवी विपंची, । जीच्या गुणें होय विधि प्रपंची, ॥
जे राजहंसावरती विलासे, । तीचे पदीं मस्तक ठेविलासे. ॥ २ ॥
वात्सल्य मोठें तुजला विकासें, । जगद्गुरू, तूं मज लावि कांसे, ॥
आणीक कांहीं तुजला न मागें, । येईन आधार धरून मागें. ॥ ३ ॥
वाचेस जे वाट कदा न फूटे, । जेथें मनाची गति नित्य खुंटे, ॥
अद्वैत ज्या आड दडोनि राहे, । त्याची किली तूज अधीन आहे. ॥ ४ ॥
जे नित्य मायापट आड लावी, । ते वृत्ति कैसी मज आडलावी ?
भवार्णवीं पाय तुझे जपावे, । तरीच हें ज्ञानसरोज पावे. ॥ ५ ॥
कामानळें जीव महा अहाळे. । याला परब्रह्म कसें न्यहाळे ? ॥
त्वन्मूर्ति चित्तांतुन हे गहाळे. । नसे मला वोळखि ये रहाळे. ॥ ६ ॥
हे बुद्धि माझी मजला चुकावी, । म्हणोन म्यां वाट तुझी चुकावी ॥
मदांध मी ये भरलों अव्हाटे. । तूं लावि आतां मज नीट वाटे. ॥ ७ ॥
तूं आंधळयाची अससील काठी; । हें पांगुळें वागवितोसि पोटीं; ॥
तूं द्रौपदीचा अति साहकारी; । असे तुझी दृष्टि परोपकारीं. ॥ ८ ॥

तां वाढवीला महिमा धुरूचा; । तां दीधला बाळकही गुरूचा; ॥
तां सोडवीलें व्यसनीं गजेंद्रा; । उपेक्षिसी तूं मज कां, उपेंद्रा? ॥ ९ ॥
माझा तुला काय विषाद आला? । किंवा कृपासागर शुष्क जाला? ॥
प्रसन्न नाहीं मन आजि तूझें? । कीं आड आलें दुरदृष्ट माझें? ॥ १० ॥
कीं लागली हे तुज योगनिद्रा? । न पावसी कां करुणासमुद्रा? ॥
करूनि दीनावरती कृपा हे । तूं आजि डोळे उघडूनि पाहें. ॥ ११ ॥
तूं आपणा दीनदयाळु ऐसें । जनामधें या म्हणवीस कैसें? ॥
मला प्रपंचांतुनि शीघ्र काढीं, । कीं आपुलें बीरुद आजि सोडीं. ॥१२॥
असत माझ्या अपराधकोटी; । तथापि मागें पसरून वोंटी ॥
मत्सारिखीं हे कितियेक वेडीं । तूझे घरीं काय असेत थोडीं? ॥ १३ ॥
अजामिळा पावन त्वांच केलें. । पातित्य नाम स्मरतांच गेलें. ॥
तां तारिला व्याध महाभिमानी. । तां बैसवीली गणिका विमानीं.॥१४॥
संहारिलें तां खरदूषणांला. । तां दीधलें राज्य बिभीषणाला. ॥
तूं अर्जुनाचे तरि अश्व धूसी. । तूं संकटीं पावसि तद्वधूसी. ॥ १५ ॥
अनेक इत्यादिक उद्धरीसी, । मदर्थ कां संशय हा धरीसी? ॥
असेच जे जे तुज अंतरेती, । कोण्या उपायें जन ते तरेती? ॥ १६ ॥
आयुःपयाचा अति गोड प्याला । हळूहळू काळबिडाल प्याला. ॥
त्वद्योग तो या समयांत नाहीं; । चुके कशी हे यमयातना ही? ॥ १७ ॥
शरीरसंरक्षणमात्र केलें; । वेंचून वायां वय सर्व गेलें. ॥
आतां असे अंत समीप आला, । म्हणोनि तूझा अवलंब केला. ॥ १८ ॥
तां घातलें ये मज मोहजाळीं. । कर्में मला बंधनरूप जालीं. ॥
हा वासनाबंध कदा सुटेना. । जन्मावळीचें बिरडें तुटेना. ॥ १९ ॥
प्रपंच हा दुर्वह कोण वोढी? । पदोपदीं यास पडेत वोढी. ॥
जेथें निधींचा समुदाय आटे, । कल्पद्रुमांचें न पुरेत सांटे, ॥ २० ॥
स्वधर्म येथें न घडेच कांहीं, । कधीं सुखाचा लवलेश नाहीं. ॥
महार्घ येथें परमार्थ जाला. । विवेक दारिद्र्यदशेसि आला. ॥ २१ ॥
माया मला लागट हे न सोडी. । अहो दुराशा मन नित्य ओढी. ॥
उभेच संकल्प विकल्प दोघे, । विरक्ति येथें मज काय भोगे? ॥ २२ ॥

तृष्णापिशाची बहु फार वाढे । त्रैलोक्यसंपत्ति धरून दाढे; ॥
क्षणेकही येथुन हे न फांके, । ब्रह्मांड जीच्या पदरांत झांके ॥ २३ ॥
या वासनेची सुजि वोसजेना. । पदानुसंधान तुझें सजेना. ॥
निवृत्ति कैसी मजला पचावी, । प्रपंच ईला जरि साप चावी? ॥ २४ ॥
हा क्रोधचांडाळ सदा विटाळी, । संपर्क याचा जन कोण टाळी? ॥
देहीं वसे वाघिणिसी अहंता, । असेस तूं येक इचा नियंता. ॥ २५ ॥
आधार तूं स्थावरजंगमांचा. । तूं भारही होसि भुजंगमाचा. ॥
अपार तूझा महिमा कळेना. । स्वरूप तूझें मज आंकळेना.॥ २६ ॥
असेत तूझीं चरितें विचित्रें । तसींच नामें सकळें पवित्रें. ॥
मदीय जिव्हेस अनेक कामें. । कदापि ईला न वसे रिकामें. ॥ २७ ॥
परापवादें अथवा विटाळे । इला कसें नाम तुझें उटाळे? ॥
जे काटली नित्य महानृतानें । ते क्षाळिजे कृष्णकथामृतानें. ॥ २८ ॥
समस्त शास्त्रांस पडेत मौनें. । शुकादिकांही विपरीत भानें. ॥
वेडावती वेद समस्त जेथें, । करूं तुझें वर्णन काय तेथें? ॥ २९ ॥
तथापि बांधिन कथा विचित्रा, । पदोपदीं पावन जे पवित्रा. ॥
तुझे कृपेच्या परि ईस पाया । पडे, तयीं हे नपवे अपाया. ॥ ३० ॥
जे बोलली भागवतीं पुराणीं, । विस्तारिली जे पुरुषीं पुराणीं, ॥
पवित्रकर्ती सकळा जगा या, । आधार ही थोर असे जगाया. ॥ ३१ ॥
त्वद्वर्णनीं हे रसना कवीची । प्रवेशतां, येति विवेकवीचि. ॥
मिळेत ही अर्थ बरे नवेची. । तो वंचलासे जन जो न वाची. ॥ ३२ ॥
असे मऱ्हाटी निजदेशभाषा, । नयेत उक्ती बहुशा विशेषा, ॥
तथापि जे कीं निजभक्त तूझे । न पाहती ते गुणदोष माझे. ॥ ३३ ॥
अगत्य नाहीं जनरंजनाचें. । लागे तुझें ध्यान निरंजनाचें. ॥
आराधनीं अन्य उपाय नाहीं; । समर्पितों याच उपायनाहीं. ॥ ३४ ॥
करूं न जाणें बहुशा जपाशी, । तथापि लागे मन तूजपाशीं. ॥
नेणें (चि) बालाबगलादिसेवा. । जाणें तुजे केवळ पाय, देवा. ॥ ३५ ॥
माझा मना, तूं असती बराडी; । कां भीमकीचा नव्हसी बराडी? ॥
हा स्नेह नाहीं वरपंगतीचा. । तूं लाभ घेयीं वरपंगतीचा. ॥ ३६ ॥

असे हरीही निजसोयरा, हो. । याच्या पदाची तुज सोय राहो. ॥
हें ब्रह्म नाना अवतारधारी; । तथापि हा कृष्णच तूज तारी. ॥ ३७ ॥
सत्संग आवश्यक आजि पाहें, । जो ईश्वरप्राप्तिस हेतु राहे. ॥
जो सज्जनांच्या निववी मनाला, । जो लाजवी, बा, वनचंदनाला.॥३८॥
राजा असे थोर परीक्षिती, हो. । कीर्ती सुधांशूस परीक्षिती हो. ॥
पुसे कथा तो मग हे शुकासी, । जीणें असे अत्यय पातकासी. ॥ ३९ ॥
द्वैपायना, योगिवरा, द्विजेंद्रा, । पौराणिका, सर्वकथासमुद्रा, ॥
ज्या सांगसी कृष्णकथा उदारा, । त्या नाशिती नित्य मनोविकारा.॥४०॥
कथारसें या मन हें विटेना । श्रीकृष्णपायींहुनि, हो, सुटेना. ॥
कथा पुसे आणिकही नवीना. । कां आपला संशय नाशवीना ? ॥४१॥
हे रुक्मिणी देववरें वरोरू, । नेली कसी द्वारवतीस भीरू ? ॥
स्वयंवरीं कृष्ण कसा वरी तें ? । केलें कसें साहस सावरीतें ? ॥ ४२ ॥
जिंकूनियां मागध, शाल्व राजे, । प्रताप ज्यांचा जगतींत गाजे, ॥
तेणें विवाहीं विधि राक्षसांचा । केला कसा ? सांग उदार साचा.॥४३॥
जाला असे जो उपजोन योगी, । क्षणेकही जन्मसुखा न भोगी, ॥
न आतळे जो द्विज अंशुकासी, । कृष्णीं महा भक्ति जया शुकासी.॥४४॥
कृष्णास तो वंदुनि विप्र भावें । प्रवर्तला तच्चरणप्रभावें. ॥
तत्त्वार्थ सांगेच परीक्षितीसी । असे कथा हे तुज रक्षितीसी. ॥ ४५ ॥
साहित्यस्वारस्य समस्त वेंचे । शब्दोदधीचे निवडून वेंचे. ॥
पवित्र हे कृष्णकथा रसाला, । जे नित्य आणी रस नीरसाला. ॥ ४६ ॥
गंगाप्रवाहोपम बोध जेथें । न जाय हा काय अशेष तेथें ? ॥
करूनि चित्तें अति सावधानें । हे आयकावी हरिसन्निधानें. ॥ ४७ ॥
जो हा महाविष्णु विराटरूपी, । चराचराची रचना निरूपी, ॥
तो गर्भ राहे मग देवईला. । संरक्षिती येउन देव ईला. ॥ ४८ ॥
सदा निराकार, निरीह भासे, । जें शुद्ध चैतन्यपणें विकासे, ॥
निर्माण ज्यापासुन विश्व जालें, । तें देवकीचां उदरास आलें. ॥ ४९ ॥
अव्यक्त जें व्यक्तदशेस आलें, । कारागृहीं तें अवतीर्ण जालें. ॥
भासे अकस्मातच बाळसेंही. ॥ तत्काळ आलें मग बाळसेंही. ॥ ५० ॥

हा बाळ सर्वांहुनि आगळा, हो. ॥ गळेत त्या आपण आगळा, हो ! ॥
तत्काळ जालीं उघडीं कवाडें. । तो पावला गोकुळही निवाडें. ॥ ५१ ॥
येऊन पाजी स्तन मावशी हे. । हा काय नेणे मग मावसी हे ? ॥
हा मोडिला बाळपणींच गाडा, । न भीतसे बाळक जो लिगाडा.॥५२॥
करीं करी रत्नजडीत सिंपी, । ते माय आगोदर पाय शिंपी. ॥
घालून पायांवर दूध पाजी, । ब्रह्मादि विश्वेश्वर ज्यासि राजी. ॥ ५३ ॥
उत्पन्न ज्यापासुन भूतसृष्टी, । काढी तयाच्या बहु फार दृष्टी. ॥
जो पूतनास्तन्यविषास प्याला, । ते माय देते गरळा तयाला. ॥ ५४ ॥

करी जो विश्रांती श्वशुरसदनीं शेषशयनीं,
कदा योगींद्रांचे क्षणभरि पडेनाच नयनीं; ।
पयःपानीं त्याचें मुखकमळ दुग्धें करि भिजे.
सुखें ये मातेच्या करयुगुलतल्पावरि निजे. ॥ ५५ ॥

न जाणें प्राग्जन्मीं कवण तप मातेस घडलें ?
यदीय प्रारब्ध प्रगटच असें हें उघडलें. ।
जयाचे हे ब्रह्मादिक विबुध लागेत चरणीं,
तया बाळा घेते उचलुन कडे नंदगृहिणी. ॥ ५६ ॥

अलिंदीं नंदाचे घन, रुचिर चैतन्य मिरवे,
जयाच्या माथांचे नव कुरळ शोभेत बरवे. ।
निजच्छंदें रांगे, विमल तळहातद्वय मळे,
पदस्पर्शें ज्याच्या तरुयुगुल तत्काळ उमळे. ॥ ५७ ॥

अनंत ब्रह्मांडें यदुदरदरीमाजि दडती,
जया चैतन्याचें स्तवन करितां वेद अडती, ।
जगत्कर्ता धाता सहज उपजे नाभिकमळीं,
विकासे त्याचा हा रुचिर रहिवास व्रजकुळीं. ॥ ५८ ॥

धरूनि हे अर्भकदेहलीला, । जे शोभवी प्रत्यह देहलीला, ॥
हे लोक ज्याच्या उदरांत माती । तें ब्रह्म टाकी वदनांत माती. ॥५९॥
जें अंगणीं येउनि नित्य खेळे, । मनोदयें जें चिखलांत लोळे, ॥
नंदालयीं बाळक धोंग त्याचें, । ब्रह्मादिकां दुर्लभ सोंग त्याचें. ॥६०॥

घरामधें अर्भकरूप रांगे, । पदोपदीं जो नवनीत मागे, ॥
ज्याच्या पदीं होति पवित्र गोठे, । ज्याच्या भयें गोरस नित्य गोठे.॥६१॥
हा आंगणीं घे अगणीत धांवा, । तथापि याच्या न पुरेत हावा. ॥
अग्रण्य भूमीरुह हा चढाया, । निष्णात गोपीगृह ऊघडाया. ॥ ६२ ॥
जो गोंविला बाळकवांसुरांनीं, । करीतसे नित्य निवास रानीं, ॥
मुखांबुजीं मंजुळ वेणु वाहे, । गोपांगनांची हरि वाट पाहे. ॥ ६३ ॥
वेणुस्वनें गोपसमूह मोहे; । टाकून धेनू वृशभास दोहे ! ॥
त्या गोपिका होति समस्त मुग्धा, । प्रत्यक्ष ज्या कीं घुसळीत दुग्धा.॥६४॥
घरोघरीं चौर्य करी मुरारी. । कुलांगनांच्या भुलवी कुमारी. ॥
असे जरी आपण आलकाहीं, । न देय येऊं पण आळ कांहीं. ॥ ६५ ॥
मिळोन तेथें मग गोपिकांहीं, । वदेत येऊन विरुद्ध कांहीं. ॥
आम्ही तुसीं काय वदों यशोदे ? । हा लाडका लेक घरीं वसों दे ॥६६॥
कर्मं करी नित्य महा अचाटें । केलीं मुलें हीं अवघीं अचाटें. ॥
दारापुढें खेळतसे लगोऱ्या. । लेंकी, सुनाही भुलवील गोऱ्या. ॥ ६७ ॥
हा खेळ खेळे यमुनाकदंबीं. । हा दृष्टि लावी ललनानितंबीं. ॥
असेत बाला सकला निरीहा; । तथापि वोढी उगला निरी हा. ॥ ६८ ॥
पतिव्रता ज्या अति आगळाल्या, । निजव्रतापासुनि त्या गळाल्या. ॥
चौढाळिलें गोकुळ सर्व येणें, । हें लोक बोलों न सकेत भेणें. ॥ ६९ ॥
उन्मूळिलीं काय म्हणोन झाडें ? । हा नासला बाळ तुझाच लाडें. ॥
कसे असे काय तऱ्हीं अरिष्टें । या गोकुळा आणिल हीं अरिष्टें ॥ ७० ॥
राम, कृष्ण, सखि, सोदर दोघे. । वाढवीस सुत नित्य अमोघे. ॥
त्यांत हा वडिल फार गुणांचा. । धाकटा चपळ हा अगुणांचा. ॥७१॥
सौंगड्यांस उठवून पहांटे, । नंदसूत सकळांत रहाटे. ॥
पाहतां हृदयतस्कर मोठा, । नेतसे सकळ गोरसमोटा. ॥ ७२ ॥
देवडे पद, उभारुनि बाहे, । गोधनें सकळ हे हरि बाहे. ॥
उठोन त्याची जननी यशोदा । तत्काळ त्याच्या मग जाय शोधा.॥७३॥
देखोन ईला हरि वावहावा । धरी यशोदा मग पाव डावा. ॥
बांधे तयाच्या उदरास दावें. । सौभाग्य ईचें कवणें वदावें ? ॥ ७४ ॥

समर्थ मायार्गल ऊखळाया, । तो गोंविला बाळक ऊखळा या. ॥
मातेस अन्याय समस्त मागें । त्या गोपिकांचे अपराध सांगे. ॥ ७५ ॥
सस्नेह माता मग त्यास सोडी; । तथापि तो नित्य करीच खोडी. ॥
अघासुरा मारुनियां, बकाला, । तसेंच वत्सासुरधेनुकांला, ॥ ७६ ॥
तृणापरी त्या तृणनामकाला, । भंगूनियां सौख्यसुकाळ केला. ॥
सर्व प्रकारें व्रज रक्षियेला. । प्रत्यक्ष हा पावक भक्षियेला ! ॥ ७७ ॥
जो नांदवी उत्कट गोपवाडे, । गाती तयाचे बरवे पंवाडे. ॥
पीतांबर, श्यामलरूपधारी, । सवेत्रवंशीकर जो मुरारी. ॥ ७८ ॥
कृत्यस्त्य पादांबुज, माळ कंठीं, । गोवृंद चारी यमुनोपकंठीं. ॥
माथां धरी रम्य मयूरबर्हें. । कर्मे करी नित्य महा अनर्हें. ॥ ७९ ॥
वाहे सिदोरीस उदास अंसीं, । उत्पन्न त्याचें भय होय कंसीं. ॥
अक्रूर तेणें मग धाडियेला. । घेऊन दोघां मथुरेस गेला. ॥ ८० ॥
कंसांबरें लूटुन आणियेलीं. । त्रिवक्र कुब्जा अति नीट केली. ॥
दारीं उभा उन्नत मत्त हस्ती । मारून, ते दंत धरीत हस्तीं. ॥ ८१ ॥
चाणूर हा, मुष्टिक दुष्ट जेटी । धाडीत मर्दूनि कृतांतभेटी. ॥
त्यानंतरें मातुळ देखियेला. । उडोनि कंसावरि कृष्ण गेला. ॥ ८२ ॥
धरून केशीं, मग खालता हा । पाडूनि त्यासीं मग होय 'हाहा;' ॥
कारागृहें सर्वहि फोडवीलीं; । ते मायबापें मग सोडवीलीं. ॥ ८३ ॥
व्यापार हा कंसवधान्त केला. । ते द्वारके श्रीहरि शीघ्र गेला. ॥
असे रिती हा हरि जन्मलासा । जाणोनि इच्छी कमळा विलासा. ॥
ज्याकारणें होय जळांत मच्छी । ते मानवी देह कसा न इच्छी ? ॥ ८४ ॥

कथा हे कृष्णाची सकलजगदानंदजननी.
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं.
प्रसंगें श्रोत्यांचे सकलहि महादोष हरती.
यदूत्तंसप्रेमें विषयरसगोडी विरसती. ॥ ८५ ॥

इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये कृष्णजन्मो नाम प्रथमः सर्गः ॥ १ ॥

---

# सर्ग दुसरा

उत्पत्ति हे आयिक भीमकीची,। श्रीकृष्णपादांबुजकामुकीची; ॥
दौःशित्य जीच्या श्रवणेंच मोडे,। लक्ष्मीपतीचें घर थोर जोडे. ॥ १ ॥
विदर्भदेशाधिप भीमनामा। राजा असे येक उदारधामा, ॥
जो धीर, गंभीर; महाप्रतापी,। जो लोकपालांसहि नित्य दापी. ॥ २ ॥
करीतसे पालन ये महीचें;। नयेंच घे उत्तम हेम ईचें. ॥
प्रजापरी पालितसे प्रजांला,। निजान्वयीं जो कुलदीप झाला. ॥ ३ ॥
असे तयाची मग मुख्य जाया,। त्याला असे तत्पर ते भजाया. ॥
विनीत अत्यंत, महाकुलीना,। कसें पतीचें मन आंकळीना? ॥ ४ ॥
मूर्धन्य जे होय पतिव्रतांची,। जिला महा आवडि ही व्रतांची, ॥
तिच्या गुणांची बहु त्यास गोडी;। तेही तयाचीं वचनें न मोडी.॥ ५ ॥
विभक्त त्यांचीं दिसती स्वरूपें,। असेंत चित्तें परि येकरूपें. ॥
तीं होति येकेंविण येक अंधे,। चाले महाप्रेम ऋणानुबंधें. ॥ ६ ॥
जे पाळिती नित्य अनेक इष्टें,। यथाविधीनें करितात इष्टें, ॥
जे सर्वकालीं करवीत पूर्तें,। नसे तयांचें तप हें अपुर्तें.॥ ७ ॥
क्रमेंच त्यांला सुत पांच झाले.। कनिष्ट हो चारि भले निघाले. ॥
रुक्मी असे अग्रज दुष्ट बुद्धि,। कदापि कांहीं न धरीच बुद्धी ॥ ८ ॥
घाली पिता नित्य तया पढाया,। पदोपदीं लागतसे अडाया. ॥
न जाय तो पुत्र कदापि साळे,। न आयके वाक्य, सदा पिसाळे. ॥ ९ ॥
टाकून दे सुंदर गद्यपद्यें,। त्या यादवांचींच वदे अवद्यें. ॥
म्हणे गुरू शिष्य नसे भलासा.। याची तुम्ही सत्वर जीभ लासा.॥१०॥
हळू हळू तो बहु होय मोठा.। आला असे काय कलंक पोटा? ॥
करी अवज्ञाच सदा पित्याची,। न पालटे रीति कदापि त्याची. ॥११॥
निघे जरी त्यास बहूत दाढी। तथापि ते बुद्धि न येचि गाढी. ॥
विवेक त्याचे हृदयीं वसेना,। अंधास आदर्श जसा दिसेना. ॥ १२ ॥
पित्यास पोटांतुनि दुःख वाटे,। तथापि त्याचे नव जाय वाटे. ॥
संबंध त्यासी बहुसा न पाडी। त्याच्या विचारांतुनि चित्त काढी.॥१३॥

चिंतावली माय तशीच त्याची। हा नायकें बुद्धि तशीच तीची. ॥
पदोपदीं येउनि शीकवीला,। तथापि तेणें उर पीकवीला. ॥ १४ ॥
ते त्रासलीसे सुतसंततीला,। कदापि नाहींच उसंत तीला. ॥
अपुत्र संसार म्हणे असावा,। कुपुत्र पोटीं सहसा नसावा. ॥ १५ ॥
निजोदरीं जे नवमास वाहे,। ते माय त्याचें मुखही न पाहे ॥
कुलास जेणें अधमत्व येतें,। संतान ते शल्य कसें न हो तें ? ॥ १६ ॥
ते त्या दिसापासुनि नित्य देवी। अनन्यभावें कमलेस सेवी. ॥
असे सुतेचीच तिला असोशी.। त्या आत्मजाचें अति दुःख सोशी.॥१७॥
न सेविती हे जरि लोकमाता,। कोठें इचा हा तरि शोक माता ? ॥
येके दिशीं फार विषण्ण झाली,। प्रत्यक्ष तीशींच वदों निघाली. ॥१८॥

"महालक्ष्मी, माते, कमलनिलये, हांस मजला;
मला तूझा आतां सकळहि मुदाही समजला. ।
स्वसा तूं धेनूची नियत असशी सिंधुदुहिता.
वराकी जाणें मी, जननि, तुजला काय दुहिता ? ॥ १९ ॥

नवांभोधीमध्यें असशि जननिर्वाण लहरी.
परब्रह्माची, वो नियत असशी तूं सहचरी. ।
महापापें, माते, न घडति मला काय अनयें ?
तुझीं आतां येथें प्रगट मजला होत अभयें. ॥ २० ॥

परब्रह्मच्छाये, कपटवनिते, होसि कमला.
प्रपंच्यामध्येंही जरि दिससि आकस्मित मला,।
करीतें विज्ञप्ती सभय तुज, वैकुंठवनिते,
कटाक्षप्रक्षेपें मज जिवावें, रत्नाकरसुते. ॥ २१ ॥

नसे हें निर्वाहें, जननि, मज सामर्थ्य भजनीं,
कृपाशीले, हेला म्हणुन न करीं मद्विधजनीं. ।
जगन्माते, येथें बहुत असती बाल तुजला;
विचारें पाहातां तुजविण नसे माय मजला. ॥ २२ ॥

प्रसंगें हे झाली, जननि, मजला वोळखि तुझी.
मनोवाक्कायें मी नियत न करीं स्वामिनि दुजी. ।

तुझ्याही भक्ताला प्रतिपद पडे संकट जयीं,
जगन्माते, तूझा अविहित दिसे लौकिक तयीं. ॥२३॥
असो चिंता माझी, जननि, पुरती येथुनि तुला.
नसे माझा कैसा अझुनि पुरता भोग सरला ? ।
असारीं संसारीं बहुत भवदाधार धरिला.
कृपाभिक्षा घालीं पदर तुज म्यां हा पसरिला." ॥ २४ ॥

अशी इची हे स्तुति आयकीली. । प्रसन्न तेही मग तीस झाली. ॥
स्वप्नीं तिला दर्शन दीधलें कीं । म्हणे, 'तुझी होइन मीच लेंकी.' ॥२५॥
त्यानंतरें जो तिस गर्भ राहे, । तें तेज ते शीतल कां न साहे ? ॥
क्लेशी करी तीस बहूत रुक्मी, । म्हणोनि आली उदरास लक्ष्मी. ॥२६॥
तत्काल आली तिस गर्भछाया, । प्रवेशली येउनि आदिमाया. ॥
आली तिच्या पांडुरता मुखाला, । ते काळिमाही कुचचूचुकांला. ॥२७॥

गजगति गमनीं ते पाउलें मंद टाकी,
प्रतिदिनिं उठतां हे हात भूमीस टेंकी, ।
त्रिवळि मग तयेची स्पष्ट मोडोनि गेली,
अनुदिन दिननिद्रा तीस येऊं निघाली. ॥ २८ ॥
जयिंहुनि उदरीं हे गर्भ वाढों निघाली,
तयिंहुनि कमलांची प्रीति उत्पन्न झाली. ।
यदुपतिभजनाचे डोहळे तीस व्हावे,
प्रतिदिन मन तीचें द्वारकेमाजि धांवे. ॥ २९ ॥

तों कांत आला सदनास तीच्या. । पाहातसे हो वदना सतीच्या. ॥
तें वक्र तेथें सुमुखी फिरावी; । दोघांत लज्जा तिसरी शिरावी. ॥ ३० ॥
तथापि तीची धरिली हनोटी, । तेही तयाचा मग हात लोटी. ॥
प्राणेश आंगावरि हात टाकी, । ते आपलें सर्व शरीर झांकी. ॥ ३१ ॥
ते बोलतां त्याजसमक्ष कोंडे, । वेणीस जीचे विलसंत गोंडे. ॥
सलज्ज जों जों बहु होय नारी, । तों तों हिच्या हेतुस हा विचारी. ॥३२॥
उच्छून नीवीनिचयास देखे. । तीचें समाधान बहूत राखे. ॥
तेणें तिची आवडि हो पुसावी, । क्षणेक तेणें मग ते रुसावी ॥ ३३ ॥

भूमंडळीं लभ्य तयास नाहीं । अशी नसे वस्तु कदापि कांहीं. ॥
ते कां न पावे मग डोहळ्यांला ?। करी तिच्या वल्लभ सोहळ्यांला.॥३४॥
धरीतसे थोर निधान पोटीं । म्हणोनि तीची भरितात वोटी. ॥
औदुंबरी माळ गळां न घाली, । जें पुत्रजन्मास बहूत भ्याली. ॥ ३५ ॥

असेपरी हे नवमास गेले. । प्रसूतिचे संनिध दीस आले. ॥
येके दिशीं मध्यम राति गेली, । कन्या तिला उत्तम येक झाली.॥ ३६ ॥
जे जन्मल्या माय कृतार्थ झाली, । तें स्वप्न देवी विसरोनि गेली. ॥
अनिंद्य हें सर्व शरीर तीचें, । न आढळे दूषण हें रतीचें. ॥ ३७ ॥

प्रवीण सर्वांहुनि हा विधाता, । कदापि याच्या न कळेंत धाता. ॥
सर्वोपमा मेळविजे अहो ते । तरीच हे सुंदर मूस वोते. ॥ ३८ ॥
चातुर्य वेंचे चतुराननाचें, । घडीत आलें तंव आननाचें. ॥
आकारलें रूप असेल जेव्हां, । तो भूलला काय नसेल तेव्हां? ॥ ३९ ॥

वृत्तांत बापें मग आयकिला । तेणें तिचा उत्सव थोर केला. ॥
द्वारप्रवेशीं बहु होय दाटी, । द्विजांस नाहीं परी आडकाठी. ॥ ४० ॥
देती विप्रां कांचनें युक्त गाई; । वादित्रांची होतसे थोर घाई. ॥
जे जे कोणी मागते लोक येती । त्यांच्या तेथें कामना पूर्ण होती. ॥ ४१ ॥

करी तिच्या उत्तम बारशाला. । दे राव वर्ग्यास अपार शाला. ॥
ठेऊनि हे रुक्मिणि नाम तीचें, । म्हणे, पहा बालक हें मतीचें. ॥ ४२ ॥
नियोजिलीसे तिस येक दायी, । जे भूपतीनें करिजे निधायी. ॥
तथापि ते वत्सल राजपत्नी । तें वाढवील किं अनेक यत्नीं. ॥ ४३ ॥

तिणेंच ते प्रत्यह खेळवावी, । ते पाळणां सुंदरि हालवावी, ॥
कडेसही घे बहु धाकटीला, । जे शोभवीते बहुधा कटीला ॥ ४४ ॥
जे नित्य शोभे बहु लक्षणांनीं । ते वाढलीसे बहुलक्षणांनीं ॥
आज्ञा करी हे मग पट्टराणी । धात्री नृपासंनिध तीस आणी. ॥ ४५ ॥

पित्यास जों जों बहु आवडावी, । तों तों तयासन्निध हे भिडावी. ॥
त्याभोंवतीं येउनि नित्य खेळे, । त्याचेच मांडीवर नित्य लोळे. ॥ ४६ ॥
जे लोबडे बोल तिला सुचावे, । तसेच त्याला बरवे रुचावे. ॥
जे क्लेश पुत्रें करिं फार पावे, । ईच्या गुणीं ते मग फार पावे. ॥ ४७ ॥

ते लाडकी होउनियां गुणांची। बहीण झाली परि दारुणाची. ॥
वेधा जिचे दूषणमात्र खोडी,। ते कन्यका काय करील खोडी? ॥ ४८ ॥
रुक्मी तिला बोल विरुद्ध बोले,। बसेत तीच्या हृदयांत भाले; ॥
तथापि ते राजसुता शहाणी। विरुद्ध वाचेस कदा न आणी. ॥ ४९ ॥
मुहूर्त केले तिस पर्करांला। घरोघरीं वाटिति शर्करांला. ॥
केले अलंकार तिला नृपानें,। तें लेववीलीं श्रवणास पानें. ॥ ५० ॥
नये शुकाची तुलनेस चोंची। ती नासिकाही मग माय टोंची. ॥
आणीक कांहीं तरि मायना कीं। म्हणोन घाली नथ माय नाकीं ॥ ५१ ॥

तदुपरि नितळे हे भीमकाची कुमारी.
मदननृपति जाला यौवराज्याधिकारी.।
तदवविभग किंचिद्बालभावासि टाकी.
सभय हृदयदेशा अंचलें नित्य झांकी. ॥ ५२ ॥

क्रमेंच तीचीं उजळेंच अंगें,। हे पाजवीली छुरिका अनंगें. ॥
हळू हळू यौवन हें झळंबे। ईला कसें शैशवही विसंबे? ॥ ५३ ॥
मुखेंदु जों जों बरवा सजावा,। तों तों इचा माज उगा झिजावा. ॥
ईच्या नितंबा गरिमान यावा। तथापि यावा इस फार यावा. ॥ ५४ ॥
लीलारसें हे सदनांत वागे,। पाठी इचे हंससमूह लागे. ॥
लाजेत ईचे कबरीस मोरें,। येती मुखासन्मुख हें चकोरें. ॥ ५५ ॥
अत्यंत त्यांची द्युति हे विकासे। सुवर्णपूगीफलयुग्म भासे, ॥
उठेत वक्षोरुह हे उठाणें,। या शैशवाचें उठवीति ठाणें. ॥ ५६ ॥
आली तिच्या ते जडता नितंबा.। हांसे तिचें तें मुख चंद्रबिंबा. ॥
शोभे तिचे पाठिस लांब वेणी.। प्रतिक्षणीं फेरुनि लेय लेणीं. ॥ ५७ ॥
होतांच हा निर्गम शैशवाचा। प्रवेशलासे गुण केशवाचा. ॥
ब्रह्मादिकांला न कळे तथा, रे,। तें ब्रह्म ईच्या हृदयांत थारे. ॥ ५८ ॥
सेवार्थ बंदीजन नित्य येती,। तेहा प्रसंगें वर वर्णिजेती. ॥
ज्याचे गुणीं रुक्मिणि कान देते। शरीर त्याला तरि कां न देते? ॥ ५९ ॥
तो द्वारकेचा वर नित्य गाजे। हे भीमकी ही नवरी अगा जे. ॥
मनोज मध्यस्थ करूं निघाला। मनोविपर्यास तयांस जाला. ॥ ६० ॥

परस्परांचे गुण दूत येती । परस्परें हे अनुरक्त होती. ॥
त्याच्या गुणें मन्मथ ईस बाधे । धनुष्य हें सज्ज तयास साधे.॥ ६१ ॥
जें कृष्णरूपें अवतीर्ण झालें, । तें मन्मथें ब्रह्म शरव्य केलें. ॥
हे वेदना दुःसहसी कळावी । म्हणोन किंवा स्मर शीक लावी ? ॥ ६२ ॥

जे आदिमाया प्रकृतिस्वभावें । स्मरे तिला ब्रह्म अनन्य भावें. ॥
तेही तदाकार तशीच झाली । स्वदेहभावा विसरोनि गेली. ॥ ६३ ॥

यदुपति पदपद्मीं चित्त आसक्ति पावे;
अवसर मदनाला तोच अत्यंत फावे. ।
अगणित मग त्याचे तीक्ष्ण नाराच येती,
कठिण हृदय तीचें नित्य भेदून जाती. ॥ ६४ ॥

परम विकल, येके आसनीं ते बसेना,
क्षणभरि जननीचे संनिधानीं असेना, ॥
अनुदिन मन तीचें कोटि संकल्प वेंघे,
हरिविण विषयांचा स्वाद कांहींच नेघे. ॥ ६५ ॥

विमल कमल हातीं भीमकी घेत नाहीं,
प्रतिवचन सख्यांला हे नसे देत कांहीं. ।
हरियुत हरितेचा वायुही फार मानी,
हरिविण दुसरा हा नायके शब्द कानीं. ॥ ६६ ॥

अशन वसन तीला सर्वथा हें न माने,
हरिरहित सुखाचा हेतु आणीक नेणे. ।
निशिदिन तिज लागे ध्यान हें द्वारकेचें.
तदितर दुसरें तत्प्रापक द्वार कैंचें ? ॥ ६७ ॥

हरिचरणवियोगें रात्रि तीला न लोटे;
युगसम तिजला हे दीसही जाति मोठे ।
कृशतनु तनु झाली, भूक ताहान गेली,
निखिल निजजनांची हे असे सांडि केली. ॥ ६८ ॥

ते भीमकी हे मग घोण घाली । चिंतासमुद्रीं प्रविशों निघाली. ॥
आंगास तीच्या कडमोड आला, । मुखेंदुही हा उतरोनि गेला. ॥ ६९ ॥

तत्काळ तन्मस्तक होय भारी । प्रवेशला येउनि कैटभारी. ।
सखीजनां सन्निध जे न आहे, । निजे उसां घालुनियां स्वबाहे. ॥ ७० ॥
विकासली पांडुरता कपोलीं, । गेला असे बोल बहूत खोली. ॥
जाळी तिला चंदन, चंद्र, वाळा । घडी घडी विव्हळ होय बाला ॥७१॥
सरीसृपी होय सरी गळांची. । झाली असे शेजहि इंगळांची. ॥
ते चालतां हे नुचलेत वाळे । शरीर तीचें सुकुमार झालें. ॥ ७२ ॥
हा पातकी मन्मथ थोर धन्वी, । हे राजकन्या सुकुमार तन्वी; ॥
कर्तव्य ईचें इस ऊमजेना. । कदापि कोठें सुख ऊपजेना. ॥ ७३ ॥
ते नित्य हातें मग दीस लोटी. । ते वागवी शोकसमुद्र पोटीं, ॥
शरीरसंताप नसे निवाला, । करीतसे नित्य अपन्हवाला. ॥ ७४ ॥

चटपट बहु लागे होय संतप्त बाळा.
प्रतिदिन मदनाचा होतसे हा उबाला. ।
चतुर तिज समाना सर्व तीच्या वयस्या
असति, परि तियेच्या नेणती या रहस्या. ॥ ७५ ॥

कुसुमशरचरानीं जर्जरीभूत झाली,
तदुपरि शरतल्पीं भीमकी हे निजेली; ।
परि इस भगवंतीं थोर निर्वाह आहे,
म्हणवुनि कठिणाही वेदना सर्व साहे. ॥ ७६ ॥

निरतिशय इची हे वेदना आयकीली,
त्वरित बहुत तेथें माय धांवोन आली. ।
मग तिस पुसतां हा कंठ अत्यंत दाटे,
नयनयुगें जलाचा पूरही थोर लोटे. ॥ ७७ ॥

न पुसत मज तूं गे चित्रशाळेस जासी,
अनियत अथवा ये गेहवापीस न्हासी, ।
सहज निजशिरीं हे नित्य घालून नाडे
प्रतिदिन फिरसी गे येकली कां अनाडे ? ॥ ७८ ॥

नकळत तुज किंवा भूक ताहान मोडे ?
अनियत तुज येती कां उगे आंगमोडे ? ।

निशिदिनिं कवणाचा हा निजध्यास लागे ?
अति कठिण अकालीं योग अभ्यासला गे. ॥ ७९ ॥
अझुणवरि न लागे कां तुला हे पिपासा ?
न मनिसि भय कांहीं, कां करीशी उपासा ? ।
झडकरि उठ आतां अल्पसें जेवि, मूली,
नियतच तुज आली हे असे अन्नभूली. ॥ ८० ॥

दिसति मज सख्याही सर्व तूझ्या लबाडा,
तुजच जवळि आतां होय याचा निवाडा. ।
अति परिचय यांसीं येक हा देखिलागे,
अभिनव कवणाची अन्यथा देखि लागे. ॥ ८१ ॥

मज तरि समजेना सर्वथा हे अवस्था.
न समजत करावी काय ईची व्यवस्था. ।
अनृत वदत नाहीं सर्वथा नावरेसी.
निशिदिन जगदंबा तूज राखो परेशी. ॥ ८२ ॥

प्रतिवचन न येतां, होय हे धावरीशी,
प्रगट म्हणत आहे गोष्टि नाहीं बरीशी. ।
प्रतिगृहिं नसती या काय लेंकी समा या,
बहुत सबळ माझी हे जळो व्यर्थ माया ! ॥ ८३ ॥

सकलहि कुलदेवी, येकदा ईस राखा,
प्रतिदिन इस दृष्टीं कांसवाचेच देखा. ।
नवस नवसिले हे व्यर्थ होऊं न द्यावे,
इस गुण दिधल्यानें सर्व संकल्प घ्यावे. ॥ ८४ ॥

घडिघडि तिस दावी पोखत्या बायकांला,
विसरुन मदनाच्या जाति ज्या सायकांला. ।
अतिशयित असे जे राजपत्नी अभिज्ञा,
सकलहि अनभिज्ञांहून ते होय अज्ञा. ॥ ८५ ॥

सचकित म्हणताहे लागि कोठें पहा, गे;
झडकरि तुम्हि येथें वैद्य कांणी बहा, गे. ।

घडिघडि इजला हे झांपडीही पडावी,
म्हणवुन मज वाटे भूतबाधा घडावी. ॥ ८६ ॥
कितियक मग तेथें नैपुणें दाखवीती.
अगणित तिज हातीं सांडणीं टाकवीती. ।
कितियक इजशीं या बोलती बोलणारी,
नकळत तुज झालें काय हें बोल नारी ! ॥ ८७ ॥
क्षणभर मग तेथें पाड त्यांचा पडावा,
दिवस तरि तयांला येक हा सांपडावा. ।
अनभिमत तयांचें वाक्य हें आयकेना,
चतुरपण जयांचें ईपुढें हें विकेना. ॥ ८८ ॥
तदुपरिहि पहाती वैद्य तीच्यीं निदानें;
तदुचित करवीती विज्ञ दैवज्ञ दानें. ।
धरुन तिस ललाटीं मंत्रवादी विभूती
करित असति, जीच्या निर्विकल्पा विभूती. ॥ ८९ ॥
तदपि न धरवे हा धीर यां पोखत्यांला.
सहज न समजे हो हा इचा रोख त्यांला !
अति विविध चरित्रें हांसिलासे मुरारी
अधिक मग तियेचें चित्तचैतन्य चोरी. ॥ ९० ॥
अगणित मग बाला दीर्घ निश्वास टाकी,
मुखकमल तियेचें अंचलें माय झांकी, ।
अनिश उभय पार्श्वीं फीरतां हे न भागे.
क्षणभरि इजला हे झोंप तेही न लागे. ॥ ९१ ॥
तदुपरि नृपपत्नी फार भेऊं निघाली,
सकरुण दुहितेला आपुली आण घाली ।
उठवुन निजअंकीं बैसवी तीस माता.
'अभिलषित तुझें तूं, भीमकी, बोल आतां. ॥ ९२ ॥
तूं खेळतां राजस भागलीशी, । कीं दृष्टि लागे तुज चांगलीशी ? ॥
संपर्ग झाला तुज सार्पिणीचा. । कीं लागला पालव पापिणीचा ? ॥९३॥

विकार भासे मज मन्मथाचा, । न सांपडे मार्ग मनोरथाचा. ॥
पडे बहू विस्मृति हे तुला गे, । कोठें तुझा जाउनि हेतु लागे? ॥ ९४ ॥
नसे तुझें हें मन आजि ठाईं, । अशा प्रकारें पडशी अपायीं. ॥
होईल शोकें हृदय द्विधा, गे, । हांसेत या तूज भवद्विधा गे. ॥ ९५ ॥
न लेति जे लोचन अंजनाला, । तथापि हे निंदिति खंजनाला. ॥
दिसेत कर्णे जपजागराचे, । करूं नको सोदर सागराचे. ॥ ९६ ॥
असीम लावण्य तुझें शरीरीं. । लाधेल हें कोण तऱ्ही शरीरी! ॥
यदर्थ चित्तीं अति तापसी, गे, । न आढळे (तो) मज तापसी, गे. ॥९७॥
प्रवेशला कोण असे त्रिवेणी? । प्रसन्न कोणास पिलाकपाणी? ॥
त्वदर्थ कोणें पडणीं पडावें? । हुताशनप्राशन वा घडावें? ॥ ९८ ॥
आजन्म कोणें उपवास केला, । ज्याच्या असे काम फळास आला ॥
कीं खड्गधाराव्रत वीर सेवी । त्याचीच तूं होशिल मुख्य देवी. ॥ ९९ ॥
किंवा असाधारण हे तपस्या. । तूं अन्यथा होशिल काय वश्या? ॥
असा महापूरुष कोण आहे । जो आजि तूझा अनुराग लाहे? ॥ १०० ॥
तूं तो स्वभावें असशी कुमारी, । हा कोपला दारुण शंबरारी. ॥
खचे तुझा उत्कट धैर्यसेतू । तूं आपुला हा मज सांग हेतू. ॥ १०१ ॥
शरीर तूझें मज पाहवेना, । त्वद्वेदनाही मज साहवेना,' ।
बोलोन ऐसें उगलीच राहे । तटस्थ तीचा मुखचंद्र पाहे ॥ १०२ ॥

यदुपतिविरहें जे शुष्क होवोनि गेली,
अविदितहृदया जे मन्मथाधीन झाली. ।
निरवधि जननीचा थोर संकोच झाला,
प्रति वचनप्रसंगीं प्राण कंठास आला. ॥ १०३ ॥

'तुज मज जननी हा सर्वथा भेद नाहीं.
नव्हतिल तुज कैशा मद्गता वेदना ही? ।
नियमितच असें मी श्वासनिश्वास तूझा,
तुजविण दुसरा हा प्राण नाहींच माझा. ॥ १०४ ॥

परि, जननि, सुतेचा लाभ हा होय ज्याला,
नियत समजताहे थोर धिक्कार त्याला.

परम अधम हें स्त्रीजन्म वाईटवाणे,
उपजत परचित्ताधीन तेणें रहाणें. ॥ १०५ ॥
अनुपद तुझिया मी व्यर्थ पोटास आलें,
परम अनुपयोगें भार भूमीस झालें.
अगणित अपराधी मी तुझें लेंकरूं गे,
अनुचित तुजशीं हे वंचना कां करूं गे ? ॥ १०६ ॥
प्रगट म्हणसि जो हा कोपला शंबरारी,
अविदित तुज कैसा तात त्याचा मुरारी ?
वदत वदत ऐसें आडवी लाज आली.
तदुपरि मग बाला खालती मान घाली. ॥ १०७ ॥
अविदित दुहिताभिप्राय विज्ञात झाला.
नरपतिरमणीचा सर्व संदेह गेला.
प्रमुदित मग माता कन्यकेला बुझावी,
तदपि परम मुग्धा ईज लाहे बुजावी. ॥ १०८ ॥
तदुपरि जनयित्री फार उद्विग्न झाली;
पतिसमिप मृगाक्षी तेच वेळेस गेली.
सविनय मग त्यासी हात जोडोनि बोले,
अपरिमित जलाचे पूर नेत्रांस आले. ॥ १०९ ॥
'उपवर मुलि जाली, बोलतां येत नाहीं.
वरविषयक चिंता हे नसे होत कांहीं. ।
यदुवर, अवतारी, पुत्र जो देवकीचा,
गुणनिधि, अवधारीं प्राण ये भीमकीचा. ॥ ११० ॥
पदयुगल हरीचें ईस आदान आहे.
तदितर वरवार्ता सर्वथा हे न साहे. ।
म्हणवुन, पृथिवींद्रा, गोष्टि हे आयकावी,
त्वरित मुलि उदारा केशवा आजि द्यावी.' ॥ १११ ॥
वचन मग विदर्भाधीश बोलों निघाला.
' मजवरि अमृताचा लोट कोठोनि आला ? ।

अगणित परिपाका पुण्य संपूर्ण आलें,
अघटितघटणेनें दैव किंवा उदेलें? ॥ ११२ ॥
तदुपरि मग दोहीं हाच निर्वाह केला.
म्हणति हरिस देऊं आपुले कन्यकेला. ।
नरपतिमुखिंची हे गोष्टि बाहेर आली,
हळुहळु तनयेच्या कर्णमूलास गेली. ॥ ११३ ॥
परम अधम रुक्मी जो महाशीघ्रकोपी.
प्रकट म्हणति याचे दोष हे कोण थोपी? ।
बहुतच अविवेकी होय संक्षुब्ध तैसा,
हुतवहवदनीं हा तैलसंपात जैसा. ॥ ११४ ॥
उपजत खल जो कीं दुष्टबुद्धि स्वभावें,
अनिश यदुपतीशीं वर्ततो वैरभावें ।
जनक मग विचाराकारणें त्यास बाहे.
अधम तंव तयातें पुत्र सक्रोध पाहे. ॥ ११५ ॥
तदुपरि हरिनिंदा जे मुखांतून आली,
स्तुतिपर परभागें ते महा पुष्ट झाली. ।
अनृत वचन कांहीं वैखरी हे वदेना
सहज हरिचरित्रा दोष येऊंच देना. ॥ ११६ ॥
कथा हे कृष्णाची सकल जगदानंदजननी.
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं. ।
प्रसंगें श्रोत्याचें सकलहि महा दोष हरती,
यदुत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ ११७ ॥

इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये
द्वितीयः सर्गः ।

# सर्ग तिसरा.

रुक्मी म्हणे हें तुज काय झालें? । कुलास या दूषण थोर आलें. ॥
विचार तूझा मज हा न माने, । किंवा इचें प्राक्तन कोण जाणें. ॥ १ ॥
विवाहकार्यीं स्थिरता धरावी, । त्वां आपुली तांतडि आंवरावी. ॥
जें येकदां कृत्य घडोन येतें । विचारल्यावीण करूं नये तें. ॥ २ ॥
हिमालयें जो अविवेक केला । तसाच त्याचा परिपाक झाला. ॥
ये पार्वतीचे पडला कपाळीं । अद्यापि पाहे न चुके कपाळी. ॥ ३ ॥
त्याचेंच त्वां हें मत आदरीलें । कां आपलें पौरुष आंवरीलें ॥
मला अभिप्राय कळों न देशी, । त्या यादवांचे गुण नित्य घेशी. ॥ ४ ॥
मुखांबुजीं संतत वेणु वाहे, । गोपांगनांचे अपशब्द साहे, ॥
धरी शिरीं केवळ मोरपीसें । तें देवकीचें तरि पोर पीसें. ॥ ५ ॥
जो हा गुणग्राहक रानटांचा, शोभे सदा वेष बरा नटाचा; ॥
असे जया संगति गोवृषांची । तो काय जाणे स्थिति मानुषांची! ॥ ६ ॥
जेणें सखा मातुल हा वधावा । संबंध त्यासीं तुजशीं बधावा, ॥
त्या मावशीच्या तरि घातक्याला । कन्या कशी देशिल पातक्याला! ॥ ७ ॥
जो गोकुळीं गोवळ मातलाहे, । वक्षस्थळीं जो हरि लात लाहे, ॥
तो ईजला वल्लभ मी करीना । ज्याचा मला हा कळला करीणा. ॥ ८ ॥
असे तुझी मूलि महागुणांची, । पत्नी कशी होइल निर्गुणाची? ॥
ज्याकारणें हे विलपे वराकी । तो काय ईला समजे गुराखी? ॥ ९ ॥
नृपा तुला उत्तम कारि जाली । दैवें निघाली परि हेरि जाली, ॥
जे भाळली केवळ गोवळाला । कलंक लावी विमळा कुळाला. ॥ १० ॥
आणों नको यास मनुष्य देहीं. । असे सदांचा हरि हा विदेही. ॥
निर्द्वंद्व, निःसंग, महा अकर्मी, । याची नसे दृष्टि मनुष्यधर्मी. ॥ ११ ॥
लज्जा न पावे हरि अग्रजाची, । जो गोकुलग्राम समग्र जाची, ॥
जो नित्य वृंदावनभू विहारी, । जो गोपकन्यावसनांस हारी, ॥ १२ ॥
सबाह्य अभ्यंतर कृष्ण काळा । कदापि नाहीं वचनास ताळा. ॥
कदापि जो धर्म अधर्म नेणे, । हा येक पाटश्वरवृत्ति जाणे. ॥ १३ ॥

हा एक जाणे विधि वा हल्याचा । विचारितां केवळ बाहल्याचा ॥
हा हुंबरी घालुन रे शहाणा, । घेऊन काठी, चढवी वहाणा. ॥ १४ ॥
न आडलें हे कुळगोत कांहीं, । विचारितां यास ठिकाण नाहीं. ॥
देऊं नको मूलि, लहान राया । जाणो नको गोष्टि अहा वराया. ॥१५॥
ज्यांच्या महा कुत्सितनांदणूका, । सुनांस नाहीं तरि कामणूका, ॥
ज्या भक्षिती केवळ ताकघाटा, । विकावया गोरस नेति हाटा. ॥ १६॥
जो गोरसें गोवळ नित्य धाणे, । तो काय या कामरसास जाणें ॥
मायाबळें केवळ विश्व मोही, । जाला तुला वल्लभ आजि तोही. ॥ १७॥
भूतांस जें होउन भूत लागे, । तें हें महद्भूत जगांत जागे. ॥
जळीं स्थळीं व्यापक रूप ज्याचें। न मानिसी तूं भय आजि त्याचें॥१८॥
जाला असे जो उदकांत मासा, । तसाच हा कांसवही अमासा, ॥
त्यानंतरें सूकर घोररूपी, । नृसिंह तो त्याहुनही विरूपी. ॥ १९ ॥
तसाच हा वामन निर्विकारी । झाला बळीचे घरिंचा भिकारी. ॥
जो आपली भार्गव माय मारी, । तुम्हांस तो निर्दय काय तारी ? ॥२०॥
गमाविलें पौरुष रामरूपें । तें मर्कटें मेळविलीं अमूपें. ॥
रानामधें टाकुन जाय राणी, । असा नसे आणिक तो अडाणी. ॥ २१ ॥
हा आठवा चालक कृष्ण मोठा, । संबंध त्यासीं तुज आजि खोटा; ॥
यालागिं जे जे जन आठवीती, । ते सर्व संसारसुखा मुकेती. ॥ २२॥
उत्पन्न जो होय चहूं भुजांचा । विटंबिला अन्वय भूभुजांचा ॥
उरीं जयाचे मिरवे लहासें । या सोयऱ्यांचें करिशील हांसें ॥ २३ ॥
पडे पहा हे अकुळी कुलीना, । शची दिसे जीजपुढें मलीना. ॥
वरी जयीं हे वरदा विपारा । जाइल हे कीर्ति समुद्रपारा. ॥ २४ ॥
हे गोष्टि माझी हृदयीं धरावी, । वार्ता हरीची सहसा त्यजावी. ॥
वसुंधरा उद्वस आजि झाली ? । पुंसृष्टि किंवा अवघी बुडाली ? ॥२५॥
जो चैद्यदेशीं मदघोष आहे, । विख्यात ज्याचें कुल, शील पाहे, ॥
आहेच पूर्वीहुन सोयरा जो । संबंध त्यासीं तुजसीं विराजो. ॥ २६ ॥
कुमार त्याचा शिशुपाल नामा । उत्कृष्ट सर्वांहुन, सार्वभौमा. ॥
उदार, गंभीर, महाभिमानी. । या यादवांला तृणतुल्य मानी. ॥ २७ ॥

विचारिलीं राजकुलें अशेषें । हा श्लाघ्यसंबंध दिसे विशेषें. ॥
ये भीमकीनें तप काय केलें ? । दैवें इच्या हेंच घडोन आलें. ॥ २८ ॥

अत्यंत हा आग्रह देखियेला; । पुत्रास तो भीमक वश्य झाला; ॥
कर्तव्य दुष्टाप्रति काय चाले ? । नेत्रीं विषादें जलबिंदु आले. ॥ २९ ॥

पाचारवी पुत्र समस्त जोशी, । प्रत्युत्तराची न धरीच गोसी. ॥
जसें तसें केवळ लग्न काढी, । चैद्येश्वरा सत्वर मूळ धाडी. ॥ ३० ॥

कोठ्या थट्या मुक्त समस्त केल्या, । प्रमाणग्या आपण देववील्या. ॥
सभोंवते भोंवति सर्व सेटे । रावेत तेथें कितियेक वेंठे. ॥ ३१ ॥

स्थळीं स्थळीं मंडप घालवीले, । प्रसाद अत्युत्तम झाडवीले, ॥
सवारिल्या राजसभा प्रशस्ता, । वारांगना आणविल्या समस्ता. ॥३२॥

त्वरित मुळचिठ्या त्या सोयऱ्यांला लिहील्या,
रथ, तुरग, तुरंगी, पालख्या पाठवील्या. ।
सहज रिपुपणें जो श्रीपतीचा विरोधी,
म्हणवुन मग मार्ग द्वारकेचा निरोधी. ॥ ३३ ॥

न पुसत जनकाला चालवी हातरोखे. ।
तदुपरि सचिवांची बुद्धि सर्वत्र रोखे. ।
तटति सकल कार्यें, हा पडे हे प्रवाहीं,
बहुतच मन घाली सोदरीचे विवाहीं. ॥ ३४ ॥

द्विपवर अवलोकी आदरें आंदणाचे,
क्षितिधर अथवा जे भारती अंजनाचे. ।
निवडुनि मग घोडे काढिले फार यानें,
जवन पवन जीहीं जिंकिलासे रयानें ॥ ३५ ॥

अति रुचिर रथांच्या आणवी संचयांला
हयनिवह नियोजी जे महासंच यांला ।
मणिखचित अपारा पालख्या, तख्तरावे
घडिघडि अवलोकी; हा भरे येच हांवे. ॥ ३६ ॥

पट्ट पटह, पताका, आतपत्रें उदंडें,
शशिकरविशदें तें चामरें हेमदंडें, ।

कनकमय कमाना, त्या गदा दुर्निवारा,
  सित शर तरवारा तीक्ष्णधारा अपारा. ॥ ३७ ॥
मग जडित कडीं तें, मुद्रिका, कर्णभूषा,
  पदकयुत गळांच्यां सांखळयाही विशेषा, ।
कनकघटित माळा, हार मुक्ताफळांचे,
  अति तरल विलोकी घाट ते मेखळांचे. ॥ ३८ ॥
तदुपरि जरतारी मंदिलें उंच वोली,
  पदुतर पटकेंही जें अमोलिक मोलीं. ।
निवडुन डगल्यांला नीलखा बेतवील्या.
  तदुचित सुरवारा तत्क्षणीं शीववील्या ॥ ३९ ॥
मखमल, सखलादा, सोपशाला अपारा,
  मृदुतर थिरमे, त्या कोंचक्या कोरदारा, ।
अतळस कुतन्याहीं साहिव्या रुंद वोली,
  बहुत सखर सेले चांगले आठ गोली. ॥ ४० ॥
पाटाऊं म्यानबंघा, तडप आणि धस्या, भेद खंबायितांचे,
  लाखी, माची, दुरंगी, बहुत ढिग तसे ताफत्या बाफत्यांचे,
साड्याही नौपटीच्या, कतिपय लुगडीं, जें नवें पांजणीचीं
  पीतें, शोणें, बनोसें, भरजर अवघीं पातळें पैठणींचीं. ॥ ४१ ॥
मुक्ताशेखर, पोंहच्या धुकधुक्या, हीरांगदें उज्वलें,
  पाची, हीरक, पद्मराग, लसणें, गोमेद, मुक्ताफळें. ।
सत्कृष्णा गरुनिर्मिता उदबत्या, काश्मीर कस्तूरिका,
  चोवा, चंदन, मोगरेल अतर, श्रीखंड खंडे, बुका. ॥ ४२ ॥
हांडे, कुंभ, पळया, परात, तवल्या, गुंडे, तपेलीं घडे,
  गंगाळें, चरव्या अनेक, निवडी सोन्यारुप्यांची जडें ।
तांबे, जांब, खुजे, प्रशस्त तिवया, ताटें नवीं तासकें,
  वाट्या लाहनशा, तशा तबकड्या, केल्या महाशासकें ॥ ४३ ॥
चौक्या सुंदर, हेममंचक, तसे चौरंग, त्या न्याहल्या,
  नीशारादि पलंगपोस, पडदे, गाद्या, उशा, पाहिल्या. ।

प्रस्तावे, समया, रुमाल, तबकें, प्याले, डबे, आरसे,
पंखे, मोरछलें, कितेक निवडीं तस्तें प्रशस्तें पुसे. ॥ ४४ ॥
सर्जे, तोडर, पाखरा, सजहुमे कंडे, पटे चांगले,
सीले टोप अनेक हा निवडितां ते लोकही भागले. ।
डेरे, खांबजडीत उंच अवघे, भारी छमीने जरी,
बाडें सुंदर खाचगे नवग ज्या सिद्धाच होत्या घरीं. ॥ ४५ ॥
तक्क्यांना मदगर्द पोश, सुजन्या, लोडें दुलीचे नवे,
सत्रंज्या अति विस्तृता, बचकण्या आलोकिले चांदवे. ।
गंजीफा, सतरंज चोपट नवें तें नर्दही सांग जे,
खाशांच्या पिलसो नसोत म्हणती त्याला बहू रागिजे. ॥ ४६ ॥
दासी, दास, सवत्स धेनु, महिषी, दासेरकें बेसरें,
रेडे, बोकड, येडके, वृषदुमे, सौगंधिकें मांजरें, ।
चित्ते, बाजजुरे, विहंगम तुरे, जे हे ससाणे बरे,
लावे, तित्तिर, मोर, थोर बदकें, रावे महासाजिरे. ॥ ४७ ॥
येला कंकोल, पूगीफल, खदिर, शशी, जायपत्री, लवंगा,
बादामें, आकरोट खिसमिस उतत्या आणवील्या सवंगा.
गोडंब्या, नारिकेलें, खजुर आणि खडीशर्करा, शुद्ध चीनी.
जीरें, शुंठी, मरीचें, हळदि बहुतशी, हिंगही दारचीनी. ॥ ४८ ॥
दाळिंबें, सोनकेळें, पनस, अननसे, जांबळें, मातुलिंगें,
अंबे, लिंबें, सुरंगें, टरबुज, पपये, अंजिरें हें कलिंगें,
शेपें, शीताफळेंही, खरबुज, खिरणी, सुंदरें, तूत, बोरें,
सत्पाळें, ऊंस, पुंडे, कविठ, कमरखें, वाळकें सूक्ष्म, थोरें. ॥ ४९ ॥
गोधूम, तांदुळ, तुरी, मुग, माष, शाली,
तीळें, तुपें, गुळ, चणे, तिळ येति काळीं ।
पानें नवीं, दळदरें रुचिरें विड्यांचीं.
आसेति दिव्य कुसुमें बहु केवड्याचीं. ॥ ५० ॥
सकल संपति यद्यपि आयती, । तदपि होति समस्तहि आयती. ॥
चहुंकडे फिरती परिचारिका । बहुत भीति तया अविचारिका. ॥ ५१ ॥

दळण, कांडण, पेषण, चाळणें, । वइंचणें, निसणें, आणि गाळणें, ॥
कणिक, शुद्ध पिठी, सपिठ रवा । म्हणति त्या गहुं आणिक ओलवा.॥५२॥
सहज सुंदरसूद कुटुंबिनी । हळुच त्या मग येति नितंबिनी. ॥
वळवटें वळिती जिव आटिती । बहुत पातळ पापड लाटिती. ॥ ५३ ॥
विविध त्या मग घालिति लोणचीं, । तिरकुटें नसती अति वाणिचीं. ॥
सहज लग्न निघे बहु तांतडी । म्हणुनि होय पुढें अति तांतडी. ॥ ५४ ॥

अपरिमित वडे हे वाळती कोहळ्यांचे.
दिवस जवळ आले बोलती सोहळ्याचे. ।
दृढतर तिळवे हे, गोड अत्यंत लाडू,
प्रिय परम जसे हो सोयऱ्यां माजि साडू. ॥ ५५ ॥
निवडुनि शिशुपाला कारणें हा मुकासे.
अगणित भरती हे नित्य जेथें नकासे. ।
तदुपरि वरपक्षीं लेहवी लोक खासे,
घडि घडि जनकाच्या जो विचारास हांसे. ॥ ५६ ॥
अविनय तनयाचा देखिला स्पष्ट भारी.
नरपतिरमणी ते खोंचलीसे जिव्हारीं. ।
मुखकमल तियेचें स्वच्छ विच्छाय झालें.
तदुपरि अविलंबें आंग मोडून आलें. ॥ ५७ ॥
न कळत हृदयेशा स्वीय गेहास गेली.
निजकनकपलंगीं भामिनी ते निजेली. ।
वचन परिजनांसी चंद्रवक्त्रा वदेना.
तनयकृत विचारा व्यक्त होऊंच देना. ॥ ५८ ॥
नरपतिदुहितेला माय येतां दिसेना,
तदुपरि मग तीचें चित्त कोठें बसेना. ।
घडि घडि निजगेहा आंत बाहेर येते,
अनिमिष जननीची वाट बाला पहाते. ॥ ५९ ॥
त्वरित बहुत घाई होतसे आपतीची.
क्षणहि मन न घाली सर्वथा माय तीची. ।

तदपि परिजनांला हेतु याचा पुसेना,
सुलज बहुगुणांची मायसीं जे रुसेना. ॥ ६० ॥
कुचकुच सखयांची अन्यथा देखियेली;
मग परम शहाणी तत्त्व जाणोन गेली. ।
नरपतितनयेचा सर्व उत्साह आटे;
प्रलयजलधि किंवा लोटला तीस वाटे. ॥ ६१ ॥
स्थगित मग मृगाक्षी ते घडी येक राहे,
अति चकित दहाही शून्य दिग्भाग पाहे. ।
विसर तिस पडे हा कांहींही आठवेना.
हृदयकमलकोशीं दुःख हें सांठवेना. ॥ ६२ ॥
अनभिमत विचारें तें तिचें चेत लासे,
विरहदहन आंगीं मागुतीं चेतलासे. ।
अपरिमित तियेला येति तेणें उमासे.
घडिक म्हणति जाऊं प्राणही हे अमासे. ॥ ६३ ॥
क्षितिपतितनया जे मन्मथाधीन झाली,
बहुत सबळ तेव्हां मूर्च्छना तीस आली. ।
परम विकल बाला नावरी जे शरीरा,
धरणिवर पडे निश्चेतना ते अधीरा. ॥ ६४ ॥
तदुपरि सखिया त्या सर्व धांवोनि येती.
नवकिसलयतल्पीं तीजला नीजवीती. ।
घडि घडि करिते हे भीमकी घालफेडी,
अगणित ऋण किंवा मन्मथाचेंच फेडी. ॥ ६५ ॥
अनुपद तिस कोणी विंजणें जाणवीती.
कितियक मग तेथें चंदनें आणवीती. ।
कितियक नलिनीचीं तें दळें कोमळेंसीं.
धरिति हृदयदेशीं संगतें शैवळेंसीं. ॥ ६६ ॥
तिजजवळि सख्यांचा बैसला थोर पाळा.
कितियक रचिती त्या दिव्य कर्पूरमाळा. ।

किंतियक मणिबंधीं बांधिती त्या मृणाळें.
म्हणतिच 'शिशुपाला, हो तुझें तोंड काळें.' ॥ ६७ ॥
परम विकल तन्वी, हालवील्या न हाले.
सशपथ सखियांनीं बोलवील्या न बोले. ।
सहज यदुपतीचें नाम जे घेत आहे,
उघडुन मग डोळे तीकडे मात्र पाहे. ॥ ६८ ॥
मुखरणि सखियांची सर्व संमर्द वारी.
बहुत जवळि केली भूपतीची कुमारी. ।
हळुहळु मग काढी श्रीपतीचीच वार्ता,
न वदत तिजशीं हे बोलती तीस धूर्ता. ॥ ६९ ॥
यदुपतिपदवार्ता तन्मुखांतून येतां,
लगबग बहु झाली मूर्च्छयेलागिं जातां, ।
सकरुण सखयेसी भीस्मकी वाक्य बोले
सहज मृदु, जयाशीं काय पीयूष तोले ? ॥ ७० ॥
कळत कळत होशी आजि कां तूं अजाणा ?
अजुणवरि कशी या नेणसी पंचबाणा ? ।
अति कठिण, सये, हें चाप याचें जळेना !
त्वरित बहुत याची कां चिता पाजळेना ! ॥ ७१ ॥
व्यजनपवनयोगें होतसे हा उबारा;
अनिश तपति किंवा सूर्य येकत्र बारा. ।
खुपति मज शरीरीं सर्व तल्पप्रसूनें.
निपटच, सखि, डोळेझांक केली प्रसूनें. ॥ ७२ ॥
किति दिस करपत्रीं आपला जीव घालूं ?
निशिदिन मदनाला कोठपर्यंत डालूं ? ।
हळहळ बहु झाली होय संसार वारा.
मजवरि फिरली हे दैवदुर्वार धारा. ॥ ७३ ॥
रतिपति मज पाठीं कां, सयें, लागला, गे, ?
यदुकुलतिलकाचा हा कसा लाग लागे ? ।

दिवस कठिण कंठीं मी पराधीन बाला.
मुररिपुकरुणेचा नाढळे हा जिव्हाळा. ॥ ७४ ॥
जिव बहु उबगे हा, गोष्टि कांहीं रुचेना.
निजहित मज आतां सर्वथा हें सुचेना.।
घडिघडि बहु, बाई, बोढती सर्व सांवा.
यदुपति मज भेटे कैं जिवाचा विसांवा? ॥ ७५ ॥
अघटित घटना हे मांडिली या विधीनें.
कठिण हृदय केलें कां कृपेच्या निधीनें?।
झडकरि जरि माझा येकदां जीव जाता
निजकुळपुरुषार्थी बंधु निश्चिंत होता. ॥ ७६ ॥
कनक, रजत वेंचे नित्य खंडीच खंडी,
परि मन जननींचें पातकी हा विखंडी.।
न पुसत परभारीं चालवी राजकार्य,
नरपतिपरिपाटी टाकिली यां अनार्यें. ॥ ७७ ॥
परम अधम रुक्मी हा महा तोंडखोडी,
नियतच वडिलांच्या जी विचारास मोडी.।
विकत कळि जयानें घेतली आजि मोलें,
अनुदिन बहुला, गे, बाप याच्याच बोलें. ॥ ७८ ॥
श्रुतिनिवह जयाला बोलती 'नेति नेति'
निजहृदयनिकेतीं नित्य योगींद्र नेती,।
निशिदिन शितिकंठा हा जयाचाच धंदा,
घडिघडि बहु त्याची हे घरीं होय निंदा. ॥ ७९ ॥
निजहित समजेना, लिप्त हा होय दोषें.
तरुन कितिक गेले पातकी नामघोषें.।
निजपदभजकांची हेळना होय जेथें,
त्वरित बहुत धांवे द्वारकानाथ तेथें. ॥ ८० ॥
सकरुण भगवंता, जाशि तूं आज कोठें?
तुजविण पडलें हें जाण संकष्ट मोठें.।

मजच वर न मानें लग्न वायां बधावें,
झडकरि बहु माझ्या धांवण्या आजि धांवें. ॥ ८१ ॥
विविधविषयतृष्णादुर्निवारप्रवाहीं
पडति जन, तयांला नाठवे आजि कांहीं. ।
निजगुणसमुदायें यांस वोढून काढीं,
झडकरि अथवा ये नाम नौकेस धाडीं. ॥ ८२ ॥
सहज घडुन आलें ये विदेशीं रहाणें. ।
तुजविण उगवी हे कोण माझीं रहाणें? ।
त्वरित बहुत आतां येकदां भेटि द्यावी,
उचलुन अथवा हे आपुली दासि न्यावी. ॥ ८३ ॥
स्मरण तुज, मुकुंदा, कां नव्हे आजि माझें?
तुजविण मज माझा देह हा होय ओझें. ।
झडकरि अथवा हा नेशिना जीव देवा!
रवितनयतुलायारूढ देखेन केव्हां? ॥ ८४ ॥
कृपादृष्टीं पाहें, मज कवण आहे यदुपती?
मला या दुष्टांचीं तिखट वचनें नित्य खुपती. ।
सुखें या प्राणेशीं नियतच पडो आजि विघडो,
भवन्निंदालेशश्रवण परि हें येक न घडो. ॥ ८५ ॥
महादैत्यश्रेणी अनुदिन असंख्यात वधिशी.
प्रसंगीं ये कैसें अतिशयित ताटस्थ धरिशी? ।
जया सिंहा मत्तद्विरदकरटस्फोटन घडे,
तयाला जंबूकापसददमनीं संकट पडे! ॥ ८६ ॥
गजेंद्रासाठीं तूं झडकरि कशी टाकिशि उडी?
परामर्शी येशी द्रुपदतनयेच्या घडिघडी. ।
ध्रुवप्रल्हादादी प्रियतम महा होति तुजला;
तयांपेक्षां कैसें निपट धरिशी दूर मजला? ॥ ८७ ॥
अनेकां जन्मांचा परिचय जयासीं बहु असे,
तया तूझें, कृष्णा, कठिण मन सर्वांहुन दिसे. ।

जगज्जीवा, किंवा दुरितचय माझा बहुतसा
अकारुण्यें तूझ्या परिणत असा होय सहसा. ॥ ८८ ॥
सुराराध्या देवी मजवरि उदासीन सकला
कशी जाली? मी तों निपटच पडें आजि विकला.।
सहाकारी माझा यदुपति पहा आजिच अडे,
कसा येकायेकीं मजवरि महापर्वत पडे! ॥ ८९ ॥
अवो बाळे, बाळे जडित तुज वाहेन बरवे.
तिहीं लोकीं तूझें अतिशयित सामर्थ्य मिरवे.।
मला तूं ये वेळे त्वरित जरि पावेसि जननी,
मनोभावें तूझें अनिश यश गाइन वदनीं. ॥ ९० ॥
यथाकाळीं, काळी, करिन भवदाराधन बरें;
महाकल्पांतींही उपकृति तुझी हे न विसरें.।
महेशे, कृष्णाचें त्वरित बहु आकर्षण करीं;
करीं, माते, आतां झडकरि मला येथुनि धरीं. ॥ ९१ ॥
अनाथांचे नाथे, सुमुखि, विमुखी होसि मजशीं.
अवस्था माझी हे समजशि; वदों काय तुजशीं?।
प्रपंचीं ये होता बहुत मज तूझा भरंवसा;
जगन्माते, कैशी न पवसिच अद्यापि नवसा? ॥ ९२ ।
मला, माते, तूझा कवण महदन्याय घडला?
तुला जेणें माजा विसर, गिरिजे, आजि पडला.।
करावा बंधूचा त्वरित वदनस्तंभ बगले
तुझें कांहीं केल्या, जननि, मन अद्यापि नुगले. ॥ ९३ ॥
अडे बंधुश्रेणी, सकल सचिवां मोहन पडे,
धुडावे दुर्वृत्त, प्रबळ, शिशुपाला ज्वर जडे,।
प्रभावें हें तूझ्या, जननि, जरि अद्यापिहि घडे,
महाविद्ये, वंद्ये, तरिच घडलें कार्य विघडे. ॥ ९४ ॥
वसति करिशि, माते, नित्य मातंकवाटीं,
परि भजक तुझा हा मत्त मातंक वांटी.।

अमृतमय कृपेची दृष्टि हे पावलीसे
तइँहुन सुरवाडें सिद्धि फोंफावलीसे. ॥ ९५ ॥
त्वरित तूं, त्वरिते, जरि पावशी, । तरिच दैवतशी मज भावशी. ॥
विनवितें तुळजापुरवासिनी, । अभयदायिनि, शंभुसुवासिनी. ॥ ९६ ॥
वचन आइक, कर्णपिशाचिके, । अतिनिगूढपराशयसूचिके. ॥
तुजच सांप्रत हे यक मागणें । मदभिलाष हरीप्रति सांगणें ॥ ९७ ॥
फिरसि लोक तिन्ही वरयक्षिणी, । परम सावध हो हरिरक्षिणी. ॥
झडपिशी दमघोषसुता जयीं । पुरति सर्व मनोरथ हे तयीं. ॥ ९८ ॥
वदत वदत ऐसें सांज होयास आली,
दिनकरकरलक्ष्मी सर्व संक्षीण झाली. ।
मुखकमल तयेचें म्लान अत्यंत देखे,
म्हणवुनि कमलांचा बंधु बांधव्य राखे. ॥ ९९ ॥
सहज दिनमणी हा अस्त होतांच, एकी
प्रियतमविरहानें क्रंदती चक्रवाकी. ।
विधिविहितनियोगें वारुणी आदरीली,
म्हणुनि चरम संध्या काय आरक्त झाली ? ॥ १०० ॥
तदुपरि उगवे हा चंद्रमा पौर्णिमेचा.
अनभिलषित अर्थी होय ये उत्तमेचा; ।
द्विजपति विसरेना सर्वथा स्वयि दीक्षा,
कर पसरुन मागे वक्त्रलावण्यभीक्षा. ॥ १०१ ॥
हिमकरकर जैसे कांतिपूर स्रवेती,
हळुच तसतसे ते चंद्रकांत द्रवेती. ।
क्षुधिततर चकोरां पारणें थोर जालें,
मुकुलित कुमुदांला जन्मसाफल्य आलें. ॥ १०२ ॥
विलसित अवघें हें भीमकीला न सोसे.
अविरत मग टाकी निःसहांगी उसासे. ।
क्षणभरि सखियेचा हात घेऊन हातीं
ससलिल बहु केलीं बोलतां नेत्रपातीं. ॥ १०३ ॥

अमृतमय शरीरीं, बोलती लोक सारे,
तदपि, कुमुदबंधू, वर्तसी तूं कसा, रे ?।
सहज विमल तूं तों बाळ रत्नाकराचें
असुनि, धरिसि कैसें नाम दोषाकराचें ? ॥ १०४ ॥

असेस चंद्रा गुरुदारगामी। प्राणास झालेंच उदार, गा, मी. ॥
या पातकें होउन रायलक्ष्मी। गमाविली तां द्विजराजलक्ष्मी. ॥१०५॥

जिवलग सखये, तूं होसि सर्वां अपेक्षा ?।
तदपि करिसि कैशी आजि माझी उपेक्षा ?।
कळत कळत तां ही हातिंचें सोडिजेतें,
नियतच तरि काळें या मला बोढिजेतें. ॥ १०६ ॥

तुहिनकर नव्हे, हें बीज चिंतालतेचें;।
विकसित अथवा हें पुष्प उद्वेगतेचें:
अभिनव मदनाचें छत्र किंवा उभारे,
युवतिजन जयाच्या दर्शनेंमात्र भारे. ॥ १०७ ॥

नभ धवलित केलें, विश्व आनंदवीलें,
परि विरहिजनाचें चित्त उन्मादवीलें.।
क्षणभरि मज बाई याकडे पाहवेना,
प्रलयदहनकल्प स्पर्श हा साहवेना. ॥ १०८ ॥

मज निज नलगे, हे वैरिणी शेज झाली,
तगमग सुटलीसे, रात्रि मध्यास आली;।
क्षणभरि सपनींही कृष्ण दृष्टीं पडेना,
नयनसलिलयोगें चित्रिचा सांपडेना. ॥ १०९ ॥

अवसर समजेना, सारिका फार बोले.
शुकवचनविलासें चित्त अत्यंत सोले.।
अझुणिहि न वचे हा चंद्र अस्ताचलासी,
यदुपतिविरहाची बैसवीली कळाशी. ॥ ११० ॥

चंद्र सोदर सये गरलाचा,। भाव काय समजे दुरळाचा ? ॥
ये शशांक मदनास सहाया,। मी अशक्य परि यास सहाया. ॥ १११ ॥

दुःख दारुण सये विषयाचें। नित्य नूतन चढे विष याचें. ॥
लग्न निश्चित असे परवांचें, । मी कशी परि अतःपर वांचें? ॥ ११२ ॥
बंधु देइन म्हणे शिशुपाला; । कां कृपा तुज नयेच कृपाला? ॥
दीनवत्सल, दयानिधि, ऐशीं । बीरुदें हरि गमाविशि कैशीं? ॥ ११३ ॥
सांवळ्या, सगुण, नंदकुमारा । राजसा, त्वरित ये सकुमारा. ॥
मन्मथें झडपिलें मन माझें, । झाडणी करिल पाउल तूझें. ॥ ११४ ॥
जन्म घेशि हरि यादववंशीं, । देवही उतरती निजअंशीं. ॥
अंगनेस मज येव करावें; । हें जगांत बहु नांव करावें. ॥ ११५ ॥
पाव तूं त्वरित, नंदकिशोरा, । राधिकावदनचंद्रचकोरा. ॥
रातलें मन तुझे पदपर्शा, । नित्य वीट उपजे निजसर्शी. ॥ ११६ ॥
नंदगोपतनया, अनयारे, । या कसा विसरसी विनया, रे? ॥
व्यापिलें मज, मनोहरवेषा, । देवकीसुकृतसारविशेषा. ॥ ११७ ॥
अंतरीं सुख तुझें बहु दाटे, । हें वृथा सकल वैभव वाटे. ॥
एक वेळ मज सन्मुख यावें, । श्रीहरी, चरणदर्शन द्यावें. ॥ ११८ ॥
गोपिकांसि, हरि, दर्शन देसी, । भावपूर्वक अपूर्व वदेसी. ॥
घाणती घुरट ज्या कुलटा, रे, । पंथ हा, हरि, तुझा उलटा, रे. ॥११९॥
द्वारकानगरनीरजनेत्रा, । काय होति मजहून पवित्रा? ॥
सुंदरा तरि, हरी, अथवा, रे । हा विवेक अवघाच निवारे. ॥ १२० ॥
श्यामसुंदर सखा वनमाळी । आणीं सत्वर, सये, गुणशाली. ॥
चाळितां सकल विश्वविसावा । आठवे पुरुष पंचविसावा. ॥ १२१ ॥
होय जें प्रकट गोवळवंशीं, । वाजवी मदनमोहन वंशी, ॥
वागवी निज सिदोरिस अंसीं, । ब्रह्म तें, सखि, सनातन गंसीं. ॥१२२॥
नीलनीरजदलद्युति भासे, । देवढें चरण नित्य उभासे. ॥
आणि त्यास, सखि, लागुन पायां, । जाय हें वय अमोलिक वांया.॥१२३॥
हा मनोगज अनावर मातें; । नांवरे मज, चराचरमाते, ॥
सिंहवाहिनि, शिवे, जगदंबे, । रक्षिं तूं, प्रणतभक्तकदंबे. ॥ १२४ ॥
हे राति आली अति अंधकारी, । तूं रक्षि येथें मज, अंधकारि. ॥
वृषध्वजा, विश्वपते, पुरारे, । केला नसे मन्मथ तां पुरा, रे." ॥१२५॥

वाक्यें इच्या दुःखित फार झाली; । सखी तिशीं स्पष्ट वदों निघाली. ॥
करवूयें ते उठवी तयेला, । जीणें असे उत्कट शोक केला. ॥ १२६ ॥
" मी काय नेणें, सखि, मन्मथातें ? । आर्यीकतां या श्रमशी कथांतें. ॥
हे वेदना काय तुलाच व्हावी, । लोकत्रया मन्मथ आगि लावी.॥१२७॥
पतिव्रता गौतमधर्मपत्नी । ते वंचवीली परम प्रयत्नीं; ॥
ज्याच्या प्रसादें द्विजराज रोगी,। ज्याच्या भयें होय कुमार जोगी.॥१२८॥
हें घेतलेंसे व्रत सैनिकाचें, । नसे जयाला भय लौकिकाचें. ॥
जो बायकांचा अति घात केला, । त्याचा तसा प्रत्यय यास आला.॥१२९॥
निदान तूं जे सकला सुखाची, । ते वल्लरी होशि महाविखाची; ॥
अशी निरुद्योग कशी बसेसी ? । पडेसि यत्नेविण तूं भसेसी ? ॥ १३० ॥
लज्जा तुझी हे परती सरेना, । पंचेषु तो हा तुज वीसरेना. ॥
डसे तुला कृष्णभुजंग, बाई. । उपाय येथें करिजेल काई ? ॥ १३१ ॥
क्षणेक आतां तकवा धरावा, । स्वपत्रिकालेख तया करावा. ॥
मदीय शिक्षापन तूज तैसें, । नटापुढें नर्तन होय जैसें." ॥ १३२ ॥

हें आयके वचन कुंडिननाथपुत्री.
ते काय होय विदुषी मग दीर्घसूत्री ? ।
जे आणवी त्वरित रत्नजडीत दौती;
ते लेखणी, रुचिर कागद घेय हातीं. ॥ १३३ ॥

बाला, भीमकसार्वभौमदुहिता, जे गांजिली सोदरें,
पूर्वीं पूर्वक पत्रलेखरचना केली तिणें आदरें. ।
स्वीयोदंतनिवेदनोक्तिपटनी, अत्यंत अभ्यापिली
श्रीकृष्णानयनार्थ हे निजसखी किंवा असे योजिली. ॥१३४॥

कथा हे कृष्णाची सकल जगदानंदजननी.
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं. ।
प्रसंगीं श्रोत्यांचे सकलहि महादोष हरती;
यदृत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ १३५ ॥

॥ इति श्रीमद्भगवभक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरण-
काव्ये पत्रिकालेखो नाम तृतीयः सर्गः ॥

# सर्ग चवथा.

ते भीभकी सर्व उपाय जाणे; । वैदग्ध्य तीचें तिस एक जाणे; ॥
सुदेव नामा द्विज सोमयाजी । स्वकीय दौत्यार्थ मनांत योजी. ॥ १ ॥
जो वेदवेदांगतदर्थवेत्ता, । लक्षांमधें जो द्विज येक वक्ता, ॥
कथा, पुराणें, इतिहास जाणें, । तो काय हे लौकिकरीति नेणें ? ॥ २ ॥
अत्यंत आराधक केशवाचा, । नामें करी नित्य पवित्र वाचा; ॥
बोलोन जो गोड बहूत आहे, । असत्य ज्याला सपनीं न साहे; ॥ ३ ॥
तो आणवीला अति गुप्त वाटे, । तथापिही साध्वस ईस वाटे. ॥
हळू हळू तीजसमीप आला, । तेणें नमस्कार तयास केला. ॥ ४ ॥
बसावया आसन देववीलें, । सखीकरें अर्चन त्यास केलें, ॥
मंत्राक्षता हा द्विज तीस देतां । म्हणे, "वर स्वेच्छित पाव आतां." ॥५॥
अशांत आली तिजला त्रपा हे । सखीकडे किंचितमात्र पाहे. ॥
ते भाव तीचा समजोन गेली. । त्यासीं सखी वाक्य वदों निघाली. ॥६॥

विषयविषधरीं हे डंखिली आजि भारी.
कवण पुरुष येथें निश्चयें यास भारी? ।
झडकरि बहु आणी गारुडी द्वारकेचा,
त्वरित बहुत राखे प्राण ये दारिकेचा. ॥ ७ ॥
मुद्रामुद्रित पत्रिका करुनि ते विप्रापुढें ठेविली.
तेणें ते उचलून भीमकसुता सव्यें असे घेतली. ।
येकाकी अवघी त्यजून सुकृती जो द्वारके चालिला,
जेणें श्रीपतिपादपंकजयुगीं आत्मा असे वाहिला. ॥ ८ ॥
ते बोळवीत कितियेक तयास आली;
तेथेंच ते सहचरी मग राहियेली. ।
बाला विषण्ण तितक्यांतच फार भागे,
कृष्णास ते हळुच तोंडानिरोप सांगे. ॥ ९ ॥

"सर्वोत्तमा, उत्तम पाय तूझे । देखोन हे नेत्र निवोत माझे. ॥
पाहें तुझी वाट, अनाथनाथा. । सनाथ कैं हा परि होय माथा? ॥१०॥

न सांपडे रूपठसा असा हा, । केले जरी तां अवतार दाहा. ॥
ते कोण तूला नवरी वरीना, । मनामधें पाय तुझे धरीना ? ॥ ११ ॥
महाभुजा, राजकुलावतंसा, । मनोरमा, मानसराजहंसा, ॥
चातुर्य तूझें कवणांत आहे ? । या क्षीरनीरा निवडोन पाहें. ॥ १२ ॥
सर्वत्र उच्चावच भेद आहे । बरें विचारून मनांत पाहें. ॥
दिसेत हें पांडुर तक्रदुग्धें । जाणोन घ्यावीं परि हें विदग्धें. ॥ १३ ॥
मी तों नसें, रे, तुज पारखीसी. । पदोपदीं कां मज पारखीसी ? ॥
मी जाणतें केवळ जो हरीसा । तो आजि होसी मज जोहरीसा. ॥ १४ ॥
माझा जळो हा जिव वीसराळू ! । तूं तों जगन्नाथ महाकृपाळू ॥
वाटे तुझें चित्त सहस्र ठायीं । हा चालला प्राण तुझेच पायीं. ॥ १५ ॥
तूझी कृपा पातळ फार झाली, । तेणें दशा हे मज आजि आली; ॥
गळेत नेत्रांतुनि वारिधारा । तूं पाव शोकार्णवकर्णधारा. ॥ १६ ॥
स्थळांतरीं देइल तात जेव्हां, । हा प्राण मी ठेविन काय तेव्हां ? ॥
घडो न माझी तुज आजि हिंसा, । या सोदराचा जिव होय हिंसा. ॥१७॥
तथापि मी हे विनती करीतें, । त्यजूं नये ये निज किंकरीतें. ॥
जाईल हा केवळ जीव माझा, । जगामधें लौकिक होय तूझा. ॥ १८ ॥
मी काय नेणें तुज मानसींही ? । नसे तुझा हा अभिमान सिंहीं. ॥
हा देह माझा, हरि, भागलाहे. । गोमायु कैसा हरिभाग लाहे ? ॥ १९ ॥
प्रसन्न, देवा, मुखचंद्र तूझा । ध्यातो सदा चित्तचकोर माझा ॥
मी चातकी, तूं घननीळ, कृष्णा; । तथापि, पाहें, नवजाय तृष्णा. ॥२०॥
तूझे पदीं नित्य अनंग नाचे, । तूं भूलवीशी जन अंगनांचे, ॥
त्या गोपिकाही असती सदेवा, । तूं पावशी ज्या असतीस, देवा. ॥२१॥
मी नंदिनी राजस भीमकाची । होईन दासी घरिंची फुकाची; ॥
पावेन तूझ्या चरणारविंदा । प्रसाद ऐसा करिजे मुकुंदा. ॥ २२ ॥
हा जीव माझा तुजला न लाहे, । करीन याची तरि आजि लाहे. ॥
कामानलीं आहुति इंद्रियांची, । देईन हें निश्चित जाण यांची ॥ २३ ॥
तूं आजि माझी करिशी उपेक्षा, । मी जीवनाची न धरीं अपेक्षा. ॥
जसा तसा केवळ काळ कंठीं; । प्रस्थान मत्प्राण करीत कंठीं. ॥ २४ ॥

असें नसे ग्रंथिस पुण्य कांहीं, । जेणें तुझें मी पदयुग्म पाहीं. ॥
आतां कृपा केवळ तां करावी, । स्वकीय दासी स्वकरीं धरावी. ॥ २५ ॥
फासां पडे केवळ मी कुरंगी, । ये पंजरीं, रे, अडके विहंगी, ॥
पंकीं पडे दुर्बळ गाय जैशी, । पदोपदीं व्याकुळ होय तैशी. ॥ २६ ॥
तूं सोडवीं जीवविहंग माझा, । होईल येणें पुरुषार्थ तूझा. ॥
त्वन्नामसुक्ताफळमात्र चारा, । तुझे पदीं केवळ यास थारा. ॥ २७ ॥
जैसें तुला मी नवरी न मानें, । करूं नको ज्येष्ठ कदापि मानें. ॥
मी धाकटी होइन धाकटीची । दासी करीं, रे, मज शेवटींची ॥२८॥
करीन हे केवळ पादसेवा; । घरामधें हा न करीन हेवा; ॥
सेवीन पादोदक नित्य तूझें; । टाकीन देवा अभिमानवोझें. ॥ २९ ॥
लावीन तूझा पदरेणु भाळीं; । उच्छिष्ट सेवीन यथोक्त काळीं; ॥
त्वत्पादनिर्माल्य धरीन माथां; । गाईन, देवा, भवदीय गाथा. ॥ ३० ॥
मार्गीं तुझे लोचनयुग्म लागे । त्वच्चिंतनीं मानस नित्य भागे ॥
झाली असे हे वचनीय सीमा; । तूं सर्व जाणेसि, गुणाभिरामा. ॥ ३१ ॥
माझे मनीं जाण विकल्प नाहीं, । करूं नको आणिक कल्पनाही. ॥
धरूं नये संशय यावयाचा, । पुढें नये, रे, रस या वयाचा ॥ ३२ ॥
अनर्कसंपर्क कदापि, पाहें, । शुचिव्रता हे नलिनी न साहे; ॥
वसेत नाना विपिनांत वल्ली, । अनादरीना सहकार मल्ली.' ॥ ३३ ॥
हा प्राणनाथास निरोप सांगें. । विप्रा, तुला आणिक येक मागें. ॥
हे गोष्टि कोणास कळों न द्यावी, । गुरूपदेशाहुनि गूढ व्यावी. ॥ ३४ ॥
त्यां वांचणें हें त्वदधीन झालें, । हाता तुझ्या हें यश थोर आलें. ॥
धर्मांमधें उत्कट धर्म, पाहें, । परोपकारासम कोण आहे ? ॥ ३५ ॥
द्विजा नको फार विलंब लावूं, । कदापि तूं रिक्त नकोच येऊं. ॥
जाणेस तूं तेथिल सर्व दीक्षा, । करून बोलें समयप्रतीक्षा. ॥ ३६ ॥
जो द्वारकेची करि पातशाही । वरील तो काय जशातशाही ? ॥
त्याचे मनीं हा मज ठाव व्हावा, । प्रसंग ऐसा बरवा पहावा. ॥ ३७ ॥
कार्यांतरीं सक्त असेल जेव्हां । करूं नको गोष्टि मदीय तेव्हां. ॥
होईल आकस्मिक हे अवज्ञा, । उपाय खुंटे अवघाच विज्ञा. ॥ ३८ ॥

मार्गीं चुकावून समस्त मेटें । तूं द्वारकापत्तन पाव नेटें. ॥
ज्याचे पदीं हा दृढ भाव माझा, । तो सर्व निर्वाह करील तुझा. ॥३९॥
अपार संसारसमुद्र पाहीं; । तरावया यास उपाय नाहीं ॥
तें द्वारकेचें घननीळ तारूं । येवोनि येथें, मज शीघ्र तारू. ॥ ४० ॥

माझा असे परम दारुण ज्येष्ठ बंधू;
चैद्येश्वरा अभिलषी अविवेकसिंधू. ।
धाकेत हे नव, पुरातन कारभारी;
यांचे मतीस बहु होय विकार भारी. ॥ ४१ ॥
तूं मायबाप कुळगोत समस्त माझें;
मी धाकटें निपट बाळक आजि तूझें. ।
तूं येकदा परमजीवन दान देईं,
तो देवकीतनय घेउन शीघ्र येईं." ॥ ४२ ॥
नरेंद्रदुहिता असें हळुहळू जन्हीं बोलते,
प्रभातसमयप्रभा तदपि दुष्ट डोकाविते. ।
चरित्र समजोनि हें स्तिमित राहिली भीमकी.
द्विजास म्हणते " द्विजा, परम शीघ्र तूं जाय," कीं. ॥ ४३ ॥
विहंगमकुळें महाविटपिकोटरीं बाहती.
सुशीतल हळूहळू सुरभिवातही वाहती, ।
विदर्भभवनीं उठे विविधवाद्यसंघोष तो,
अनेकनुतिपाठकस्तुतिभरेंच जो पोषतो. ॥ ४४ ॥
कलकलति कपोती; पूर्व दिग्भाग हांसे.
हळुहळु मग तेणें चंद्र निःश्रीक भासे; ।
तशिच उडुगणाला तूटि येऊं निघाली:
तदुपरि तनुता हे दीपशोभेस आली. ॥ ४५ ॥
गलबल बहु जाली दासिकांची पहांटे,
म्हणवुनि परते हे, मायचा धाक वाटे. ।
सकल निजसख्याही लागती जों उठाया,
झडकरि तंव आली भीमकी पूर्वठायां. ॥ ४६ ॥

चिरतर व्यवसायें भागली फार बाळा.
क्षणभरि तिस लागे जागृतीमाजि डोळा. ।
तदुपरि गरुडीं हे कृष्ण आरूढ देखे,
यदुतिलक जिचे हा गुंतला पूर्ण भाके. ॥ ४७ ॥

अति रुचिर विकासे कांस पीतांबराची,
प्रकट परम झाली मूर्ति त्या श्रीधराची. ।
निरुपम उमटे हे कुंडलांची झळाळी,
मणिमयमुगुटाची दीप्ति फांके निराळीं. ॥ ४८ ॥

अभिनव वनमाळा कंठदेशीं विलासे,
मुखकमल इचें जो देखतां देव हांसे. ।
यदुपति अवतारी, जो गदाचक्रधारी,
झडकरी इजसाठीं धाविलासे मुरारि. ॥ ४९ ॥

हळुच जंव पलंगीं कृष्ण येवोनि बैसे,
मुकुलित तंव होतीं हे इचे नेत्र तैसे. ।
क्षणभरि निजअंकीं भीमकी बैसवीली,
मुखकमळिं तियेच्या स्वीय तांबूल घाली. ॥ ५० ॥

तदुपरि रव बाळा आयके सारिकेचा,
यदुपति मग तेणें हारपे द्वारकेचा. ।
खडबडुन उठे ते भीमकी नित्सुरीशी;
मुखकमलसुगंधे लाजवी कस्तुरीशीं. ॥ ५१ ॥

तदुपरि निजशय्या चांचपो जों निघाली,
हरिचरणवियोगें घाबरी फार झाली. ।
उठवुन सखियांतें दीप लावोन पाहे,
नलगत निधि हातीं, ते यथावस्थ राहे. ॥ ५२ ॥

पक्षद्वारें विप्र बाहेर आला, । क्षेमाशंसी त्याजला काक गेला; ॥
जैसा देखे पूर्णकुंभद्वयाला । तैसा त्याला पूर्ण आनंद झाला. ॥ ५३ ॥
सवत्स त्या सन्मुख गाय आली; । सुवासिनीची मग भेट झाली; ॥
देखोन सालंकृत कन्यकेला, । मुहूर्त तेणें अति धन्य केला. ॥ ५४ ॥

अनुपद मग तेथें पातली होमवेळा,
　म्हणवुन मग तेणें घाबरा विप्र जाला; ।
अविदित निजगेहा ये महातांतडीनें;
　विधि विहित तयाचा होय येके घडीनें. ॥ ५५ ॥
उदयगिरिशिरीं हें भानुबिंब प्रकाशे,
　रजनिजनित जेणें कोकशोकाग्नि नासे. ।
मुकुलित कमलांचा भार उल्हास पावे.
　मधुकरपटलीला बंधनिर्मुक्ति फावे. ॥ ५६ ॥
द्विज सविनय वंदी सूर्यनारायणाला,
　क्षणभरि मग ठेवी वेदपारायणाला. ।
वचन गृहपतीसीं व्यक्त बोले तपस्वी,
　"मज गुरुतर कार्यी तां करावें यशस्वी. ॥ ५७ ॥
सकळहि निजपोष्यें रक्षि तूं आश्रयाशा;
　तुजविण मज नाहीं आणखी आश्रयाशा. ।
सदय उभयकाळीं हव्य घे नित्य होमीं.
　यदुतिलक पहाया चालिलोंसें, अहो, मी." ॥ ५८ ॥
प्रवासविधि आदरेंत्वरित फार केला असे,
　निदेश नृपनंदिनीविहित मानसीं हा वसे. ।
कमंडलु करीं धरी, स्मरणमालिका आदरी,
　घरींहुन निघे महामुदित होय जो अंतरीं. ॥ ५९ ॥
अतिसभय उलंघी हा पुरद्वार जेव्हां,
　घरिंहुन सुटलोंसें वाटलें त्यास तेव्हां. ।
यदुपतिपुरमार्गा रोधिती राजसेना,
　तदपि हरिकृपेनें यास कोणी पुसेना. ॥ ६० ॥
तदुपरि मग त्याची अंगना होय जागी.
　"त्वरित उठ" म्हणे हे कन्यकेला बजागी. ।
घडिघडि वदलें जे वल्लभासी चिरींटी,
　म्हणवुन बहुधा हे होय ऐशी करंटी. ॥ ६१ ॥
न पुसत गृहिणीला द्वारके विप्र गेला,
　म्हणवुन इजला हा थोर संताप आला ।

त्वरित बहुत गेली त्यांसि धांवोन तेथें,
नरपतितनया हे बैसली श्रांत जेथें. ॥ ६२ ॥

बहुत मुखबळें हे फार बोलों निघाली,
तदपि नपसुतेनें आदरें बैसवीली. ।
हळुच तिस खुणेनें हे निवारीत आहे,
तदपि परम अज्ञा बोलतां ते न राहे. ॥ ६३ ॥

"अलगट बहु होशी ढाल; हें काय केलें ?
लटिकपण कसें या सोदरा आणियेलें ? ।
न पुसत पति माझा धाडिला हा विदेशा,
झडकरि तुझिया या आगि लागो निदेशा ! ॥ ६४ ॥

घडिघडि अशनाला मागती जें अपत्यें,
उगिच मज दिलीं हें व्यर्थ कां गार्हपत्यें. ।
हळुहळु सरती या सर्वही दर्भमुष्टी;
घृतविरहित, बाई, चालती काय इष्टी ? ॥ ६५ ॥

निपट अपुरती हे बुद्धि या वल्लभाची. ।
उगिच विजवटी हे आणिली काल भाची. ।
क्षणभरि मज दृष्टी नावडे ज्येष्ठ धाडी,
अझुणवरि इला हा सासुऱ्यांही न धाडी. ॥ ६६ ॥

सकलहि करिजेतें जीव देऊनि वाणी,
परि विखळ मिळाली सून मोठी निवाणी. ।
तिजहुन नवसांची नाति झाली तिवाटी,
अनिश सहचरींशीं खेळतां धान्य वाटी. ॥ ६७ ॥

अवगुण नणँदेच्या चोरट्या पोरट्यांचे ।
घडिघडि किती सोसूं सांग या कारट्यांचें ? ।
मज तरि सपनींही हा दिसेना अधेला,
अझुणि तरि न लागे आगि यांच्या क्षुधेला. ॥ ६८ ॥

अति मधुर न साहे कोरका कोरण्याला;
अझुणिवरि समस्तें नित्य धाकों कण्यांला. ।

रुचिर बहुत लागे भाकरी नाचण्यांची,
 जिजवरी मज भाजी आवडेना चण्यांची. ॥ ६९
हळुहळु जरि सासू होय अत्यंत वृद्धा,
 तदपि बहु भुकेनें होतसे नित्य क्रुद्धा. ।
निरुपम घरिचा हा जांच कोणास सांगों !
 घडिघडि उसनें मी धान्य कोणास मागों ? ॥ ७०
परम विरस वाक्यें बोलतें जों असाळी,
 तंव नरपतिपत्नी येतसे तेंच काळीं; ।
लगबग उठतां हे राजकन्येस जाली,
 परि बहु अविदग्धा बोलतां ते न भ्याली. ॥ ७१
हळुच तिस म्हणे हे, " गागसी कां, गव्हारे ?
 गृहविषयक चिंता सर्व येथून वारे. ।
जडित वलय तीणें हातिंचें काढियेलें,
 द्विजपतिगृहिणीला शुभ्रसें अर्पियेलें. ॥ ७२ ॥
रुचिरतर तयेच्या वस्तु येतांच हातां,
 हळुच 'पति नये कां' ते म्हणे व्यक्त आतां. ।
परम परिजनांची दाटि होऊं निघाली,
 म्हणुन निजगृहातें ते चुकावून गेली. ॥ ७३ ॥
निशि दिवस जयानें सेविजे कृष्णवर्त्मा,
 द्विजतिलक न लागे तो कसा कृष्णवर्त्मा ? ।
अपरिमित पवाडे देवकीनंदनाचे
 विविध, रुचिर, गातां, थोर आनंद; नाचे. ॥ ७४ ।
अनिश यदुपतीचा हा महाछंद लागे,
 म्हणवुनि अतिपंथा चालतां तो न भागे, ।
अति कठिण अव्हांटा चोखटा होति वाटा,
 हरिगुणकथनाचा फूटला ज्यास फांटा. ॥ ७५ ॥
सहज कठिण आहे काळ जो हा उन्हाळा,
 प्रगट परम तेथें होय माध्यान्ह वेळा. ।

तद्रपि हरिकृपेची सावली यास आली,
सहज निजसुखाची थोर विश्रांति झाली. ॥ ७६
त्रिविध मग तयाला पाठिंचे येति वारे,
त्रिविधहिं परि जींहीं क्रूर संताप वारे. ।
अगणित सुकृतांचे सांठवी नित्य सांठे,
अति तिखट तया कां मोडतां द्वंद्व वाटे ? ॥ ७७
द्विजवर निजमार्गी नित्य येकांत सेवी,
सहज हरिकृपेच्या जो सिदोरीस जेवी. ।
यदुपतिभजनाची लागली थोर गोडी,
हळुहळु विषयांची वासना यास सोडी. ॥ ७८ ॥
तद्रुपरि उपदेशी आपल्या या मनाला,
क्षणभरि परि नेदी ठाव जें कामनांला; ।
सदनजनितचिंता सर्वदा जें न साहे,
यदुकुलमणि जेथें नित्य येवोनि राहे. ॥ ७९ ॥
परम निलज चित्ता कां पडे हें कुटुंबी,
तुजवरि विषयांची हे पडे नित्य झोंबी. ।
यदुपति तुजला हा ज्या घरांतून काढी,
सदयहृदय तो हा हातिचें काय सोडी ? ॥ ८० ॥
लगबग करिसी हे, व्यर्थ हांवे भरेसी;
क्षणभरि परि माझें तूं मला नावरेसी, ।
लुडबुड करिशी तूं जी पुढें, ते पुसेना,
तदपि तुज विषादावेश कांहीं असेना. ॥ ८१ ॥
पुसत पुसत आली या शरीरा जरा हे,
परि हरिभजनाची वासना वांझ राहे. ।
विषयबडिशलोभें गुंतसी मोहजाळीं:
कवण विषय आतां सोडवी अंतकाळीं ? ॥ ८२ ॥
चलन वलन राहे, बोल भार्या न साहे;
जवळि कधिं न बाहे, नित्य सक्रोध पाहे; ।

अझुणि तरि, मना, तूं सांडि येची करावी,
   झडकरि उगली हे शांतिकांता वरावी. ॥ ८३ ॥
अनुभविशि शरीरीं यातना या उदंडा,
   तदपि अझुणि तूझा होत नाहीं उगंडा; ।
घडिघडि युवतीच्या गुंतशी स्नेहपाशीं;
   विषयविरति नाहीं सर्वथा तूजपाशीं. ॥ ८४ ॥
निशिदिनि परनिंदास्वाद घेतां न राहे,
   क्षणभरि हरिनामस्पर्श जीला न साहे, ।
अतिमधुर रसें हे सर्वदा तृप्त केली,
   तदपि मज रसज्ञा काय उत्तीर्ण जाली ? ॥ ८५ ॥
अनिश परकलत्रालोकनाभ्यास ज्यांला,
   हरिचरणदिदृक्षा काय हे होय त्यांला ? ।
म्हणुन घडिघडी हें लोचनें आंवरावीं,
   हरिचरणचरित्रें अंतरीं हीं स्मरावीं. ॥ ८६ ॥
क्षण परिचय झाल्या जन्मजन्मीं सुटेना,
   परम विषम काळीं सोयरा जो विटेना, ।
निधि निरवधि पुण्यें लाधसी जो फुकाचा,
   विसरसि परि कैसा कंद तो चित्सुखाचा ? ॥ ८७ ॥
अनिश विधिनिषेधीं काल वेंचोनि गेला;
   क्षणभरि हरि नाहीं ध्यानयोगास आला. ।
गृहसुतधनदारा राहती सर्व येथें,
   हरिविण तुज, मूढा, सोडवी कोण तेथें ? ॥ ८८ ॥
मजलि जवळि आली, हें अहंभाव ओझें
   झडकरि त्यजि आतां; कोण अज्ञान तुझें ! ।
हळुहळु अवघा हा सोडिं संसारधंदा,
   क्षणभरि अवकाशें चिंतिं आनंदकंदा. ॥ ८९ ॥
अझुणि तुज मना हें काय कर्तव्य आहे ?
   हरिचरणसरोजीं लीन होवोनि राहें. ।

स्मरण करिं हरीचें, व्यर्थ आयुष्य वेंचे;
मरण जवळि आलें; काळ कोणास मेचे ? ॥ ९० ॥
दृढतर भगवंतीं पूर्ण सद्भाव ज्याचा,
सहज मग तुटे हा वासना बंध त्याचा. ।
करुनि विषयसेवा वासना वा मुराली;
त्रिभुवनपति त्याला दूर नाहीं मुरारी; ॥ ९१ ॥
हरिपदिंहुनि कैंही चित्त ज्याचें निघेना,
क्षणभरि विषयांचा वास नांवास घेना, ।
गुणगणन हरीचें नित्य जेणें जपावें,
भवसलिलनिधीचा पार तो येक पावे. ॥ ९२ ॥
अगणित फिरशी तूं, पामरा, हीन योनी.
अपर गति दिसेना, तूज जन्मा नयोनी. ।
निजगुरुचरणाब्जीं सर्वदा चित्त देई,
हरिभजककुळीं हें जन्म मागोन घेई. ॥ ९३ ॥
परति धरुनि आतां लाज तूं चित्स्वरूपीं,
न कळत पडशी ये व्यर्थ मोहांधकूपीं. ।
कळस जरी तुझे ये कल्पनेचा ढळावा
त्वरित गुरुकृपेचा सोहळा आढळावा. ॥ ९४ ॥
त्यजुनि विषयधंदा सद्गुरूच्या नियोगें.
सगुणभजनमार्गी लाग सत्संगयोगें, ।
जंव जंव तुजमध्यें चित्स्वरूप प्रकाशे.
तंव तंव अवघे हें गाढ मोहांध नासे. ॥ ९५ ॥
विषयविषममार्गी चालतां क्लेश होती;
पदर धरुनि ओढी हे जगन्मुक्तिदूती. ।
हरिचरणसरोजीं क्षेत्रसंन्यास घ्यावा,
तरिच मग न व्हावी हे परावृत्ति जीवा. ॥ ९६ ॥
निरुपम ममतेची लागली दाट झाडी,
त्वरित बहुत आतां पाय येथून काढीं. ।

यदुपतिपदवी हे येकल्या तों न चाले;
सहजच तुज साही आडवे शत्रु आले. ॥ ९७ ॥
अम्हणि तरि विवेकें तूं विचारूनि पाहीं
गुरुविण तुजला हा सर्वथा मार्ग नाहीं. ।
सहज तुज यशोदापुत्र हा सांपडावा
कवण अपरजन्मीं योग ऐसा घडावा? ॥ ९८ ॥
क्षणभरि परि याचे पाय आतां न सोडीं,
त्वरित गुरुपणाची लावि यासींच गोडी. ।
बहुतच तुज जें कीं वाटती, रे, अशक्यें;
सहज समजशी तें तत्वमस्यादिवाक्यें. ॥ ९९ ॥
गोकुळीं प्रकटली द्युति सांवळी,
गोधनें द्रुमतळीं सहसा वळी; ।
जे सनातन जगत्रय सावली;
तत्पदीं हृदयवृत्ति विसांवली. ॥ १०० ॥
द्वारकापतिपदांबुजमार्गीं
लागलें मन, विटे अपवर्गीं. ।
वासुदेव मज कौस्तुभधारी
आठवे नलिननाभ मुरारी. ॥ १०१ ॥
जो श्रुतींसहि अयोनिज वाचे
तो सदैव तुज यो निजवाचे. ।
.........चरणपद्म जयाचें
जाण धाम विषयोर्मिजयाचें. ॥ १०२
जो परात्पर अगोचर वेदां,
नातुडेच हरि जो मतभेदा, ॥
गोपवेष मुरलीधर ध्यावा,
तोच त्वां मुखिं अहर्निश गावा. ॥ १०३ ॥
जो नसोनही असे परि साचा;
जाण जो परिसही परिसाचा. ।

नाकनायक जया कर जोडी,
मानसा, करि तयाचिच जोडी. ॥ १०४ ॥
कृष्णमूर्ति हृदयीं जडलीसे, । तत्पदा दृढ मिठी पडलीसे, ॥
विश्व हें सकळ तन्मय जालें, । द्वैतभान अवघेंच उडालें. ॥ १०५ ॥
माय, बाप, कुळगोत, विसांवा, । सोयरा सजण ह्याच असावा. ॥
अंतरंग तुज याहुन नाहीं, । हें मना हित विचारुन पाहीं. ॥ १०६ ॥
कृष्ण, केशव, जनार्दन, नमें । घेत जाय करितां निज कामें. ॥
वासुदेव, घननीळ फुकाचा । सांपडे, निधि अनादिसुखाचा. ॥ १०७ ॥
हा भवाब्धि मजला न उलंघे, । धुंडिता विषय मानस लंघे. ॥
सांवळा, सगुण, जो अवतारी, । कर्णधार उतरील उतारीं. ॥ १०८ ॥
सोयरीं सकळ, सादर, मित्रें, । व्यर्थ जाण अनुकूल कलत्रें; ॥
चित्त हें नलगतां भगवंतीं । सोडवी कवण येउन अंतीं ? ॥ १०९ ॥
ज्ञानराज मजला गुरु भेटे, । शोकसागर समग्रहि आटे. ॥
नित्य वोहट पडे ममतेला । ठाव होय चढता समतेला. ॥ ११० ॥
हा भरें मज भवज्वर आला, । ज्ञानराज मज वैद्य मिळाला. ॥
मी उदास विषयांवरि जालों, । सद्गुरू, शरण तूजच आलों. ॥ १११ ॥
व्यापिलें मज मनोभवरोगें, । जांचलों विषयसंचययोगें. ॥
पादुकाभजनभेषज द्यावें; । सद्गुरू, यश अमोलिक घ्यावें. ॥ ११२ ॥
ओघ येति तुझिया स्तवनाचे, । भारती बहुत यास्तव नाचे. ॥
वेग जाय मुरडोन मनाचा, । नित्य उत्सव तुझ्या नमनाचा ॥ ११३ ॥
मातलों धनमदें, जगदीशा, । नाठवीशि मज, गोपतिवेषा. ॥
वेदवेद्यचरिता, भगवंता । येइं मी शरण तूज, अनंता. ॥ ११४ ॥
पुत्रमित्रपशुबांधव मोहें । नित्य संसृतिसुखांतचि पोहें. ॥
नाठवे चरणपंकज तूझें, । सोडवी कवण बंधन माझें ? ॥ ११५ ॥
झोंबलाच मदनानल आहे । रक्षिता कवण आणिक आहे ? ॥
मत्सरें हुरपळे मन माझें, । यास जीवन पदोदक तूझें. ॥ ११६ ॥
मोहमैंद भुरळें मज घाली, । वृत्ति हे तुज पराङ्मुख झाली. ॥
घातला दृढ गुणत्रयफांसा, । लाविशी हरि किती मज झांसा. ॥ ११७ ॥

कृष्णजी, परमदीन दयाळा, । पावना, पतितपावनशीला, ॥
सोयऱ्या, सुसखया, रण सोडीं. । यक वेळ मज येथुनि सोडीं ॥११८॥
आयके द्विज अजामिळ नांवें, । ज्याजला पतितराज म्हणावें, ॥
उद्धरे निधि अनाचरणाचा, । हा प्रताप तुझिया चरणांचा. ॥११९॥
रूप हें सहज सुंदर तूझें । नोळखे हृदय पामर माझें. ।
हें निरर्थक भंर बहु हांवे; । या अनित्य विषयांवरि धांवे. ॥ १२० ॥
कोटि जन्म जपतां तुजला, रे,। लाधसी अवचिता मजला रे. ॥
सांपडेस निज संचित ठेवा, । कोण यावरि विसंबिल देवा? ॥१२१॥
निद्रितास मज जागृत केलें, । हातिंचें सकल संचित नेलें. ॥
तोडिलें सकल बंधन, बापा, । कोण हे हरि तुझी अनुकंपा. ॥१२२॥
खेळ हा सकल मोडुन नेला, । थोर तां मज अनुग्रह केला; ॥
दावणीहुनि सुटे पशु जैसा । होय मी सहज मुक्तच तैसा. ॥१२३॥
नित्य संसृतिभयें सुखदुःखें । देखिलीं विविधरूप अनेकें. ॥
सोडवीं त्वरित, यादवराजा. । गुंतसी कवणिया निजकाजा? ॥१२४॥
तुजवीण मन पांगुळ जालें, । आंधळेपण मतीस्तह आलें. ॥
ऊचलून कडियें मज घेई, । कृष्णरूपजननी स्तन देई. ॥ १२५ ॥
तूं असोनि जननी कनवाळु, । मी तुझें परमबाळ भुकाळु, ॥
काय होय अति वो रस तूझा, । प्राण जाय तुजवांचुन माझा. ॥१२६॥
मी विषण्ण विळपें परदेशीं, । तूं कसें मज अनुत्तर देशी? ॥
वत्सले, त्यजुनि बाळक तान्हा। काय हा पळविशी निजपान्हा? ॥१२७॥
बाळकें रुसतसे जननींसीं, । काय माय रुसते परि त्यासीं? ॥
वासुरां तजुन गाय खडाणी । काय जाय पशुजाति अडाणी? ॥१२८॥
श्वापदांत भयभीत वराकी । काय हे हरिणि पाडस टाकी? ॥
चारया जरि विहंगिणि जाते, । ते फिरोन पिलियांप्रति येते. ॥१२९॥
कोरडें मुख पडे बहु माझें । न द्रवे अझुनि मानस तूझें. ॥
म्यां किती तरि हरी विलपावें? । कोण काळ तरि तारिल पावें. ॥१३०॥
कंठ हा गहिंवरें बहु दाटे. । लावि सत्वर मला निज वाटे. ॥
पंथ हा जरि तुझा उमगावा, । पाश हा तरिच रे, उगवावा. ॥१३१॥

हा हरिस्तव पढे जन जो कीं, । तो कृतार्थ म्हणवी नर लोकीं. ॥
प्रेमपात्र हरिचें बहु व्हावा; । संसृतिश्रम तयास न व्हावा. ॥ १३२ ॥

बहुविध महायासें ऐसें मनाप्रति बोलतां,
स्मरणहि शरीराचें ज्याला नसे पण चालतां; ।
तदपि करुणासिंधू पंथा स्वकीय न टाकवी,
जळनिधिमहासीमेमध्यें हळू हळु पाववी. ॥ १३३ ॥

नयनकमळें विप्राचीं ते क्षणेंच न्यहाळितां
कळस कनकप्रासादांचे जडीत झळाळिती. ।
तदुपरि पहा आलीं नामें तदीय मुखांबुजा.
जय जय कृपासिंधो, बंधो मदीय, अधोक्षजा. ॥१३४॥

यदुपतिपुरी विप्रातें त दिसों जंव लागली,
प्रणति भगवद्भक्तें तेव्हां असे मग घातली. ।
सजल नयनें झालीं, प्रेमें गळा बहु दाटला,
अतिशयित हा रोमांचाचा समूहहि थाटला. ॥१३५॥

कथा हे कृष्णाची सकल जगदानंदजननी.
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं. ।
प्रसंगें श्रोत्यांचे सकलही महादोष हरती;
यदूत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ १३६ ॥

इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये द्वारकादर्शनो नाम चतुर्थः सर्गः ।

---

## सर्ग पांचवा.

महापुण्यें राहे जलधिजठरीं हेमनगरी,
धरी जे रुद्रावें त्रिभुवननिधानास उदरीं; ।
तिच्या द्वारा आला द्विजवर महासंभ्रमभरें,
कपाटें रत्नांचीं विलसति जयेलागिं रुचिरें. ॥ १ ॥

करा जिला द्वादश योजनांचा, । आधार जे केवळ सज्जनांचा, ।
प्राकार जे सात धरीत आहे, । क्षणेक हा तीजकडेच पाहे. ॥ २ ॥

जे देखिली केवळ कांचनाची । कृतार्थता होय विलोचनांची. ॥
प्रवेशही ते नगरींत केला; । जन्मांतरीय श्रम सर्व गेला. ॥ ३ ॥

असे तयां सप्त पुऱ्यांसमाना; । उत्कृष्ट सर्वांहुनि ईस माना. ॥
प्रत्यक्ष जेथें भगवंत नांदे, । सौभाग्य हें याहुनि काय लाधे? ॥ ४ ॥

वाहे जिचा उत्कट धाक लंका, । धरीत आहे अलका कलंका, ॥
जे लाजवीते अमरावतीला, । हा आदरी यादवराव तीला. ॥ ५ ॥

जेथें निधींच्या करिजेत पोती, । कल्पद्रुमांची तरि होय खोती, ॥
घरोघरीं पाळिति कामधेनू, । संपत्ति हे याहुनि काय वानूं? ॥ ६ ॥

लोटांगणीं येति महासमृद्धि, । लोळेति दारीं अणिमादि सिद्धि. ॥
पावोनि अत्युत्कट संपदा या । चुकेतना जे निजसंप्रदाया. ॥ ७ ॥

बिदोबिदीं लोटति तें प्रवाळें; । खेळेत मुक्तागण विप्रबाळें. ॥
जेथें नसे आदर माणिकांचा, । विचार कैचा परि आणिकांचा? ॥ ८ ॥

पाहोनि नानाविध आपणांतें । कृतार्थ मानी द्विज आपणातें. ॥
चहूंकडे केवळ जातरूपें, । कदापि दृष्टीं न पडेच रूपें. ॥ ९ ॥

संपन्न चिंतामणिसंदुकांनीं । बसेत सौदागर ते दुकानीं. ॥
अधिष्ठिती तत्सुदती सज्यांला, । अनेक मुक्ताफळघोंस ज्यांला. ॥१०॥

वाजेत हे ताल मृदंग वीणा, । नाचेत त्या नृत्यकलाप्रवीणा. ॥
सबाळ कृष्णांघ्रिसरोरुहार्चा, । करीत तच्चित्रचरित्रचर्चा. ॥ ११ ॥

वाटांविही नामभरें अटाळ्या, । पौरांगना वाजवितात टाळ्या. ॥
घरोघरीं उत्सव केशवाचा । गोविंद, दामोदर, हेच वाचा. ॥ १२ ॥

संमर्द जेथें भगवत्कथांचे, । जे हे समुत्पादक सत्पथांचे. ॥
उठेत नाना ध्वनि आरत्यांचे । कळेत ना पार अपार त्यांचे. ॥ १३ ॥

संवाद होती शुकसारिकांचे । अखंड वेदांतिक कारिकांचे. ॥
ठेवूनियां मस्तक योषिदंकीं । कपोत हुंकार करी विटंकीं. ॥ १४ ॥

द्विज नगर पहातां भ्रांत होवोनि गेला;
चुकत चुकत दैवें राजचौकांत आला. ।
सभय यदुपतीच्या पावला द्वारपाळीं,
हरिजवळि जयाला नेइंजे द्वारपाळीं. ॥ १५ ॥

निरुपम तंव देखे बाग, पीयूषवापी; ।
हरिगुण पिक गाती; नाचती ते कलापी; ।
सहजच ऋतु साही होति येकत्र गोळा,
कधिंहि न समजे हा पाउसाळा, उन्हाळा. ॥ १६ ॥

तशी असे अंगणभू नृपाची, । बसेत जेथें अति सज्ज पाची. ॥
उठेत जेथें जलयंत्रधारा, । देवांगना नाचति निर्विकारा. ॥ १७ ॥

गंधर्व जेथें करितात गानें, । स्वर्लोकवासी धरिती विमानें, ॥
मेळा मिळे उत्कट किन्नरांचा, । करी महा आदर तो नरांचा. ॥ १८ ॥

झुलेत ऐरावतकोटि जेथें, । उच्चैःश्रवे काय नसेत तेथें ? ॥
स्थळीं स्थळीं युद्ध करीत जेठी, । नरेंद्रही घेउनि येति भेटी. ॥ १९ ॥

चहूंकडे रत्नजडीत जोतीं; । गोपानशीला अगणीत मोतीं. ॥
अशी असे राजसभा विशाला; । चंद्रासही स्पर्शति चंद्रशाला. ॥ २० ॥

वातायनें शोभति इंद्रनीलीं, । दिगंतरें भासति सर्व नीळीं. ॥
तशा हिऱ्यांच्या घडितां चिऱ्यांच्या। परंपरा शोभति पायऱ्यांच्या. ॥ २१ ॥

तदुपरि जंव वेंघे विप्र सोपानपंक्ती,
झडकरि तंव चारी आडव्या येति युक्ती; ।
ढकलुनि परत्या त्या, तो पुढें चाललासे.
हरिचरणसरोजीं जीव हा ठेविलासे. । २२ ॥

जय, विजय उभे हे त्या सभाद्वारदेशीं;
म्हणति, 'कवण येतो हा विचारा विदेशी.' ।
क्षणभरि परि कांहीं त्यांकडेही न पाहे;
मुनिजनहृदयाचें लक्ष्य लक्षीत आहे. ॥ २३ ॥

सिंहासनीं श्यामल तेज भासे । देखोन जें यास निगूढ हांसे. ॥
द्विजागमाचा हरि हेतु जाणे । अक्रूरहस्तावरि हस्त हाणे. ॥ २४ ॥

सुरासुरांची मग दाटि देखे, । पदप्रणामीं बहु होति वाखे, ॥
घेती किरीटांवरि वेत्रयष्टी । तथापि शौरी न पडेच दृष्टी. ॥ २५ ॥

स्वर्लोकलोकाधिप वज्रपाणी । राहे उभा घेउनि तत्कृपाणी; ॥
तसाच तेथें यमदंडधारी । यथोचितस्थाननिदेशकारी. ॥ २६ ॥

आणीतसे तो मग पाशपाणी । कृष्णास गंडूषविधीस पाणी; ॥
उपायनें घेय मनुष्यधर्मा । कदा चुकेनाच मनुष्यधर्मा. ॥ २७ ॥

कृशानु तांबूलकरंक वाहे; । पतद्गृही नैर्ऋत घेत आहे; ॥
हा वायु जेथें व्यजनास वारी; । ईशान हा राजसभाधिकारी. ॥ २८ ॥

सहस्रपत्र स्फुट होय जैसें । कलाधर च्छत्र धरीच तैसें ॥
जे सात्यकी उद्धव भक्त भारी, । ते चामरें वारिति निर्विकारी. ॥ २९ ॥

हरीत ज्या इंद्रकिरीटशोभा । त्या पादुकांचा गरुडास डांभा. ॥
गणेश घे रत्नजडीत आसा । उभा असे टाकित जो उसासा. ॥ ३० ॥

अमात्यचूडामणि हे हरीचे, । जे एक रत्नाकर चातुरीचे. ॥
चहूंकडे सर्व उभे रहाती, । तटस्थ गोविंदपदें पहाती. ॥ ३१ ॥

विलक्षणा तेथिल राजरीती, । देवांसही मानव नादरीती ! ॥
हा विप्र येणें अति भीति वाहे, । मधें मधें थोकत येत आहे. ॥ ३२ ॥

कृष्णास दृग्गोचर विप्र झाला, । तत्काल खालें उतरोन आला. ॥
सस्नेह वत्साप्रति गाय धांवे, । तसाच भक्तांप्रति देव पावे. ॥ ३३ ॥

पीतांबराचा बहु घोळ लोळे, । आकर्णपर्यंत विशाल डोळे. ॥
आपाद कंठीं वनमाळ घाली; । ते सांवळी सन्मुख मूर्ति आली. ॥३४॥

द्विजास तेव्हां न सुचेच कांहीं । पडे महानंदरसप्रवाहीं;॥
स्तवी चतुर्वक्त्र जयास वंदी । तो कृष्ण त्याचे मग पाय वंदी. ॥ ३५ ॥

अर्धासनीं आणुनि बैसवीला, । यथाविधीनें मधुपर्क केला. ॥
ब्रह्मादिकां जो हरि वोचकेना, । तो आजि याच्या उचिता चुकेना ॥३६॥

अपूर्व वाटे सनकादिकांला, । तसें वसिष्ठादिक वैदिकांला. ॥
एतत्कृपागर्व महा वहाती, । परस्परें ते वदनें पहाती. ॥ ३७ ॥

सुदेव नामा द्विज माज सोडी, । तें भीमकीचें मग पत्र काढी. ॥
म्हणे तया श्रीहरि, 'राहवावें; । क्षणांतरीं हें मज दाखवावें.' ॥ ३८ ॥

द्विज परम शहाणा हा महा बोलकाही,
परि निपट निघेना त्या पुढें बोल कांहीं. ।
घडि घडि जिभ जेथें चावळे वाक्पतीची,
रद्‍बदल न चाले सर्वथा दिक्पतींची. ॥ ३९ ॥

तदुपरि मग सायंकाळिचा तास वजे,
विविध रुचिर वाद्यध्वान गंभीर गाजे. ।
अगणित मग येती दीपधारी, हिलाली,
यदुपतिनमनीं हे पंक्ति ज्यांची कलाली. ॥ ४० ॥

बहुत जवळि आली हे समुत्थानवेळा
म्हणउनि विनयें हा षण्मुखें अर्ज केला. ।
यदुपति उठतां हे वारि होऊं निघाली,
तदपि कितियकांची दाटि अत्यंत झाली. ॥ ४१ ॥

कषति परम जेथें अंगदें अंगदांसीं,
अपरिमित तशी हे आयुधें आयुधांशीं. ।
विलुठति पदपीठीं देव कोटीनुकोटी,
अहमहमिकतेनें धांवती वीर कोटी. ॥ ४२ ॥

क्षणभरि तंव तेथें विप्र साशंक पाहे,
झडकरि कर त्याचा सात्यकी घेत आहे. ।
तदुपरि अवरोधद्वार किंचिद्विलंबें,
यदुपति मग पावे पार्थहस्तावलंबें. ॥ ४३ ॥

दाशार्ह हे अनुसरेत तया नृपातें; । संभाविलें मग यथोचित दृष्टिपातें. ॥
अंतःपुर प्रविशतां मधुकैटभारी, । सर्वांसही अति निषेधति वेत्रधारी. ॥ ४४ ॥

संध्यामंडपमार्ग दावित असे मुख्य प्रतीहारिका.
'यावें, श्रीहरि ! कृष्ण ! यादवपते !' हें बोलती सारिका. ।
संध्यावंदन आदरें करुनि जों गेला असे भोजना,
विप्राची तंव नारदें हळुच ते केली असे सूचना. ॥ ४५ ॥

झडकरि जगदीशें विप्र तो आणवीला,
अति सुरभि फुलेलें आदरें न्हाणवीला; ।
तडप रुचिर लाखी उंच हा नेसवीला;
सविनय मग पंक्ती आपुले बैसवीला. ॥ ४६ ॥

तदुपरि मग पंक्ती बैसती यादवांच्या,
द्विजपरिणत जेथें बोलती वेदवाचा. ।
फिरति बहुत तेथें देवदासीसहस्त्रें,
सहजच निजतेजें वारिती जे तमिस्त्रें. ॥ ४७ ॥

कितिक मग बसाया देति या हेमपीठें,
कितियक मग तेथें मांडिती रत्नताटें; ।
कितियक तरळा या लाविती दीपमाळा,
कितियक मग तेथें वाढिती त्या सुशीला. ॥ ४८ ॥

हलधर हरि दोघे बैसती येक ताटीं,
त्वरित बहुत आली माय्र हे त्यांजसाठीं; ।
सकलयुवतिमान्या देवकी देवमाता,
पुनरपि निजहस्तें वाढिते जे अनंता. ॥ ४९ ॥

क्षणभरि मग दारा येति त्या राजदारा,
अति रुचिर पदार्थां वाढिती ज्या उदारा. ।
हळुहळु सकाळांचीं भोजनें सांग होतीं,
कनकघटित तस्तें दासिका आणवीती. ॥ ५० ॥

सुरभिसलिल देती कस्तुरी आंचवाया,
स्थविर तदपि लागे मृत्तिका चांचपाया. ।
अभिनव नवलें या हांसती देवदासी,
हळुच मग दटावी ते दरोगीण त्यांसी. ॥ ५१ ॥

अति रुचिर विडयांची प्राप्ति सर्वांस झाली,
द्विजपतिस अनुज्ञा उद्धवें देववीली. ।
यदुपतिजनकाची जे असे होमशाळा,
क्षणभर मग तेथें स्वाप जाऊन केला. ॥ ५२ ॥

निजेल्याही रामायण आणि महाभारत पढे,
मधेमध्यें नामस्मरणमहिमा त्यावरि चढे. ।
महाध्यानाभ्यासीं स्थगित मग राहे क्षणभरी,
मनामध्यें येती हरिपदसुखांभोधिलहरी. ॥ ५३ ॥

भरें हा निद्रेच्या द्विजपति निजेला जंव असे,
त्यव्हां, हा येऊन प्रभुवर तया संनिध बसे. ।
मनस्वी, विश्वात्मा, भुवनपति, विश्वंभर, हरी,
विसांवा भक्तांचा द्विजचरणसंवाहन करी ! ॥ ५४ ॥

करस्पर्शें त्याच्या द्विजतिलक तत्काल उठिला,
म्हणे "हा श्रीकृष्णा परम मज अन्याय घडला !" ।
पदीं माथा ठेवी; झडकरि करें तत्कर धरी,
"प्रकार स्वामी हा सकल परलोकास अधरी. ॥ ५५ ॥

घडे हें प्रत्यक्ष प्रकटच तुझें दर्शन मला,
नसे कांहीं माझा तदपि असदुद्योग शमला; ।
रहातां ही पाहें सुरपतितरूच्या तळवटीं,
जसा भिक्षेसाठीं निशिदिस करंटा कटकटी ! ॥ ५६ ॥

प्रयासें संसारीं निजविषयगुंते उगविती,
गुणीं तूझ्या ते तों सहजच सुखें गुंतति यती. ।
अहंबुद्धिस्पर्शें प्रकटच जया वाळित पडे,
तयां त्वत्पंक्तीचें अढळ बसणें कोठुनि घडे ? ॥ ५७ ॥

निजानंदें जें कीं स्थळ परमहंसां विचरणें,
कदा जेथें नाहीं नियत निजकर्में निचरणें. ।
तया ठायां जाया हृदय बहुधा तांतडि करी,
जगन्नाथा, आतां क्षणभरि पहा धीर न धरीं. ॥ ५८ ॥

वृथा मायाजाळीं पडुन मन हें धांवति करी,
दुराशेनें गुंते अजुनि विषयीं वीट न धरी. ।
विवेकाच्या मूळें निजनिलयकारागृह सुटे,
ठसा वैराग्याचा तरिच हृदयामाजि उमटे. ॥ ५९ ॥

मनामध्यें माझ्या विषयविषवृक्ष प्रकटला,
फलाशेनें जीवाभिधविहग जेथें लिगटला, ।
निराशेनें जेथें शुक, सनक झेंपावति सदा,
यदुत्तंसा, आतां झडकरि तया दाखविं पदा. ॥ ६० ॥

पदस्पर्शें तूझ्या दुरितचयपाथोनिधि जळे,
क्षणार्धें श्रीकृष्णा, सुकृतमय कल्पद्रुम फळे ।
भवद्बोधाचा हा अनुभव महा होय मजला,
अहो मूढत्वानें अझुनि पुसणें काय तुजला ? ॥ ६१ ॥

अहो या लोहाचा जिनस परिसेसीं जरि मिळे,
तयाच्या संसर्गें अखिल मग लोहत्व उधळे. ।
अकस्मात स्वामी, सकलहि अहंकार निरसे,
पदस्पर्शें तूझ्या सहज मजला मीपण नसे " ॥ ६२ ॥

सदा सद्भावाचा अतिशयित भोक्ता हरि असे,
मनामध्यें ज्याच्या स्वपरजनवैषम्य न वसे. ।
महा प्रेमें त्यासीं तदुपरि जगन्नायक वदे,
जयाचे भक्तीला मन यदुपतीचें बहु वधे. ॥ ६३ ॥

"चहूंमध्यें मुख्य प्रकटच गृहस्थाश्रम असे,
असें विश्रांताचें निलय दुसरें आणिक नसे. ।
प्रसंगें हे तेथें अतिथिपरिचर्या जरि घडे,
समारंभें अंतीं सुरपतिपुरद्वार उघडे. ॥ ६४ ॥

महादोषी मूढप्रवरवर विप्रद्रुव असे,
जया दुष्टा माझी निपट कधिंही चाडच नसे, ।
तयाही विप्राचा अनुचित असत्कार करणें,
जयाच्या संक्षोभें निजपतन कैसें न घडणें ? ॥ ६५ ॥

निजद्रोहाग्नीचा कण जरि पडे किंचित मनीं,
तयाच्या संसर्गें उठति भडके वंशविपिनीं; ।
महांधाचे दृष्टी प्रकटहि महा दोष न दिसे,
पहातां तो याचें फळ तुरुत हातावरि असे. ॥ ६६ ॥

यदृच्छालाभें जे द्विज मुदित युष्मद्विध सदा,
  तयांच्या पायांचा परिचय सुटेना मज कदा. ।
भृगूची हे लत्ता विमल हृदयीं नित्य मिरवीं,
  इच्या लाभें लक्ष्मीप्रणयरस जीवा विसरवीं. ॥ ६७ ॥

प्रसादें ज्यांच्या मी यदुपति जगन्नायक असें,
  असे हे निर्वाहें अझुणि समजेना जग कसें ? ।
मदीया भक्तांचा अपसद तिरस्कार करिती,
  अहो, ते दुष्टात्मे नियत मजशीं वैर धरिती. ॥ ६८ ॥

भल्याच्या संतोषें निरतिशय माझें मन निवे,
  तयांच्या या दुःखें नियत बहुधा जीव दुखवे. ।
तयां भक्तांसाठीं विविध अवतारांस धरणें,
  तदुद्देशें ऐसा विरस मज संसार करणें. ॥ ६९ ॥

पहा माझे नाभीकमळिहुनि वेधे उपजती,
  अनंतब्रह्मांडें उदरकुहरीं हे कुहिजती; ।
द्विजाची मर्यादा तदपि अवहेळूंच न शके,
  अहो, तेथें इंद्रप्रभृति विबुधें कोण मशकें ? ॥ ७० ॥

अहो, जेथें माझें स्तवन करितां वेद अडती,
  शिरोभागा माझे अपरिमित संदेह पडती. ।
गुणोत्कर्षें माझ्या निपटच धरी शेष लघिमा,
  तया जाला पाहें अविषय मला भक्तमहिमा. ॥ ७१ ॥

अहो, सद्भक्तांचा परम मज दुष्काळ पडला,
  अशामध्यें तूझा अवचट मला लाभ घडला ! ।
द्विजा तूझें आहे अनिश अनुसंधान मजशीं,
  घडे कैसा तेथें क्षणभरि तरी भेद तुजशीं ? ॥ ७२ ॥

सदा सद्वांच्छेचें हृदयविवरीं बीज उगवे,
  अहो, मद्भक्तीचा तरिच बरवा कोंब उघवे. ।
विवेकाचे पाले सहज फुटती कोमल नवे,
  मनाचे वृत्तीला अभिनव कसा उत्सव नव्हे. ॥ ७३ ॥

क्रमप्राप्तीनें हे तदुपरि फुले शांतिलतिका,
अशें हें विश्रांतिस्थल परम जें जीवपथिका. ।
निजानंदामोदें सकल सुखदुःखादि विसरे,
पहातां अद्वैतामृतफळ रसोडेक पसरे. ॥ ७४ ॥

प्रपंचीं हें माझें भजन जरि कांहीं ( क्षण ) घडे,
महादोषी तोही निपट अडवाटेस न पडे; ।
प्रतिज्ञा माझी हे नियत समजावी बुध जनीं,
धरावा निर्वाहें अनवरत विश्वास भजनीं. ॥ ७५ ॥

अहो जों जों जीवा सगुण भजनाचें पुट चढे,
अनेका जन्मांचा तंव तंव मनाचा मळ झडे. ।
स्वभावें सत्वाचे तदुपरि कसोटीस उतरे,
क्रमप्राप्तीनें हें मनपण मनाचें मग तुरे. ॥ ७६ ॥

भवांभोधीमध्यें विषयमय आनाय पसरे.
तयाच्या संसर्गे निजहित मनोमीन विसरे. ।
पहातां या दोघां अणु जिवशिवां भेद नसतां,
स्वबुद्धीनें कल्पी हतमति दुजा भाव नसतां ! ॥ ७७ ॥

मतें वेदांताच्या समज निजसंसार लटिका,
करी कोणाची हे कवण लटकी आजि सुटका ? ।
पहातां बंधाचें सहज समजे मूळच नसे,
मुमुक्षा तेथें हे गगनकुसुमाकार विलसे. ॥ ७८ ॥

समस्तां शास्त्रांचें मथित कथितों सार तुजला,
नको आतां टाकूं क्षणभर मनांतून मजला. ।
कराया हे सेवा समुचित तुझी सिद्धच असें,
अभिज्ञा, विप्रेंद्रा, प्रकृत तुजला यावरि पुसें. ॥ ७९ ॥

समुद्रामध्यें हें स्थळ तरि महा दुर्गम असे,
तुम्हां लोकांचा तो अझुणिवरि संचारच नसे; ।
किमर्थ स्वामी, हा श्रमित बहु आत्मा श्रमविला ?
कळों द्यावें याचें झडकरि तुम्हीं कारण मला." ॥ ८० ॥

घनःश्यामाचीं हे सरस वचनें विप्र परिसे,
महा आनंदाचे हुरुप उठती त्याजसरिसे. ।
तुरीयावस्थेचे अनुभवरसीं यद्यपि वसे,
तऱ्ही श्रीकृष्णाला प्रतिवचन हे देतच असे. ॥ ८१ ॥

विदर्भी हे आहे प्रथित बहुधा कुंडिनपुरी,
तयेच्या राजाची चतुर विलसे आजि कुमरी. ।
मनोभावें कृष्णा, नियतच जिनें तूज वरिलें,
तुझे पायीं निष्ठा धरुनि तुजला पत्र लिहिलें. ॥ ८२ ॥

द्विजें श्रीकृष्णाचे तदुपरि करीं पत्र दिधलें,
तयानें लाखोटा उखळुनि असे जें उकलिलें. ।
तयाला वैदर्भी स्वलिखितमिषें भेटत असे.
जयेच्या प्रेमाचा अतिशय असाधारण दिसे. ॥ ८३ ॥

जेथें वठे रुचिर कुंकमबिंदु शोभा,
लाजे जिला कनककेतकिगर्भगाभा; ।
आली असे प्रकृत जे प्रतिमा प्रियेची,
ते पत्रिका हळुच यादवराव वाची. ॥ ८४ ॥

जैसी असे विमल वोवणि मोतियांची,
तैसी वसे सहज ठेवणि अक्षरांची; ।
ओजःप्रसादमधुरादिक संपदांची,
शोभा धरून विलसे रचना पदांची. ॥ ८५ ॥

“ तीर्थस्वरूपचरणा, करुणानिधाना,
प्रौढप्रतापमिहिरा, प्रथिताभिमाना, ।
सौजन्यसिंधुसदना, मदनाभिरामा,
सर्वोपकारनिरता, समवाप्तकामा, ॥ ८६ ॥

राजाधिराज, यदुवंशशिरोवतंसा,
कंसांतका, मुररिपो, कमळानिवासा, ।
राजश्रियासह विराजित राजमान्या,
वंदी तुझे चरण भीमकराजकन्या. ॥ ८७ ॥

येथील हें कुशल जाणुन लेखकाला,
आज्ञापिजे निजमहोत्सवलेखनाला. ।
हें लीहिलें प्रकृत केवळ संप्रदायें;
मानूं नये परि यथार्थचि देवरायें. ॥ ८८ ॥

विज्ञापना परिस यादववंशवीरा,
योगींद्रहृत्कमलपंजरगर्भकीरा, ।
हातास ये त्वरित आजि उडोन माझ्या,
वार्ता मला श्रवणगोचर होति तूझ्या. ॥ ८९ ॥

माझा मनोमधुप लुब्ध बहूत झाला,
तूझे पदांबुजयुगीं रहिवास केला. ।
काकूलती बहुत याजनिमित्त येतें,
कृष्णा, तुझे चरणपल्लव हे धरीतें. ॥ ९० ॥

जे आयकेत भवदीय गुणौघ कानीं
त्यांचे निवेति उगले मग ताप तीन्ही. ।
जे पाहती अति मनोहर रूप देवा,
त्यां डोळसां अखिल लाभ अपूर्व व्हावा. ॥ ९१ ॥

जन्मास या तुज निमित्तचि जाण आलें,
आईकतां गुण तुझे सजणा, न धालें. ।
हे अच्युता, मन मला नकळेच तूझें,
तूझे पदीं परि अपत्रप चित्त माझें. ॥ ९२ ॥

सर्वां गुणीं तुजसमान महा वदान्या,
ते कोण तूज नवरी न वरील धन्या ? ।
विद्यावयद्रविणरूपगुणौघधामा,
कृष्णा, नृसिंह नरलोकमनोभिरामा. ॥ ९३ ॥

या कारणें नियत त्यां वरिलास भावें,
येऊनियां त्वरित त्वां मज आजि न्यावें. ।
हा लागला जिव असे तुजवीण जाया,
तूं आपुली हरि करीं मज आजि जाया. ॥ ९४ ॥

हा वीरभाग शिशुपाळ जयीं विटाळी,
वीरामधें तुरुत होईल येकि टाळी. ।
लज्जा त्यजून धिट आणिक येक बोलें,
सिंहामिषा हरुनि नेतिल आजि कोल्हे ! ॥ ९५ ॥

यागादिदाननियमव्रतदेवपूजा,
केली असे, तरिच होइल लाभ तूझा. ।
येऊनियां त्वरित फार गदाग्रजानें
पाणिग्रहास करिजेच चतुर्भुजानें. ॥ ९६ ॥

पर्वा असे लगिन निश्चित जाण भावें,
सेनेसमेंत अति गुप्त बहूत यावें. ।
मंथून चैद्यमगधेशबळासि धीरा,
रक्षोविवाह विधिनें मज नेयिं, वीरा. ॥ ९७ ॥

अंतःपुरांतुन वधू न वधून बंधू,
नेऊं कशी म्हणशि तूं पुरुषार्थसिंधू ? ।
यांचे कुळीं नववधूस असे विचित्रा
लग्नास पूर्व दिवशीं कुळदेवियात्रा. ॥ ९८ ॥

ग्रामास संनिध निकेतन अंबिकेचें,
जें हें असे निजमनोरथदायिकेचें; ।
तेथें बसोन घटिकाद्वय वाट पाहें,
मी ही नये तरि तुझी मज आण आहें. ॥ ९९ ॥

तूझ्या पदांबुजरजःस्नपनें शिवाला
अज्ञाननाशनमहोत्सव थोर जाला. ।
एतन्निमित्त सनकादिक लुब्ध होती,
तूझा पदांबुजरजःकण इच्छितातो. ॥ १०० ॥

जें हा तुझा चरणलाभ मला न व्हावा.
त्यां निश्चयें तरि हरी मग जीव द्यावा. ।
घेईन मी तुज निमित्त सहस्र जन्में,
त्वत्प्रापकें करिन नित्य अनेक कर्में. ॥ १०१ ॥

विज्ञापना शपथपूर्वक तूज केली,
येथील तों सकळरीति कळोनि गेली. ।
आणीक काय निपुणाप्रति म्यां लिहावें,
त्वां एक वेळ सगुणा इकडे पहावें. ॥ १०२ ॥

नारायणा, निखिलवृष्णिपते, मुकुंदा,
टाकून दे मज निमित्त समस्त धंदा ।
दासी तुझी परम लालस वाट पाहे,
तूझे त्वरेस बहु यावरि मोल आहे. ॥ १०३ ॥

हेजीब हे जीभचि जाण माझी,
येथें नसो किमपि विप्रतिपत्ति तूझी. ।
पत्रांत लेख्य अवशिष्ट असेल कांहीं,
याच्या मुखें विदित होइल तूज तें ही." ॥ १०४ ॥

हें भीमकीपत्र समाप्त जालें. । कृष्णास कांहीं यक हास्य आलें. ॥
जाणोनि हा आदर माधवाचा, । वदे प्रसंगोचित विप्र वाचा.॥ १०५ ॥
चतुर्भुजा, नीरदनीलवर्णा, । परावरा, वीरकुलावतीर्णा, ॥
विशेष हा आइक शेषशाई । करीस लोकत्रयपातशाही. ॥ १०६ ॥
ते भीमकी पंकजपत्रनेत्रा, । कृशोदरी पूर्णसुधांशुवक्त्रा, ॥
उत्फुल्ल आरक्त सरोरुहांतें । जे लाजवीते करभोरु हातें. ॥ १०७ ॥
जो हा न पावे समता नखाची । तो काय पावे उपमा मुखाची ? ॥
नखप्रभेनें विधु हा उटावा । तरीच हो निर्मल ऊमटावा. ॥ १०८ ॥
असेत हे सुंदर केश काळे, । विशाल तीचे विलसेत डोळे; ॥
जयांपुढें खंजन खंज जाले । प्रत्यक्ष हे मीन जळीं लपाले. ॥ १०९ ॥
तीची असे सज्ज कपाळपाटी; । सौभाग्यरेखा उमटे ललाटीं; ॥
ज्या भ्रूलता श्यामल शोभमाना । त्या कामकोदंडसमान माना. ॥११०॥
अत्यंत हे स्वच्छ कपोल दोन्ही, । सुवर्णशुक्तिभ्रम होय कानीं; ॥
नासा तिची हे उपमा न साहे, । तिलप्रसूनाहुन नीट आहे. ॥ १११ ॥
आली तशी त्या अधरास लाली, । लज्जा प्रवाळांस विशेष जाली. ॥
त्या पक्क हो दाडिमबीजराजी । दंतावलीदास्यविधीस राजी. ॥ ११२ ॥

असे गळा मंजुळ हा निसर्गें, । तथापि तीचीं वचनें महर्घे. ॥
तीच्या स्मिताचें जंव तेज फांके । तेणेंहि त्याचें मग ओज झांके. ॥ ११३॥
न ये मृणालां मृदुता भुजांची, । कन्या महासुंदर भूभुजाची. ॥
अत्यंत शोभा कुचकुड्मलाची । विलसभू तन्नयनोत्पलांची. ॥ ११४ ॥

नाभीऱ्हदीं या मदनास थारा. । रोमावली तत्तरवारधारा. ॥
तीच्या नितंबास गुरूत्व साजे; । माजे जिच्या सिंहसमाज लाजे.॥११५॥
दृष्टांत तीच्या जघनास नाहीं. । तथापि भासे मज येक कांहीं. ॥
साम्राज्य जेव्हां मदनास आलें, । सुवर्णसिंहासन सिद्ध केलें. ॥ ११६ ॥

असेत त्या मांसल फार ऊरू; । जानुद्वयें सुंदर फार भीरू. ॥
त्या पोटऱ्यांची रुचिर प्रभा ते । कीं मन्मथाचे विलसेत भाते. ॥ ११७॥
ते पाय तीचे नवपल्लवांनीं । समानसे, मानव कोण वानी ? ।
औदार्य जे नित्य धरीत मोठें । कल्पद्रुमाचें यश हाय खोटें. ॥ ११८ ॥

नसे बहू पातळ आणि मोटी; । देवांगनांच्या नुपमेति कोटी. ।
नसे बहू उंच तशीच खूजी; । प्रत्यक्ष लक्ष्मीप्रतिमाच दूजी. ॥ ११९ ॥
नसे मनांतून कदापि खोटी; । खोट्या करी तप्त सुवर्णकोटी. ।
गंगाप्रवाहोपम शील जीचें; । पवित्रतावर्णन काय तीचें ? ॥ १२० ॥

पादादिमूर्धांत सुलक्षणांनीं । संपन्न सामुद्रिक लक्षणांनीं. ॥
लक्ष्मीच किंवा अवतीर्ण जाली । या भीमकाच्या उदरास आली.॥१२१॥
माला स्मराची विलसे जपाची । कीं बोलती मूस तुझ्या तपाची, ॥
लोकत्रयीं मोहनमूलविद्या; । साहित्यसंगीतकलानिषद्या. ॥१२२॥

नसे तुझ्या तों गणना गुणांची । तेही असे मूलि महागुणांची. ॥
ते तूजला हात बहूत जोडी, । केली तिणें आजि तुझीच जोडी. ॥१२३॥
असे स्वभावें बहुफार गोरी । घरांमधें कामविकार चोरी. ॥
जीला फुलांची जड होय जाळी । मुक्ताफळांची जिस माळ जाळी.॥१२४॥

तथापि बाहेर उभी न ठांके, । अंतर्गृहांतून कदा न फांके. ॥
ध्याते तुझ्या ते पदनीरजातें; । अखंड नेत्रांतुन नीर जातें. ॥ १२५ ॥
तीचा सदा गद्गद कंठ दाटे, । नेत्रांबुजीं सागरपूर लोटे, ॥
तुझे कृपेचा नसतां जिव्हाळा, । वांचेल कैसी सुकुमार बाळा ? ॥१२६॥

अत्यंत दैनंदिन दैन्य जोडी, । लावण्यलक्ष्मी परि हे न सोडी. ॥
समीप आली दशमी अवस्था। करूं नये या वरि त्वां अनास्था.॥१२७॥
तूझ्या गुणांची जपमाळ केली । ते वीसरे भोजनही भुकेली. ॥
कृष्णा, तुझीं जें असती चरित्रें । चित्रीं पहा ते लिहिते विचित्रें.॥१२८॥
दैवें पुरोडाश पवित्र झाला । शिवेल आकस्मिक काय याला ? ॥
म्यां काय देवा तुजशीं वदावें ? । थोडक्यांत जाणोन बहूत घ्यावें.॥१२९॥
हें सर्व आहे नटनाट्य तूझें । चातुर्य हें व्यर्थ समस्त माझें. ॥
तूझ्या प्रकाशें जग हें प्रकाशे, । त्वां नाशिल्या हें जग सर्व नासे.॥१३०॥

त्वां हालवील्याविण हें न हाले, । त्वदीय सत्तेविण हें न चाले, ॥
असेच निश्चेतन चित्र जैसें, । हें सर्व आहे तुजवीण तैसें. ॥ १३१ ॥
पाहे तुझी वाट नरेंद्रपुत्री, । दिसेस तूं तो मज दीर्घसूत्री ! ॥
केली तिची येउन हे अनुज्ञा, । आतां असे यावरि काय आज्ञा ? ॥१३२॥

निजेल्या पर्यंकीं किमपि न लगे नीज नयनीं,
वियोगें उद्विग्ना उठत बसते भूमिशयनीं. ।
स्मराचे जे सोशी तिखट शर राजन्यतनुजा,
चकोराक्षी लक्षी त्वरित मुखचंद्रोदय तुझा.' ॥ १३३ ॥

वाक्यें अशीं हे जंव आयकीलीं, । श्रोत्रें हरीचीं अति तृप्त झालीं. ॥
धरून हातें मग हात त्याचा । वदे तयासीं स्मितपूर्व वाचा. ॥ १३४ ॥
"जाली असे हेच मला अवस्था, । दिसेत तद्युक्त दिशा समस्ता. ॥
प्रतिक्षणीं व्याकुल चित्त होतें, । विदर्भदेशाप्रति धांव घेतें. ॥ १३५ ॥

रुक्मीच तो मद्विषयीं निषेधी, । कळोन गेलें तुजहून आधीं. ॥
आतां रणीं सर्व वधून वैरी, । हरीन ते कांचनगर्भ गौरी. ॥ १३६ ॥
चंद्रानना, खंजनमंजुळाक्षी, । शीतोदरी, मार्ग मदीय लक्षी. ॥
जाली असे मत्पर पेशलांगी, । तीचें असें शासन कोण लंघी ?"॥१३७॥

बोलोन ऐसें पणपूर्व शौरी । प्रस्थाननक्षत्र त्यव्हां विचारी. ॥
तों दैवयोगें गुरुपुष्य साधे, । मुहूर्त अत्युत्तम कृष्ण लाधे. ॥ १३८ ॥
उत्साह तेणें द्विगुणीत झाला. । तत्काळ तेव्हां रथ आणवीला. ॥
आनंदला नंदन देवकीचा, । तेथेंच केला विधि देवकीचा. ॥ १३९ ॥

प्रस्थानकाळीं बहु गौरवीलें, । समस्त ते यादव राहवीले. ॥
करी उपस्थान महारथाचें, । जो येक वाहे भय मन्मथाचें. ॥ १४० ॥
धरून हातें द्विज बैंघवीला. । विशेष हा आदर दाखवीला. ॥
त्यानंतरें आपण पाय टाकी. । तत्काळ तो दारुक अश्व हांकी. ॥१४१॥
धांवेत ते तेथुन फार घोडे, । वाटेत हें ज्यांस दिगंत थोडें. ॥
तों कावळेही उजवे उडावे. । महा हटी त्यासहि जाति डावे. ॥ १४२ ॥
उल्लंघिलीं ग्राम, पुरें, सहारें, । प्राणप्रियाचारुकथाविहारें. ॥
आनर्तदेशींहुन येक रात्रें, । तें पाविजे कुंडिन पद्मनेत्रें. ॥ १४३ ॥

कथा हे कृष्णाची सकळजगदानंदजननी,
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं; ।
प्रसंगें श्रोत्यांचे सकलहि महादोष हरती,
यदूत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ १४४ ॥

इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये कुंडिनाऽऽगमनं नाम पंचमः सर्गः ॥ ५ ॥

---

# सर्ग सहावा.

याहून पूर्वीं शिशुपाळ आला, । जेणें विवाहोचित वेष केला.॥
चाले जयाची चतुरंग सेना, । रजोविशेषें रवि हा दिसेना. ॥ १ ॥
रुक्मी पुराबाहिर त्यास आला, । करून पूजा मिरवीत नेला. ॥
वाजेत भेरी, बरवे नगारे, । ते भीमकाची नगरी सवारे. ॥ २ ॥
शोभे महा कुंडिन राजधानी । संपन्न नानाविध संविधांनीं. ॥
शृंगारिल्या उत्कट राजवीथी. । समस्त शृंगाटक नोप देती. ॥ ३ ॥
प्रासाद अत्युच्च असे असावे, । सप्ताश्व जेथें बहु घे विसांवे. ॥
जेथें उभारति महा पताका, । विचित्रवर्णा दिसती अनेका. ॥ ४ ॥
काश्मीरसंसेचित अंगणांनीं, । प्रवाळमुक्तामय तोरणांनीं, ॥
द्वारप्रदेशा बहु येति शोभा, । पण्यांगना नाचति त्या सदंभा. ॥ ५ ॥

चैद्येंद्र हा जानवशास आला, । नृपें पुरस्कार बहूत केला. ॥
चहूंकडे या प्रसरेत वार्ता. । आरंभलें मूळ महा अनर्था. ॥ ६ ॥
स्त्रीरत्न हें कृष्ण हरील जेव्हां । स्वकीय नाशे पुरुषार्थ तेव्हां. ॥
म्हणोनि हा मागध सिद्ध झाला, । सहाय या चैद्यनृपास आला. ॥७॥

हा दंतवक्रादिक पौंड्रकांनीं । आइकिजे सर्व उदंत कानीं. ॥
द्वेषी हरीचे हृदयीं जळाले, । मदें जरासंधमता मिळाले. ॥ ८ ॥

या वेगळे आणिक येति राजे, । बलिष्ट ज्यांचा दळभार साजे. ॥
कित्येक हे चैद्यनृपा सहाया, । कित्येक हे कौतुकही पहाया. ॥ ९ ॥

तैलंग, कार्नाटक, पांड्य राजे, । त्या द्राविडांचा समुदाय गाजे. ॥
येती महाराष्ट्र महाभिमानी, । कित्येक ते केवळ मद्यपानी. ॥ १० ॥

काश्मीर, पांचालक, गौड येती । आवंत्य, बाल्हीक, अनेक जाती, ॥
कैकेय, गांधार अनेक आले, । सत्कार त्यांचे बहु फार केले. ॥ ११ ॥

झडकरि गणकांला भीमकें आणवीलें,
कनकमय विटांचें बोहलें घालवीलें. ।
दृढतर बसवीले अंगजाचेच लेवे,
वरिवरि करिजेती कस्तुरीचे गिलावे. ॥ १२ ॥

तदुपरि सकळेंही मंदिरें धूपवीलीं,
परम रुचिर चित्रें कारुकीं काढियेलीं. ।
अति मृदुतरबाला ज्या महा उंच खाशा,
अति चतुर फरासीं अंथरील्या तिवाशा. ॥ १३ ॥

त्रिविध मधुर वाद्यें, चौघडे वाजताती;
अगणित दरबारीं भाट हे गाजताती; ।
तदुपरि मग ल्याल्या नेसल्या नायकांचे
अगणित गण येती, सोयऱ्याधायऱ्यांचे. ॥ १४ ॥

आता, माम्या, मावशा, सर्व आल्या. ।
धाड्या, भाच्या, आणिल्या सर्व साल्या. ।
सास्वा, जावा, माय, आज्या, बहीणी ।
आल्या, मानें त्या नणंदा, विहीणी. ॥ १५ ॥

सकळहि मग तेथें राजपत्न्या मिळाल्या,
धरुनि मुलिस हातीं स्नानशाळेस आल्या. ।
द्रुचित मन तयेचें होय, कांहीं न चाले,
यदुतिलकविलंबें घाबिरे प्राण झाले. ॥ १६ ॥

ते मांडिली रत्नजडीत चौकी, । मुक्ताफळांचे बसलीत चौकीं. ॥
लागे तिला जे समयीं हरिद्रा, । शची दिसे जीजपुढें दरिद्रा ! ॥ १७ ॥

सख्या तिच्या काढुनि सर्व लेणीं, । हळूच तीची उकलीति वेणी. ॥
जेथें असे रत्नजडीत न्हाणी, । तेथें तिला नेउनि माय न्हाणी. ॥१८॥

जों जों पडे ईवरि उष्ण पाणी, । तों तों स्मराची झळके कृपाणी. ॥
हें मंगलस्नान तयेस झालें, । शरीर संप्रोछन सज्ज केलें. ॥ १९ ॥

अत्यंत थोर गजरें अति शीघ्र आली,
राकाशशांकवदना सदनांत आली. ।
बाळातपीं कुटिल कुंतल वाळवीले,
आलीजनें अतिसुगंधहि धूपवीले. ॥ २० ॥

असे असे सर्व शरीर गोरें, । जयापुढें कांचन होय भोरें. ॥
अल्यक्ष हे दोष दिसोन याचे, । तथापि लेते नग सोनियाचे. ॥ २१ ॥

भरजर अवर्घा हे नेसली उंच साडी,
पदर मग तयेचा सुंदरी लांब काढी. ।
पदकमळ जयेचें वंदीजे लोकपाळीं,
सिसफुल धरि माथां, भांग, टीळा कपाळीं. ॥ २२ ॥

कांचोळी मोतियांची तटतटित वसे वक्षदेशीं जयेच्या,
पेट्यांचें येकदाणे, तदुपरि दुलडी कंठदेशीं तयेच्या. ।
रत्नांची रुंद कांची अतिरुचिर जिच्या मध्यभागीं विलासे,
जालीसे क्षीण मध्यें म्हणउनि मदनें बंध किंवा दिलासे !॥२३॥

कोथिंबिरी, टोपण, घोंसबाळ्या, । शोभेत कानीं जडिता निराळ्या. ॥
मुक्तामयें तानवडे, विचित्रें । ल्याली असे, जे वदनांत पत्रें. ॥ २४ ॥

दंडीं धरी रत्नजडीत वांकी, । ल्याली असे, बेसर दिव्य नाकीं, ॥
गोंडाळ ईचे बहु हात गोरे, । बसेत जेथें अति सज्ज दोरे. ॥ २५ ॥

त्या बांगड्या उत्तम सोनियाच्या, । मधें मधें शोभति माणिकांच्या; ॥
हे पाटल्या, हात-सरांस त्याली, । अत्यंत किर्मीरित कांति झाली.॥२६॥
त्या आरशा घालुनि आंगठ्याला, । त्याली असे सुंदर आंगठ्यांला, ॥
साध्या, बिलोरी, नकशीजडीता, । दशावतारांकित मूर्तिमंता. ॥ २७ ॥
तीच्या सरीचे न बसेत फांसे, । म्हणोन कांहींयक माय हांसे. ॥
चितांक चिंताकुल लेत नाहीं, । तद्वाक्य चित्तांत न घेय कांहीं. ॥२८॥
घाली गळां रत्नजडीत पेटी, । लावण्यसिंधूंत निघे अपेटी. ॥
चापेकळ्यांच्या मिरवेत माळा, । मुक्ताफळांच्या दिसती अमाळा. ॥२९॥
ते जोड पायीं सज सांखळ्यांचे, । शोभेत दोन्ही सर पोवळ्यांचे. ॥
बाळा, कडीं, पैंजण जाण त्याली,। त्या खालते घुंगुर सज्ज घाली.॥३०॥

अनवट निटल्या ही जोड त्या जोडव्यांचा,
अनुपम उमटे हा शब्द पोल्हारियांचा. ।
रुचिरतर विरोद्या शोभती अंगुळीला,
कितियक नग लेतां भार झाला मुलीला. ॥ ३१ ॥

क्षणभरि परि तीचें चित्त हें स्वस्थ नाहीं,
म्हणउनि नग तेव्हां लेतसे स्वल्प पाहीं. ।
अविरल मग बाळा मोकळे केश बांधे,
वदनविधुभयानें ध्वांत हे कावरोधे. ॥ ३२ ॥

सुस्नात देवी मग ते सुशीला । प्रवेशली येउनि यज्ञशाळा. ॥
जे पीत खंबाइत उंच नेसे, । जे हेमपीठावरि सज्ज बैसे. ॥ ३३ ॥
जे येकलें मंगल मंगळाचें । तें येकदाणें मिरवे गळांचें. ॥
बाळ्या धरी रत्नजडीत कानीं, । नासेस मोतीं विलसे सुपानी. ॥३४॥
जीच्या स्वरें लाजतसे विपंची । माजीं जिच्या रत्नजडीत कांची. ॥
त्याली असे जे मुद राखडीला,। झाली असे तांतडि तांखडीला. ॥३५॥

पुण्याहवाचन करून बसेत दोघें,
आहेर घेत असती द्विजमंत्रयोगें. ।
बैसे पुढें अति सुलक्षण ते कुमारी,
नीरांजनें करिति तीस अनेक नारी. ॥ ३६ ॥

पञ्चापदोपासक, अग्निहोत्री, । पुरोहित, श्रोत्रिय वत्सगोत्री, ।
पुढें निघे उत्तम संप्रदायी, । ज्याभोंवते भोंवति वाजपेयी. ॥ ३७ ॥

अथर्ववेदें गृह्यज्ञ केला. । तें भीमकीला अभिषेक झाला. ॥
हिरण्यगोभूतिलवस्त्रदानें । इंच्या करें देवविलीं नृपानें. ॥ ३८ ॥

मिळति सकल तेथें ऋग्यजुःसामवेदी,
शतपुरुष जयांची हे अविच्छिन्न वेदी. ।
त्वरित बहुत केली मंडपादि प्रतिष्ठा,
धरणिपतिस देवीं ब्राह्मणीं थोर निष्ठा. ॥ ३९ ॥

देशोदेशींहून ते विप्र येती, । कीर्ती याच्या नित्य जे आयकेती. ॥
देती गांवीं टाकुनीयां कुटुंबें, । लागे मागें अर्भकांचेंच लोंबें. ॥ ४० ॥
वऱ्हाडी, कऱ्हाडी, बहू खानदेशी, । वऱ्हाडास येती कनोजे विदेशी, ॥
तसे कानडे, कोंकणे, वागलाणे. । महा मस्करे माथुर, जे शहाणे. ॥४१॥

कित्येक हे येति दशावधानी, । जे कुंडलें हालविताति कानीं. ॥
पदोंपदीं देति महापरीक्षा, । जाली असे सौमिक ज्यांस दीक्षा. ॥४२॥
भजेत कोणी जन माधवाला, । आराधिती एक उमाधवाला, ॥
सेवीत कोणी द्विज अंबिकेला, । नसेच हा वस्तुविवेक केला. ॥ ४३ ॥
अपार ते दीक्षितभार येती, । समागमें जे पशु वागवीती. ॥
प्रत्यक्ष दंभप्रतिमाच जे कीं । आस्था नसे हे सदसद्विवेकीं ! ॥ ४४ ॥
कित्येक तेथें अजपा जपती, । अव्यग्र जे उग्र तपा तपती. ॥
समाधिसेजे द्विज जे निजेले, । पद्धति ते कोठुन कर्मजालें ? ॥ ४५ ॥

पढत अध्याय सदा क्रमाचे, । बोलेत जे बोल पराक्रमाचे. ॥
कित्येक तेथें पढताति पांच्या, । कित्येक माळा धरिती जपांच्या, ॥४६॥
कृष्णातीरींहून ते माध्व आले, । ज्यांच्या मागें शिष्यसंभार चाले. ॥
आंगोआंगीं लाविती श्रीशमुद्रा, । ग्रंथोग्रंथीं निंदिती नित्य निद्रा. ॥४७॥

हातीं येती तीर्थगंड्या, गवाळीं, । चंबू, चंच्या, आसनांचीं चवाळीं, ॥
माथां ज्यांच्या शोभती उंच टोप्या, । विद्या गर्वें वाटती सर्व सोप्या. ॥४८॥

स्वधर्में गोदेच्या उभयपुलिनीं वास करिती,
सदा श्रीकृष्णाच्या चरणयुगुलीं जे विचरती, ॥

सदाचारी वेदाध्ययनरत वेदांत पढती,
तयांचे हे तथें अतिशयित सन्मान घडती. ॥ ४९ ॥
द्विज परम शहाणे हे महाराष्ट्र येती,
तदुपरि मग तैशी गोडखे गुर्जराती. ।
मिळुनि सकल तथें मंडपामाजि आले,
सविनय अवघे हे भीमकें पूजियेले. ॥ ५० ॥

हातीं जयांच्या झळकेत झाऱ्या, । त्या धोतरांच्या विलसेत धाऱ्या, ॥
काशीनिवासी कितिएक आले, । सत्कार त्यांचे बहु फार केले. ॥५१॥
गाणेश, जे शांभव, सौर आले, । एकांत ते एक मिळोन गेले ॥
जे पूजिती शाक्त विविक्त यंत्रें, । येती बिऱ्हाडें बरवीं स्वतंत्रें. ॥ ५२ ॥
येती पुढें जे जन हे वऱ्हाडे, । मिळेत त्याला बरवीं बिऱ्हाडें. ॥
राहेत देऊन कित्येक भाडें, । धरूनि कित्येक अपूर्व झाडें. ॥ ५३ ॥
कित्येक ते देत असेत बाडें; । फिरेत कित्तेक उगीं लबाडें; ॥
आटोपिले मंडप यायजूकीं; । आक्रंदती अंध, अनाथ, मूकीं. ॥ ५४ ॥
शोभेति वोटे बरवे विटांचे, । समूह जेथें बसती विटांचे; ॥
साध्वी महा सुंदर लोकदारा । ज्यांच्या भयें येत नसेत दारा. ॥ ५५ ॥
बाजार जारीं बहु वेष्टियेले । बाहेर सच्छ्रोत्रिय काढियेले; ॥
आलोकिती नित्य परांगनांतें, । लावीत त्यांसीं अनुकूळ नातें. ॥ ५६ ॥
येती महादोंदिल मोठपोटे; । भारीपणें हे कितियेक लोटे; ॥
धरून बैसेत वृथा प्रतिष्टा, । द्रव्यार्जनीं मुख्य धरीत निष्टा. ॥ ५७ ॥
शिष्यांस जे केवळ राबवीती, । जे स्नानसंध्या बहु लांबवीती, ॥
उगाच ज्यांचा पसेर पसारा, । भुलोन गेला मग लोक सारा. ॥५८॥
जेव्हां येती भार नैय्यायिकांचे, । गोळा होती प्राण मीमांसकांचे; ॥
हातीं पायीं फूटती ज्यास जीभा, । जेव्हां तेव्हां बोलतां वाद ऊभा ॥५९॥
परस्परें शिष्य करीत पृच्छा. । म्हणेत, 'तूं बोलसि काय, तुच्छा. ॥
बोलों नको तूं: क्षण एक राहें; । माझा उपन्यास समग्र पाहें. ॥ ६० ॥
बोलेन आतां अनुमान खंडी. । तुम्हांमधें हें मत कोण खंडी ? ॥
कानींत युक्ती चढती उदंडा, । घेऊं नको व्यर्थ उगा वितंडा. ॥ ६१ ॥

काढूं नका ये समयीं कपालें. । याच्या विचारें उठती कपाळें. ॥
हें निग्रहस्थान तुम्हांस आलें:। नैय्यायिकांचें यश थोर झालें." ॥६२॥
वदेत मीमांसक योग्यताभरें, । " वेमातुरी व्यर्थच चक्र वीवरे. ॥
असेत हें केवळ बुद्धिरोधनें; । नसेत कांहीं परलोकसाधनें." ॥६३॥

वेदांती म्हणताति, " शास्त्र बरवें आमूळ आलोडिलें,
त्याचा हा परिपाक आजि दिसतां या पंडितां मोडिलें.
कैंचे न्याय? किमर्थ याग करणें? संसार हा पारखा.
मिथ्याभूत समस्त जाणुनि तुम्हीं अद्वैत हें वोळखा." ॥६४॥

प्रतिष्टेनें येती कितिक कवि राजेंद्रसदना,
जयांच्या पद्यांच्या अनवरत चालेत रचना. ।
तयांचे दाटीनें अपरिमित दाटेत सदनें,
कुरंगाक्षींचीं जे अति चतुर पाहेत वदनें. ॥ ६५ ॥

त्यानंतरें अति अलंकृत राजदासी
वाद्यस्वनें निघति बाहिर संपदांसीं. ।
हत्तीवरून चिकसे आणि मोगरेलें
वांटीत जाति नगरांत; अपूर्व जालें. ॥ ६६ ॥

आज्ञा नृपें स्ववनितेस हळूच केली.
ते सुंदरी त्वरित पाकघरांत आली. ।
रांधून घेत तंव त्या मग रांधणारी,
ज्या धूतलेंच बहु धूतिल हो धुणारी. ॥ ६७ ॥

बसेत जेव्हां तळणें तळाया, । ते अर्भकें धांवति आतळाया. ॥
आकांत होती बहु लेकरांचे । वाजेत तेथें धबके करांचे. ॥ ६८ ॥
ठेवूनि शाका वर त्या शिजाया । कढींत घालीत वडे भिजाया. ॥
खोवोन आधीं पदरास पोटीं । नितंबिनी उत्तम डाळ वांटी. ॥ ६९ ॥
सुदेवपत्नी अति मंद आली, । भाग्योदयें जे सुकुमार जाली. ॥
असे शहाणी उसळून सोले, । जीच्या करें सूरण फार सोले. ॥ ७० ॥
अत्यंत आणी चवि कारल्याला, । उपाय जाणेच विकारल्याला. ॥
करीतसे जे गुण पापडीला, । तथापि जाला श्रम वापडीला. ॥ ७१ ॥

तळणवळण केलें, कोरकें सिद्ध जालें.
त्वरित परम तेथें भात हे वेळियेले. ।
रुचिर बहुत शाका फोडण्या देयिजेती.
तदुपरि मग तेव्हां आंबुळी सांगिजेती. ॥ ७२ ॥

स्नानें करून मग विप्र समस्त आले.
सत्कारपूर्वक यथोचित बैसवीले. ।
पात्रें सुवर्ण रुचिरें मग मांडवीलीं.
गंधाक्षतें कितियकीं मग चालवीलीं. ॥ ७३ ॥

कोशिंबिरी विविध, मीठ, मिरें, मुळेही
तेथील हे त्वरित वाढिति त मुळे ही. ।
अत्यंत जें रुचिर रोचकतेस आलें,
तें वाढिजे कितियकीं अति शीघ्र आलें. ॥ ७४ ॥

वाढावया निघति सुंदर त्या सुशीळा,
वीजेहुनी चपळ ज्या चमकेति बाळा; ।
ज्या लोणचीं रुचिर, पापड, पत्रशाका
वाढीत जात असतां भुलवीत लोकां. ॥ ७५ ॥

त्यानंतरें विविध ओदन वाढिजेती,
अत्यंत जे निवति ते मग काढिजेती. ।
शोभेति ते सघृतशर्कर पायसान्नें.
अत्यंत फार पिवळीं बरवीं वरान्नें. ॥ ७६ ॥

अत्यंत वर्तुल वडे अरवार भारी
वाढीति त्या गजगती सखवार नारी. ।
ते घोटवे सरवळे आणि मालत्यांला
वाढीत जाति बहु बारिक सेवयांला. ॥ ७७ ॥

त्या पोळियांच्या चळथा रचाया । परस्परें ब्राहति बायका या. ॥
घाऱ्या, पुऱ्या, तेलवऱ्या विदग्धा । वाढीत दुग्धें कितियेक मुग्धा. ॥७८॥
वाढीत तेथें बरव्या करंज्या । ज्या सुंदरी रांधविती बिरंज्या. ॥
कोणी घड्या घालुन मांडयांच्या, । नेती पराता मग सांडयांच्या. ॥७९॥

मुखेंदु हे निंदति आरशांला, । त्या काय नेणेत अनारशांला ? ॥
नितंबपर्यंत पडेत वेण्या । त्या सुंदरी वाढितसेत फेण्या. ॥ ८० ॥

जेव्हां घृतान्त परिवेषण सर्व जालें,
आपोशनादि मग कृत्य समग्र केलें. ।
पंक्ती अनेक बसती विविधप्रकारा
बाळा तथापि करिती बहु येरझारा. ॥ ८१ ॥
जेथें नद्या लोटति या घृतांच्या
दह्यांबुधांच्या, मधुरा मधाच्या; ।
पडेत हे पर्वत शर्करांचे,
लोपोन गेले रव कर्करांचे. ॥ ८२ ॥

मागेत कोणी द्विज ते फराळा. । आरंभिती पाक किती निराळा. ॥
भक्षीत कोणी मग ते हविष्यें; । तसींच त्यांचीं असती भविष्यें. ॥८३॥

कितियक सुख तेथें स्वीय जिव्हेस देती.
अनियत हरिनामें भक्त कित्तेक घेती. ।
विविध परम होतो नामसंतोष जेथें;
घडिघडि बहु देते भीमकी कान तेथें. ॥ ८४ ॥
सहज निजजिवाचा जीव जो अंतरींचा,
निशिदिवसच लागे वेध त्या श्रीहरीचा. ।
अनिश हृदय तीचें तत्स्वरूपाभिलाषी;
मुखकमल तयेचें तद्गुणौघाभिलाषी. ॥ ८५ ॥
करजळ पुतळ्यांतें नित्य चोरून पाहे;
परि निजजननीचा अंतरीं धाक वाहे. ।
घडिघडि करिते जे प्रश्न विप्राश्रिकांला.
हळुच मग निवारी बंधुसंबंधिकाला. ॥ ८६ ॥
क्षितिवरि परदेसीं नित्य निद्रा करीते.
व्रत नियमतपस्या अंतरीं आदरी ते. ।
स्वन जंव अजिरीं हे आयके वायसाचा,
उठुन कवळ त्यातें घालवी पायसाचा. ॥ ८७ ॥

न वदति सखयांही सर्वथा तत्प्रसंगीं.
श्रमित बहुत जाली अंग टाकी पलंगीं. ।
परम विकळ बाळा फार चिंता करी ते,
अनिश यदुपतीचे पाय जे आठवीते. ॥ ८८ ॥

महा विश्वासाचें निलय बहु आनंदलतिका;
द्वितीया हे तैसी अतिचतुर शृंगारकलिका. ।
सख्या दोहीं भागीं बसति सरसा सावधपणें.
कनिष्ठेच्या वक्त्राभिमुख करिजेतें मुख यिणें. ॥ ८९ ॥

अद्यापि वैकुंठनिवास येना; । तेथून त्याचें मन हें निघेना; ॥
लग्नास तों रातिच आड आहे; । करीच ना ईश्वर कां कृपा हे? ॥९०॥
जाली असे हे प्रतिकूळ गौरी, । म्हणोन हा काय न येच शौरी? ॥
अत्यंत दैवेंकरि हीन जालें, । म्हणोन ये दीन दशेस आलें. ॥ ९१ ॥
हरून माझ्या जिवसावजाला. । तो आजि कैसा हरि साव जाला? ॥
आतां कशाची मज जीवनाशा?। जालें असें सन्मुख जीवनाशा.॥९२॥
जो द्वारके ब्राह्मण पाठवीला । अद्यापि नाहीं परतोन आला. ॥
जे भक्त कृष्णाप्रति पावताती । फिरोन ते काय घरा न येती? ॥९३॥
वाटेस अद्यापि असे निजेला? । किंवा घरींहून नसेच गेला? ॥
कीं द्वारकेची पदवी न चाले?। कीं कृष्ण जातांच विरुद्ध बोले?॥९४॥
प्रत्युत्तरें हे न सुचेत याला? । किंवा सभाक्षोभ तयास जाला? ॥
किंवा निषेधी वसुदेवदेवा? । सक्रोध संकर्षण हा वदे वा? ॥ ९५ ॥
कीं लागला वैदिक तो गुणाया? । कीं लुब्ध जाला भगवद्गुणां या? ॥
त्या संपदा देखुनि थोरथोरा । कीं गुंतला ब्राह्मण पाहुणेरा? ॥ ९६ ॥
किंवा बसे नित्य करीत इष्टी? । कीं चालतां श्रोत्रिय होय कष्टी? ॥
स्वाभाविक च्छांदस वृत्ति ज्याची। पाहातसें व्यर्थच वाट त्याची.॥९७॥
जेथें नसे आदर नारदाचा । कदापि या योगविशारदाचा, ॥
अद्यापि जेथें शुक बैसला, गे; । हा विप्र कोणे लगडेस लागे? ॥९८॥
तथापि तो बंधु अकिंचनाचा । प्रसिद्ध हे शास्त्रपुराणवाचा ॥
हा येक विश्वास असे मला, गे; । परंतु मार्गीं हरि हा न लागे. ॥९९॥

त्या देवकी आदिकरून राण्या । निषेधिती काय महा शहाण्या ? ॥
कृष्णार्थ कृष्णास पडेत गुंते ? । कीं योगियांच्या हृदयांत गुंते ?॥१००॥
कीं पूर आला बहु आपगेला ? । कीं आडवा येउनि साप गेला ? ॥
किंवा रथाचें युग भग्न जालें ? । कीं पांखरूं आजि उडोनि गेलें ॥१०१॥
किंवा निजे शेषविशेषतल्पीं । कोणे तयातें उठिजेल कल्पीं ? ॥
किती तरी येथुन वाट पाहों ? । आकल्पपर्यंत असीच राहों ? ॥ १०२ ॥
येकीकडे लौकिक सर्व ठेवूं । निर्लज्ज लोकांत म्हणोन घेवूं ? ॥
कीं द्वारके धाडुन जीव देवूं ? । कीं पक्ष लावून उडोन जाऊं ? ॥ १०३ ॥

नृपतिकुळकळंका म्यां तुझें काय केलें ?
यथवरि शिशुपाळा का वृथा आणियेलें ? ।
तुजजवळि पडे हे चालि नीचा जनांची.
निपटच हळवारे वृत्ति तूझ्या मनाची. ॥ १०४ ॥

कळत कळत घेसी जीव या मानवांचे.
तुजजवळि भल्यांचा काय सन्मान कांचे ? ।
अति विमळ कुळीं ये भूत निर्माण होसी.
शिव, शिव ! भगवंता जाब हा काय देसी ? ॥ १०५ ॥

पदीं श्रीकृष्णाचे अविरत मनोवृत्ति विचरे.
वियोगें त्याच्या हा क्षणभरि मला धीर न धरे. ।
रहावी हे माझीं यथुनि अवघीं हीं व्यवसितें.
कितेकां या देवां विविध नवसांतें नवसितें. ॥ १०६ ॥

गणाधीशा जे जे स्मरति तुज संकष्टसमयीं,
पहा, ते ते होती मनुजजन आजन्म विजयी. ।
कुमारा गौरीच्या, म्हणुन विनवीतें तुज बरें.
चतुर्थी तूझ्या मी करिन अवघ्या थोर गजरें. ॥ १०७ ॥

असो हें काठिण्य क्षितिधरकुळोत्तंसकुलजे
वदों वारंवार प्रकट तुजसीं काय तुळजे ? ।
न सोसे कांहींही शिवसुरत सप्रेम लतिके,
तुला तों नाहीं हा अनुभव, शरीरार्धपतिके. ॥ १०८ ॥

उदारा मल्लारी, अति विषयचिंतानळ हरीं.
कृपापारावारा, प्रकट करिं कारुण्य लहरी. ।
सहस्रा खड्गांचा तुजवरिच भडार उधळीं.
करावे त्वां ऐसें झडकरिं पडें यादवकुळीं. ॥ १०९ ॥

हनूमंता, विश्वप्रणितचरिता, अंजनिसुता,
महावीरा, धीरा, कपिकुळवरा, वायुकुमरा, ।
कृपावंता, आतां वडवडित पावेसि मजला,
वड्यांचीही माळा रुचिरतर वाहीन तुजला. ॥ ११० ॥

स्वकीय स्वामीसीं अतिनिकटता केवळ तुझी.
नियोज्या रामाच्या, मज न मनि सीतेहुन दुजी. ।
अयोध्येचा राजा, विभु, अवतरे यादवकुळीं;
तयाचे हें यंते हृदय सगुणा अंघ्रिकमळीं. ॥ १११ ॥

महाभाग्यें रामासदृश तुजला स्वामि गवसे.
तयालाही ऐसा तुजसम दुजा सेवक नसे. ।
अनुज्ञेनें त्याचे झडकरि महासिंधु तरसी.
कसा लंकेमध्यें त्वरित मजसाठीं उतरसी? ॥ ११२ ॥

अशोकाचे मूळीं पतिचरणचिंताकुळ असें
कपटयें तेथें तूं वचन वदसी येउनि बसें. ।
अभिज्ञे! रामाचा नियत समजें दूत मजला;
तयाची हे मुद्रा अभिनव अभिज्ञान तुजला. ॥ ११३ ॥

अरे, जे जे काळीं परम मजला संकट पडे,
तुझी ते ते वेळे नियतच उडी येउन पडे. ।
अनेकां दुःखांचा त्वरित बहु निस्तार करिसी.
कसा ये संकष्टीं बहुतच मला तूं विसरसी? ॥ ११४ ॥

महा विश्वासाचे अति चतुर शृंगारकलिके,
सुमध्ये, मध्यस्थे, कुसुमशरनालीकनलिके, ।
प्रसंगीं ये येथें सकळ तुमचा भाव कळला.
दुराचारी रुक्मा निपट, सखिये, हा विचळला. ॥ ११५ ॥

सये हा पुष्पेषु प्रकट निज कोदंड चढवी.
  धनुर्विद्या यातें कवण, सखिये, वीर पढवी ? ।
जया या मूढातें निपटच पहा माय न कळे;
  शहाणे, हा कैसा अजुनि तुज संबंध नुकळे ? ॥ ११६ ॥

पहातां हा माझा मजच हृदयीं प्रत्यय न ये.
  वदों कोणापाशीं सहज सपत्नींचें सुख सये ? ।
धरी बाहे, बाहे यदुपति; अये, जे अवसरीं,
  पहा तेव्हां दुःखक्षितिधर पडे सर्व विसरीं. ॥ ११७ ॥

यिच्या या बोलांनीं मग सहचरी हे दचकली.
  म्हणे, " कांहीं, बाई, तिळभरि नसे चूकि पडली. ।
अभंगक्षोभें या सहज पडसी थोर व्यसनीं.
  वदों, पाहें, कांहीं धरिसि जरि विश्वास वचनीं. ॥११८॥

दुराशेच्या, बाई, निरुपम खळाळीं मन पडे.
  वितर्कावर्तीं या उमज तुजला कोठुन घडे ? ।
अविश्रांते, आतां उठुन, सखिये, बैस सरसी.
  अकस्मात स्वीयप्रकृति अवघी हे विसरसी. ॥ ११९ ॥

अये, पाहें आहे उपजत मला संगति तुझी.
  नसे कांहीं आलें अपरिचित बाहेरुन दुजी. ।
कसा झाला आहे, सखि, उभयतः पाश मजला.
  फुकाचें हें होतें विधुर वदतां काय तुजला ? ॥ १२० ॥

परद्वारी पूर्वींपसुनच महा चाळक असे;
  जयाचे ये छाये जवळुनि सती वागत नसे. ।
अवो, तूं कोणाचे उपजासि, सये, आजि उदरीं.
  कसा हा बांधेसी प्रकट खदिरांगार पदरीं ? ॥ १२१ ॥

गुणज्ञे, रंभोरू, प्रकृतिकमनीये, गुणवती,
  तुझ्या या बंधूच्या सकळ तुज हांसेत युवती. ।
पवाडे कृष्णाचे भुवनतळविख्यात असतां.
  हठें, बाई, कैसी धरुनि बससी गोष्टि नसती. ॥ १२२ ॥

अनात्मज्ञे, आतांपसुनच तुला वेड पातिचें.
महासोसाची, गे, गुरुभय न मानीस रतिचें. ।
नरेंद्राचे कन्ये, कवण शिकवी बुद्धि तुजला ?
सुखें आतां रागेजसिल तरि रागेज मजला. ॥ १२३ ।

विचारें या व्हावा निखिल निज राज्यांत वळसा.
चढे, बाळे, कैसी असरळ तुझी बुद्धि कळसा ? ।
कदाचित् हे वार्ता, कमळमुखि, कोठूनहि फुटे;
घरामध्यें तेव्हां अभिनव अनर्थांकुर उठे. ॥ १२४ ॥

मिळाले हे पृथ्वीवरिल, सखि, राजन्य अवघे.
कसे वेडे, मूके, बधिर आणि विद्रूप अवघे ? ।
कशाला हा आम्हां अतिशय, सये, आवडि बरी,
बरें जालें हें ही अति चतुर सज्ञान नवरी. ॥ १२५ ॥

अवश्यंभावी हें सहज जरि होणारच असे,
अयत्नेंही तूझ्या करकिसलयीं येउन वसे. ।
महा धीराची तूं; निपट तकवा सोडिसि कसा ?
उतावेळी होसी म्हणवुनि तुटे हा भरंवसा." ॥ १२६ ॥

सखीच्या वक्त्रें हा गरळमय पर्जन्य पडला;
अहो किंवा उल्काशतपतनसंस्कार घडला. ।
जऱ्ही हे कांहींही विधुर न वदे वारिजमुखी,
महाप्रस्तावीं ते तदपि पडलीसे बहु सखी. ॥ १२७ ॥

दगदली वदतां बहु भीमकी. । न समजे कुसुमायुध पातकी. ॥
उपचडे सुटती तिजला बहू; । शयनिचीं सुमनें खुपती मऊ. ॥ १२८ ॥

निपट हा तकवा हिजला नसे. । उठुन ते शयनावरती बसे. ॥
बहुत जे बरळे विविधापरी, । सुख नसे सहसा जिस अंतरीं. ॥ १२९ ॥

"भुवननायक, कंजविलोचना, । गरुडवाहन, शोकविमोचना, ।
रुससि कां मुरलीधर, माधवा, । मदनमोहन, गोकुळबांधवा. ॥ १३० ॥

व्रजपती, जपती तुज गोपिका । अझुणि तेथुनि, नंदकिशोरका. ॥
नरहरी, शरणागतवत्सला, । परतसी अथवा निज गोकुळा ? ॥ १३१ ॥

अझुनि गुंतासि गोधनदोहना ? । परम व्याकुळ मी, मनमोहना. ॥
मुरलिवादनिं तादृश हे सवे; । परि तुझें वय हें तयिचें नव्हे. ॥ १३२ ॥
उबगती सखिया निजजीविता; । न पवती कुळिंच्या कुळदेवता; ॥
जनक हे जननी मजला नसे; । यदुपती मज आस तुझी असे. ॥ १३३ ॥
अवस, रे, बहु होय मला तुझी. । तरिणिसी नवरी अथवा दुजी, ॥
जन्हि असें नृपनायककन्यका । तन्हि तुझी हरि होइन दासिका. ॥ १३४ ॥
जरि तुवां मन येथुन काढिजे । यमपुरा तरि आजचि धाडिजे. ॥
गति नसे तुजवांचुन अन्यथा; । निरसता करिसी नसती वृथा." ॥ १३५ ॥
घडिघडी बरळे असि भीमकी, । चतुर जे सकळा गुणिं नेटकी. ॥
यदुपुरीपथ साशय जे पुसे, । न कथतां सखियांवरती रुसे. ॥ १३६ ॥
सहचरीवचनें सलती जिला, । कवण आणिक हे शिकवी तिला ? ॥
घरिंहुनी क्षण येक न हालली । तदपि ते मग बाहिर चालली. ॥ १३७ ॥

अति चतुर वयस्या आडवी तीस आली.
धरुन हळुच हातीं भीमकी चालवीली. ।
तदुपरि पथ दावी माधवीमंडपाचा.
हरिविण बहुवारा होय ईच्या जिवाचा. ॥ १३८ ॥
प्रमदविपिनगर्भीं वेदिका कांचनाची,
तिजवरि बसवीली कन्यका भीमकाची. ।
निजकरकमळीं जे वक्त्रचंद्रास ठेवी;
व्रत नवजलदाचें लोचनद्वंद्व सेवी. ॥ १३९ ॥
मुररिपु, अवतारी, जो महा मूढ तारी.
हरहृदयविहारी, केशव क्लेशहारी, ।
सकळजनविसांवा द्वारकाधीश आहे.
पुनरपि मग त्यासी वक्र बोलोन पाहे. ॥ १४० ॥
"सकरुण विलपें मी, माधवा, केधवांची,
त्यजुन सकळ आशा आपल्या बांधवांची. ।
यदुपति अडल्यांचा सारथी तूंच होसी;
क्षणभरि परि येथें, श्रीहरी, कां न येसी ? ॥ १४१ ॥

न समजत गजेंद्र काय हें काय केलें ?
अढळपद ध्रुवातें काय जाणोन दिल्हें ? ।
दशविध हरि जन्में अंबरीषार्थ घेसी.
झडकरि गणिकेला स्वीय सायुज्य देशी. ॥ १४२ ॥

सकळ नृप पहातां पार्थसारथ्य केलें,
यदुपति तुज तेथें काय हातास आलें ? ।
क्षणभरि मजसाठीं येथपर्यंत येतां,
अभिनव पडलें, रे, थोर कोडें, अनंता. ॥ १४३ ॥

यदुपति तुजसाठीं मीच मासीण जालें;
अकथित कमठीच्या मीच पोटास आलें; ।
अति विकट वराहा मीच जालें वराही;
तदुपरि नरसिंहा होय मी नारसिंही. ॥ १४४ ॥

अभिनव तुज रामा मीच रामावतारीं;
प्रकृतहि तुजसाठीं भीमकाची कुमारी. ।
क्षणभरि मज, कृष्णा, आठव्या, नाठवीसी;
व्रजयुवतिसहस्त्रें अंतरीं सांठवीसी ॥ १४५ ॥

स्वकीयां भक्तांचे निरुपम महा वेड तुजला;
असे, हें, श्रीकृष्णा, अविदित असे काय मजला ? ॥
मदींय प्रारब्धें स्मरणहि फुकाचें तुज नव्हे.
कृपाळा, हे लागे अभिनव तुला कोठुन सवे ? ॥ १४६ ॥

निजध्यासें तूझ्या न समजति संसाररचना,
सदा वेडे होती, अनुसरति तूझ्याच वचना; ।
तुला गाती, ध्याती, अनिश भजती, भाविकपणें,
तयांचें तूं कृष्णा, क्षणभरि पडों नेदिस उणें. ॥ १४७ ॥

महाबाहो कृष्णा, परमपुरुषार्थैकनिलया,
तुझ्या नामें जाती सकळहि महा दोष विलया. ।
रथांच्या कोटींनीं विविध बिरुदें जात नसती,
घनःश्यामा, तेंही प्रकृत मज निःसार दिसती. ॥ १४८ ॥

पिता, माता, भ्राता, सखिनिवह वंचून, तुजला,
मुखें या विप्राच्या यथिल अवघा भेद दिधला; ।
अशी मी हे तूझी परम अपराधीणच असें.
न योजे हें, कृष्णा, अझुणि तुज पत्रोत्तर कसें? ॥१४९॥

अति स्नेहाळें हे जनकजननी राहति उगीं.
भयें या बंधूच्या फिरति सुहृदें आजि अवघीं. ।
वृथा या एकांतीं सकळ सखिया गांजिति मला.
अवस्था माझी हे यथिल समजे कोठुन तुला? ॥ १५० ॥

सदा वेदाभ्यासी द्विजपति तुझा मार्ग चुकला?
तुला नेतां मार्गी गरुड अथवा काय थकला? ।
निषेधी हा किंवा हलधर तुझा सोदर तुला?
कृपापारावारा, परम पडलें संकट मला. ॥ १५१ ॥

पृथेच्या पुत्रांचा अससिल हरी केवळ ऋणी.
तयांची हे बाजू तिळभरि पडों नेदिस उणी. ।
अरे धर्माचेथें श्रमास बहु निष्कारण वृथा.
सदा उच्छिष्टांच्या उचलिसि असंख्यात चळथा.॥१५२॥

प्रतिष्ठा वैकुंठीं निरतिशय तैसी मिरविसी;
रथाचे पार्थाच्या अनवरत घोडे फिरविसी. ।
मुरारे,पार्थाचें श्रमसि बहु सारथ्य करितां,
न वाटे हे लज्जा कराकिसलयीं दोर धरितां, ॥ १५३ ॥

विचारें, श्रीकृष्णा, दिससि मज तूं थोर निकसी.
जनामध्यें येणें करुनि निजधर्मास मुकसी. ।
ऋजुत्वाची कैसी निपटच, हरी, वाट चुकसी.
अरे, कोठें हें तूं परमशठपांडित्य शिकसी? ॥ १५४ ॥

हरे कृष्णा नारायण, नरहरे, आदिपुरुषा,
तुझ्या तों पायांसीं वचन न वदे पापिणि मृषा. ।
प्रतापी हे राजे मिळाले अवघे कुंडिनपुरीं;
नृपव्याघ्रा, कां रे बससि उगला जाउनि घरीं? ॥ १५५ ॥

अवज्ञेनें बोलें कितियक हिणावून वचनें;
अशा या बोलाचा अनुचित मनीं राग धरणें. ।
व्रजस्वामी, आम्ही कपट न पढा राजदुहिता.
विलंबें या तूझ्या बहुत पडला जीव दुचिता. ॥ १५६ ॥

तुझ्या या पायांसीं प्रथम सलगीनें वदतसे.
मनामध्यें तूझ्या व्रजयुवति दाटींतहि धसे; ।
मसीं आतां, कृष्णा, तिळभरि दुजाभाव न धरीं.
समीक्षाभिक्षेनें प्रणतजनसंभावन करीं. ॥ १५७ ॥

फुकाचे दासीतें अनुचित उदासीन धरणें.
समर्थे रंकासीं असदृश असा रोष करणें. ।
अकस्मात स्वामी मन विषयगर्वांतुन उठे.
तुझे भेटीसाठीं निशिदिवस माझा जिव फुटे. ॥ १५८ ॥

जिवें भावें कृष्णा, शरण तुज आलें यदुपती.
न व्हावें हें हांसें म्हणुनि करितें तूज विनती. ।
तुझ्या वेडा लागे, सहज निजकर्तव्य विसरें.
अकर्तव्याची हे प्रकृत पदवी ही अनुसरे. ॥ १५९ ॥

नये कोण्हा हातीं, यदुपति, समाचारहि तुझा;
असे झाला माझा म्हणुन मजला जीव अवझा. ।
महाप्रस्थानाचे अनुभवुन संक्लेश पुरते
तुझे भेटीसाठीं पुनरपि हरी प्राण परते. ॥ १६० ॥

अरे, तूझें नामस्मरण करितें अंतसमयीं.
सुखें राहें, कृष्णा, यशुन पुरता होय विजयी ! ।
वियोगें या तूझ्या नियत जरि लोकांतर मला;
अरे याची पृच्छा सहजच पडे केवळ तुला. ॥ १६१ ॥

परित्याग स्त्रीचा कवण पुरुषार्थी नर करी ?
असें हें श्रीकृष्णा, अपयश शिरीं वीर न धरी. ।
उसासा हे टाकी, सुकृतरससारांश विघडे,
अनेका हिंसाची सहज मुरकुंडी वरि पडे. ॥ १६२ ॥

अरण्यीं श्रीरामें अवगणुन सीतेस त्यजिलें,
जगामध्यें कोणें समुचित असें त्यास म्हटिलें ? ।
पदीं श्रीरामाच्या दृढतर महादोष विलगे;
कसा या दोषाचा दशरथकुळीं डाग न लगे ? ॥ १६३ ॥
पहातां त्वन्मार्ग, त्रिभुवनपती, नेत्र शिणती.
कृपासिंधू, स्वामी, कवण तुजला लोक म्हणती ? ।
तुझें हें पाषाणें हृदय बहुधा आजि घडिलें.
कठोरत्वें किंवा अति कठिण आमूळ मढिलें. ॥ १६४ ॥
सये, माझ्या दुःखें उपवन लता या दुखवती.
पहा, हे पक्षी हा वदनगत चारा विसरती. ।
विलापें या माझ्या द्रवति बहु पाषाण, सखिये.
शठांचा, हा बाई, मुकुटमणि अद्यापिहि न ये. ॥१६५॥
इच्या वक्त्रांभोजापसुन सज वाग्बाण सुटती,
मनीं श्रीकृष्णाचे अति तिखट जाऊन बसती ।
असे जाला तेणें क्षणभरि अति व्याकुळ हरी.
प्रियेच्या आक्रंदें किमपि न सुचे ते असवरीं. ॥ ६६ ॥
कथा हे कृष्णाची सकळजगदानंदजननी,
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुमनीं; ।
प्रसंगें श्रोत्यांचे सकळहि महादोष हरती,
यदुत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ १६७ ॥

इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरण-
काव्ये रुक्मिणीविलापो नाम षष्ठः सर्गः ॥ ६ ॥

## सर्ग सातवा.

विचारें विप्राच्या हृदयगत चोरून मजसी
रथें येकट्या गेला; निपट न दिसे बुद्धि सजसि. ।
विदर्भीं वीरांचें घनतर महामंडळ मिळे;
तयांसी युद्धाचा समय पडल्या कृष्ण न ढळे. ॥ १ ॥

मनीं हे आशंका धरुन मुसली तेथुनि निघे,
सवें ते सेनेचे निवह सज घेऊन अवघे. ।
जसा येतां देखे अति निकट काळांतक हळी,
तयाच्या आतंकें द्विजतिलक तेथें चळवळी. ॥ २ ॥

द्विजाचा कृष्णाला हृदयगत भावार्थ समजे;
म्हणे, "आतां, स्वामी, त्वरित घरिंचा मार्ग धरिजे." ।
अनुज्ञेनें त्याचे द्विजतिलक तेथून उठला. ।
भयें श्रीरामाच्या त्वरिततर तैसा निसटला. ॥ ३ ॥

कृतांताचे दाढेपसुन जंव दैवें द्विज सुटे,
पुरामध्यें कृष्णागमनभव कोलाहल उठे. ।
तशामध्यें गेला नृपतितनयेच्या उपवना.
न्यहाळीतां तीतें क्षणभरि पडे संशय मना. ॥ ४ ॥

सुवर्णाचे वेदीवरि कनकवल्ली उगवली.
कशी एकाएकीं कवण चतुरेनें सुकविली ?।
सरोव्याजें द्वंद्वींहुन सतत मुक्तागण गळे.
यथाकाळीं किंवा यदुतिलकपुण्यद्रुम फळे. ॥ ५ ॥

विदर्भाची कन्या, अति चतुर, लावण्यपुतळी;
वियोगें कृष्णाच्या निशिदिवस जे हे तळमळी; ।
तयेची हे डावी अतिमृदुल बाहे फुरफुरी,
शुभाशंसी तैसी तदुपरि लवे नेत्रशफरी. ॥ ६ ॥

तों तीस नेत्रातिथि विप्र जाला, । किंवा तिचा प्राण फिरोन आला; ॥
भावार्थ हा केवळ भीमकीचा; । आकर्षिला नंदन देवकीचा. ॥ ७ ॥

प्रसन्न त्याचा मुखचंद्र देखे, । तत्काळ चिंतातम दूर फांके. ॥
कदापि हा हर्ष न माय पोटीं; । विराजतें किंचित हास्य वोठीं. ॥ ८ ॥

तत्काळ तन्वी अति पुष्ट जाली; । चोळी तयेची उतटोन गेली. ॥
संतप्त अत्यंत निवेति गात्रें, । जालीं तयेचीं अनिमेष नेत्रें. ॥ ९ ॥

तान्हेजल्यासन्मुख तोय आलें, । बुभुक्षिता भोजन हें मिळालें, ॥
अंधास आकस्मिक दृष्टि आली, । मृतास संजीवनसिद्धि जाली. ॥ १० ॥

कीं होय चंद्रोदय हा चकोरा, । प्रसन्न वर्षागम येय मोरा, ॥
कीं वोळवे मेघ निदाघकाळीं, । मानी असें भीमकराजबाळी. ॥ ११ ॥
तत्काळ कृष्णार्पण देह केला. । तीचा अहंभाव गळोन गेला. ॥
अत्यंत निर्वासन चित्त जालें. । जेथील तेथें मन हें मुरालें ॥ १२ ॥
निमग्न आनंदरसांत जाली. । सत्कार त्याचा विसरोन गेली. ॥
हे बोलिलीसे नृपकन्यकांनीं, । लागे तिचे विप्र म्हणोनि कानीं. ॥१३ ॥
आला सखा सान्निध उद्धवाचा, । बोलों न जाणेच विरुद्ध वाचा. ॥
जाला असे हा दिस सोनियाचा, । वृत्तांत आयीक बसोनि याचा. ॥१४॥
" जो आजि आहे पति द्वारकेचा, । यासारखा आजि उदार कैंचा? ॥
हा वासवाचा हरि आजि भाऊ, । तूंही शचीची तरि होय जाऊ. ॥१५॥
अखंड आखंडळ ज्यास दापे, । कृतांत देखोन जयास कांपे, ॥
अडे जया शेष सहस्रजिव्हा, । तेथें वदों मी द्विज काय यज्वा ! ॥ १६ ॥
धरून मौनव्रत वेद चाऱ्ही । फिरेति शास्त्रासमवेत दारीं; ॥
गाती पवाडे अठरा पुराणें; । घेती यती ज्याजनिमित्त रानें. ॥ १७ ॥
हें सांख्य पातंजल पाहियेलें; । समग्र वेदान्त विचारियेले; ॥
आलोडिलीं वेदशिरोरहस्यें; । तत्प्राप्ति हे केवळ सामरस्यें. ॥ १८ ॥
जें हें महादैवत दैवतांचें, । असे तसें जीवित जीवितांचें; ॥
तें दैवयोगें तुज सांपडावें; । निधान तूझें पदरीं पडावें. ॥ १९ ॥
ते द्वारकेचे बहुलोक भोळे, । ज्यांच्या घरांतील अपूर्व मोळे, ॥
वागेति ज्यांच्या अति संचरूना, । घडे तयां कोठुन पंचसूना ॥ २० ॥
अपूर्व तो संगम गोमतीचा, । जेथें न राहे मळ गोमतीचा. ॥
जाऊन तेथें सज नित्य न्हाती, । हीरांकुरांच्या उजळीत वाती ॥ २१ ॥
करीत सेवा तुळसीवनाच्या; । वसेत बाळा अळशी मनाच्या; ॥
करून संसारिक सर्व कामें । पढेत गोविंदसहस्रनामें. ॥ २२ ॥
त्या यादवांचेथिल बायका या । वसेत तूझे गुण आयकाया. ॥
तूं आजि सर्वांहुन धन्य, बाळे, । सनातन ब्रह्म मनांत खेळे. ॥ २३ ॥
सांगों नये कां तुजला भले गे ? । छत्तीसही हे गुण लाभले गे. ॥
अपूर्व हे गोत्र घटीत आहे. । बोलों नये हें; उगलीच राहें. ॥ २४ ॥

ढकल करुन कैसें धाडिलें द्वारकेसी ?
नरहरिसहवासें मूकलों या जिवासी. ।
जपतपयजनें जें स्नानसंध्यादि कर्मे
जळुन सकळ गेलीं या तुझ्या दौत्यधर्मे. ॥ २५ ॥

तां भीमकी मज अनुग्रह थोर केला;
श्रीकृष्णदर्शनमहोत्सव दावियेला. ।
येथून हे सकळ निस्पृहवृत्ति जाली;
बेडी प्रपंचमय सर्व तुटोनि गेली. ॥ २६ ॥

श्रीरंग जो गरुडवाहन शेषशायी,
ब्रह्मादिकां अभयदानवरप्रदायी; ॥
त्यां तों तदर्थ अयि यत्न नसोचि केला;
तुझ्या परंतु सुकृतें भगवंत आला. ॥ २७ ॥

वृत्तांत हा सकळ तूज निवेदिलाहे;
माझें प्रयोजन अत:पर काय आहे ? ।
आज्ञा मला त्वरित दे स्वगृहास जाया."
हें बोलतां वदतसे मग आदिमाया. ॥ २८ ॥

" अत्यंत बापा श्रमलास भारी, । स्वकीय हे वांचविली कुमारी. ॥
जामात हा श्रीपति आणियेला, । मदर्थ त्वां उत्कट यत्न केला. ॥ २९ ॥
न वर्णवे हा उपकार तूझा, । तूं तत्त्वदर्शी गुरुराज माझा; ॥
हे सार्थक क्लेश समस्त जाले. । मनोरथा अंकुर आजि आले. ॥ ३० ॥
उत्तीर्ण आतां तुज काय होऊं ? । प्राणेशदात्या तुज काय देऊं ? " ॥
बोलोन हे अंजाळि जोडियेला; । प्रणाममात्रें द्विज बोळवीला. ॥ ३१ ॥
जो दैवयोगें कृतकृत्य जाला, । तो हा गृहासन्निध विप्र आला. ॥
विचित्र गेहास्थिति देखियेली. । गजांतलक्ष्मी सदनास आली. ॥ ३२ ॥
कोणीकडे वाट चुकोन आलों; । स्वकीय वीथी विसरोन गेलों ? ॥
किंवा असें जागृत कीं निजेलों, । उगाच कां मी वचकों निघालों? ॥ ३३ ॥
करून हे तर्क तटस्थ राहे. । चहूंकडे संशयरूप पाहे. ॥
तों ते गृहस्वामिणि देखियेली, । जे हे गृहाबाहिर शीघ्र आली. ॥ ३४ ॥

विनीत अत्यंत, महा सुशीला, । प्रणाम येऊन पतीस केला. ॥
धरून हातीं सदनांत नेला, । सुवर्णपीठावरि बैसवीला. ॥ ३५ ॥
पदांबुजें क्षाळुन आदरानें । पुशीतसे जे वसनांचळानें. ॥
आश्रांत जो हा विमळा जळानें । संतोषवीला व्यजनानिळानें ॥ ३६ ॥
लेंकी सुना येउन भेटताती; । ते दासदासीजन दाटताती; ॥
स्त्रीपुत्रमित्रादि कुटुंब पाहे । तों सर्वही हें अनुकूळ आहे. ॥ ३७ ॥
मनामधें विस्मय थोर जाला. । उठोन जों होमगृहांत गेला, ॥
तों सर्व तेथें विपरीत देखे; । जेथील तेथें उगलाच थोके. ॥ ३८ ॥

सुवर्णाची वेदी, जडित अरणीयुग्म विलसे:
सुवर्णाचीं पात्रें दृषदुपल सौवर्णच दिसे. ।
सुवर्णाच्या जाल्या सकळहि पहा दर्भसमिधा.
म्हणे हे कृष्णाची सकळ करणी होय बहुधा. ॥ ३९ ॥

तदुपरि नृहरीचा शंख गंभीर वाजे.
गजबाजिति वऱ्हाडी सर्व धाकेंति राजे. ।
पडति बहुत तेव्हां रुक्मियाचे धसासे;
अगणित शिशुपाळें टाकिजेती उसासे. ॥ ४० ॥

'त्रिभुवनपति दोघे रामकृष्णाख्य आले,'
नृपतिजवळि ऐसें दूत सांगों निघाले. ।
अभिनव हृदयीं हा थोर आनंद जाला.
अभिमुख मग त्याला सैन्य घेऊन गेला. ॥ ४१ ॥

तदुपरि हरिसेनेमाजि सेना मिळाली.
म्हणउन मग तेव्हां दाटि होऊं निघाली. ।
कितियक मग तेथें भेटती एकमेकां;
बसति कितियकांला वेत्रयष्टी अनेकां. ॥ ४२ ॥

तदुपरि हरिपूजा हे यथायुक्त जाली.
प्रणति मग तयातें भूप साष्टांग घाली. ।
विनययुत उभा तो हात जोडून राहे.
विनउन नृहरीतें तो पुरामाजि वाहे. ॥ ४३ ॥

कळत कळत म्यां तों थोर अन्याय केला.
तदपि परम माझा हेतु तां पूरवीला.।
सहज मज अनाथा नाथ तूं आजि होसी;
निजपदभजकांचा नित्य कैवार घेसी.॥ ४४॥

अलभ्य तूझा मज लाभ जाला.। पवित्र हा देश समस्त केला.॥
यानंतरें या नगरांत यावें,। कृतार्थ कृष्णा, मज तां करावें.॥ ४५॥
त्यानंतरें सास्मित कृष्ण बोले,। "मागील हा लोक समस्त आले;॥
पुरांत संमर्द बहूत जाला,। होयील कोठें अवकाश याला?॥ ४६॥
याकारणें निश्चय हा करावा,। अंबालयासन्निध ठाव द्यावा.॥
आणीकही हा यक हेतु आहे,। पुरांमधें तो शिशुपाळ राहे.॥ ४७॥
हे आमचे यादव तुंद मोठे;। ते चैद्य पूर्वीहुन लोंद खोटे.॥
वाढेल बोलें वरि बोल जेव्हां। लग्नापुढें येयिल विघ्न तेव्हां."॥ ४८॥
भावार्थ याचा समजोन गेला,। राजा विदर्भेंद्र वदों निघाला.॥
अवश्य अंबालय आदरावें,। परंतु मार्गें तरि याच जावें.॥ ४९॥
स्थळीं स्थळीं सर्व उभ्या रहाती। पौरांगना, वाट तुझी पहाती.॥
या कुंडिनाची रचना प्रसंगें। आलोकिजे किंचित दृक्तरंगें.॥ ५०॥
विज्ञाप्ति भूपें अनुरूप केली,। घडोन चित्तांतिल गोष्टि आली.॥
रामाकडे कृष्ण तथापि पाहे,। तोही तया सम्मत देत आहे.॥ ५१॥
विज्ञापिलासे अति गोड बोलीं,। आरूढ जाला हरि चौर डोली.॥
अक्रूर सानंद रुमाल वारी;। सभोंवते चालति वीर भारी.॥ ५२॥
ते आतपत्रादिक राजचिन्हें। शोभेति, तैसीं तगटीं निशाणें.॥
वाजेति हत्तीवर ते दमामे। ज्याच्या स्वनें हा शिशुपाळ वामे.॥ ५३॥
पुढें पुढें तो गजभार चाले,। त्याहून मागें रहवाळ आले.॥
सर्वांत अग्रेसर भूप जाला;। हा द्वारकाधीश पुरांत नेला.॥ ५४॥
पहावया नागरलोक आले,। आलोकनें नेत्र कृतार्थ जाले;॥
कित्येक तेथें सतखे करीती,। होती नमस्कार अनेक रीतीं.॥ ५५॥
सुवर्णपुष्पें उडवींत कोण्ही,। जोडीत निष्किंचन हात दोन्ही.॥
दाटेत नानाविध राजवीथी,। आरातिकें घेऊन भक्त येती.॥ ५६॥

क्षणेकसा कृष्ण तटस्थ राहे, । त्या कुंडिनाचे रचनेस पाहे; ॥
कटाक्ष विक्षेप करी हरी तो, । पौरांगनांचीं हृदयें हरी तो. ॥ ५७ ॥
पुरांत जेव्हां यदुनाथ आला, । आनंद सर्वां वनितांस जाला. ॥
पहावया येति कितेक दारा, । घरामधें हा न निघेच तारा. ॥ ५८ ॥
लागेत जातां बहु दार वेडे, । परस्परें लोटिति बाहुदंडें; ॥
धरून सर्वत्र महाउपेक्षा । करीत कृष्णागमनप्रतीक्षा. ॥ ५९ ॥
येकीपुढें धांवुनि येकि जाती, । येकीस येकी धरिताति हातीं; ॥
येकीस येकी ढकलून देती, । येताति येकीवरि येकि दांतीं. ॥ ६० ॥
धांवोनि येती कितियेक न्हातां, । बाळांस कोणी स्तनपान देतां; ॥
उगाळितां चंदन येति कोण्ही, । अर्धींच कोणी उकलून वेणी. ॥ ६१ ॥
वाढावया ओदन नेतनेतां. । धांवेति कोण्ही जळ देतदेतां. ॥
उठेति कोण्ही उटि घेतघेतां । नेत्रांबुजीं अंजन लेतलेतां. ॥ ६२ ॥
संभ्रांत अत्यंत कितेक जाल्या, । भूषा विपर्यास करून आल्या; ॥
घालून पायीं करकंकणांला, । पादांगदीं शोभविती करांला. ॥ ६३ ॥
नाकीं बाळया, राखड्या कर्णदेशीं, । ताटंकाते गोविती केशपाशीं, ॥
दंडीं कंठे, बाजुबंदास कंठीं । लेती, माजी हार, नाईत पेटी. ॥ ६४ ॥
मुखकमळें उटुनि कुंकुमानें, । नयनयुगें भरिजेति चंदनानें, ॥
अधर सजविताति अंजनानें, । कृतविपरीतदशा निरंजनानें. ॥ ६५ ॥
पहावया कौतुक सर्व आल्या, । श्रीकृष्णरूपास भुलोन गेल्या; ॥
आंदोलती मन्मथसिंधुकूळें, । उगीच होती श्लथ हे दुकूळें. ॥ ६६ ॥
घालून पायीं मणिनूपुरांला । चढेति बाळा निज गोपुरांला; ॥
मुखांबुजीं रोधिति ज्या झरोखे, । कटाक्षपाशीं हरि आजि रोखे. ॥ ६७ ॥
माड्या, अटाळ्या आणि उंच भिंती, । व्यापून कित्तेक उभ्या रहाती; ॥
प्रासाद नारीमय सर्व जाले, । अनेक संदेह पडों निघाले. ॥ ६८ ॥
देवांगना या उतरोन आल्या, । विद्युल्लता कीं झळकों निघाल्या; ॥
भासेत किंवा स्मरवैजयंती, । प्रतिक्षणीं चंचल रूप होती. ॥ ६९ ॥
चालेत हे छप्पन कोटि खासे, । तयांमधें श्रीहरि मुख्य भासे. ॥
त्या तारकांला अति दिव्य आभा । तथापि, चंद्रास विशेष शोभा. ॥ ७० ॥

न्यहाळिती कृष्णपदारविंदा, । म्हणेति आलास बरा मुकुंदा. ॥
कित्येक घेती वनिता बळाया, । लागेति कोण्हीं वचनें वदाया. ॥ ७१ ॥
" हा देखिला यादवराव जीणें, । जालें तिचें सार्थक आजि जीणें. ॥
नीराजिजे मन्मथकोटि जेथें, । सौंदर्यता वर्णन काय तेथें. ॥ ७२ ॥

करून बाई उघडीं कवाडें, । हा पाहिजे कृष्ण बरा निवाडें; ॥
हा पाहिलाही पुरता पहावा, । न पाहतां हा अनुताप व्हावा. ॥ ७३ ॥
पुढें तुम्ही व्हा, अति डोळसा गे, । मागें फिरा जा, अति साळसा गे; ॥
जाला महा सौख्य सुकाळसा गे, । उभा न राहेच अमाळसा गे!"॥७४॥
म्हणेत " हा या समयास आला, । पूंजाप्रसंगें मधुपर्क जाला; ॥
होणार हें काय असे कळेना, । दुर्बुद्धि रुक्मी सहसा वळेना. ॥ ७५ ॥
दैवें मिळे हा यिज योग्य जोडा, । परंतु आहे अवकाश थोडा; ॥
हें आमचें पुण्य उभें रहावें, । दोघांजणां सत्वर ऐक्य व्हावें. ॥ ७६ ॥
हा कृष्ण काळा, अति गौर बाळा, । संयोग शोभेल अपूर्व यांला; ॥
रत्ना सुवर्णा जरि भेटि होते, । परस्परें कांति विशेष येते. " ॥ ७७ ॥
इत्यादि संवाद करीत नारी; । तटस्थ पाहेत पहा कुमारी; ॥
पुढें पुढें श्रीहरि चालियेला, । प्रासाद वैदर्भिक देखियेला. ॥ ७८ ॥
चढेत कोण्ही, उतरेत कोण्ही, । पडेत वाटेत गळोन लेणीं, ॥
सिंजारवें व्याकुळ सौध जालें, । निर्जीवही जीवदशेस आले. ॥ ७९ ॥

असूर्यपश्या ही त्वरित बहु धांवेति अबला,
अनभ्यासें मार्गीं स्खलण अति पावेति विकळा; ।
बसे त्यांची तेथे अविरत मनोवृत्ति अवघी,
जयांच्या दासांचें अनिश करिती दास्य मघवी. ॥ ८० ॥

स्वरूपें कृष्णाच्या अविरत जिचें मानस रुधे,
तये वैदर्भीसी मग सहचरी येउनि वदे, ।
" महा रथ्यामार्गें अभिनव युवा जात असतां,
निजप्रासादाग्रीं चढति सकळा राजवनिता. ॥ ८१ ॥
कटाक्षांची छाया घनतर सये ज्यास पडली,
विधात्यानें ऐसी अभिनव असे मूर्ति घडली; ।

असे हा कोणाचा कवण मजला तत्त्व न कळे, ।
अये, ये भूलोकीं कवण तरुणीचें तप फळे." ॥ ८२ ॥

न बोले कांहींही मुकुलितमुखी, कुंदरदना,
चमत्कारें बाळा झडकरि उठे मंदगमना; ।
निवारी सर्वांतें करकिसलयें वारिजमुखी,
तयेची हे हांसे पदर वदनीं लाउन सखी ॥ ८३ ॥

पहाया वैदर्भी मग उपरमाडीवरि चढे,
अनायासें प्रत्युद्गमनविधि किंवा तिस घडे. ।
करें छत्रच्छाया करुनि वदनीं चंद्रवदना
न्यहाळी कृष्णाचें मुखकमल सारंगनयना ॥ ८४ ॥

जिवाचा सांगाती निजनगररथ्या प्रविशला,
तिला वाटे चिंतामणिच निधि किंवा गवसला. ।
बलात्कारें बाळा करुन परती ऱ्ही सहचरी,
कटाक्षप्रक्षेपें यदुपतिस नीराजन करी. ॥ ८५ ॥

मनामध्यें जीच्या प्रणयरस हेलावत असे,
मुखें बाळा कांहीं प्रकट तरि हे बोलत नसे; ।
अलभ्याच्या लाभें परम हरिखे, नीरजमुखी, ।
भयें या बंधूच्या हृदय परि यीचें धुकधुकी. ॥ ८६ ॥

समारंभें गेला मिरवत पुराबाहिर हरी,
न राहे पाहातां तदपि नृपमूर्धन्यकुमरी; ।
स्वरूपीं हा साक्षादनुभव महा होय जिजला,
अहो आला गेला म्हणुन म्हणणें काय तिजला ! ॥८७॥

अहो खासा राहे यदुतिलक अंबापरिसरीं,
अनुज्ञेनें सेनापति उतरती स्वस्वशिबिरीं. ।
विदर्भें सर्वांचें अतिशयित आतिथ्य करिजे,
पदीं श्रीकृष्णाचे दृढ परम हा भाव धरिजे. ॥ ८८ ॥

याळून सव्यें मग अंबिकेला, । राजा विदर्भेंद्र घरास आला; ॥
सक्रोध रुक्मी तंव फार जाला, । द्विजामधें वाक्य वदों निघाला. ॥८९॥

" पुरोहित च्छांदस फार भोळे, । उगेच हातीं मिरवी कचोळें; ॥
प्रसंग यांला सहसा कळेना, । सांगीतलें यांस कदा कळेना. ॥ ९० ॥
पाचारिल्यावांचुन मूढ आले, । हे गोवळी तों विचळोन गेले; ॥
आतां तुम्ही तांतडि हे करावी, । कन्या नृपाची उजवून घ्यावी. ॥९१॥
कृष्णाकडे झोंबति मायबापें, । म्हणोन जालीं मज शल्यरूपें; ॥
दावा मसां उत्कट साधियेला, । भुजंग हा केवळ आणियेला.' ॥ ९२ ॥

जे जे पदार्थ उपयुक्त विवाहकर्मीं,
ते आणवी त्वरित राजकुमार रुक्मी; ।
जों ज्योतिषी त्वरित लग्नघडीस घाली,
तों सन्मुख प्रलयसूचय शिंक जाली. ॥ ९३ ॥

येती मेळे वैदिकांपंडितांचे, । होती तेथें वाद त्या तांत्रिकांचे; ॥
येतां जातां मंडपीं दाटि केली, । होती ज्यांच्या या वृथा घालमेली. ॥९४॥
म्हणेत कोण्ही मधुपर्क आणा, । म्हणेत कोण्ही नवरीस न्हाणा; ॥
म्हणेत कोण्ही वर सिद्ध जाला, । मागेत कोण्ही चवकास सेला. ॥ ९५ ॥
म्हणेत कोण्ही शुभलग्न पाहा, । म्हणेत कोण्ही उगलेच राहा; ॥
म्हणेत कोण्ही नवरी दिसेना । कोण्हास कोण्ही मगहो पुसेना ! ॥ ९६ ॥
आर्यीकतां व्याकुळ फार जाली, । उठोन माडीवरि माय गेली; ॥
म्हणे तिला "चाल; विलंब जाला; । आली असे सन्निध लग्नवेळा." ॥९७॥

प्रसुवचनविलासें होतसे त्रास तैसा,
अभिनव करिणीला अंकुशाघात जैसा; ।
तदुपरि जननीच्या ते गळां हात घाली,
अभिमत जनयित्री वाक्य बोलों निघाली. ॥ ९८ ॥
" उगी राहें आतां बहुत वदतां ओष्ठ सुकले,
नको बोलों कांहीं. अकथित मला ग्रंथ उकले. ।
अवो, तूं दैवाची ! प्रिय, परम अर्धांग हरिचें,
तुझ्या हातां आलें सहज निजसाम्राज्य घरिचें. ॥ ९९ ॥

बाळे, तुवां साहस थोर केलें, । हें द्वारकादैवत आणियेलें; ॥
वैकुंठिचा नायक जो मुरारी । तो आठवा हा अवतारधारी. ॥ १०० ॥

तुम्हांस दोघांसर पाड आहे, । पूर्वींच हे गोष्टि कळोन राहे; ॥
येथें जयीं हा चुकता विधाता, । येती तयाच्या अपकीर्ति हातां. ॥ १ ॥
सुदेव त्वां चोरुन पाठवीला, मनोरथा घेउनि शीघ्र आला; ॥
आईक हे अंमिळ दृक्प्रसंगें, । निधान लाधे तुज दैवयोगें. ॥ २ ॥

माझ्या मनायोग्य घडोन आलें. । परंतु दुःखास्पद येक जालें; ॥
जाऊन तूं नांदसि सिंधुगर्भी । मी येकली राहिन ये विदर्भी ! ॥ ३ ॥
मागेल आतां मज कोण जेऊं ? । कोणास मी उत्तर आजि देऊं ? ॥
वाटेस माझी करिसील खंती, । तूं लागसी आजिपसून तंती. ॥ ४ ॥

कठीण आहे स्थिति सासुऱ्याची, । पडे मला गोष्टि तुझ्या जिवाची ॥
तूझे गुणीं न्यून कदापि नाहीं, । तथापि पाहें सिकऊंच कांहीं. ॥ ५ ॥
घालाघाली घालिती नित्य सासा, । टाकूं बाई नेदिती हा उसासा; ॥
पोटागीची माय मी दूर जालें, । लागे आतां नांदणें त्याजखालें. ॥ ६ ॥

प्राणेश्वराच्या अति मान्य माता । अलीकडे त्याहुन जाण आतां. ॥
तो सासरा साधु बहूत आहे, । आज्ञेंत त्याचे उगलीच राहें. ॥ ७ ॥
असे तुझा दारुण जेष्ट भावा । तूं काय त्याच्या करिसी स्वभावा ? ॥
राहों नको त्याजपुढें उभी गे, । तूं सर्वदा तद्वचनास भी गे. ॥ ८ ॥

करीत जा आदर त्या दिराचें, । असोत जे माणुसही तिरांचे; ॥
तेथें असे गे तुज कोण साहे ? । तूं बोल त्यांचे उगलेच साहें. ॥ ९ ॥

अखंड गोपीजनवल्लभाचे । ते आदरीजेत समग्र भाचे. ॥
ज्या लाडक्या लांब महाजिभांच्या । तशाच त्या मानित जाय भाच्या ११०

असेत तूझ्या नणंदा अहेवा, । उगाच तूझा करितील हेवा; ॥
लागेत जेव्हां तुजसी रुसाया । तूं देत जा पाट पिढें बसाया. ॥ ११ ॥

असेत जे तूज बहूत जावा, । विरोध त्यांसी न करीत जावा; ॥
त्वां आपलीं आवरिजेत मूलें, । जे नित्य होती कलहास मूळें. ॥ १२ ॥

तूं सर्व शृंगार करून रातीं, । आधीं पतीचें मन घेय हातीं ! ॥
त्याच्या बऱ्यानें अवघीं बरीं हे, । त्या वेगळीं शत्रु तुझीं खरीं हे ॥१३॥

ते स्वामिसेवा तुजला घडावी, । त्याची तुला आवडि आवडावी; ॥
त्याच्या मनासी मन मेळवावें, । त्वां नित्य त्याचे मिळणीं मिळावें. १४

असे जरी तो प्रतिकूल तूसी, । तथापि राहें अनुकूल त्यासी; ॥
असेल गे पूर्विल पुण्यठेवा, । तरीच हा वल्लभ वश्य व्हावा! ॥१५॥
घरामधें होतील सुष्टदुष्टें, । तथापि तूला अवघीं वरिष्टें; ॥
उगेच त्यांचे गुण नित्य घ्यावे, । ते बोलतां जाब कदा न द्यावे. ॥१६॥
टाकून बाई अभिमान द्यावा, । संसार हा गोड करून घ्यावा; ॥
मुखास येती जरि शब्द मोठे, । तूझ्या गुणांचें तरि मूळ तूटे. ॥ १७ ॥
बोलोन जासी जरि वांकडेसें, । पडेल तूझें तुज सांकडेसें. ॥
येका तुझ्या या तरि गोड बोलें । ते वश्य होती, अवघींच कोल्हें! ॥१८॥
त· हा अहंभाव अशेष सांडीं, । पदोपदीं त्वां धरिजेत सांडी; ॥
वाढेल वा ढंग उगाच जेव्हां । पुसेल तेथें तुज कोण तेव्हां? ॥ १९ ॥
त्वां आपला चालवितां घरोबा, । धरूं नये किंचित मात्र लोभा; ॥
तसें अनासक्तपणें असावें, । जळीं जसें पद्मदळें वसावें. ॥ १२० ॥
साक्षात सापत्न न दाखवावें, । प्राणेश्वराचें मन वोळखावें. ॥
माझें तुझें हें म्हणशील जेव्हां, । परस्परें तूटि पडेल तेव्हां. ॥ २१ ॥
हा सोयरा केवळ पांडवांचा, । जो दाहकर्ता हरि खांडवाचा; ॥
कृष्णा सुभद्रेहुन आवडावी, । मैत्री तिसीं हे तुजसी घडावी. ॥ २२ ॥
संसार हा बुद्बुदरूप आहे!। तो स्वामि तूं ईश्वररूप पाहें. ॥
संसारकृत्यीं तुजला नवोढे । त्या वल्लभावांचुन कोण वोढे? ॥ २३ ॥
संसार हा यद्यपि सज्ज आहे, । तथापि सांगें गुज येक पाहें; ॥
मिळोन जातें मन दंपतीचें । तरीच घेती सुख संपतीचें. ॥ २४ ॥
आहेसि तूं तो अतिसाहसी गे, । त्याचें कसें कैतव साहसी, गे? ॥
करी हरी आदर गौळणीचा । कशास त्वां त्या म्हणिजेति नीचा? ॥२५॥
प्रगल्भता येथुन आदरावी, । हे लोकलज्जा हृदयीं धरावी; ॥
लोकापवादास बहूत भ्यावें । टाकून चित्तांतुन पाप द्यावें. ॥ २६ ॥
असेस तूं सुंदर फार गोरी, । पापास राहें परि पाठमोरी; ॥
स्वशीळ संरक्षिसि नित्य बाळे, । तरीच तूझा पति तूज भाळे. ॥ २७ ॥
ज्या सासुरां वर्तति गे उधंटा । जनांत त्यांचा बहु होय तंटा; ॥
नांदेति ज्या गे सुलजा, विनीता, । सर्वांमुखीं त्या अति कीर्तिमंता! ॥२८॥

सर्वांपुढें सत्वर त्वां उठावें, । ते नीजल्या नंतर त्वां निजावें; ॥
आदासपर्यंतहि अन्न द्यावें, । त्यानंतरें भोजन त्वां करावें. ॥ २९ ॥
त्याच्या घरांतील समस्त राण्या, । रांधून वाढून महा शहाण्या; ॥
पट्टांगना राजशिरोमणीची, । होयीं बरी अग्रणि सुग्रणींची. ॥ १३० ॥
त्वां वागतां पल्लव नीट घ्यावा, । पाचारिल्या मंजुळ जाब द्यावा. ॥
तूं खालती पाहुनि नित्य चालें । तूं बोलवील्याविण गे, न बोलें. ॥३१॥
नेसे बरें उत्तम वस्त्र तैसें, । माने पतीच्या हृदयास जैसें. ॥
माने तया भूषण तेंच ल्यावें, । सेवेसि त्याचे परि चित्त द्यावें. ॥ ३२ ॥
लावीत जा कुंकुम नित्य भाळीं, । सौभाग्य संसूचक सर्वकाळीं; ॥
घालीत जा कज्जळ नित्य डोळां, । सिकें बरा तेथिल सर्व मोळा. ॥३३॥
सदा शुचिष्मंत तुवां असावें, । सदा सतीसन्निध, गे बसावें. ॥
जे उंबऱ्याबाहिर पाय टाकी । ते आपला लौकिक काय झांकी ? ॥ ३४॥
धम्मिल्ल अंधतमरूप भासे, । विक्त्रेंदु नक्तंदिव हा प्रकाशे; ॥
म्हणोन तूझीं स्तनचक्रवाकें । कूर्पासका आड दडोन धाकें. ॥ ३५ ॥
घालीं गळां रत्नजडीत गांठी, । देऊं नको भ्रूयुगुळास गांठीं. ॥
प्रसन्नता हे वदनीं असावी, । तरीच लक्ष्मी सदनीं वसावी. ॥ ३६ ॥
सन्मान सर्वां वडिलांस द्यावा, । कुलीन हा शब्द म्हणोन घ्यावा; ॥
न घेसि पैशून्य कदापि कानीं, । तरीच तूझें यश लोक वानी. ॥ ३७।
तूं संकटीं हा निजधर्म राखें, । कदापि संसारसुखें न माखें; ॥
तत्काळ घालीं अतिथीस भिक्षा, । पतिव्रतांची तरि हेच दीक्षा. ॥ ३८ ॥
कधींकधीं तूं मज आठवीं, गे, । त्यासारिखे आत्मज आठवीं गे. ॥
उत्कृष्ट येकीहुन येकयेकी । तथापि तूं वीसिल लेकलेकी. ॥ ३९ ॥
त्वां सासुरां उत्तम नांदिजे ते, । पतिव्रतासाधन साधिजे तें; ॥
असी तुझी येइल कीर्ति जेव्हां, । मला महाभूषण होय तेव्हां. ॥ १४० ॥

दुपाराची सायी समज अवघी संपति असे,
शहाणे हे कोणी न धरितिच यीचे भरंवसे. ।
अवो, जों जों ज्यावें तंवरि करिजे हात वरता
पहा हा विश्वात्मा तरिच पुरवी देव पुरता. ॥ ४१ ॥

अये, ये लक्ष्मीची तिळभरिहि तृष्णा न धरिजे,
  यिच्या त्वां या वेचेंकरुनच यिची वृद्धि करिजे; ।
सुते, जों जों हातें करुन विहिरा हा उपसिजे,
  पहा तों तों तेणें पुनरपि यथापूर्ण भरिजे. ॥ ४२ ॥

समस्तां भूतीं त्वां निरुपम दया नित्य धरिजे,
  भुकेले, तान्हेले, शशिमुखि, विशेषें समजिजे. ।
विलासें लक्ष्मीच्या स्वसुहृदवर्गा विसरिजे
  अनाथा दीनांचा निशिदिन परामर्ष करिजे. ॥ ४३ ॥

प्रपंचीं ये देवाद्विजचरणनिष्ठा, तुज असो,
  असत्याचा, बाई, तिळभरि घरीं संग्रह नसो. ।
असत्यें हें पाहें अखिलहि महापातक जडे,
  जगांमध्यें तैसा सहज निज विश्वासहि उडे. ॥ ४४ ॥

उपेक्षाबुद्धीनें विचर, चतुरे, संसृतिसुखीं
  नको लागों देऊं किमपि, विमळे, पातक नखीं; ।
नको राहों देऊं परुषवचनोच्चारण मुखीं,
  अये, या दुर्वादेंकरुन तुटती सर्वहि सखी. ॥ ४५ ॥

तुला ये स्वप्नींही क्षणभरि असत्संगति नको,
  सदा या सत्संग करुनच अहोरात्र उरको ! ।
अवो, ये संसारींहुन हळुहळू चित्त विरमे,
  रमेच्या भर्तारीं तरिच उगलें जाउन रमे. ॥ ४६ ॥

स्वभावें ही आर्यी परसदन वार्ता करुं नये,
  मनोवाचाकायें परपुरुषइच्छा धरुं नये; ।
पतीचे ये पाईं दृढतर धरीं भक्ति बरवी,
  पतिप्रेमाची हे प्रकटच गुढी उंच उभवीं. ॥ ४७ ॥

अवो या चौघांच्या सज अनुमतें चालसि जयीं;
  प्रपंच्यामध्यें या किमपि न पडे अंतर तयीं; ।
शहाणी तूं, पोटातुन शिकविलें काय तुजला
  असें त्वां वर्तावें निपट न लगे बोल मजला ! ॥ ४८ ॥

अवो येतां जातां, उठत बसतां, कार्य करितां,
सदा देतां घेतां, वचन वदतां, ग्रास गिळितां; ।
घरीं दारीं, शय्येवरि रतिसुखाचे अवसरीं,
समस्तांची लज्जा त्यजुन भगवच्चिंतन करीं. ॥ ४९ ॥

निसर्गें स्वर्गंगा पदकमल सौरभ्य धरिते,
जिवें भावें ज्याचें जलधितनया दास्य करिते; ।
असा ही हा लोकत्रयपति तुझा इच्छित अमे,
मला तों ये लोकीं तुजहुन सुते धन्य न दिसे. ॥ १५० ॥

पवित्राही रामायणमय महाभारतकथा
निजस्वामीच्या या स्वजनभजनावांचुन वृथा; ।
गुणोत्कर्षें जीचा प्रियतम असे वश्य जिजला
उषःकाळीं तीचें पदयुग दिसो नित्य तुजला. ॥ ५१ ॥

मदें तारुण्याच्या कुळवति अहंकार न करीं,
विनीतें वैदर्भी पतिवचन हातावरि धरीं; ।
पतीची हे सेवा नीरुपम महा साधन तुझें,
कुळस्त्रीला बाई पतिविण नसे दैवत दुजें. ॥ ५२ ॥

पतीच्या ये पायीं व्रत नियम दानें विलसती,
सदा जेथें गंगादिक सकल तीर्थें निवसती; ।
धरावीं ते माथां पतिचरण संक्षाळण जळें,
जयाच्या संस्पर्शें तरति सकळ बांधवकुळें. ॥ ५३ ॥

तुझ्या या स्वामीचें चरित वदतां वेद शिणती,
कदां 'नेणों नेणों' शुक सनक योगींद्र म्हणती; ।
सहस्रां तोंडांचा फणिपति धरी शेष लघिमा,
अचिंत्य श्रीकृष्ण प्रणविनितदुच्छिष्ट महिमा. ॥ ५४ ॥

प्रसंगें हे बाई सहज पतिनिंदा जरि घडे,
गळत्कुष्ठें जिव्हा नियत शतधा होउन झडे. ।
विहारीं आहारीं निज पतिस वंचीत असती,
वटाग्रीं तत्कर्में प्रतिफळित सर्वांस दिसती. ॥ ५५ ॥

विषादें स्वामीच्या घडि घडि उगें तोंड मुरडीं,
अवो ते तों पत्नी नियत अथवा होय सरडी; ।
उगी वारंवार क्षितिपतिसुते जें पुटपुटी
अपंकीं ते भेकी अयुत शतजन्में चटपटी. ॥ ५६ ॥

न वर्तसी हा विधि बोलिला गे, । त्या सासुऱ्यांचा तरि बोल लागे; ॥
देऊन मातेवरि त्या शिव्यांला । म्हणेत हा यीस कशास व्याला. ॥५७॥
तूं आजि रोडेजुन हाड होसी, । चिंतातपें फार सुकोन जाशी; ॥
अक्रोश अत्यंत करूं नये गे, । प्रणाम अंबेस करून ये, गे." ॥ ५८ ॥

असें जिला जें शिकवून माता । म्हणे, " मुली सत्वर चाल आतां; ॥
आरोपिलें बीज फळास आलें, । सहाय तूझें तुज पुण्य जालें. ॥ ५९ ॥
हा तूज शिक्षाविधि मात्र केला, । सर्वांस बाई उपदेश जाला; ॥
वर्तोत ऐशाच समस्त मूली, । घरोघरीं मृण्मय जाण चूली ' ॥ १६० ॥
बोले तिची ते तिजसी कुमारी, । " मोठ्या बळें येय पहा मुरारी; ॥
हा सर्व कारुण्य कटाक्ष तूझा । येथें नसे किंचित यत्न माझा. ॥ ६१ ॥
जें जें मला तूं सिकवीस कांहीं, । वर्तेन तैसी अनुमान नाहीं; ॥
तूं सर्व माते समजेसि तत्त्वें, । नसेत तूझीं वचनें कवित्वें. ॥ ६२ ॥
माते चमत्कार अपूर्व पाहें । जगामधें वर्तत एक आहे; ॥
मूर्खापुढें काढुनि ठेवियेला । तथापि नाहीं यश ये सुनेला. ॥ ६३ ॥
सासू सुनेला सिकवीत आहे, । वर्ते कसी आपण हें न पाहे; ॥
कार्पण्य कारुण्य कटाक्ष लेशी । पांडित्य हें सर्व परोपदेशीं. ॥ ६४ ॥
हे तों नसे गे मज आजि चिंता, । माझी असे लाज तया अनंता; ॥
माया महा-नाटक सूत्रधारी । तो आजि आहे मज अंगिकारी. ॥ ६५ ॥
कल्पद्रु हा कल्पित मात्र देतो, । चिंतामणी चिंतित पूरवीतो; ॥
अकल्पितां चिंतित अर्थदाई । समर्थ लक्ष्मीपति शेषशायी. ॥ ६६ ॥
निर्वाहकर्ता भगवंत आहे । घालूनि जो यावरि भार राहे; ॥
संपन्न जो कीं सकळां पदार्थीं । तो काय घालील तया अनर्थीं. ॥ ६७ ॥

यदुपति-पदपद्मीं माय माहेर माझें,
मज निमित न व्हावें चित्त हें व्यग्र तूझें; ।

सहजच बळरामासारिखा पाठिराखा
म्हणउनि कवणाचा हा असे आजि लेखा ? ॥ ६८ ॥
करूं नको खेद कदापि माझा, । खेदें तुझ्या होइल खिन्न राजा. ॥
घडे परामर्ष कसा क्षितीचा । तुझा विधेयी सुत ये रितीचा ? ॥ ६९ ॥
असे प्रजापालन धर्म मोठा, । तुम्हांस तो याहुन अन्य खोटा; ॥
घडे प्रजापालन नित्य जेथें । हें ऐहिकामुष्मिक सर्व तेथें. ॥ १७० ॥
दयानिधि श्रीहरि शीघ्र आला, । म्हणोन माझा वरि बोज जाला. ॥
होणार तो होउन अर्थ जातो, । मागें पुढें हा उपहास होतो ॥ ७१ ॥
हे सर्व बाहेरिल सिद्धि जाली, । घरामधें यावरि गोष्टि आली. ॥
म्यां, काय, मातें उगऊन द्यावें ? । कळेल ते यावरि त्वां करावें." ॥७२॥
तेव्हां ते मातेनें सकरुणकरें कारि धरिली,
तयेचे ते मांडीवरुन मग खालें उतरिली; ।
भुजिष्येच्या वक्रेंकरुन विनवी प्राणपतिला,
करावें देवीचें झडकरि तुम्हीं दर्शन यिला. ॥ ७३ ॥
सभेमध्यें राजा प्रकट मग हें बोलत असे,
"यिला तेथें नेणें परम मज आवश्यक दिसे. ।
न केल्या हें ऐसें नियतच कुळस्वामिनि खिजे,
अहो जाल्या आतां तुरुत नव तें विश्व उपजे." ॥७४॥
पित्याचें हें जालें वचन गरळप्राय तनया,
हरिद्रोहें मोठा उपजत पढे नित्य अनया; ।
हरिद्वेषें ज्याला जनकजननीद्रोहच घडे,
तयासाठीं कैसें विविध निरयद्वार उघडे ? ॥ ७५ ॥
कथा हे कृष्णाची सकळ जगदानंदजननी,
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं. ।
प्रसंगें श्रोत्यांचे सकळहि महा दोष हरती;
यदुत्तंसप्रेमें विषयरस गोडी विसरती ॥ १७६ ॥

॥ इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये रुक्मिण्युपदेशो नाम सप्तमः सर्गः ॥ ७ ॥

# सर्ग आठवा.

रुक्मी पित्यासन्मुख नीट बैसे, । निघेत वक्रांतुन शब्द तैसे; ॥
स्फुल्लिंग जे केवळ पावकाचें, । उठेति किंवा गण सायकांचे. ॥ १ ॥
" लग्नप्रसंगीं, जगदेकपाळा, । हें वोड ये काय यिच्या कपाळा ? ॥
देवी स्वदेशांतुन आजि जाते, । किंवा पुढें दर्शनही न देते ? ॥ २ ॥
या ब्राह्मणां आणिक काय धंदा ? । म्हणेत हो या दमडीस वंदा. ॥
वाढे तपस्या बहु फार यांची, । हातांकडे केवळ दृष्टि ज्यांची.
हे आमचे वेद समस्त वेडे, । पदोपदीं लाविति कर्म चेडें. ॥
हें धर्मशास्त्रें अवघींच बाटें । परस्परें घेति महा हिलाटें. ॥ ४ ॥
देवी कशाची ? कुळधर्म कैचा ? । विचार आधीं पडला जिवाचा. ॥
येकीकडे वृद्ध उभा रहाशी, । माझा जिवाचा बळि आजि देशी. ॥ ५ ॥
हा कृष्ण काळा अति कूडमंत्री । आसक्त जाली नरवीरपुत्री, ॥
बोला फुला गांठि पडेल जेव्हा, । तूं काय तेथें करिसील तेव्हां ? ॥ ६ ॥
जळामधें लोटुनि कां न द्यावी ? । हुताशनीं आहुति वा करावी. ॥
परंतु बाहेर न पाठवावी, । हे गोष्टि माझी यक आयकावी. ॥ ७ ॥
बोलाविल्यावांचुन येय पाहे, । कसा बकध्यान धरून राहे; ॥
कदापि यांचें मत हें कळेना; । अंबालयापासुनि हा ढळेना. ॥ ८ ॥
व्याघ्रापुढें आपण गाय जाते, । ते मागुती काय फिरोन येते ? ॥
जे सांपडे व्याधकरीं कुरंगी, । मिळे कशी ते निजयूथसंगीं ? ॥ ९ ॥
कदापि हे होरडि हो न द्यावी ? । मागें पुढें दृष्टि बहूत द्यावी. ॥
तूं नेदिसी जीव मला फुकाचा । कळेल आतां परिपाक याचा. ॥ १० ॥
पूर्वीं मसीं बोलुन काय जासी । कृष्णाकडे सांप्रत डोल देसी ? ॥
निर्वाह तूझ्या वचनास नाहीं; । या स्त्रीजिता नित्य विटाळ पाहीं. ॥ ११ ॥
स्त्रीबुद्धियोगें मजसी पडेना, । आरंभिलें कार्य सिरां चढेना. ॥
स्त्रीबुद्धि हे नित्य अनर्थकारी, । गमाविसी कां उगलीच क्वारी ? ॥ १२ ॥

हा आजि तूझे नगरीं न राहो, । आला असे केवळ तूज राहो. ॥
कशास हा दाढ तुम्हांस व्हावा ? । संमार्जनींचा गुण हा पहावा. ॥१३॥
खिरीमधें हा नसता सराटा, । हा पांडवांचे घरिंचा खराटा. ॥
संपत्ति हे झाडुन सर्व नेली, । त्या पांडवांला भिक लावियेली." ॥ १४ ॥
बाचाट हा चाट वदोन राहे; । औद्धत्य राजा सहसा न साहे. ॥
सानंद निंदा करिजे पित्याची, । होईल येणें गति काय त्याची? ॥ १५ ॥
राजा म्हणे " निंदिसि आदिदेवा । जळो तुझी पातकरूप जिव्हा, ।
उगाच तूं जासिल नित्य गर्वें, । कर्मैं तुझीं हे विपरीत सर्वें. ॥ १६ ॥
तूं काढिसी या नसत्या कुसृष्टी, । हा कोण पाहेहि सवक्र दृष्टीं ? ॥
घालीन पृथ्वीतळ पालथें मी । जाणेस कैसें मज आजि, हत्मी ? ॥ १७ ॥
विकत्थना कां करिसील गेहीं ? । न आढले हा पुरुषार्थ देहीं. ॥
तूं व्यर्थ माझ्या उदरास येसी, । वीरामधें क्लीब म्हणोन घेसी ! ॥ १८ ॥
असेस तूं तो पितृमातृहंता, । अद्यापि तूझी न जळे अहंता. ॥
दाऊं नको तोंड कदापि आतां, । लज्जा न वाटे मज जाब देतां ? ॥१९॥
तूं देवतादर्शनविघ्नकारी । होसी कसा पैत्र्यपदाधिकारी ? ॥
ये पुत्रहत्येस कदा न भीतों, । राष्ट्रीकडे केवळ, रे, पहातों." ॥ २० ॥
वैदर्भ निर्भर्त्सुन बोलियेला, । तों अंतरीं पुत्र जळोन गेला; ॥
निघे मुखाबाहिर काय वाणी, । जो विंधिला केवळ शब्दबाणीं ? ॥२१॥
उठोन तो जाय, पडे विचारीं, । पाचारिले स्वीय मतानुसारी. ॥
मुख्यप्रधानाप्रति काय बोले । "हे आम्ही लोक अनाथ जाले. ॥२२॥
बलिष्ठ हे प्राक्तनकर्मरेखा; । आरंभिलें हे विपरीत देखा. ॥
हे गोवळी कोठुन आजि आले ? । येकायकीं चक्र फिरोन गेलें ! ॥२३॥
घरामधें हा गृहभेद जाला, । प्रयत्न हा वाहत सर्व गेला. ॥
जेथें घरांतूनच आगि लागे । कोणापसीं जाउन कोण सांगे ? ॥ २४ ॥
दावा मसीं साधिति मायबापें, । कृष्णाकडे वोढति पापरूपें. ॥
हा पोटिंचा पुत्रहि दुर जाला । असा पहा हा कळिधर्म आला ! ॥२५॥
कृशोदरी, सुंदर, सोदरी ते । जे सांवळा गोवळ आदरीते, ॥
सुलोचना कांचनवेदिमध्या । नव्हेल कैसी मज आजि वध्या? ॥ २६ ॥

अद्यापिही येक उपाय आहे, । मलाच जो हा समजोन राहे; ॥
सोडून हें कार्य कदा न दीजे, । प्रयत्न हा आमरणांत कीजे. ॥ २७ ॥
दैवें पुराबाहिर गोप राहे; । पुरांमधें हा शिशुपाळ आहे. ॥
आतां कपाटें अवघींच देऊं, । बळें तिला आणुन लग्न लाऊं. ॥ २८ ॥
हे गोष्टि चित्तावरिती धरावी, । परस्परें फूटि पडों न द्यावी. ॥
हा आडवा येइल कोण पाहो, । युद्धासही नीट उभेच राहो. ॥ २९ ॥
सहाय हा मागध आजि आहे, । आम्हाकडे यावरि कोण पाहे ? ॥
जो नित्य खासा तरवार मारी, । तयापुढें काय टिके मुरारी ? " ॥ ३० ॥
विचार एवंविध काढियेला, । सर्वांसही सम्मत तोच जाला. ॥
करून तेव्हां घरिंच्या अरासी, । ते मूळ जाती अवघे वरासी. ॥ ३१ ॥
विचार हा सांगति चार तेथें, । राजा बसे राजसभेस जेथें; ॥
विषाद निःसीम नृपास आला, । सेनापतीसी मग बोलियेला. ॥ ३२ ॥
" सेना सर्व हे अवघीच घ्यावी, । अंबालया रुक्मिणि शीघ्र न्यावी.
सेनेमधें सावधरूप राहें, । ईला घरांतीलच शत्रु आहे. ॥ ३३ ॥
आज्ञा तयानें बहु वंदियेली, । समग्र सेना मग सिद्ध केली. ॥
चहूंकडे दुंदुभिघोष गाजे, । सेनासमूहें दरबार साजे. ॥ ३४ ॥
स्वधर्म भूमीपति हा न सोडी, । तो आपली हे करि हो न मोडी. ॥
दोघांमधें ताळ पडोन गेलें, । ये भीमकीचें परि कार्य जालें. ॥ ३५ ॥
राजांगना वाट पहात होती, । फिरोन आली तंव तेच दूती. ॥
वृत्तांत जो तेथिल देखियेला, । तो यीजपाशींच निवेदियेला. ॥ ३६ ॥
न माय हर्षे, मग माय कोठें । तीच्या सख्यांचें उठऊन ओठें, ॥
येऊन तीच्या श्रवणास लागे, । हळूच बीजाक्षर मंत्र सांगे. ॥ ३७ ॥

निजानंदें बाळा थरथरबित निःसीम निथळे,
असे जाला तो तों अनुभव तिचा तीसच कळे ।
त्रपेनें मातेशीं प्रतिवचन किंचित्र वदली
स्ववस्रप्रांतीं हे त्वरित शकुनग्रंथि दिधली. ॥ ३८ ॥

तत्काळ ते राजस सिद्ध जाली, । सुवर्ण वृंदावन सव्य घाली. ॥
सुदेवपत्नीयुत पूजियेला, । प्रणाम मातापितरांस केला. ॥ ३९ ॥

दुर्वामयी मंगलपुष्पमाळा, । जे आणवी संवरणार्थ बाळा; ॥
करांबुजीं ते अतिगुप्त घेते, । आगुल्फ माता तिस बुंथि देते. ॥ ४० ॥
स्मरोन विश्वेश्वरमूर्ति तेथें, । सवत्स गोदान करून हातें, ॥
पार्यांच विश्वेश्वरि चालियेली, । दौवारिकीं दाटणि वारियेली. ॥ ४१ ॥
जांबूनदच्छत्र शिरीं विराजे, । मुक्ताफळस्तोम जयास साजे. ॥
दोहींकडे चामरधारिणींचा । संचार मध्यें गजगामिनीचा. ॥ ४२ ॥
सभोंवतीं वत्सल माय भोंवे, । सर्वे सख्यांचा परिवार धांवे. ॥
चालेति दासीगण हे दुरस्ता, । होती पुढें वेत्रधरा समस्ता. ॥ ४३ ॥
करें सखीचा कर घेय कारी, । समागमें सात सहस्र नारी. ॥
डावीत डावेसम हा हत्यारें, । करीत सर्वांहुन युद्ध न्यारें. ॥ ४४ ॥
अंतःपुराबाहिर शीघ्र आली । सिकेत जीच्या कळहंस चाली. ॥
तथापि हे चंचळ दृष्टि पाहे, । अत्यंत दोलाचलवृत्ति आहे. ॥ ४५ ॥
तों हा गृहासन्निध चैद्य आला, । होणार आहे मधुपर्क ज्याला, ॥
वार्ता जसी ये मग आयकीली, । तत्काळ बाळा उतरोन गेली. ॥ ४६ ॥
हा घाबिरा राजकुमार जाला, । कपाट बंधा विसरोन गेला. ॥
सहाय जेथें भगवंत आहे, । तेथें कदा विघ्न शिरो न लाहे. ॥ ४७ ॥
सहस्र हस्तीं हरि रक्षिता हा, । तयेकडे कोण अवेक्षिता हा? ॥
नाकां चुना लाउन जात आहे, । ज्याचें कुडें त्याजपुढेंच राहे. ॥ ४८ ॥
त्या पाठिसी चालति राजदारा, । कदापि ज्यांला न लगेच वारा. ॥
अधिष्ठिती सुंदरि पालख्यांला, । न देति वाटों जन पारख्यांला. ॥ ४९ ॥
मधें मधें चालतिं वारमुख्या, । सुवासिनी धांवति लक्ष संख्या. ॥
वाजेत नानाविध सर्व वाद्यें, । पढेत बंदी स्तुतिरूप पद्यें. ॥ ५० ॥
जे लोक खासे जवळील भारी, । आरूढ ते ज्यांवरि शस्त्रधारी. ॥
सभोंवते चालति ते शिपायी, । हे चाललीसे सुकुमार पायीं. ॥ ५१ ॥
त्याभोंवता सज्ज पदातिफेरा । त्या भोंवता स्वारसमूहघेरा. ॥
त्याभोंवते हे रथ थाट चाले, । त्याभोंवते मत्त गजेंद्र काळे. ॥ ५२ ॥
त्याभोंवतीं केवळ वन्हियंत्रें, । चालेत ज्यांच्ची शकटें स्वतंत्रें. ॥
बसेत साहाकट दाट, पाहीं, । पिपीलिकेला परि मार्ग नाहीं. ॥ ५३ ॥

अपार सेनार्णव चालिलासे, । सेनाभरें शेषहि हालिलासे. ॥
महापुरद्वारहि टाकियेलें, । तत्काळ अंबालय पावियेलें. ॥ ५४ ॥
मुकुंद-पादांबुज ध्यानशीला, । राहे उभी बाहिर गूढलीला. ॥
जे पाणिपादांबुजयुग्म धूते, । गंगोदकें आचमनार्थ घेते. ॥ ५५ ॥
देवालयीं दाटणि देखियेली, । ते वारिजे सत्वर सौविदल्ली ॥
प्रवेशली त्यावरि राजपुत्री, । प्रफुल्लपंकेरुहपत्रनेत्री. ॥ ५६ ॥
ठेवी तयेचे चरणाब्ज माथां, । आधार जे केवळ या अनाथां, ॥
अपारसंपद्रचना विधात्री, । कटाक्षमात्रें करि मोक्षदात्री. ॥ ५७ ॥
माता तिच्या तीजसमीप आल्या, । प्रणाम देवीस करूं निघाल्या. ॥
सुवासिनी दाटति त्या अपारा । करीत दासी बहु वेरझारा. ॥ ५८ ॥
अगस्तिपत्नी अणि अत्रिपत्नी, । पतिव्रता मुद्गलधर्मपत्नी, ॥
अरुंधती स्त्रीजनवृंदवृद्धा, । पतिव्रतांमाजि अतिप्रबुद्धा. ॥ ५९ ॥
पतिव्रतामंडन गौतमाची । जाया अहिल्या मुनिसत्तमाची, ॥
मिळोन इत्यादिक सर्व आल्या, । यथोचित स्वागत बैसवील्या ॥६०॥
गंधर्वविद्याधरबायकांचे । येती थवे गुह्यकगायकांचे ॥
वाजेत ते ताळ, मृदुंग, भेरी, । देवीपुढें नाचात वारनारी. ॥ ६१ ॥
शुभासनीं रुक्मिणि बैसलीसे । जे पीतपीतांबर नेसलीसे.
सख्या उभ्या राहति पृष्ठभागीं, । कुरंगनेत्रा, कुशला, कृशांगी. ॥६२॥
संभार देवीपदपूजनाचे । आणीत अध्यक्ष वधूजनाचे; ॥
आरंभिजे अर्चन अंबिकेचें; । सौभाग्य मोठें नृप कन्यकेचें. ॥ ६३ ॥
सुदेवपत्नी मग बाहवीली, । सर्वांपुढें आणुन बैसवीली; ॥
साडी जरी हे परिधान केली, । सुवर्ण जे हें म्हण येक त्याली. ॥ ६४ ॥
करीत सत्कार समस्त नारी, । सस्मेर, सापत्रप होय कारी. ॥
जाली जिच्या राजगृहीं प्रतिष्ठा, । न होय अन्यत्र कसी वरिष्ठा? ॥६५॥
देवालय स्त्रीमय सर्व जालें, । स्त्री राज्य एकत्रच वा मिळालें. ॥
पुन्नाम कोठें श्रवणीं पडेना, । कोण्हीकडे मानस वावडेना. ॥ ६६ ॥
द्विजांगना पूजन तीस सांगे, । ते अर्चनीं श्रीपति मान मागे. ॥
जें जें तिणें आपण मागिजेती, । तें तें सख्याही उपचार देती. ॥ ६७ ॥

पदांबुज ध्यान मनांत केलें, । सुवर्णसिंहासन अर्पियेलें. ॥
सुगंधि पायावरि पाद्य घाली, । अनर्घ्य अर्घ्योदक सिद्धि आली. ॥६८॥
समर्पिलीं आचमनीय तोयें, । संपादिलीं जे गुरुसंप्रदायें. ॥
मळापकर्षस्नपनीय वारी । निवेदिते त्यावरि राजकारी. ॥ ६९ ॥

पंचामृतस्नानविधान जालें, । पृथक् पृथक् पूजन त्यास केलें. ॥
विशेष संक्षाळण होय जेव्हां, । परस्परें बिंबुन जाति तेव्हां. ॥ ७० ॥
प्रवाळपीठावरि बैसवीली, । सुगंध तैलें मग माखियेली, ॥
काश्मीरकस्तूरि समान भागें, । उद्वर्तिजे तत्तनु भक्तियोगें. ॥ ७१ ॥

सुवर्ण गंगालय आणवीलें, । सुगंधि ऊष्णोदक सारियेलें. ॥
करांगुलीच्या अवकाश मार्गें, । त्या तोयधारा पडती निसर्गें. ॥ ७२ ॥
अपार येती घट कांचनाचे । जे शुद्ध शीतोदक सेचनाचे. ॥
विधियुक्त तेणें अभिषेक केला. । तत्प्रोंच्छनीं हा उपयुक्त सेला. ॥ ७३ ॥

तदुपरि तिस अर्पी पीत चंद्रातकांतें,
परम रुचिविशेषें लाजवी हाटकांतें. ।
भरजर अवघी हे शाठिका नेसवीली,
धरुन करसरोजीं आसनीं बैसवीली. ॥ ७४ ॥

झळकति सज जेथें गोठ हे सोनियांचे,
विलसति जव जाणे हे तसे मोतियांचे; ।
हरित तिस असी हे कंचुली लेववीली,
माणिखचित नगांची पेटिका आणवीली. ॥ ६५ ॥

उघडुन मग काढी जे अळंकार यत्नें,
वसति बहुत जेथें हे अमोलीक रत्नें. ।
तदुपरि तिस अर्पी ते यथास्थानदेशीं
पदयुग जननीचें आदरीजे जिवेंसी. ॥ ७६ ॥

सौभाग्यसंसूचक रूपमुद्रा । अर्पीतसे कुंकुम हे हरिद्रा. ॥
घेऊनियां रुक्ममयी शलाका, । नेत्रांबुजीं अंजनलेशलेखा. ॥ ७७ ॥
कस्तूरिका, चंदन, सारचोवा, । काश्मीरकर्पूर, बुका वहावा. ॥
सुगंधि नानाविध पुष्पजाती । त्यानंतर तीस समर्पिजेती. ॥ ७८ ॥

तत्काळ काळागरु धूप दावी. । प्रसन्न एकार्तिक दीप लावी. ॥
नैवेद्य विस्तारुन रत्नताटीं । निवेदिला उत्तम तीजसाठीं. ॥ ७९ ॥
फळार्पणानंतर अर्पणीयें । समर्पिलीं शीत, सुगंधि तोयें. ॥
कर्पूरकंकोळलवंगयेला- । संमिश्र तांबूल निवेदियेला. ॥ ८० ॥
आदर्श हा रत्नजडीत दावी । पतद्ग्रही तीज समीप ठेवी. ॥
क्षणेक संवीजन ताळवृंते, । तत्पादसंवाहन होय हातें. ॥ ८१ ॥
सुवर्णकोटिद्वय दक्षिणा हे । वाहोन, मागें परतोन पाहे. ॥
सख्या तिच्या सर्वहि इंगितज्ञा, । संकेतमात्रें करिताति आज्ञा. ॥ ८२ ॥
आंदोलिका उत्तम वाहियेली । मुक्ताफळीं केवळ गुंफियेली. ॥
सुवर्णपर्याणित अश्व चारी, । समर्पिजेती गजराज भारी. ॥ ८३ ॥
सचामरच्छत्र, सुवर्णपादुका, । सुवर्णपर्यंक, सुवर्णदीपिका ॥
मृदूपधानान्वित हंसतूळिका, । समर्पिल्या ज्या उपयुक्त दासिका. ॥८४॥
कर्पूर, नीरांजन होय जेव्हां, । सहस्रघंटाध्वनि होति तेव्हां; ॥
सुवर्णपुष्पांजाळि वाहियेला, । प्रणाम साष्टांग तयेस केला. ॥ ८५ ॥
प्रदक्षिणा तीस करून आली; । पुढें उभी सन्मुख राहियेली. ॥
पुनःप्रणामांजाळि जोडियेला, । संपूर्ण पूजाविधि अर्पियेला. ॥ ८६ ॥

अहो, लोपामुद्राप्रभृति अनसूयावधि सती,
जयेच्या लक्षांशेंकरुन तुळने येत नसती; ।
अशी हे जे बाळा मुनिवरमहामुद्गलवधू,
वदे ते अंबेसी घवघवित जीचा मुखविधू. ॥ ८७ ॥

"अपर्णे शर्वाणि, त्रिनयनगृहस्वामिनि, उमे,
कृपापांगें तूझ्या प्रणतजनचिंतानळ शमे. ।
मृदुस्वांते, शांते, जननि जगदंबे, भगवती,
करावें तां ऐसें शुभ अशुभ कर्मं जुगवती." ॥ ८८ ॥

नृपाची हे कन्या पदयुग नमस्कारित असे.
मनीं हा आनर्ताधिप हरि इचे येउनि वसे. ।
भवानी, हा अस्मद्विधहृदयसंदेह तुरवीं,
जगन्माते आतां झडकरिं इचा हेतु पुरवीं. ॥ ८९ ॥

विनंतीनें झाली किमपि जगदंबा स्मितमुखी,
स्मितज्योत्स्नाजाळें निजनिलय जीचें लखलखी. ।
ऋषीचे पत्नीला नियत तदभिप्राय कळला.
म्हणे, "बाळे, तूझा सकळ मनिंचा हेतु कळला."॥९०॥

भवानीचे कंठींहुन बकुलमाळा उचलिली.
इचे कंठीं घाली अतिमृदुळ जे हे मिरवली. ।
वह्राती तन्माता त्वरित जंव घेऊन अभिधा,
अनुज्ञा अंबेची [illegible]करि निघे येऊनि तदा. ॥ ९१ ॥

पुरोभागीं जो हा अतितत सभामंडप असे,
अहो, बाळा तेथें हळुच मग हे येउनि बसे. ।
चिरंटीचा नानाविधनिवह तेथें घनवटे;
कुमारींचा कोळाहळ बहळ तैसा मग उठे. ॥ ९२ ॥

सुवासिनी सन्निध आणवील्या; । पदांबुजें क्षाळुन बैसवील्या. ॥
वेण्या तयांच्या सज घालवील्या;। साड्या सकूर्पासक अर्पियेल्या. ॥९३॥
स्वयेंच ते देत असे हरिद्रा. । उद्वर्तिती त्या निज वक्त्रचंद्रा. ॥
ते कुंकुमें उत्तम लाववीलीं. । हे पाउलें सुंदर रावलीलीं. ॥ ९४ ॥
त्या कंठसूत्रांत अनेक भूषा । समर्पिते ते स्पृहणीयवेषा. ॥
फळेक्षु तांबूल सुवर्णपूर्णें । शूर्पें करी सिद्ध सुवर्णवर्णें. ॥ ९५ ॥
समर्पिते जे मग लक्ष वाणें. । करीत नारी तिस अक्षवाणें. ॥
अशीच तेही तिहिं पूजियेली. । वोटी तिची हे परिपूर्ण केली. ॥ ९६ ॥
माता समस्ता मग पुजियेल्या, । माथा पदीं ठेउनि वंदियेल्या. ॥
त्या तीस आशीर्वचनास देती. । म्हणेति, "तूं होसिल पुत्रवंती." ॥९७॥
जाली पुढें सोदरमुख्यजाया । ईच्या मनांतील विषाद जाया. ॥
भाळीं तिचे कुंकुमबिंदु लावी. । म्हणे तिला, "तूं अससी दुलावी."॥९८॥
त्या देवकन्या आणि राजकन्या । पहावया कौतुक येति धन्या. ॥
त्या मेनकाआदिकरून मुख्या । करीत सेवा सुरवारमुख्या. ॥ ९९ ॥
घालून मल्लीकुसुमें स्वकेशीं । तत्केशसंस्कार करी सुकेशी. ॥
धरून मौनव्रत मंजुघोषा । ते लेववीते तिजला विभूषा. ॥ १०० ॥

तिलोत्तमा उत्तम पाय ऊटी, । अधोमुखी तीस न देय ऊटी; ॥
रंभा स्वदंभास धरूं न लाहे, । आदर्श घेऊन उभीच राहे. ॥ १०१ ॥
उपासना सन्निध उर्वशीला, । असे जिला वासव हा वसीला. ॥
वरिष्ठ सर्वांहुन हे घृताची । ते वाट पाहे वचनामृताची. ॥ २ ॥

होऊन हा संभ्रम जाय जेव्हां । बाहेर कोलाहल होय तेव्हां. ॥
तेणें तिचें व्याकुळ चित्त जालें; । संदेहसोपान चढों निघालें. ॥ ३ ॥
उठे त्यव्हां तेथुन ते शहाणी, । शिंकेत जीच्या हरिणी पहाणी. ॥
पुसोन सर्वांस असे निघाली, । देवालयाबाहिर चालियेली. ॥ ४ ॥

तो घाबिरा होय भरोन धापे, । महाभयें ब्राह्मण फार कांपे. ॥
तो तांतडी धांवत वृद्ध आला. । म्हणे, " मुली, काय विलंब केला. ॥५॥
प्रसंग जाणोन न वर्तसी, गे. । असार कर्मीच प्रवर्तसी, गे. ॥
टाकून गोविंदपदारविंदा । आरंभिला हा नसताच धंदा. ॥ ६ ॥

अद्यापि चित्तावरि गोष्टि घ्यावी, । माया तुवां सोडुनि सर्व द्यावी. ॥
हे लाविल्यानें लिगटोन येते; । हे सोडिल्या दूर सुटोन जाते. ॥ ७ ॥
जे आप्तवर्गी म्हणशील माझीं, । ते सर्वथाही नव्हतील तूझीं. ॥
आलीकडे हा जन सर्व राहे; । आत्मीय तो याहुन भिन्न आहे. ॥ ८ ॥

तूं गुंतसी, गोंविसी कां निसांसी ?। या अंतरंगा विसरोन जासी; ॥
हे कोण आहे भवदीय दीक्षा ?। करी परब्रह्म तुझी प्रतीक्षा ! ॥ ९ ॥
स्वभाव तूझा बहु फार भोळा. । बाळे, विवेकांजन घालि डोळां. ॥
येथें उदासीनपणें रहातां । चढेल अद्वैत निधान हाता. ॥ ११० ॥

पडेल पायांवरि दृष्टि जेव्हां, । कृतार्थ तूं होसिल जाण तेव्हां. ॥
भाग्यास तूझ्या तरि पार नाहीं, । फिटेल हे लोचन पारणाही. ॥ ११ ॥
हे क्रोध, लोभ, मद, मत्सर बोळवावे. । वाचेकरून भगवद्गुण बोलवावे.॥
आशादिकां सहचरींस त्यजून, बाई, ।तूं येकली त्वरित जाउनि लाग पायीं.१२

आणीकही परम विस्मय थोर जाला। तो क्षत्रियाधम नरेंद्रगृहास आला.॥
रुक्मी तयास मधुपर्क करीत आहे.।चाटीत तो दधि हताश तसाच राहे. १३
पूर्वेकडील आणि दक्षिण पश्चिमेचे । राजे, कितेक अति उद्धत उत्तरेचे॥
सन्नद्धशस्त्रबळवाहनयुक्त होती; । अंबालयाप्रति मिळोन समस्त येती. १४

ते आपले विविधभार रचीत राजे, । जे, भीमकी, तुजनिमित्त पडेत लाजे;॥
अत्याहित प्रकट उत्कट मांडियेले; । हें अंबिकानिलय येउनि वेढियेलें. १५

हा द्वारकारमण, कृष्ण सहाय जेथें, । कोणापसून उपजे भय तुज तेथें?॥
बाहेर तूं त्वरित येथुन जाय, बाई. । हे त्यापुढें नृपति केवळ जाण गाई.॥१६॥

नरपतिसमुदायीं नेणसी श्रीपतीला.
   त्वरित करून जासी आपले व्युत्पतीला. ।
सहज नृप समाजामाजि जो देखणा, गे;
   तदपि तुज तयाच्या सांगतों या खुणा, गे. ॥ १७ ॥

अभिनव वनमाळा शोभते नित्य कंठीं,
   अविरळ कुरळांची मस्तकीं वीरगुंठी, ।
वदननिहित वंशीं, देवढें ठाण ज्याचें,
   दृढतर तुज लागो सर्वदा ध्यान त्याचें. ॥ १८ ॥

सुररिपु वळखें जो कंद नीळया नभाचा,
   उदय हृदयदेशीं होय तो कौस्तुभाचा, ।
परम विसळ जेथें वैजयंती विराजे,
   त्वरित वरिं तयातें, सर्व टाकूनि राजे. ॥ १९ ॥

ध्वजस्तंभीं ज्याचे खगपति सदा राहत असे,
   भुजद्वंद्वीं तैसें अविरत गदा, चक्र विलसे, ।
शिरीं पिच्छे वाहे, कटितटिस पीतांबर धरी,
   जसा हा लक्षावा यदुपति, जगन्नायक हरी. ॥ १२० ॥

न लक्षे योग्यांला अति तरळ ते लक्षिति कसें?
   करावेना बाई क्षणभरि मनीं चिंतन असें. ।
तयाची तूं सत्ता; तुजविण तया स्पंदन नसे;
   तथापि प्रारब्धें सहज तुज हें ब्रह्म गंवसे." ॥ २१ ॥

बोलोन हें वचन विप्र सुदेवनामा
   "स्वस्त्यस्तुते" म्हणुन जात असे स्वधामा. ।
तेथेंच राहति उभ्या नरनाथनारी
   रक्षीत जाति तिजला बहु वेत्रधारी. ॥ २२ ॥

माता म्हणे, “ नृपसुते, परतोन पाहें. ।
लोकांत हा विधि पुरातन, उक्त आहे. ॥
धाडीन मी मुळ दिवाळिस तूज, बाई. ।
हा प्राण होय मजला तुजवीण कायी ? ॥ २३ ॥

तो तों करील तुजला तळहातछाया,
माझी कशी मज सुटे परि आजि माया ? ।
वृत्तांत दूरिल कसा मजला कळे, गे ?
याकारणें परम हा जिव जाकळे, गे. ॥ २४ ॥

तूं आत्मजे, मज मनांतुन मोकलीसी.
जाऊं कशी स्वसदना परि येकलीसी ? ।
ये कातरींत जिव आजि पडोन राहे.
'माते' म्हणोन तुजवांचुन कोण बाहे ! ” ॥ २५ ॥

हें आयकोन पृथिवीपुरुहूतपुत्री
कोमेजली विकचपद्मपलाशनेत्री. ।
बाहेर ये तदपि धीर धरून बाळा.
टाकी पदें हळुच कोमळ चारुशीला. ॥ २६ ॥

दोहीं करीं सहचरीस धरून चाले.
चालेत वीर अतिदूर धरून भाले. ।
दाटेत त्या निजसमीप अनेक दासी,
ज्या सर्वदा वसति केवळ तीजपासीं. ॥ २७ ॥

आज्ञापिती कितियकां परिचारिकांला,
अध्यापिती चतुर ज्या शुकसारिकांला. ।
वाटेस वांटिति विडे, सगळ्या सुपाऱ्या.
रंभादिका दिसति ज्यांजपुढें विपाऱ्या. ॥ २८ ॥

नाचेत त्या तिजपुढें बहु वारनारी.
दूती फिरेति कितियेक निवारणारी. ।
वंशावळी पढत भाट अनेक जाती.
वाजेति त्या विविध सुंदर वाद्यजाती. ॥ २९ ॥

ते भीमकी सकळलोकमनोभिरामा,
वैकुंठनाथपदपंकजबद्धकामा, ।
सौंदर्यसाररसनिर्मित मूर्ति जीची,
उत्कृष्टता परम याहुन काय तीची? ॥ १३० ॥

वक्त्रेंदु हा सहज सिंधु सुधारसाचा.
याचा धरी नियत इंदु उधार साचा. ।
आहे असाच बहुधा अपवाद लोकीं.
हा अन्यथा हरिणलांछन कां कलंकी? ॥ ३१ ॥

अत्यंत निर्मळ, अमोलिक, ज्या अभुक्ता,
सीमंतसीमपदवीस बसेत मुक्ता, ।
साजे वरा बिजवरा तिजला ललाटीं.
येकावळीयुत मनोहर हार कंठीं. ॥ ३२ ॥

शोभे तिचें मृदु भुजद्वय बाजुबंदीं.
तें नीळ तेज झळकें हृदयारविंदीं. ।
हातीं तिचे सहजरत्नजडीत चूडा.
त्या मुद्रिका सकळ अंगुळिकाधिरूढा. ॥ ३३ ॥

आकर्ण विस्तृत तिच्या विलसेत दृष्टी;
तन्मध्य हा सहज सुंदर माय मुष्टी ।
तीचा महा रुचिर नाभि गभीर शोभे.
वक्त्रांबुजीं परम षट्पदवृंद लोभे. ॥ ३४ ॥

ते भीमकीस सिसफूल शिरीं विराजे.
नाकीं तिचे अति मनोहर मोर साजे. ।
पायीं तिचे जडित नूपुरयुग्म वाजे.
तीचे गतीस गगनीं गजराज लाजे. ॥ ३५ ॥

जे देवमाया, वरवीर मोहिनी,
व्यंजत्स्तनीं, जे कळहंसगामिनी, ।
श्यामा, नितंबार्पितरत्नमेखळा,
पायीं जिचे शोभति हेमशृंखळा. ॥ ३६ ॥

कृशोदरी, कुंडलमंडितेक्षणा,
शुचिस्मिता, सुंदरि जे सुलक्षणा. ।
जे पक्वबिंबीफळसोदराधरा,
ते होय वीरां मग दृष्टिगोचरा. ॥ ३७ ॥

व्रीडावलोकनविमिश्र तदीय हासा
देखोन, ते पडति वीर मनोजफांसां. ।
उत्साह जे बहुत थोर धरून आले
राजन्य ते परम मूर्च्छित सर्व जाले. ॥ ३८ ॥

हस्तांबुजींहुन गळोन पडेत शस्त्रें.
चित्रांपरी धरिति भूषण आणि वस्त्रें. ।
यानावरून कितियेक पडेत खालें.
येकायकीं नृपतिमंडळ मुग्ध झालें. ॥ ३९ ॥

जों पावलें सकळ राजक हे अवस्था,
तों चालिली सहज तेथुन पद्महस्ता. ।
कृष्णार्पण प्रकट देह करूनि राहे.
ते भीमकी भगवदाप्तिस इच्छिताहे. ॥ १४० ॥

वारून वामकरजीं अलकांस, बाळा;
तैसें अपांगविशिखीं अपरां नृपाला; ।
आलोकिते सभय सादर अच्युतातें.
सव्रीड साचिवदना, पुरुषोत्तमातें. ॥ ४१ ॥

तें सांवळें, सगुण ब्रह्म कृपाकटाक्षीं.
सस्मेर तन्मुखसरोरुह हें अवेक्षी. ।
दृष्टीस दृष्टि जंव नीट मिळोन गेली,
ते भीमकी हळुच त्याजसमीप आली. ॥ ४२ ॥

कीं चक्रवाकरमणीच वियुक्त जाली
ते चक्रवाक उमगीतच काय आली? ।
कीं मानसा त्यजुन मानसराजहंसी
आसक्त हे परमहंसकुळावतंसीं? ॥ ४३ ॥

कल्पद्रुमाजवळि जंगम कल्पवल्ली
  कीं येय हे हळुच चालत पायचाली. ।
कीं चातकप्रणयिनीच निदाघतप्ता
  धांवोन ये नवघनाभिमुख तृषार्ता! ॥ ४४ ॥

किंवा त्यजून विषयांकुरमात्रचारा
  मुग्धा मृगी अनुसरे निज कृष्णसारा; ।
किंवा महोदधि गवेषित येय गंगा;
  कीं भेटली रतिच येउनि या अनंगा. ॥ ४५ ॥

हे भीमकी सहचरीसहित त्रिवेणी;
  प्रत्यक्ष हा वटमहीरुह चक्रपाणी. ।
जेणें सुटे सहज हा भवबंध, राया;
  तो तीर्थराज प्रकटे जग उद्धराया. ॥ ४६ ॥

तत्काळ इंद्रियपराङ्मुख वृत्ति जाली.
  श्रीकृष्णमूर्ति हृदयीं विवरों निघाली. ॥
हारोन जाय मकरध्वज कोटिशोभा.
  पाहे न्यहाळुन तया मग पद्मनाभा. ॥ ४७ ॥

चतुर्भुज श्यामळरूपधारी,
  जो शंखचक्राब्जगदा उभारी, ।
उभा असे जो रणभूमिभागीं,
  घेऊनियां चंदनऊटि अंगीं. ॥ ४८ ॥

कंठस्थळीं कौस्तुभ दिव्य भासे
  मुखेंदुसानुग्रह मंद हांसे ।
उत्फुल्लकंजोपमनेत्र दोन्ही
  ते कुंडलें हो झळकेति कानीं. ॥ ४९ ॥

ते साजिरी उन्नत नीट नासा,
  शोभा महा भ्रूलतिकाविलासा. ।
टिळा ललाटीं निट केशराचा,
  तो बिंदु शोभे वरि कस्तुरीचा. ॥ १५० ॥

धम्मिल्ल शोभे मृदु कुंडलांचा;
संवेष्टिला हार असे फुलांचा. ।
किरीट माथां जडित प्रकाशे.
रत्नावतंसद्युति हे विकासे. ॥ ५१ ॥

हीरांगदें शोभति बाहुदंडी
रत्नीं कडीं हे खचितें उदंडीं; ।
उद्योत तो उत्कट ऊर्मिकांचा,
प्रकाश जेथें पडला नखांचा. ॥ ५२ ॥

श्रीवत्सलक्ष्मीस विशेष शोभा. । वसे विधी नाभिसरोजगाभा. ॥
वक्षस्थळीं उज्वळ वैजयंती. । पदाब्ज सेवी त्रिदिवस्रवंती. ॥ ५३ ॥

पीतांबराचें परिधान साजे, । कटिप्रदेशीं रशना विराजे, ॥
त्या किंकिणीचा समुदाय वाजे, । वांकी पदीं तोडरयुग्म गाजे. ॥ ५४ ॥

आविर्भवे केवळ शंबरारी; । शृंगार किंवा अवतारधारी. ॥
जें जें, अहो, रुक्मिणि अंग पाहे । तेथेंच ते दृष्टि जडोन राहे. ॥ ५५ ॥

तथापि ते सस्मित वक्त्रचंद्रा । अमुद्र लावण्य समुद्रमुद्रा ॥
त्या मेचका सेचन काय पायीं । सदृष्टि लेवी विविधा उपायीं. ॥५६॥

पहातसे विश्वमनोभिरामा; । कदा न पावेच विराम रामा. ॥
जो हारि हा दुर्लभ योगियांला । प्रत्यक्ष तो दर्शन लाभ झाला. ॥५७॥

मिळे शशांकास अहो विशाखा; । किंवा अशोका सहकारशाखा; ॥
हे साधकासन्निध सिद्धि आली, । किंवा विरक्तान्वित शांति जाली. ॥५८॥

जाला इला चरणदर्शनलाभ जेव्हां, ।
प्रेमार्द्र लोचन यदूद्वह होय तेव्हां. ॥
तिर्यङ्मुखी सभय लज्जित फार जाली. ।
कृष्णास ते नमनपूर्वक माळ घाली. ॥ ५९ ॥

सख्या दोघी तीच्या सहज मग मागें परतती.
निजा सौजन्याच्या निरवधिक निर्वाह करिती. ।
अहो, जन्मा आल्या उचित बहुधा हेंच इतुकें,
करावें हें तेणें नियत उरके ज्यास कितुकें. ॥ १६० ॥

न देखे वैदर्भी जवळिसखियांतें सुनयना;
नवोढत्वें लाजे, किमपि परते हंसगमना; ।
जयाचें हें ईणें सहज फिरतां चित्त हरिलें,
तया या श्रीरंगें त्वरित पदरीं तीस धरिलें. ॥ ६१ ॥

पृथुश्रोणिश्रांता, उदितमदना, स्विन्नवदना,
महाभाग्यें जाली सफळनयना, कुंदरदना; ।
सुशीळा, तन्वंगी पदरिं धरितां जे दचकली
कृपाळें गोपाळें त्वरित चहुं हातीं उचलिली. ॥ ६२ ॥

रथीं वाहे, बाहे धरुन, जगदाधार जिजला
तयेची ही लज्जा तदपि विसंबेच तिजला. ।
रथारूढें कृष्णें शिथिल भुजबंधें कवळिली
कृशांगी सत्कारें करुन निजअंकीं बसविली. ॥ ६३ ॥

पतिप्रेमाचें ये हृदयकमळीं थोर भरतें;
तयाचें हें देहीं प्रकट उमटे चिन्ह वरतें. ।
प्रकर्षं हर्षाच्या कृशतनु अकस्मातच फुगे,
त्यव्हां त्या सत्वाचे अनुभव कसे राहति उगे? ॥ ६४ ॥

कपोळीं बाळेच्या अपरिचित रोमांच उठती.
तयेच्या चोळीचे सकळ जवदाणे उतटती. ।
गळां दाटे भारी, सहज सलिलें नेत्र भरले,
महर्घाचें घर्मोदकण मुखचंद्रीं उमटले. ॥ ६५ ॥

वियोगें कृष्णाच्या अनवरत तापत्रय धरी
हृदीं आनंदाचे अतिशयित ते मज्जन करी. ।
निवाडें स्वामीच्या चरणनलिनातें अनुसरे. ।
तयेच्या क्लेशांचा पृथुतर कसा भार नुतरे? ॥ ६६ ॥

जनाच्या सौभाग्यें प्रकृतिपुरुषां योग घडला.
अनेकां वीरांचा प्रबळतम उन्माद झडला. ।
समस्तां भक्तांचा नयनगत हा पांग फिटला.
प्रंपचाविष्टांचा सह (ज?) हृदयग्रंथि सुटला. ॥ ६७॥

दमाम्याची घाई तदुपरि उठे हे चहुंकडे.
प्रसादें वाजेत त्रिदशनगरीचे चवघडे. ।
विमोक्ता बंधाचा यदुपति इणें कृष्ण वरिला.
फुलांचा हा माथा सुरतरुफुलांनींच भरला. ॥ ६८ ॥

प्रतापें श्रीकृष्णें त्वरित हरिली प्राणदयिता
मिळाल्या तेथेंही सकल सुर दिक्पालवनिता. ।
तया त्या दोघांतें विविध कुरवंडीस करिती.
प्रणामांतीं ज्याला घडति निज नीरांजन रिती. ॥ ६९ ॥

विनीतत्वें ब्रह्मादिक सकळ बद्धांजळि उभे,
प्रभावें गर्जेत प्रमुदित महा यादव शुभें; ।
पहाया हे येती अगणित वसिष्ठादिक मुनी
जयांची हे जाली अतिशयित दाटी प्रणमनीं. ॥ १७० ॥

अहो, हाहाहूहूप्रभृति बहु विद्याधरकुलें;
प्रमोदें कृष्णाचीं विविध चरितें गाति विपुलें. ।
महोत्साहें येथें यदुपतिकथा भक्त करिती;
जयेच्या स्वारस्यें अमृतलहरींतें अधरिती. ॥ ७१ ॥

तयां सर्वांमध्यें प्रिय परम हा नारद असे,
करीं ज्याचे वीणा, अनियत मुखीं नाम·निवसे. ।
निजप्रेमें नाचे, हरिचरण लाभें तववरी,
शिखा युद्धासाठीं अतिशयित त्याची थरथरी. ॥ ७२ ॥

त्यव्हां त्या श्रीकृष्णें स्वपुरगमनोद्योग धरिजे
पुढें ते सेनेला प्रबळ बळरामास करिजे. ।
प्रयाणप्रारंभीं उठति करनाल ध्वनिमहा
निनादें भेरींच्या दुमदुमित दिग्भागहि दहा. ॥ ७३ ॥

न पाहे वैदर्भी अतिविस्फुल्लवदना,
निघाली दैवाची नृपकुमरि, लावण्यसदना; ।
मुखश्रीनें जीचे सकळहि दिशा या उजळती,
धरित्रीचे राजे निखिल हृदयामाजि जळती. ॥ ७४ ॥

भुकेला भक्तीचा हरुन तिजला होय विजयी.
धरावी हे याची त्वरित वरवी मूर्ति हृदयीं. ।
निजांभक्तांसाठीं यदुपति कसा धांवत असे
त्रिलोकी-मध्यें ये सदन दुसरा याहुन नसे. ॥ ७५ ॥

जगामध्यें जेणें अनवरत याचें म्हणविलें,
निजप्राप्तीसाठीं अतिविनय याला विनविलें; ।
मनीं, ध्यानीं, स्वप्नीं, निशिदिवस जेणें निरखिला
तयाचा हा शौरि नियतच अहो होय विकला. ॥ ७६ ॥

सखा हा दीनांचा, पतितनिवहोद्धारक महा;
अनाथांचा नाथ, प्रणतजन बंधूत्तम पहा; ।
विसांवा श्रांताचा, जनकजननी हाच भजका;
करीना हे कैसी यदुतिलक संसारसुटका ? ॥ ७७ ॥

कथा हे कृष्णाची सकळ जगदानंदजननी
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं. ।
प्रसंगें श्रोत्यांचे सकळहि महादोष हरती;
यदूत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ ७८ ॥

वृथा संकल्पाचे अनियत कडे वृत्ति न चढे.
पहातां तों येथें प्रकट सदसद्वस्तु निवडे. ।
चुके यातायात श्रम सकळ; सत्संगति घडे;
अनायासें जेणें सहजसुखसंदूक उघडे. ॥ ७९ ॥

स्वस्यंदनीं वाहुन राजकन्या,
तो वाजवी श्रीपति पांचजन्या. ।
त्या वीरवृंदातुन जाय तैसा,
शृगालसंघातुन सिंह जैसा. ॥ १८० ॥

॥ इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये रुक्मिणीहरणोन्नाम अष्टमः सर्गः ॥

शके १६६६

समाप्त.

# सामराजकविविरचित रुक्मिणीहरण.

# टीपा व स्पष्टीकरण.

## सर्ग पहिला.

[पहिले १६ श्लोक मंगलाचरणपर आहेत. त्यांत कवीनें जुन्या काव्यपद्धती-प्रमाणें श्रीगजानन, सरस्वति व जगद्गुरु परमेश्वर यांस नमन केलें असून जगद्गुरूला आपला उद्धार करण्याविषयीं प्रार्थना केली आहे. हे श्लोक सरस आहेत. श्लोक १७–२७ मध्यें प्रपंच व त्याचें दुस्तरत्व यांचें सुंदर वर्णन आहे. पुढील श्लोकांत काव्यकथेची प्रस्तावना व कृष्णजन्म-कथेचें वर्णन हीं आलीं आहेत. यांत कृष्णाच्या बाललीला फार चांगल्या रीतीनें वर्णिल्या आहेत.]

पृष्ठ१. श्लोक १. 'उपजाति;' इंद्रवज्रा व उपेंद्रवज्रा यांच्या मिश्रणानें उप-जाति वृत्त बनतें. कल्पद्रुमकाननांचे सिंधु; कल्पवृक्षांचीं असंख्य अरण्यें. 'सिंधु' शब्द केवळ बाहुल्य दाखवितो. विघ्न; विघ्नें. प्रस्तुत काव्यांत वृत्तसुखा-स्तव ऱ्हस्वदीर्घ, मात्रा वगैरेंची पुष्कळ ओढाताण केलेली दृष्टीस पडते. कवित्वजाती; काव्यप्रकार. श्लोक २. 'इंद्रवज्रा.' घेय; घेते, घेई. चरण २ ब्रह्मदेवानें आपली कन्या सरस्वती इच्यापासूनच हें अखिल जग निर्माण केल्यामुळें, तिच्या योगानेंच तो प्रपंची, संसारी, झाला असा भाव. तीचे; वृत्तसुखास्तव 'ती' दीर्घ घातली आहे. 'ती' ऱ्हस्व घातल्यास 'उपजाति' वृत्त होईल. श्लोक ३. लाविं कांसे; कांसेला लाव; ज्ञानरूपी दुग्धाचें प्राशन करीव. चरण ४–तुझा आधार घेऊन तुझ्या मागोमाग येऊन ज्ञान साध्य करून घेईन. श्लोक ४. अर्थ–ज्या आत्मज्ञानाचा मार्ग वाचेला सांगवत नाहीं, ज्याचा विचार करतांना मनाची गति खुंटते, जें ज्ञान झाल्याशिवाय द्वैतभाव नाहींसा होत नाहीं, अशा ज्ञानाची किल्ली तुमच्या

जवळ आहे. **किली** (सं.'कील') वृत्तसुखास्तव 'ली' द्वित्त घातली नाहीं; किल्ली. श्लोक ५. **मायापट**; परमेश्वराच्या मायेचा पडदा. **चरण** २; 'पूत्ति' हा शब्द 'मूर्ति' असा असावा. **आडलावी**; आढळावी. ती मूर्ति मला कशी आढळेल ? तिचें दर्शन कसें घडेल ? **भवार्णवीं**; संसारसमुद्रांत. **ज्ञानसरोज**; ज्ञानरूपी कमल. **श्लोक ६. कामानळें**; कामरूपी अग्नीनें. **चरण ४**. 'ये रहाळें' म्हणजे या कामानळाच्या सतत क्रमानें मला तुझी ओळख होत नाहीं. **श्लोक ७. हे बुद्धि**; विषयांकडे धाव घेणारी माझी बुद्धि; देहबुद्धि. **चुकावी** (चरण १) प्रयोजकभेदी क्रियापद. माझ्याकडून चूक करविते; माझें मन विषयांकडे लावून मला आडमार्गाला लावते. **चुकावी** (चरण २); मूलभेदी क्रियापद; चुकतों. **भरलों अव्हाटे**; आडमार्गाला लागलों. **श्लोक ८. अससील**; आहेस; भविष्यकाळाचा वर्तमानकाळीं उपयोग. **हें पांगुळें**; हा दीनदुबळा. नपुंसकलिंगीरूप दुर्बलता दाखवून मनांत दया उत्पन्न करितें. **पोटीं वागविणें**; एखाद्याला सतत आपल्याबरोबर वागवून त्याची काळजी वाहणें. **द्रौपदीचा साहकारी**; वस्त्रहरणादि अनेक प्रसंगीं भगवान् श्रीकृष्णांनीं द्रौपदीची लाज राखल्याचें वर्णन भारतांत अनेकदां आलेलें आहे.

**पृष्ठ २. श्लोक ९. तां**; त्वां, तूं. 'तां' हें द्वितीय पुरुषी सर्वनाम सामराजानें अनेकदां वापरलें आहे. **धुरूचा**; ध्रुवाचा. ध्रुव हा उत्तानपाद राजाचा मुलगा. हा बालवयांत प्रेमानें आपल्या वडिलांच्या मांडीवर बसला असतां त्याची सावत्र आई सुरुचि इनें त्याला लत्ताप्रहार करून राजापासून दूर केलें व त्याला दुरुत्तरें बोलली. यामुळें फार वाईट वाटून तो अरण्यांत परमेश्वरास भेटण्यास गेला. श्रीविष्णूनीं त्याला त्याची अढळ भक्ति पाहून दर्शन दिलें, व आकाशांत अढळपद दिलें. हाच आपल्याला दिसणारा ध्रुवाचा तारा होय. **चरण २—गुरूचा**, सांदीपनीचा. सांदीपनी हा कृष्ण व बलराम यांचा गुरु. याच्या मुलाला पंचजन नांवाच्या राक्षसानें समुद्रांत कोंडून ठेविलें होतें. तो आपल्याला परत मिळवून द्यावा ही गुरुदक्षिणा सांदीपनीनें कृष्णाजवळ मागितल्यावरून कृष्णानें त्या राक्षसाचा वध करून गुरुपुत्राची मुक्तता केली, अशी विष्णुपुराणांत कथा आहे. **चरण ३—गजेंद्र**. हाहा आणि हूहू हे दोन गंधर्व देवल ऋषीच्या शापामुळें अनुक्रमें एक त्रिकूट पर्वतावर गज व दुसरा सरोवरांत नक्र असे झाले होते. गजेंद्र

तृषार्त होऊन सरोवरावर पाणी पिण्याकरितां आला असतां त्याला नक्रानें पाण्यांत ओढलें. त्यावेळीं गजेंद्राच्या धाव्यानें प्रसन्न होऊन श्रीकृष्णानें त्याची सुटका केली, अशी कथा आहे. **उपेंद्र**; विष्णु; इंद्राचा धाकटा भाऊ. **श्लोक १०. कृपासागर**; दयेचा समुद्र. **दुरदृष्ट**; अदृष्ट, दैव. **श्लोक १२. चरण ३।४**—तूं मला संसाराच्या बेडींतून मुक्त तरी कर, किंवा दीनांचें रक्षण करण्याची प्रतिज्ञा तरी सोडून दे. **श्लोक १३. असेत**; असती, आहेत. 'स्फुरेत' 'करेत' वगैरे तृतीय पुरुषीं वर्तमानकाळाचीं अनेकवचनीं रूपें या कवींत अनेकदां आलेलीं आहेत. **वोंटी पसरणें**; पदर पसरून याचना करणें. **मागें**, मी मागतों. या क्रियापदाचें कर्म अध्याहृत घ्यावें. 'क्षमा मागें'. **वेडीं**; 'पांगुळें' (श्लोक. ८) वरील टीप पहा. **तूझे**; तुझे. 'तु' ऱ्हस्व असूनही चाललें असतें. इंद्रवज्राच्या ऐवजीं उपेंद्रवज्रा चरण झाला असता येवढेंच. पण तेवढ्यानें हा ऱ्हस्वदीर्घाचा दोष टळला असता. अशा प्रकारचे ऱ्हस्व दीर्घाचे दोष या काव्यांत अनेक आहेत. या श्लोकाच्या शेवटच्या दोन चरणांत 'प्रश्नालंकार' आहे. बोलणारा जेव्हां अशा रीतीनें प्रश्न करितो कीं त्याचें उत्तर काय येणार हें उघड ठाऊक असतें किंवा तेंच उत्तर दिल्याशिवाय गत्यंतर नसतें, तेव्हां त्या ठिकाणीं 'प्रश्नालंकार होतो. **श्लोक १४. अजामिळ**; हा कनोज, प्राचीन 'कान्यकुब्ज,' देशांतील एक विद्वान् अग्निहोत्री ब्राह्मण. याचें एका शूद्रस्त्रीवर प्रेम बसून तिच्यापासून याला दहा मुलें झालीं. शेवटचा मुलगा 'नारायण' या नांवाचा होता. त्यानें त्याला अंतकालसमयीं पुत्रस्नेहानें 'नारायण' म्हणून सहज हांक मारिली. पुत्राच्या निमित्तानें कां होईना, पण अंतकालीं त्याच्या मुखांतून परमेश्वराचें नांव आलें म्हणून विष्णुदूत त्यांस वैकुंठास नेण्यास आले. इकडे हा महापातकी म्हणून यमदूत त्याला अगोदरच घेऊन चालले होते; पण विष्णुदूतांनीं त्याला सोडविलें. यानंतर अजामिळाला पश्चात्ताप होऊन, त्यानें आपलें अवशिष्ट आयुष्य गंगातीरीं भगवच्चिंतनांत घालविलें, व शेवटीं उत्तम लोकाची प्राप्ति करून घेतली. **पावन करणें**; पापमुक्त करणें. **व्याध**; ही कथा 'शिवलीलामृतांत' आहे. एक गरीब व्याध रानांत बेलाच्या झाडावर सावजाची पाळत राखण्याकरितां बसला असतां, त्या झाडाचीं पानें त्याच्या दृष्टीआड येऊं लागलीं. त्यानें तीं तोडून खालीं

टाकिलीं व त्या वृक्षाखालींच शिवलिंग असल्यामुळें त्यावर तीं पडलीं. तेवढ्यानें भोळा सांब प्रसन्न होऊन व्याधाचा उद्धार झाला. **गणिका**; पिंगला. ही मिथिला नगरींत राहणारी एक वेश्या होती. हिला कांहीं कारणानें एके दिवशीं विरक्ति उत्पन्न झाली, व तेव्हांपासून ती परमात्मा परमेश्वरच आपला पति असें समजून राहिली. तिनें आपला निंद्य व्यवहार सोडून दिला व ती आत्मरूपीं रममाण झाली. **श्लोक १५. खरदूषण**; खर हा रावणाचा सावत्र भाऊ व दूषण हा रावणाचा सेनापति. या दोन्ही दैत्यांना रामानें ठार मारिलें. **बिभीषण**. रावणाचा भाऊ. **चरण ३, ४**—यांतील दोन्ही कथा महाभारतांतील आहेत. १ अर्जुनाचें सारथ्य करीत असतां श्रीकृष्णाला आपल्या भक्ताचे घोडे धुवावे लागत. २ श्रीकृष्ण द्रौपदीच्या धाव्याला धांवल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. **श्लोक १६. चरण १.** अन्वय; अजामिळ इत्यादिक अनेक उद्धरीसी. **अंतरेति**; अंतरतात, तुझ्या चरणकमलांस मुकतात. **श्लोक १७. आयुःपयाचा**; आयुष्यरूपी दुधाचा. **काळबिडाल**; काळरूपी बिडाल म्हणजे मांजर. चरण १ व २ यामध्यें 'रूपकालंकार' फार सुंदर साधला आहे. उपमेय व उपमान यांच्यामध्यें अभेद आहे असें मानून वर्णन केलेलें असतें तेव्हां 'रूपक' होतें. **त्वद्योग**; तुझा योग. तुझ्याभेटीचा योग. **या समयांत**; या वेळीं, या समयाला. **श्लोक १९. मोहजाळीं**; मायेच्या योगानें संसारांत उत्पन्न होणाऱ्या मोहाच्या जाळ्यांत. **चरण २**—सकाम कर्में हातून घडत असल्यामुळें मला तीं जन्ममरणापासून मुक्त होऊं देत नाहींत; त्यांच्यामुळें मी संसाराशीं अधिक अधिक निगडित होतों. **वासनाबंध**; वासनेचा बंध. निष्काम कर्म घडत नाहीं हा अभिप्राय. **जन्मावळी**; (जन्म+आवळी. आवली=पंक्ती.) नानाप्रकारच्या जन्मांचा फेरा. **चरण**; जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होत नाहीं हा भाव. **श्लोक २०. वोढी** ( चरण १ ) ओढणें, पार पाडणें. **वोढी** (चरण २); ओढ. समुद्राप्रमाणें संसाराला ओढ असते; त्यांत वारंवार संकटें उत्पन्न होतात, व तो तरून जाण्यास कठीण पडते. **श्लोक २१. येथें**; यासंसारांत. **महार्घ**; महाग, दुष्प्राप्य. **परमार्थ**; ब्रह्मज्ञान, आत्मज्ञान. **चरण ३ व ४**—संसारांत विषयसुखांत मन गुंतून गेल्यामुळें आत्मज्ञान पारखें होतें व विचार नाहींसा

होतो. चरण ४ मध्यें 'पर्यायोक्त' अलंकार आहे. उजू व सरळ वर्णन न करितां तीच गोष्ट पर्यायानें सांगतात. तेथें 'पर्यायोक्त' अलंकार होतो. श्लोक. २२. चरण ४–१ 'भोगे' या शब्दांत 'गे' वर अनुस्वार असतां तर 'भोग भोगीत असतां किंवा विषयोपभोगांनीं माझ्या ठिकाणीं वैराग्य कसें उत्पन्न होणार ?' असा अर्थ होईल. हा अर्थ चांगला आहे. २ भोगे; भोगी. वैराग्य मला कसें भोगील; म्ह. माझ्यामध्यें वैराग्य कसें उत्पन्न होईल ?

पृष्ठ ३. श्लोक.२३.या श्लोकांत 'तृष्णा' किंवा 'वासना' यावर पिशाचीचा आरोप करून फार सुंदर रूपक साधलें आहे. तृष्णापिशाची; वासनारूपी डाकिनी. वाढें; प्रबल होते. चरण ४. वासनाडाकिनीनें सर्व विश्व व्यापून टाकिलें आहे. श्लोक २४. पदानुसंधान; तुझ्या पदकमलावरचें लक्ष. सजेना; जमेना. चरण ३ व ४–प्रपंचरूपी सर्प निवृत्तीला दंश करीत असतां ती मला कशी पचणार ? प्रपंचांत माझें मन सतत गुंतून राहिल्यामुळें त्या ठिकाणीं वैराग्याचें बीं रुजत नाहीं हा भाव. चवथ्या चरणांत 'रूपक' अलंकार आहे. श्लोक २५. क्रोधचांडाळ; क्रोध हाच कोणी चांडाळ. चरण १ व २–रूपकालंकार. श्लोक २६. स्थावर-जंगमाचा, चराचर जगताचा. भुजंगमाचा; (१) महासर्प जो शेष त्याचा. याच्यावर श्रीविष्णु शयन करितात. (२) कालियामर्दनाच्या कथेचाही उल्लेख असेल. यमुनेच्या डोहांत कालिया नांवाचा एक विषारी महासर्प रहात असे. त्याच्यापासून व्रजवासी गोपांना फार त्रास होई. त्याचा भगवान् श्रीकृष्णानीं पराजय केला अशी कथा आहे. श्लोक २७. चरितें विचित्रें; जुन्या मराठींत नामाच्या वचनाप्रमाणें विशेषणाचें रूप बदलतें; हल्लींच्या मराठींत बदलत नाहीं. हल्लीं आपण "विचित्र चरितें" असेंच म्हणूं. ईला न वसे रिकामें, इला, जिभेला, स्वस्थ बसवत नाहीं. 'वसे' हें रूप मूलभेदी असतांना त्याचा शक्यभेदासारखा उपयोग केला आहे. वसे; बसवते. श्लोक २८. परापवादें; दुसऱ्याच्या निंदेनें. महानृतनें; अत्यंत असत्य भाषणानें. श्लोक २९. चरण १–तुझ्या स्वरूपाचें यथार्थ आकलन न झाल्यामुळें सर्व शास्त्रें मौन धारण करतात. शुक; भगवान् व्यासांना घृताची अप्सरेपासून झालेला मुलगा. हा मुलगा उपजत ज्ञानी असून महानिग्रही व योगी होता. याच्या योगसाधनानें

इंद्रास भय वाटून त्यानें रंभा नांवाच्या अप्सरेला त्याला योगभ्रष्ट करण्याकरितां पाठविलें, पण तिला निराश होऊन परत यावें लागलें. **चरण २**–शुकादिकांसारख्या महाज्ञान्यांना सुद्धां तुझ्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान होत नाहीं. **श्लोक ३०. कथा बांधणें**; पद्यमय रचनेंत चरित्र किंवा कथा लिहिणें. **ईस**; या कथेच्या रचनेला. **श्लोक ३१. जे**; जी रुक्मिणीस्वयंवराची कथा. **विस्तारिली**; विस्तार करून लिहिली. **पुरुषीं पुराणीं**; प्राचीन कवींनीं. **श्लोक ३२. त्वद्वर्णनीं**; तुझें वर्णन करीत असतां. **विवेकवीचि**; विचारतरंग. **वंचलासे**; वंचिला जातो, फसतो. **श्लोक ३४. निरंजन**, निर्विकल्प, शुद्ध असा परमेश्वर. **श्लोक ३५. बालाबगला**; लहानसहान देवता विशेष. **श्लोक ३६. भीमकी**, भीमक राजाची कन्या रुक्मिणी. **नव्हसीन** होसी, **वर पंगतीचा**; चरण ३–वरकांती वरपांगी. **वरपंगतीचा** (चरण ४); वराच्या पंक्तीचा.

**पृष्ठ ४. श्लोक ३७. निजसोयरा** आपला नातेवाईक, प्रेमळ मित्र. **अवतारधारी**; अवतार धारण करणारें. **हें ब्रह्म**; परमात्मा परमेश्वर, श्रीहरि. **श्लोक ३९. परीक्षिती**; अभिमन्यूचा मुलगा व अर्जुनाचा नातू. **सुधांशु**; चंद्र. **चरण २**–ज्याची कीर्ति चंद्राच्या कीर्तीस कसोटीला लावण्यासारखी होती; चंद्राच्या कीर्तीची परीक्षा करण्यासारखी होती. सारांश तो चंद्रापेक्षां कीर्तिमान् होता. **शुक**; यानें परीक्षितीला भागवत सांगितलें. **श्लोक ४०. द्वैपायन**; व्यासाचा मुलगा. 'द्वैपायन हें वास्तविक व्यासाचें नांव असून तें शुकाला उद्देशून योजिलें आहे. **योगिवर**; योग्यांमध्यें श्रेष्ठ. **द्विजेंद्र**; ब्राह्मणश्रेष्ठ. **सर्वकथासमुद्र**; सर्व कथांचा सागर, ज्याला सर्व कथा माहीत आहेत असा. **मनोविकार**, कामक्रोधादि मनाचे सहा विकार. **श्लोक ४१. कथारस**; भगवत्कथारूपी अमृत. गोरसादिकांनीं मन विटतें, पण कथामृतानें मन केव्हांही विटत नाहीं. **चरण ४**–ही कथा ऐकून आपलें शंकासमाधान कां करून घेऊं नये. पुढील श्लोकांत शंका निवेदन केल्या आहेत. **श्लोक ४२. देववर**; देवश्रेष्ठ श्रीकृष्ण. **वरोरु**; सुंदर स्त्री. **द्वारवती**, द्वारावती, द्वारका. **चरण ३–सावरीतें**; 'सावरी तें' अशीं निरनिराळीं पदें पाहिजेत. **अर्थ**:—('तें' या ठिकाणीं मुळांत अनुस्वार आहे तो नको. 'तें'=ती रुक्मिणी.) श्रीकृष्णानें जें साहस केलें तें त्यानें कसें

सावरलें; म्हणजे त्यांतून तो कसा पार पडला ? श्लोक ४३. मागध; मगध देशांतील. शाल्व; शाल्व देशांतील. राक्षसाचा विधि; याला 'राक्षस' किंवा 'राक्षस विवाह' असें म्हणतात. विवाहाच्या आठ प्रकारांपैकीं हा एक होय. यांत नवऱ्या मुलीच्या नातेवाईकांशीं युद्ध करून वर तिचें बलजबरीनें हरण करून तिच्याशीं लग्न लावतो. श्लोक ४४. चरण १—गर्भांत असतांनाच आत्मज्ञान झाल्यामुळें जो जन्मापासूनच योगी झाला होता. जन्मसुख; नरदेह प्राप्त झाल्यामुळें तद्वारें मिळणारें विषयांचें सुख. चरण ३—जो वस्त्रांस कधींही न शिवतां नेहमीं दिगंबरवृत्तीनें रहात असे. श्लोक ४५. तो विप्र; वरच्या श्लोकांत वर्णिलेला द्विजश्रेष्ठ शुक. रक्षितीसी; रक्षील अशी, रक्षण करणारी. श्लोक ४६. साहित्यस्वारस्य; साहित्यशास्त्रांतील मर्म किंवा उत्तम भाग. साहित्य; साहित्यशास्त्र. या शास्त्रांत काव्य, काव्यगुणदोष, रस, अलंकार इत्यादिकांचें विवेचन होतें. चरण १—ही कथा वर्णन करण्यांत सर्व साहित्यशास्त्रांतील सार खर्चीं पडलें आहे. वेंच (चरण) १; खर्च होई.(चरण) २ निवडक भाग, उतारे.रसाला;रसाळ, सुरस. श्लोक ४७. वोघ; ओघ, प्रवाह. चरण १ व २ अर्थः—ज्या कृष्णकथेचा असा गंगेसारखा प्रवाह चालला आहे त्या ठिकाणीं 'ही काय म्हणजे हें सर्व शरीर कसें वाहून जाणार नाहीं ? याला उत्तम गति कशी मिळणार नाहीं ? सावधानें; सावधान, जागृत. विशेष्याच्या वचनाप्रमाणें विशेषणाचें रूप. हरिसंन्निधानें; हरिसंन्निध. मनांत हरीचें सांनिध्य ठेवून भक्तियुक्त अंतःकरणानें. श्लोक ४८. विराटरूपी; विराटाचें स्वरूप धारण केलेला. चराचर; जंगम व स्थावर. देवईला; देवकीला. प्राकृत भाषेंत क्, ग्, च्, ज्, त्, द्, प्, य्, व् हीं व्यंजनें शब्दाच्या मध्यें आलीं असतां प्रायः त्याचा लोप होतो. जसें:—नकुल=णउल, सागर=साअरो. याच नियमानें जुन्या मराठींत 'देवई' असें रूप झालें. श्लोक ४९. चैतन्यपणें; ब्रह्मस्वरूपानें. देवकीचा; देवकीच्या. जुनें षष्ठीचें रूप. श्लोक ५०. व्यक्तदशा; दृश्य साकाररूपाची अवस्था. चरण १—निराकार अदृश्य अशा परमात्म्यानें सगुण साकाररूप धारण केलें. कारागृह; तुरुंग. श्रीकृष्ण परमात्म्यानें देवकीच्या उदरीं कारागृहांत जन्म घेतला या कथेला उद्देशून लिहिलें आहे. अवतीर्ण झालें; अवतार घेतला.

पृष्ठ ५. श्लोक ५१. कवाड; (सं.) कपाट, दरवाजा. आगळा (चरण २); (सं.) अर्गला, अडसर. श्लोक ५२. मावशी; पूतनाराक्षसी. कंसाची अनुचर राक्षसी. एका तरुण स्त्रीचें रूप धारण करून ती नंदाच्या घरांत गेली व कृष्णाला मांडीवर घेऊन पाजूं लागली. स्तनांत दुधाच्या ऐवजीं विष होतें हें जाणून कृष्णानें विष प्राशन करून त्याबरोबर तिच्या प्राणांचेंही आकर्षण केलें, अशी कथा आहे. मावसी; (चरण २); माया असावी अशी, कपटी. गाडा; कंसानें पाठविलेल्या शकटासुर नांवाच्या राक्षसानें गाड्याचें रूप घेतलें होतें. त्याचा गोकुळांत कृष्णानें चुराडा करून त्या राक्षसाला ठार केलें. या कथेला उल्लेखून लिहिलें आहे. श्लोक ५३. करीं करी; हातांत घेई. सिंपी; दूध पाजण्याचा शिंपला, बोंडलें. श्लोक ५४. भूतसृष्टि; उत्पन्न झालेलें अखिल चराचर जग. पूतनास्तन्यविष; पूतनेच्या स्तनांतील विष. (श्लोक ५२ पहा.) बहु फार दृष्टी; या ठिकाणीं 'बहु' व 'फार' या शब्दांनीं विनाकारण द्विरुक्ति झाली आहे. श्लोक ५५. वृत्त शिखरिणी. श्वशुरसदनीं; सासऱ्याच्या घरीं, समुद्रांत. (समुद्रमंथनसमयीं निघालेल्या चवदा रत्नांत विष्णुपत्नी लक्ष्मी ही होती, म्हणून समुद्र हा सासरा होतो.) योगींद्र; योग्यांमध्यें श्रेष्ठ, उत्तम प्रकारचा योगी. ('इंद्र' शब्द 'उत्तम' 'श्रेष्ठ' अशा अर्थीं वापरतात. जसें—नरेंद्र, गजेंद्र वगैरे.) पयःपानीं; दूध पाजण्याचें वेळीं. करयुगुलतल्प; (कर+युगल+तल्प); दोन हाताच्या अंथरुणावर. श्लोक ५६. प्राग्जन्मीं; पूर्वजन्मीं. नंदगृहिणी; नंदस्त्री यशोदा. श्लोक ५७. घनरुचिर; १ अतिशय सुंदर. २ मेघासारखी कांति आहे ज्याची असें. निजच्छंदें; स्वेच्छेनें. चरण ४—श्रीकृष्णाला उखळाला बांधून यशोदा घरांत गेली, इतक्यांत कृष्ण उखळ ओढीत ओढीत जवळच असलेल्या अर्जुन-वृक्षाकडे गेला. त्यांना त्याचा स्पर्श होतांच ते उन्मळून पडले. नारदमुनींच्या शापानें वृक्षरूप झालेल्या कुबेरपुत्रांचा अशा रीतीनें उद्धार झाला. श्लोक ५८. यदुदरदरीमाजि; ज्याच्या पोटाच्या आंतील (विशाल) भागांत. चरण २—त्या ब्रह्मस्वरूपाचें वर्णन वेदांना सुद्धां करवत नाहीं. व्रजकुळीं; गोकुळांत. श्लोक ५९. चरण १—अर्थः—निर्गुण निराकार परमात्मा असून त्यानें सगुण लीला धारण केल्या असा अर्थ. प्रत्यह; दररोज. माती (चरण ३); मावती. श्लोक ६०. मनोदयें; स्वेच्छेनें. घोंग; आरडाओरड (घोंगावणें).

पृष्ठ ६. श्लोक ६३. गोंविला; गुरफटला गेला. (कर्मणि प्र.) मुखांबुजीं (मुख+अंबुज); मुखकमलांत. श्लोक ६४. वृशभास दोहे; (मराठींत ज्या जनावराची धार काढावयाची त्याची षष्ठि विभक्ति घालतात. जसें:—कृष्ण-माता यशोदा गाईची धार काढीत होती.' संस्कृतांत द्वितीया घालतात. जसें:—'राजन् दुधुक्षसि यदि क्षितिधेनुमेताम्' 'वृशभास दोहे' या ठिकाणीं संस्कृतच्या धर्तीवर द्वितीया योजिली आहे.) श्लोक ६५. चरण ३, ४—आपण मोठा लबाड व कपटी असूनही आपणांवर आळ येऊं देत नाहीं. आल; कपटजाल. श्लोक ६७. लगोऱ्या; एक प्रकारचा चेंडूचा खेळ. श्लोक ६८. यमुनाकदंबी; यमुनेच्या तीरावरील कळंबाच्या वृक्षावर. ललनानितंबीं; स्त्रियांच्या नितंबभागावर, ढुंगणावर. श्लोक ६९. भेणें; भयानें. श्लोक ७०. चरण ३ व ४—यांत 'अरिष्टें' या एकाच शब्दानें यमक साधलें आहे तें सदोष आहे. एकच शब्द भिन्नार्थीं योजून यमक साधल्यास तें युक्त असतें. श्लोक ७१. वृत्त—स्वागता. श्लोक ७२. गोरसमोटा; दहींदुधाच्या मोटा. श्लोक ७३. या श्लोकांत दोन वृत्तांची भेसळ झाली आहे. येथें मधील चरण गळले असावे असें दिसतें. मूळ प्रत सांपडत नाहीं. श्लोक ७४. वावह्यावा; पळून जावा.

पृष्ठ ७. श्लोक ७५. मायार्गल (माया+अर्गल); मायेची शृंखला; मायेचें, अज्ञानाचें पटल. श्लोक ७६. अघासुर, बंक, वत्सासुर, धेनुक (धेनुकासुर); कंसानें श्रीकृष्णास ठार मारण्याकरितां पाठविलेले राक्षस. या सर्वांना कृष्णानें ठार केलें. श्लोक ७७. तृण; तृणासुर, कृष्णानें ठार केलेला एक राक्षस. श्लोक ७८. श्यामलरूपधारी; श्यामरूप, सांवळें रूप धारण करणारा. सवेत्रवंशीकर; हातांत काठी व वेणु असलेला. श्लोक ७९. (कृत्यस्त्य?). श्लोक ८०. चरण १ अर्थ:—श्रीकृष्ण परमात्मा वास्तविक खाण्यापिण्याविषयीं उदास असतांना आपल्याबरोबर ईशदोरी बाळगीत असे. कंस; हा कृष्णमाता देवकी इचा भाऊ व कृष्णाचा मामा. श्लोक ८१. कुब्जा; कंसाची दासी. ही तीन ठिकाणीं वांकडी असतांना सुद्धां तिनें कंसाकरितां नेत असलेल्या चंदनादि अनुलेपनांपैकीं थोडेंसें कृष्णास दिल्यावरून त्याला फार प्रिय झाली. चरण ४—कंससभे-मध्यें कृष्ण व बलराम मल्लयुद्धाचे प्रसंगीं जात असतां दरवाजावर कुवलया-

पीड नांवाचा गज आडवा आला, त्याला कृष्णानें ठार केलें. **श्लोक ८२. चाणूर;** हा कंसाच्या दरबारांतील एक मल्ल होता. याला मल्लयुद्धांत कृष्णानें ठार केलें. **श्लोक ८३. मायबापें;** देवकी व वसुदेव. **श्लोक ८४.** या श्लोकांत ६ चरण आहेत. पहिले दोन चरण दुसऱ्या श्लोकाचे असावेत. पण त्याचे दुसरे चरण माहीत नाहींत. (श्लोक ७३ टीप पहा.) **व्यापार;** कृष्णावतारांतील कृत्यें. **चरण ५, ६—अर्थः**—ज्या परमात्म्याकरितां ती मत्स्यावतारीं मच्छीसुद्धां झाली, त्याच्या आतांच्या मानवी कृष्णावतारांत त्याच्याशीं सहवास घडण्याची तिला इच्छा कां होणार नाहीं ? **श्लोक ८५.** वृत्तः—शिखरिणी. **सकलजगदानंदजननी;** अखिल जगाला आनंद देणारी. **विसरति;** 'विरसति' ही छापण्याची चूक आहे.

## सर्ग दुसरा.

**पृष्ठ ८. श्लोक १.** वृत्त; इंद्रवज्रा. **श्रीकृष्णपादांबुजकामुकी;** श्रीकृष्णाच्या चरणकमलाची इच्छा असलेली. **लक्ष्मीपतीचें घर;** वैकुंठ. **श्लोक २. विदर्भदेशाधिप;** विदर्भदेशाचा (वऱ्हाड) राजा. **उदारधामा;** उदार आहे धाम म्हणजे तेज ज्याचें असा, तेजस्वी. **लोकपाल;** अष्टदिक्पाल. **श्लोक ३. चरण २**—तो राजा कराच्या रूपानें प्रजेचें हेम (सुवर्ण, द्रव्य) हरण करीत नसे. **चरण ३—प्रजा;** १ मुलें, अपत्यें २ प्रजाजन; ('प्रजाः प्रजाः स्वा इव तंत्रयित्वा. शाकुंतल, अंक. ५) **निजान्वयीं;** आपल्या वंशांत. **श्लोक ६. ऋणानुबंधें;** पूर्वजन्मींचा संबंध. **श्लोक ७. इष्टें;** (चरण १) हितावह गोष्टी; (चरण २) यज्ञयागादि कर्मे. **पूर्तें;** दानधर्माचीं कृत्यें. **इष्ट;** 'अग्निहोत्रं तपः सत्यं वेदानां चैव पालनम् । आतिथ्यं वैश्वदेवश्च इष्टमित्यभिधीयते ॥१॥ **पुर्त;** वापीकूपतडागादि देवतायतनानि च । अन्नप्रदानमारामः पूर्तमित्यभिधीयते ॥ २ ॥—मनुस्मृति. **श्लोक १२. चरण ४**—दृष्टांत अलंकार. (एकादी गोष्ट मनांत चांगली ठसावी म्हणून तशाच प्रकारचें दुसऱ्या एकाद्या गोष्टीचें उदाहरण घेतलें म्हणजे त्या ठिकाणीं 'दृष्टांत' अलंकार होतो.) **श्लोक १३. नव;** नच. **संबंध पाडणें;** संबंध ठेवणें.

**पृष्ठ ९. श्लोक १४. ऊर पिकविणें;** अतिशय त्रास देणें छळणें. **चिंतावली;** 'चिंतावणें' हें चिंता या नामापासून क्रियापद. चिंता उत्पन्न

होणें. **श्लोक १७. देवी;** राणी, रुक्मिणीची आई. **श्लोक १९. कमलनिळये;** हे कमलांच्या ठायीं वास करणारे लक्ष्मी. **स्वसा तूं धेनूची;** समुद्रमंथनसमयीं जीं चवदा रत्नें बाहेर पडलीं त्यांत धेनु व लक्ष्मी हीं होतीं; यास्तव लक्ष्मी धेनूची बहीण असें म्हटलें आहे. **सिंधुदुहिता;** समुद्रकन्या. **चरण ४**—हे माते, मी गरीब बिचारी तुझी शक्ति, थोरवी, काय ओळखणार ? **श्लोक २०. नवांभोधीमध्यें;** मुळांत 'नवांभोधी' असेंच आहे; पण 'भवांभोधीमध्यें' असें पाहिजे. **भवांभोधि;** संसारसमुद्र. **जननिवार्णलहरी;** लोकांची सुटका करणारी किंवा लोकांस तारणारी लाट. पहिल्या चरणांत 'रूपक' अलंकार आहे. **चरण ३**—माझ्या हातून अनीतीचीं अशीं महापापें घडत नाहींत काय ? घडतात असा भावार्थ. **अभयें;** अभयकारक आशीर्वाद., **श्लोक २१. परब्रह्मच्छाये;** परमात्म्याला सावलीप्रमाणें अनुसरणारी; परमात्म्याची सहचारिणी. **कपटवनिता;** मायावी स्त्री; आदिशक्ति माया. **चरण १ व २**—अर्थः—तूं जरी मला प्रपंचामध्यें साकार दिसतेस तरी तूं विष्णुपत्नी कमला आदिशक्ति महामाया आहेस. **कटाक्षप्रक्षेपें;** कृपादृष्टीनें. **रत्नाकरसुते;** समुद्रकन्ये लाक्ष्मी. **श्लोक २२. निर्वाहें;** कार्यक्षमता दाखवून. ( निर्वाह; कार्यक्षमता ). **चरण १**—तुझें भजन करणें हें माझें कर्तव्य; पण तें पार पाडण्याचें सामर्थ्य माझें अंगीं नाहीं. **चरण ३, ४;** तुला बालकें पुष्कळ आहेत, पण मला मात्र तुझ्यावांचून माता नाहीं हा भाव.

**पृष्ठ १०. श्लोक २३. प्रसंगें;** प्रसंगोपात्त; माझ्यावर हा प्रसंग आल्यानें. **मनोवाक्कायें;** मनानें, वाचेनें व शरीरानें. **प्रतिपद;** प्रत्येक पावलाला, प्रत्येक क्षणीं. **श्लोक २६. नंतरें;** नंतर. ( वृत्तसुखास्तव 'रें' ). **चरण २**—अन्वय; 'तें शीतल तेज ते ( ती ) कां न साहे ?' **श्लोक २७. गर्भछाया;** गर्भावस्थेमुळें मुखावर येणारी टवटवी. **आदिमाया;** लक्ष्मी. **कुचचूचुकांला;** स्तनाग्रांना. **श्लोक २७. वृत्त;** मालिनी. **गजगति;** जिची गति ( चालणें ) गजासारखी आहे; मंदगामिनी. **त्रिवळी;** पोटावरील कातडीच्या तीन वळ्या. **श्लोक २९. जायिंहुनि, तयिंहुनि;** जेव्हांपासून, तेव्हांपासून. **श्लोक ३०. फिरावी;** फिरवी ( वृत्तसुखास्तव ).

श्लोक ३३. उच्छून; गर्भारपणामुळें उंचावलेल्या, पुढें आलेल्या. नीरीनिचय; निऱ्यांचा समुदाय, निऱ्या.

पृष्ठ ११. श्लोक ३४. चरण ३–मग ती डोहळ्यांला कां न पावे? तिचे डोहाळे कां पुरणार नाहींत? श्लोक ३५. निधान; गर्भरूपी निधि किंवा ठेवा. चरण ३–मुलगा व्हावा म्हणून औदुंबरी माळ म्ह० उंबराची माळ आठांगुळाचे वेळेस गळ्यांत घालतात. पण मुलगा होऊं नये अशी तिची इच्छा असल्यामुळें तिनें ती घातली नाहीं. श्लोक ३७. देवी; भीमकीची आई. रतीचें; रतिमात्र, तिळमात्र. श्लोक ३८. चरण ३, ४–ब्रह्मदेवानें सर्व सुंदर व रमणीय वस्तु ( उपमेस योग्य अशा वस्तु ) गोळा केल्या असाव्यात, व म्हणूनच त्याला ही सुंदर मूर्ति निर्माण करितां आली असावी. श्लोक ३९. आकारलें; आकाराला आलें. श्लोक ४१. वृत्त; शालिनी श्लोक ४२. वर्ग्य; बांधव, भाऊबंद. मतीचें; बुद्धिवान. श्लोक ४४. प्रत्यह; दररोज. श्लोक ४७. पुत्रें करिं; पुत्राच्या हातून.

पृष्ठ १२. श्लोक ४८. दारुणाची; दुष्ट भावाची, रुक्मीची. चरण ३–ब्रह्मदेवानें मनुष्य प्राण्यांत राहणारें प्रत्येक व्यंग तिच्यांतून नाहींसें केलें होतें. ती सर्वतोपरी अव्यंग होती हा भाव. श्लोक ४९. चरण २–रुक्मीच्या दुरुक्ती तिला शल्यासारख्या बोंचत. चरण ४–ती त्याला कधींही उलटून किंवा त्याच्या विरुद्ध बोलत नसे. श्लोक ५०. लेववीलीं; ( प्रयोजक ). चरण ४–तिला कानांत पानें ( एक प्रकारचा दागिना ) घालावयास लाविलीं. श्लोक ५२. वितळे; सुंदर दिसूं लागली. मदननृपति; कामदेव राजा. यौवराज्याधिकरी; शरीराचें तारुण्य हेंच राज्य, त्या राज्याचा स्वामी. राज्यावर जशी राजाची मालकी चालते, तशी मालकी मदनाची तिच्या तारुण्ययुक्त शरीरावर चालूं लागली. मदनाचा पूर्ण अंमल तिच्या शरीरावर बसला. तद्वाविभगा; 'तदवयव किंचित्' असें पाहिजे. चरण ३–तारुण्यावस्थेमुळें तिच्या अवयवांनीं आपला बालपणींचा भाव, स्थिति, टाकून दिली. हृदयदेश; स्तन. श्लोक ५३. चरण १–क्रमाक्रमानें हळुहळू तिचे अवयव अधिकाधिक गोरे दिसूं लागले. चरण २–मदनानें जणूं काय तरुणांना ठार करण्याकरितां ही एक राजकन्यारूपी सुरीच पाजळून ठेविली. चरण ३ व ४–अर्थः—हिच्या शरीरावर तारुण्य ओथंबूं

लागलें; बाल्यावस्थेनें इला इतक्यांतच कसें सोडलें ? पहिल्या चरणांत 'क्रमेंच' व 'उजळेंच' या ठिकाणीं 'च' ची विनाकारण द्विरुक्ति झाली असल्यामुळें दोष उत्पन्न होतो. 'उजळेंच' यापेक्षां 'उजळेत' असतें तर बरें होतें. **श्लोक ५४. माज;** ( सं. मध्य ) कंबर, कटि. **चरण २**—( नितंब वाढूं लागल्यामुळें ) तिचा कटिभाग बारिक होऊं लागला. बारिक कंबर हें स्त्रीसौंदर्याचें लक्षण मानतात.उदा. 'सिंहकटि'. **श्लोक५५.लीलारसें;** नानाप्रकारच्या क्रीडांत दंग होऊन. **चरण २, ३ व ४**—तिची मंदगती पाहून हंस तिच्या पाठोपाठ चालतात, आपल्या पंखांपेक्षां सुंदर केशकलाप पाहून मोरांनाही लाज वाटते, व चकोर तिच्या मुखाला पाहून हा चंद्रच आहे अशी भ्रांति उत्पन्न झाल्यामुळें चंद्रकिरणाच्या आशेनें तिच्या मुखाजवळ येतात. **श्लोक ५६. सुवर्णपूगीफलयुग्म;** सुवर्णाच्या सुपाऱ्यांची जोडी ( 'वक्षोरुहा'चें विशेषण ). **श्लोक ५८. केशवाचा गुण;** कृष्णाचें परमेश्वरत्व, ब्रह्म. **श्लोक ६०. मनोविपर्यास;** मनाची अदलाबदल. **चरण ४**—मदनानें मध्यस्थी सुरू केल्यामुळें त्यांच्या मनाची अदलाबदल झाली, म्ह० रुक्मिणीचें मन कृष्णाकडे गुंतलें, व कृष्णाचें मन रुक्मिणीनें चोरलें.

**पृष्ठ १३. श्लोक ६१. गुण–दूत;** गुण हेच दूत. **श्लोक ६२. शीकलावी;** शीक=शिकवण शिकवी. **श्लोक ६३. प्रकृतिस्वभावें;** स्वाभाविकपणें. **तदाकार;** ब्रह्मस्वरूप. **स्वदेहभाव;** स्वतांच्या शरीराच्या स्वभावाला किंवा देहधर्माला ती विसरून गेली. **श्लोक ६४. चरण १, २**—श्रीकृष्णाच्या चरणकमलीं मन अनुरक्त होऊन ठिकाणावर नसल्यामुळें मदनाला तिच्यावर आपले बाण फेकण्यास अवसर मिळाला. **श्लोक ६६. चरण ३**—द्वारकेच्या दिशेकडून वाहणारा वायू जर कृष्णाच्या अंगावरून येत असेल तर तोसुद्धां तिला प्रिय होता. **श्लोक ६७. तत्प्रापक;** श्रीकृष्णाची प्राप्ति करून देणारें. **श्लोक ६८. कृशतनु;** कृश आहे तनु म्ह० शरीर जीचें अशी 'तनु'. **श्लोक ६९. घोण घालणें;** कोणाशीं न बोलतां फुरंगटून बसणें. **कडमोड;** आंग मोडून येणें.

**पृष्ठ १४. श्लोक ७०. भारी;** जड. **कैटभारी;** कैटभ राक्षसाचा शत्रु, श्रीकृष्ण. **चरण ४**—उशाला आपला बाहू ( हात ) घेऊन निजली. **श्लोक ७२. सरीसृपी; (?). चरण १**—मदनबाधेनें मान निघून तिच्या गळ्याभोंवतीं

सरी नीट न बसल्यामुळें, ती अतिशय सैल झाली—असा भावार्थ असावा. **श्लोक ७४.** वियोग. **अपन्हव;** लपवणूक, लपविणें. **चरण** ३ व ४—तिला कृष्णवियोगानें इतकें दुःख सोसावें लागत होतें तरी ती तें बाहेर न दाखवितां लपवून ठेवीत असे. **श्लोक ७६. कुसुमशरचर;** ( मदनाच्या ) पुष्पांच्या बाणांच्या समूहानें. मदनाचे बाण फुलांचे आहेत असा कविसंकेत आहे, व म्हणूनच त्याला 'पुष्पधन्वा', 'कुसुमसायक' वगैरे नांवें आहेत. **शरतल्पीं;** बाणांच्या शय्येवर. तिची शय्या तिला बाणांसारखी दुःखप्रद होऊं लागली. **भगवंती थोर निर्वाह आहे;** भगवंतावर विश्वास असल्यामुळें तिच्या अंगीं वियोगजन्य दुःख सहन करण्याची शक्ति होती; **श्लोक ७८. गेहवापी;** घरांतील अंघोळीचा हौद; पुष्करणी. **अनियत;** भलत्या वेळीं, अनियमित वेळीं. **चरण** ३—डोक्यांत नीट चांगले अगवळ घालून केंस सुंदर न बांधतां कांहींतरी जाड्या भरड्या दोऱ्या ( नाडे ) घालून कसे तरी केंस बांधून फिरसी. **अनाडे;** हे अडाणी मुली. **श्लोक ७९. चरण** १—तुझी भूक, व तहान तुला नकळतच नाहींशी होतात; म्ह० तुला त्यांचें भानही रहात नाहीं. **आंगमोडे;** तापाची कणकण. **अकालीं;** भलत्याच वेळीं; वृद्धपणीं आचरण्याचा योग तूं तरुणपणींच कसा आचरतेंस? **निजध्यास;** चिंतन.

**पृष्ठ १५. श्लोक ८०. मनिसि;** मानिशी, मानतेस. **अन्नभूली;** अन्नद्वेष. **श्लोक ८१. चरण** ३ व ४.—तुझा यांच्याशींच काय तो परिचय आहे; तुझ्याकडे दुसऱ्या कोणत्या अपरिचिताची नजर जाणार. **श्लोक ८३. प्रतिगृहीं;** प्रत्येक घरांत, घरोघरीं. **श्लोक ८४. नवासिले;** नवस केले. ( नामापासून क्रियापदाचें रूप. ) **चरण** ४—इच्या प्रकृतीला गुण देऊन म्हणजे आराम पाहून माझे सर्व संकल्प ( नवस ) फेडून घ्यावे. **श्लोक ८६. लागि;** भूतबाधा. हिला पिशाचबाधा झाली कां पहा.

**पृष्ठ १६. श्लोक ८७. कितियक;** कितिएक. ( वृत्तसुखास्तव 'ए'च्याऐवजीं 'य' योजला आहे. अशा प्रकारचे दोष या काव्यांत पुष्कळ आहेत. ) **बोलती बोलणारी;** भुताची झाडणी करतांना त्याच्याशीं बोलणाऱ्या स्त्रिया तिला विचारूं लागल्या. **नारी;** हा शब्द लावण्यांत चांगला दिसतो. प्रस्तुत काव्यांत योग्य दिसत नाहीं. **श्लोक ८८. चरण १ व २**—या स्त्रियांचें शहाण-

पण राजकन्येपुढें फार तर एकादा क्षण टिके; म्हणजे तें मुळींच टिकत नसें. श्लोक ८९. **विभूति** रक्षा, राख. **चरण ३**–ऐश्वर्य. **चरण ४–ललाटीं विभूति करणें**; कपाळाला अंगारा लावणें. **श्लोक. ९० चरण ३**–आपल्या विविध ( हृदयंगम ) कृत्यांनीं श्रीकृष्ण हांसला, म्हणजे त्यानें तिचें मन मोहून टाकलें. **चित्तचैतन्य;** चित्त हेंच चैतन्य, किंवा प्राण, चित्तसर्वस्व. **श्लोक ९३. चरण ३**–सर्पीण चावल्यामुळें लहरी येत आहेत कीं काय ? **चरण ४**–पापिणीचा पदर लागला काय ? म्ह० पापिणीचा पदरसंपर्क झाल्यामुळे तुझी अशी अवस्था झाली काय ?

**पृष्ठ १७. श्लोक ९४. चरण २**–मनोरथ पूर्ण होण्याचा मार्ग दिसत नाहीं. **श्लोक ९६. निंदिति खंजनाला;** खंजनपक्ष्याला मागें टाकीत होते. **चरण ३ व ४**–अर्थ (?) **श्लोक ९७. चरण २**–वास्तविक पाहतां 'कोणा शरीरीला ( पुरुषाला ) हें लावण्य लाधेल' असें पाहिजे. **श्लोक ९८. त्रिवेणी;** 'त्रिवेणी' असें पाहिजे; गंगा, यमुना, सरस्वति यांच्या संगमामध्यें. तुझ्या प्राप्तीकरितां प्रवेश करून कोणी तपश्चर्या केली ? **पिलाकपाणी;** 'पिनाक पाणी' असें पाहिजे. 'पिनाक' हें शिव-धनुष्याचें नांव आहे. **हुताशनप्राशन;** अग्निकाष्ठभक्षण. **श्लोक ९९. चरण २**–ज्याची इच्छा परिपूर्ण झाली आहे. **खड्गधाराव्रत;** असिधाराव्रत-अतिशय प्रखर तपश्चर्या. **श्लोक १०१. शंबरारी;** शंबरासुराचा शत्रु, त्याला मारणारा, प्रद्युम्न ( मदन ). **श्लोक १०२. तटस्थ;** उदासीन वृत्तीनें; उदास मनानें. **श्लोक १०४. नियमितच;** खरोखर. **श्वास-निश्वास;** श्वासोच्छ्वास. ( मी तुझा बहिश्चर प्राणच आहे; मी तुला प्राणा-इतकी प्रिय आहे हा भाव ). **चरण ४**–तूंच माझा प्राण आहेस. **श्लोक १०५. हें स्त्रीजन्म;** 'जन्म' मराठींत पुल्लिंगी असतांही येथें संस्कृताप्रमाणें नपुसकलिंगी वापरला आहे.

**पृष्ठ १८. श्लोक १०७. चरण २**–त्याचा (प्रद्युम्नाचा) तात ( कृष्ण ) तुला कसा माहीत नाहीं. ( प्रद्युम्न हा कृष्ण व रुक्मिणी यांचा मुलगा. या ठिकाणीं लग्नाच्या पूर्वींच कृष्णाचा मुलगा असा उल्लेख व तो स्वतः रुक्मिणीनें केल्यानें अनुचित असा कालविपर्यास झाला आहे.) **श्लोक १०८. ईज लाहे बुजावी;** ('बुजणें' घाबरणें या क्रियापदापासून 'बुजावी'

हें नाम ) ही मुलगी घाबरून गेली. श्लोक ११०. वरविषयक; वरासंबंधीं. श्लोक १११. पदयुगुल; चरणद्वय. आदान आहे; स्वीकारावयाचें आहे. श्लोक ११२ विदर्भाधीश; विदर्भ देशाचा राजा. चरण २—माझें सर्व पुण्य आज चांगलें फळास आलें. अघटितघटणेनें; असंभाव्य किंवा विलक्षण तऱ्हेनें. उदेलें; उदय पावलें, भाग्योदय झाला.

पृष्ठ १९. श्लोक ११३. कर्णमूलास; कानीं. श्लोक ११४. चरण २—याचे दोष कोण नाहींसे करील. हुतवहवदनीं; अग्नीच्या ज्वालांत. चरण ४—उपमा अलंकार. श्लोक ११५. विचाराकारणें; विचार करण्याकरितां. श्लोक ११६. रुक्मीच्या मुखांतून निघालेली कृष्णनिंदा त्याच्या उत्तम प्रकारच्या किंवा परमेश्वरी गुणांमुळें अतिस्तुतिपरच झाली.

## सर्ग तिसरा.

पृष्ठ २०. श्लोक २. विचारल्यावीण; विचार केल्यावांचून. श्लोक. ३. चरण १ व २—हिमालयानें आपली कन्या पार्वती स्मशानवासी नरकपाल धारण करणाऱ्या शंकराला देण्याचा अविचार केला, त्याचें फळ तसेंच झालें. कपाळी; शंकर. नरकपाल ( कवटी ) धारण करणारा. श्लोक ४. चरण १—तूंही त्या हिमालयासारखाच वागत आहेस. श्लोक ६. गुणग्राहक रानटांचा; रानटी माणसांचे, गोवळ्यांचे, गुण घेणारा; त्यांची स्तुति करणारा. श्लोक ७. मातुल; मामा ( कंस ). मावशी; पूतना. श्लोक ८. वक्षस्थळ; छाती. चरण २—पूर्वीं एकदां सर्व ऋषीमंडळींत ब्रह्मा, विष्णु व महेष, यांत श्रेष्ठ कोण असा वाद पडल्यामुळें भृगु नांवाचा एक ब्राह्मण ऋषि या तिन्ही देवांची परीक्षा पहाण्यास निघाला. ब्रह्मदेव व शंकर यांच्याकडे जाऊन त्यांना वंदन वगैरे न करतां त्यांना त्यानें शिव्या देण्यास आरंभ केला, तेव्हां ते देव त्याच्यावर फार क्रुद्ध झाले. त्यांचा राग शांत करून तो विष्णूकडे गेला व ते शांतपणें निजले असतां त्यांच्या छातीवर त्यानें लत्ताप्रहार केला. परंतु ते त्याच्यावर न रागावतां उलट 'आपल्या पदकमलाला कांहीं इजा झाली नाहींना ?' म्हणून चौकशी करूं लागले. श्लोक ९. चरण १ व २—तुझी कन्या मोठी गुणाची आहे. ती सगुण असतां निर्गुण अशा कृष्णाची पत्नी कशी होईल. 'निर्गुण' या शब्दावर श्लेष

केला आहे. **निर्गुण**; ( १ ) चांगले गुण नसलेला; ( २ ) त्रिगुण बाह्य. **श्लोक १०. कारि**; मुलगी, कुंवरी, कुमारी. **हेरि जाली**; उत्तम राजकुमारी असून हेरि ( दूती ) झाली. **श्लोक ११. अकर्मी**; कुकर्म करणारा, दुराचारी. **चरण ४**,—मानवधर्म काय आहेत, मनुष्याची आवडनिवड काय असते इकडे त्यांचें लक्ष नसतें. अशा पतीच्या संगतींत रुक्मिणीला कोणतें सुख लागणार ? **श्लोक १२. वृंदावनभू विहारी**; सर्व एक समास पाहिजे. वृंदावनाच्या भूमीवर क्रीडा करणारा. **श्लोक १३. सबाह्य अभ्यंतर**; आंत बाहेर शरीरानें व मनानें. **चरण २**—केव्हांही बोलण्यांत बोल नाहीं. **पाटश्चरवृत्ति**; ( 'पाटच्चर' असा मूळ संस्कृत शब्द आहे, त्याचा अर्थ 'चोर' ) चोराची वृत्ति.

**पृष्ठ २१. श्लोक १४. चरण १**—हा टोणगे कसे वळावे येवढेंच जाणतो. **हुंबरी घालणें**; हुंबरी नांवाचा गोवळ्यांचा खेळ खेळणें. **चरण २**—अर्थ (?). **चरण ३**—हा हुंबरी खेळण्यांत मात्र पटाईत. **श्लोक १५. चरण १**—याला कधीं कुळगोताची जरूर लागली नाहीं. **कुत्सितनांदणूका**; कुवर्तन. **कामणूका**; करमणूक, खेळ. **श्लोक १९.** ह्या व पुढील तीन श्लोकांत कृष्णावतारापर्यंत झालेल्या परमेश्वराच्या आठ अवतारांचा उल्लेख आला आहे. **अमासा**; दुबळा ( ? ) **विरूपी**; कुरूप. **श्लोक २०. चरण १ व २**—वामन अवतारीं परमेश्वरानें बळीजवळ त्रिपाद भूमीची याचना केली अशी कथा आहे. **भार्गव**; भृगूचा ( जमदग्नीचा ) मुलगा परशुराम. **चरण ३**—जमदग्नीची पत्नी रेणुका इच्यावर तो एकदां कांहीं कारणानें फार क्रुद्ध झाला असतां त्यानें आपल्या मुलांस तिला ठार मारण्यास सांगितलें. चार मुलांनीं त्याची ती आज्ञा पाळली नाहीं, पण परशुरामानें आपल्या हातांतील परशूनें आईचा शिरच्छेद केला व बाप प्रसन्न झाल्यावर, ती पुन्हां सजीव व्हावी असा वर मागून त्यानें तिला सजीव केलें. **श्लोक २३. लहांसें** (?) **श्लोक २५. पुंसृष्टि**; पुरुषांची जात.

**पृष्ठ २२. श्लोक २८. विचारिलीं**; विचारांत घेतलीं; त्यांच्याविषयीं विचार केला. **श्लोक ३०. चरण ३**—लग्न लवकर उरकून घेण्याकरितां त्यानें जोशीबुवांकडून कसा तरी लग्नमुहूर्त काढविला. **श्लोक ३२. प्रसाद**; 'प्रासाद' असें पाहिजे. **श्लोक ३५. आंदणाचे**; आंदण देण्याचे. **चरण २**—जणूं काय काजळाचे पर्वतच (?) **श्लोक ३६. महासंच चरण २**—

मोठ्या पुठ्याचे किंवा बांध्याचे. **तख्तरावा;** बैलाच्या गाडीवर फळ्या टाकून त्यावर कलावंतिणीचा गांवांतून फिरता नाच करितात त्याला 'तख्त (क्त) रावा' असें म्हणतात.

**पृष्ठ २३. श्लोक ४१.** वृत्त स्रग्धरा. **भेद खंबायताचे;** नानाप्रकारचीं खंबायती लुगडीं. **श्लोक ४२. वृत्त;** शार्दूलविक्रीडित. **सत्कृष्णा गरुनिर्मिता,** हा सर्व एक समास पाहिजे, ( सत्+कृष्णागरु+निर्मिता ); चांगल्या प्रकारच्या कृष्णागरूच्या म्हणजे चंदनाच्या केलेल्या. **श्रीखंड खंडे;** ( एक शब्द पाहिजे ); चंदनाचे तुकडे. **श्लोक ४३. जडें;** रत्नखचित.

**पृष्ठ २४. श्लोक ४६. नर्द;** नरदा, सोंगट्या. **सांग;** अंगासहित; पेट व फासे या सुद्धां. **श्लोक ४८. वृत्त;** स्रग्धरा. **श्लोक ४९. सत्पाळ;** सत्फळ, डाळिंब, या अर्थी पहिल्याच ओळींत हा शब्द आला असल्यामुळें या फळाची द्विरुक्ति झाली आहे. **श्लोक ५०. वृत्त;** वसंततिलका. **श्लोक ५१. वृत्त;** द्रुतविलंवित. **चरण १-आयती;** श्रमावांचून: **चरण २**—काम, कष्ट, श्रम.

**पृष्ठ २५. श्लोक ५२. पेषण;** दळणें. ( प्रथम 'दळण' शब्द आला असून पुन्हां 'पेषण' शब्द आल्यानें एकाच क्रियेची पुनरुक्ति झाली आहे. श्लोक ४९. 'सत्पाळें' या शब्दावरील टीप पहा.) **श्लोक ५८. हृदयेश;** हृदयाचा ईश म्ह० स्वामी; पति. **श्लोक ५९. चित्त बसणें;** मन रमणें. **श्लोक ६०. चरण १;**—येणाऱ्या आपत्तीची ( शिशुपालाशीं होऊं घातलेल्या लग्नाची ) फार घाई होत होती. **मांयसीं;** मातेशीं.

**पृष्ठ २६. श्लोक ६२. हृदयकमलकोशीं;** हृदय कमलाच्या म्ह० हृदयाच्या आंत. **श्लोक ६५. नवकिसलयतल्पीं;** नूतन कोमल पल्लवाच्या बिछान्यावर. **चरण ४**—इतक्या यातना सोसून ती जणूं कांहीं मदनाचें ऋणच फेडीत होती. **श्लोक ६६. विंजणें जाणवीति;** पंख्यानीं वारा घालतात. **हृदयदेशीं;** हृदयाच्या भागावर.

**पृष्ठ २७. श्लोक ६८. 'तत्वी';** 'तन्वी' असें पाहिजे. **श्लोक ७०. मूर्च्छये लागिं जातां;** मूर्च्छा जात असतां, मूर्च्छा गेली तेव्हां. **चरण ४**—तिच्या मृदु भाषणाशीं अमृताची काय तुलना होणार? त्याच्यापुढें अमृतही फिकें पडेल. या ठिकाणीं उपमानापेक्षां उपमेयाचें श्रेष्ठत्व दाखविलें आहे

म्हणून 'व्यतिरेक' अलंकार झाला. **श्लोक ७१. कळत कळत;** कळून सव-रून, समजून उमजून. **श्लोक ७३. चरण १**—करवतीवर धरल्याप्रमाणें होणाऱ्या या यातना आतां किती दिवस सोसूं? **वारा होणें;** वाताहात होणें, वाऱ्याप्रमाणें चारी दिशेला भडकून जाणें.

**पृष्ठ २८. श्लोक ७६. अघटित घटना;** न घडून येणारी विलक्षण गोष्ट. **निजकुलपुरुषार्थी;** आपल्या कुलाचा पराक्रम किंवा महत्त्व गाजविण्याची इच्छा करणारा. **श्लोक ७८. कलि;** भांडण. हा संस्कृत पुल्लिंगी शब्द असून या ठिकाणीं स्त्रीलिंगी म्हणून वापरला आहे. **श्लोक ७९. श्रुतिनिवह;** अखिल वेद, किंवा सर्व श्रुति. **चरण १**—अखिल वेद ज्याचें वर्णन करतांना अमूक एक वस्तु म्हणजे परमेश्वर किंवा ब्रह्म असें न सांगतां नकारार्थी, म्हणजे ब्रह्म काय नाहीं तें, सांगतात. **निजहृदयनिकेतीं;** आपल्या हृदयाच्या ठिकाणीं; हृदयांत. **चरण ३**—ज्याचें नामस्मरण करणें हाच श्रीशंकराचा रात्रंदिवस धंदा आहे. **श्लोक ८१. धांवण्या धांवणें;** रक्षण किंवा सहाय्य करण्याकरितां धांवणें. **बधावें;** घडावें (?).

**पृष्ठ २९. श्लोक ८२. चरण १**—नानाप्रकारच्या सुखोपभोगाच्या वासनेच्या दुस्तर प्रवाहांत. या श्लोकांत पहिल्या चरणांत विषयोपभोगाची तृष्णा हीच कोणी एक दुस्तर नदी अशा सुंदर रूपकाची योजना करून तें रूपक शेवटपर्यंत फार चतुराईनें पार पाडलें आहे. **श्लोक ८३. विदेशीं;** श्रीकृष्णाच्या चरणकमलापासून फार लांब असल्यामुळें तिला आपली जन्म-भूमी परकीच वाटूं लागली असा भाव. **चरण २**—तुझ्याशिवाय माझ्या हल्लींच्या चमत्कारिक राहण्याचा (वागण्याचा) कुणाला उलगडा होणार आहे? **रहाणें;** वागण्याची पद्धत; रहाटी. **श्लोक ८४. चरण ४**—रवि-तनय म्ह० सूर्यपुत्र यम; त्याचा लुलाय म्ह० रेडा; त्याच्यावर मी स्वतःला आरूढ झालेली केव्हां पाहीन? मला मृत्यु केव्हां घेऊन जाईल? ही एवढी साधी गोष्ट पर्यायानें विचारली आहे म्हणून या ठिकाणीं 'पर्याय' किंवा 'पर्यायोक्त' अलंकार होतो. **श्लोक ८५. चरण १**—हे कृष्णा, माझ्या-कडे कृपादृष्टीनें पहा; मला तुझ्याशिवाय कोण आहे? **प्राणेशीं;** प्राणाशीं; प्राणाचा. **चरण ४—श्लोक. ८६ मत्तद्विरदकरटस्फोटन;** माजलेल्या हत्तीच्या गंडस्थलाचें विदारण. **जंबूकापरदमन;** क्षुद्र अशा कोल्ह्याचा

पराभव; **श्लोक ८७. द्रुपदतनया;** द्रौपदी; **प्रल्हाद;** प्ऱ्हा (ल्हा.) द. हिरण्यकशिपु राक्षसाचा मुलगा. हा बालपणापासून विष्णुभक्त असल्या- मुळें बापाचा त्याच्यावर फार रोष असे. एकदां तुझा ईश्वर कोठें आहे तें सांग असें विचारल्यावरून तो सर्वत्र आहे असें प्रल्हादानें उत्तर दिलें. तो या खांबांतसुद्धां आहे असें त्यानें सांगितलें. तेव्हां हिरण्यकशिपूनें त्या खांबाला लाथ मारतांच त्यांतून नृसिंहाचें रूप धारण करून विष्णु प्रगट झाले व त्यांनीं त्या दैत्याला ठार मारलें अशी कथा आहे. **श्लोक ८८. दुरितचय;** पापांचा सांठा. **चरण ३, ४**—माझा पापसंचय तुझ्या या निष्ठुरपणाच्या रूपानें फलद्रुप होत आहे कीं काय ?

पृष्ठ ३०. **श्लोक ८९. सुराराध्या;** देवानींसुद्धां जिची आराधना करावी अशी. **श्लोक ९१. करीं धरणें;** हातांत धरणें, मदत करणें. **श्लोक ९३. मला अन्याय घडला;** 'मला', माझ्याकडून. **वगला;** एका देवीचें नांव. **वदनस्तंभ करावा;** तोंड बंद करावें; त्याची वाचा बंद कर. **मन नुगलें;** मन मोकळें होत नाहीं.

पृष्ठ ३१. **श्लोक ९६. त्वरिता;** त्वरा करणारी. **श्लोक ९७. अतिनिगूढपराशयसूचिका;** अत्यंत गुप्त असें दुसऱ्याचें मनोगत सुचवि- णारी. **श्लोक ९८. वरयक्षिणी;** उत्तम यक्षस्त्री. **श्लोक ९९.** ह्या व पुढील श्लोकांत उत्तम प्रकारचें सृष्टिवर्णन दृष्टीस पडतें. संध्याकाल, तदनंतरचा चंद्रोदय वगैरे वर्णनें निःसंशय फार बहारीचीं आहेत. **दिनकरकरलक्ष्मी;** सूर्यकिरणांचें ऐश्वर्य. **कमलांचा बंधु;** चंद्र. **चरण ३, ४**—आपल्या इतर कमलबांधवांप्रमाणेंच हें मुखकमल म्लान झालें आहे असें पाहून चंद्र तिला सुख देण्याच्या हेतूनें त्या ठिकाणीं आला (उगवला). या दोन चरणांत 'समासोक्ति' अलंकार आहे. अचेतनावर चेतनासच योग्य अशा क्रियेचा आरोप करण्यांत आला म्हणजे 'समासोक्ति' अलंकार होतो. **श्लोक १००. चरण २**—सूर्यास्तानंतर रात्रीं चक्रवाक व चक्रवाकी या पक्षांचा नेहमीं वियोग होऊन दिवसां पुन्हां समागम होतो असा कविसंकेत आहे. **चरण ३, ४**—ब्रह्मदेवाच्या योजनेप्रमाणें ( विधिविहित- नियोगें ) सूर्यानें वारुणीचा ( पश्चिम दिशेचा ) अंगीकार केला म्हणून सायंसंध्येला ( संधिकालाला ) राग येऊन ती आरक्त झाली आहे काय ?

येथेंही 'समासोक्ती'च होते. **श्लोक १०१. चरण २, ३ व ४**—चंद्र स्वतः निरिच्छ असून त्यानें या सुंदरीशीं याचकवृत्ति स्वीकारली. ब्राह्मणाची नेहमींची भिक्षा मागण्याची वृत्ति (द्विजपति=१ ब्राह्मणश्रेष्ठ, २ चंद्र) न विसरतां त्यानें आपले किरणरूपी हात (कर—१ किरण, २ हात) **पसरून** तिच्याजवळ तिचें मुखलावण्य मागितलें. या ठिकाणीं 'समासोक्ति' तर होतेच; शिवाय उपमानापेक्षां उपमेयाचें श्रेष्ठत्व दाखविल्यामुळें 'व्यतिरेक' अलंकारही होतो. **श्लोक १०२. कांतिपूर**; चंद्रप्रभेचे पूर. **चंद्रकांत**; हा मणि चंद्रकिरणांच्या सान्निध्यानें पाझरूं लागतो असा कविसंकेत आहे. **चरण ३**—चकोर पक्षी केवळ चंद्रकिरणांवर आपली उपजीविका करितात, असा कविसंकेत.

**पृष्ठ ३२. श्लोक १०४. बाल रत्नाकराचें**; समुद्रमंथनाचे प्रसंगीं निघालेल्या चौदा रत्नांतील चंद्र हा एक आहे, **चरण ३, ४**; हें चंद्रा, तूं रत्नाकराचें सुंदर अपत्य असतांना 'दोषाकर' असें नांव कसें धारण करतोस. 'विरोध' किंवा 'विरोधाभास' अलंकार. **श्लोक १०५. गुरुदारगामी**; 'गुरु', बृहस्पतीचें नांव; त्याची दारा (पत्नी) तारा; इच्याशीं गमन करणारा. चंद्राला हें गुरुपत्नीगमनाचें पातक लागलें होतें. **राजलक्ष्मी**; राजयक्ष्मा किंवा क्षयरोग. उपरिनिर्दिष्ट पातकामुळें चंद्राच्या मागें क्षय लागला अशी कथा आहे. **द्विजराजलक्ष्मी**; तुझें चंद्राचें ऐश्वर्य. 'द्विजराज' शब्द श्लिष्ट आहे. श्लोक १०१ पहा. **श्लोक १०७.** 'अपन्हुति' अलंकार. उपमेय तें उपमेय नव्हे तर उपमानच आहे असें वर्णन असतें तेथें हा अलंकार होतो. **भारे**; पीडित होतो. **श्लोक १०८. प्रलयदहनकल्प**; प्रलयाग्निसारखा. **श्लोक ११०. सोले**; दुःखित होतें. **वचे**; जाई, जातो. **श्लोक १११. चरण १**—समुद्रमंथनाचे वेळीं बाहेर पडलेल्या चौदा रत्नांपैकीं चंद्र व विष हीं असल्यानें चंद्र हा विषाचा भाऊ होतो.

**पृष्ठ ३३. श्लोक ११४. झडपणें**; भूतबाधा होणें. **झाडणी करणें**; अंगांतून भूत काढणें. **श्लोक ११५. निजअंशीं**; आपआपल्या अंशानें. **श्लोक ११६. चरण २**—राधिकेच्या मुखचंद्राचा चकोर. चकोरपक्षी जसा चंद्रकिरणांचा भुकेला असतो तसा तूं राधिकेच्या मुखचंद्राचा भुकेला असतोस. 'रूपक' अलंकार. **श्लोक १२४. मनोगज**; मनरूप हत्ती. **प्रणतभक्तकदंबा**;

भक्तसमूहांनीं नमस्कारिलेली. श्लोक १२५. चरण ४—मदनाला जाळून जरी तूं त्याचें भस्म केलेंस तरी त्याचा तूं पुरा नायनाट केला नाहींस, कारण तो अद्याप मला त्रास देत आहे.

पृष्ठ ३४. श्लोक १२८. चरण १—गौतम ऋषीची धर्मपत्नी अहल्या. चरण ३—दक्षाच्या सत्तावीस कन्यांना चंद्रानें वरिलें होतें, पण त्यांत त्याचें रोहिणीवर विशेष प्रेम होतें. यामुळें राग येऊन दक्षानें त्याला 'तूं क्षयरोगी होशील' असा शाप दिला; पण पुढें इतर मुलींनीं त्याची प्रार्थना केल्यामुळें 'हा क्षय सतत न टिकतां महिन्यांतून एक पंधरवडा राहील' असा त्यानें उःशाप दिला. चरण ४—कार्तिकेयाची कथा प्रसिद्धच आहे. श्लोक १३३. चरण २—मग ती काय पत्र लेखनाला विलंब करणार ? श्लोक १३४. स्वीयो...पटनी; आपल्या हकीगतीची कथा सांगण्यांत कुशल. अध्यपिली; सुशिक्षित, शिकलेली.

## सर्ग चवथा.

पृष्ठ ३५. श्लोक १. दौत्यार्थ; दूताचें काम करण्याकरितां. श्लोक २. वेदांग; शिक्षा, कल्प, व्याकरण, छंदस्, ज्योतिष व निरुक्त यांतील प्रत्येक शास्त्र. श्लोक ७. विषयाविषधर; विषय ( काम ) रूपी सर्प. भारी ( चरण २ ); 'मारी' असें पाहिजे असें वाटतें. श्लोक ८. मुद्रामुद्रित; अंगठीची मुद्रा ( छाप ) करून. चरण २—भीमकसुतेला उजवी घालून गेला. श्रीपतिपादपंकजयुगीं; श्रीकृष्णाच्या चरणकमलाच्या ठिकाणीं.

पृष्ठ ३६. श्लोक १२. चरण ४—हंसक्षीरन्यायानें तूं मनामनांत निवड कर, श्लोक १३. उच्चावच; उच्च व हलके. श्लोक १६. शोकार्णव कर्णधारा; शोकसमुद्रांतून पार वाहून नेणारा सुकाण्या. श्लोक २०. चरण २—चिचकारते; 'चित्तचकोर' असें वाचावें. श्लोक २३. चरण २—जिवाची लाही करीन.

पृष्ठ ३७. श्लोक २६. फांसा पडे; पाशांत ( जाळ्यांत ) सांपडे. श्लोक २७. चरण ३—तुझ्या नाममुक्तांचा (नांव हेंच मोती) चारा. श्लोक ३१. वचनीय सीमा; बोलण्याची सीमा. श्लोक ३२. चरण ४—रुक्मिणी-सारख्या राजकन्येच्या तोंडीं, विशेषेंकरून ती सुदेवाबरोबर तोंडीं निरोप

सांगत असतांना, हें शब्द शोभत नाहींत. श्लोक ३३. अनर्कसंपर्क; सूर्याशिवाय इतरांचा संपर्क. श्लोक ३६. समय प्रतीक्षा; योग्य वेळेची वाट पाहून. श्लोक ३७. जशातशाही; वाटेल तिला, भलतीला. ठाव व्हावा; स्थान मिळावें.

पृष्ठ ३८. श्लोक ४१. धाकेत; धाक बाळगतात, भितात. श्लोक ४४. बाहती; एकमेकाला बोलावतात. नुतिपाठक; स्तुतिपाठक. या श्लोकापासून पुढील तीन श्लोकांत प्रातःकाळचें फार सुंदर वर्णन आहे. जुन्या मराठी काव्यांत निसर्गाचें वर्णन नाहीं असें म्हणणारांनीं हे श्लोक, व तसेंच तिसऱ्या सर्गांतील ९९ पासून पुढील श्लोक अवश्य वाचावेत. श्लोक ४५. चरण ४–प्रातःकाळच्या प्रकाशामुळें तारे कमीकमी होऊं लागले.

पृष्ठ ३९. श्लोक ४७. ध्यानीं वसें तें स्वप्नीं दिसें या म्हणीप्रमाणें रुक्मिणीला स्वप्नांत कृष्णभेट होते. श्लोक ५२. निधि; कृष्णरूपी द्रव्यसंचय. श्लोक ५३. पक्षद्वार; मागील दरवाजा. क्षेमाशंसी; क्षेम (हित किंवा कल्याण) सुचविणारा. काकपक्षी, पाण्यानें भरलेल्या घागरी, सवत्स धेनु, सुवासिनी वगैरे शुभसूचक शकून होत.

पृष्ठ ४०. श्लोक ५६. मधुकरपटली; भृंगसमूह. चरण ४–कमलदलें रात्रीं मिटल्यामुळें त्यांत सांपडलेल्या भुंग्यांची आतां सुटका झाली. श्लोक ५८. निजपोष्यें; आपले आश्रित. श्लोक ५९. पृथ्वीवृत्त. स्मरण-मालिका; जपमाळ, स्मरणी.

पृष्ठ ४२. श्लोक ७४. कृष्णवर्त्मा; (चरण १) अग्नि, (चरण २) कृष्णाचा मार्ग.

पृष्ठ ४३. श्लोक ८१. चरण २ व ३–जिच्याकरितां (पत्नीकरितां) तूं इतकी लुडबूड करतोस ती तुला मुळींच विचारीत नाहीं; पण त्याबद्दल तुला वाईट वाटत नाहीं, किंवा रागही येत नाहीं. श्लोक ८३. शांतिकांता; शांतिरूप कांता.

पृष्ठ ४४. श्लोक ८४. विषयविरति; विषयांपासून परावृत्त होणें. श्लोक ८५. चरण ४–या रसज्ञ जिव्हेनें माझे उपकार अशा रीतीनें हरिनाम घेतां परनिंदा करून फेडले काय ? श्लोक ८८. विधिनिषेधीं; धर्मनियम मोडण्यांत, धर्मनियमांचा निषेध करण्यांत.

पृष्ठ ४५. श्लोक ९३. **अपरगति**; उत्कृष्ट गति, मोक्ष. **जन्मा नयोनी**; पुनर्जन्म न पावून. **श्लोक ९४; चरण ३**—तुझी कल्पना, ( परमेश्वराव्यतिरिक्त मनांत येणाऱ्या कल्पना किंवा विचार), नष्ट व्हावी असें जर तुला वाटत असेल. **कळस ढळणें**; मोडून जाणें, नष्ट होणें. श्लोक ९६. **विषयविषममार्गी**; विषयांच्या दुस्तर मार्गांत. **क्षेत्रसंन्यास**; शरीराचा त्याग, मरणें. श्लोक ९७. **यदुपतिपदवी**; श्रीकृष्णाकडे ( परमेश्वराकडे ) जाण्याचा मार्ग. **साही शत्रु**; षड्विकार.

पृष्ठ ४६. श्लोक ९८. **अपरजन्मीं**; उत्तम प्रकारचा जन्म. **चरण ४**—हा परमेश्वरप्राप्तीचा योग मनुष्यजन्माशिवाय इतर कोणत्या उत्तम जन्मांत घडून येईल ? श्लोक ९९. **तत्वमस्यादि**; 'तत्त्वमसि' तूंच तें ( ब्रह्म ) आहेस. तुला सहज ब्रह्मज्ञान होईल हा अर्थ. श्लोक १००. **जगत्रय सावली**; 'जगत्रयसावली' असा एक समास पाहिजे. **विसांवली**; शांत झाली; हृदयांत उत्पन्न होणारे विचार व विकार शांत झाले. श्लोक १०२. **चरण ३**—या चरणाचे पहिले शब्द हस्तलिखित पोथीच्या अभावीं सांपडत नाहींत. श्लोक १०४. **नाकनायक**; स्वर्गाधिपति इंद्र.

पृष्ठ ४७. श्लोक १०५. **द्वैतभाव**; परमेश्वर व जीव हे भिन्न मानणें. श्लोक ११०. **चरण ३ व ४**—ममत्व ( व तदुद्भव द्वैतभाव ) नाहींसें होऊन जिवाशिवाची जीवात्म्याची व परमात्म्याची समता अधिकाधिक होऊं लागली. श्लोक ११३. **चरण ३**—विषयांकडे धांवणारें मन मागें परततें. श्लोक ११७. **गुणत्रयफांसा**; त्रिगुणात्मक संसाराचा पाश किंवा बंधन.

पृष्ठ ४८. श्लोक १२२. अर्थ:—मायेची निद्रा ( मोह ) मला लागल्यामुळें मी तुला विसरलों होतो. आतां तूं मला त्या निद्रेंतून जागे केल्यामुळें झालेल्या ज्ञानानें माझ्या संचिताचा ( कर्मांचा ) नाश झाला आहे, व सर्व संसारबंधनें तुटून गेलीं आहेत. परमेश्वरा, केवढी ही तुझी माझ्यावर दया ! श्लोक १२३. **खेळ**; संसाररूपी खेळ. श्लोक १२७. **परदेशीं**; संसाररूपीं परदेशांत. श्लोक १३१. **पाश**; मोहपाश. **उगवावा**; मोकळा करावा, सोडवावा.

पृष्ठ ४९. श्लोक १३२. **हरिस्तव**; कृष्णस्तुति. श्लोक १३३. 'हरिणी' वृत्त.

# सर्ग पांचवा.

श्लोक १. हेमनगरी; द्वारका. त्रिभुवननिधान; तिन्ही लोकांना निधी-प्रमाणें वाटणारा श्रीकृष्ण.

पृष्ठ ५०. श्लोक ५. अलका; कुबेराची राजधानी. अमरावती; इंद्राची राजधानी. श्लोक ७. सिद्धि; अष्टसिद्धि—अणिमा, महिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व आणि वशित्व. श्लोक १०. अधिष्ठिती; उभ्या राहतात. सज्यांला; सज्ज्यांत. श्लोक ११. सबाळ; आपल्या मुलांना बरोबर घेऊन. कृष्णांघ्रिसरोरुहार्चा; कृष्णाच्या चरण कमलांची पूजा. श्लोक १३. वैदान्तिक कारिका; वेदांतावरचे श्लोक किंवा सूत्रें.

पृष्ठ ५१. श्लोक १६. पीयूषवापी; अमृताच्या विहिरी. श्लोक १९. उच्चैःश्रवे, इंद्राच्या घोड्यासारखे (उच्चैःश्रव्यासारखे) घोडे. श्लोक २२. चार मुक्ती; सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता. श्लोक २३. जय-विजय; वैकुंठ लोकचे विष्णूचे द्वारपाल. चरण ४—मुनिजनांचें मन ज्याकडे लागलें असा जो श्रीकृष्ण त्याला पहात आहे. श्लोक २४. निगूढ; त्याला न दिसेल अशा रीतीनें एकीकडे. अक्रूर; कृष्णाचा मित्र.

पृष्ठ ५२. श्लोक २५. चरण ३ व ४ वेत्रयष्टी—भालदाराच्या हातांतील काठी. भालदाराची काठी हातांत घेतली, भालदाराची जागा पतकरिली, तरी सुद्धां श्रीकृष्ण दृष्टीस पडेना हा भाव. श्लोक २६. स्वर्लोकलोकाधिप; स्वर्गाचा लोकाधिप म्ह० राजा; इंद्र. चरण ४—योग्यतेप्रमाणें आसनें दाखविणारा. श्लोक २७. गंडूषविधि; चूळ भरणें, तोंड धुणें; श्लोक २८. तांबूल-करंक; विड्याची पेटी, करंडा. पतद्गृही (सं. पतद्ग्रह) पिकदाणी, तस्त. श्लोक २९. स्फुट होय; उमलतें. श्लोक ३०. आसा; धनुष्य (सं. आस; धनुष्य). श्लोक ३४. आपाद; पायाला लागणारी, पायाला पोहोंचणारी.

पृष्ठ ५३. श्लोक ३८. चरण १ व २—धोतरानें कंबर कसली होती ती सोडून रुक्मिणीचें पत्र काढलें. राहवावे; राहूं द्यावें, बाजूला ठेवावें श्लोक ३९. दिक्पती; अष्टदिक्पाल. श्लोक ४०. चरण १—वजे; 'वाजे' असें वाचावें. वाघध्वान; वाघांचा आवाज. कलाली; कलली; वांकली. श्लोक ४१. समुत्थानवेळा; उठण्याची (कचेरी बरखास्त होण्याची) वेळ.

पृष्ठ ५४. श्लोक ४६. **लाखी तडप**; लाखी रंगाचें उंची वस्त्र. श्लोक ५२. **उद्धव**; कृष्णाचा चुलता.

पृष्ठ ५५. श्लोक ५३. **हरिपद**; कृष्णाच्या चरणकमलांपासून उत्पन्न होणाऱ्या आनंदसागराच्या लाटा. श्लोक ५३. **असदुद्योग**; दुष्कर्मांचा व्यवसाय. **सुरपतितरु**; कल्पवृक्ष. श्लोक ५७. चरण १–जे ( यती ) मोठ्या प्रयासानें संसारांतील विषयपाशांचा उलगडा किंवा च्छेद करतात. श्लोक ५८. **निजानंद**; ब्रह्मानंद. **निजकर्मे निचरणें**; कर्मांचा निचरा करणें, म्हणजे कर्मांचा ( कर्म फलाचा ) आपल्यावर परिणाम होऊं न देणें. श्लोक ५९ **धांवति** ( नाम.); धांवणें. **निजनिलयकारागृह**; आपला देह ( निलयः वसतिस्थान, घर ) रूपी कारागृह; देहबुद्धि नाहींशी होते हा भाव.

पृष्ठ ५६. श्लोक ६०. **जीवाभिधविहग**; जीव नांवाचा पक्षी. श्लोक ६१. **दुरितचयपाथोनिधि**; ( पाथोनिधि=समुद्र ) पापसंचयाचा समुद्र. श्लोक ६३. **स्वपजरनवैषम्य**; आपपराविषयीं विषमभाव. श्लोक ६४. **चहूंमध्यें**; चार आश्रमांत. १ ब्रह्मचर्य, २ गार्हस्थ ( गृहस्थाश्रम ), ३ वानप्रस्थ, ४ संन्यास. **विश्रांताचे**; 'विश्रांती'चें असें वाचावें. **सुरपतिपुर**; इंद्राची नगरी, अमरावती. श्लोक ६५. **मूढप्रवरवर**; अतिमूर्खांचा शिरोमणि. **विप्रब्रुव**; नांवाचा ब्राह्मण. श्लोक ६६. **वंशविपिनीं**; कुटुंबरूपी अरण्यांत. **तुरुत** ( सं. त्वरित ); तत्काळ.

पृष्ठ ५७. श्लोक ६७. **लक्ष्मीप्रणयरस**; लक्ष्मीचें प्रेम. श्लोक ६९. **तदुद्देशें**; त्यांच्यासाठीं. श्लोक ७०. **उदरकुहरीं**; उदरांत. **कुह्जिती**; कुह् कुह् ( डब् डब् ) असा आवाज करतात.

पृष्ठ ५८. श्लोक ७३ व ७४. यांत फार सुंदर रूपक साधलें आहे. **जीवपथिक**; जीव हाच प्रवासी. श्लोक ७६. **सगुण भजन**; परमेश्वराच्या सगुण मूर्तीचें भजन. चरण ३–मग तो सहजच सत्त्वगुणाच्या कसोटीला उतरतो म्ह० पूर्णपणें सात्त्विक बनतो. श्लोक ७७. **जिवशिवां**; जीवात्मा व परमात्मा यांमध्यें. श्लोक ७८. **मुमुक्षा**; जन्ममरणांपासून मुक्त होण्याची इच्छा. चरण ४–ज्याप्रमाणें खपुष्पाला ( गगनकुसूम ) अस्तित्व नाहीं, त्याप्रमाणें बंधाभावीं मुमुक्षेलाही अस्तित्व नाहीं. बंधच नाहींत तर बंधापासून मोक्ष (सुटका) तरी कशी संभवणार ?

पृष्ठ ५९. श्लोक ८१. तुरीयावस्था; सुषुप्ति, स्वप्न, जागृति व तुर्या (किंवा तुरीया) या चार अवस्थांपैकीं ब्रह्माशीं तादात्म्य होण्याची एक स्थिति. श्लोक ८६. तीर्थस्वरूपचरण; तीर्थाप्रमाणें पवित्र चरण असलेला. प्रथिताभिमान; अतिशय अभिमानी. समवाप्तकाम; सर्व इच्छा पूर्ण झालेला. श्लोक ८७. शिरोवतंसा; शिरोमणि. चरण ३–मराठी पत्रांत नेहमीं येणारा मायना 'सह' खेरीज करून असाच असतो.

पृष्ठ ६०. श्लोक ८९. चरण २–योगिश्रेष्ठाच्या हृत्कमलरूपीं पिंजऱ्यांत राहणारा पोपट. श्लोक ९१. भवदीय गुणौघ; तुमच्या गुणांचा प्रवाह. ताप तीन्ही; आधिभौतिक, आधिदैविक, आध्यात्मिक. श्लोक ९३. चरण ३–विद्या, तरुण वय, संपत्ति, सौंदर्य व सद्गुण यांचें स्थान.

पृष्ठ ६१. श्लोक ९५. वीरभाग; वीरालाच योग्य असा भाग. चरण २–वीरांमध्यें तुझी तत्काळ फजीती होईल; ते निंदाव्यंजक टाळ्या पिटतील तुरुत; (सं. त्वरित), तत्काळ. सिंहामिष; सिंहाचा भाग. आमिष; मांस. श्लोक ९६. पाणिग्रहास करिजे; पाणिग्रहण कर, लग्न कर. श्लोक ९८. पुरुषार्थसिंधु; पराक्रमाचा सागर. श्लोक ९९. निजमनोरथदायिकेचें; आपले मनोरथ पूर्ण करणारीचें. श्लोक १००. पदांबुजरजःस्नपनें; चरण कमलाच्या धुळीच्या स्नानानें, विलेपनानें. श्लोक १०१. त्वत्प्रायकें; 'त्वत्प्रापकें' असें असावें. त्वत्प्रापक म्ह० तुझी प्राप्ति करून देणारें.

पृष्ठ ६२. श्लोक १०६. परावर; अत्यंत श्रेष्ठ. श्लोक १०७. करभोरु; (करभ=हाताच्या मनगटापासून बोटांपर्यंतचा भाग. ऊरु=मांडी.) जिच्या मांड्या सुंदर आहेत अशी स्त्री. श्लोक १०८. जो; जो विधु (चंद्र). श्लोक ११०. कपाळपाटी; कपाळाचा भव्य पट्टा. श्लोक १११. चरण २–कान पाहिले म्हणजे सुवर्णाच्या शिंपल्याच आहेत कीं काय असा भ्रम होतो. तिलप्रसून; तिळाचें फूल.

पृष्ठ ६३. श्लोक ११४. विलसभू; 'विलासभू' असें वाचावें. विलासभू; विलासस्थान. श्लोक ११५. माजे; कंबरेमुळें; कंबरेकडे पाहून. श्लोक १२१. सामुद्रिक लक्षणानीं; (सामुद्रिक; हातांपायांवरच्या रेषा पाहून भविष्य सांगण्याचें शास्त्र). हातांपायांवरील रेषा.

पृष्ठ ६४. श्लोक १२७. दशमी अवस्था; मूर्च्छा; प्रेमीजनाच्या दहा अवस्था

सांगितल्या आहेत, त्यांना 'अवस्था दशक' असें म्हणतात; त्यांतील दहावी अवस्था; मूर्च्छा. अवस्था दशक पुढीलप्रमाणें वर्णिलें आहे:—" दृङ् मनःसंगसंकल्पौ जागरः कृशताऽरतिः। ह्रीत्यागोन्मादमूर्च्छांता इत्यनंगदशा दश ॥१॥ श्लोक १३०. नटनाट्य; कृष्णा, तूं अवतारधारी परमेश्वर आहेस, व हे सर्व तुझे खेळ आहेत. श्लोक १३७. पेशळांगी; मृद्वंगी. श्लोक १३८. पणपूर्व; शपथ घेऊन. प्रस्थाननक्षत्र; प्रवासास निघण्याकरितां अनुकूल नक्षत्र. श्लोक १३९. देवक; लग्नमुंज इत्यादि कार्याचे सिद्ध्यर्थ देवता स्थापन.

पृष्ठ ६५. श्लोक १४१. दारुक; कृष्णाचा सारथी. श्लोक १४३. सहारें; ( सं. सहार=आम्रवृक्ष ) आंबराया. चरण २—प्राणप्रियेच्या सुंदर कथांनीं करमणूक करून. आनर्त; एक प्राचीन देश. हल्लींचा काठेवाड. त्याची द्वारका राजधानी होती. हिलाच आनर्तनगरी असें प्राचीन नांव होतें.

## सर्ग सहावा.

श्लोक १. चतुरंग सेना; हत्ती, घोडे, रथ व पायदळ हीं चार अंगें ज्यांत आहेत असें सैन्य. रजोविशेषें; धुळीच्या लोटांनीं. श्लोक ५. श्लोक काश्मीरसंसेचित; केशराचा सडा घातलेलीं. सदंभा; गर्विष्ठ, मानी.

पृष्ठ ६६. श्लोक ८. जरासंध; बृहद्रथाचा मुलगा व कंसाचा सासरा. याच्या शरीराचीं उपजतांच दोन छकलें होतीं तीं 'जरा' नांवाच्या राक्षसीनें सांधलीं, व त्यामुळें याला जरासंध हें नांव प्राप्त झालें. श्लोक १३. अतिमृदुतरबाला; अतिशय मऊ केंसांच्या किंवा लोंकरीच्या.

पृष्ठ ६७. श्लोक १९. संप्रोछन; संप्रोक्षण; तीर्थ शिंपडणें. श्लोक २०. बाळातपीं; कोंवळ्या उन्हांत. आलीजनें; सखीजनानें. श्लोक २४. चरण १—कानांतील बाळ्यांचा प्रकार.

पृष्ठ ६८. श्लोक २७. दशावतारांकित; परमेश्वराच्या दहा अवतारांचीं चित्रें काढलेल्या. श्लोक २९. अपेटी; ( ? ). अमाळा; ( ? ). श्लोक ३० सज; सज्ज, सुशोभित. श्लोक ३१. अनवट; (?) ( नवट=नवीन ). या व मागील श्लोकांतील 'अपेटी', 'अमाळा' व 'अनवट' या शब्दांत 'अ'चा अर्थ अभावात्मक नसून दुसरा कांहींतरी असावा. निटल्या; नीट

रीतीनें नकसून केलेल्या. श्लोक ३२. कावरोधे; 'कां अवरोधे' असें असावें. ( अवरोधे—अडथळा करतो, आड येतो.) श्लोक ३६. पुण्याहवाचन; विवाहादि मंगलकार्यांतील प्रारंभींचें कर्म. नीरांजन करणें; औक्षण करणें, ओवाळणें.

पृष्ठ ६९. श्लोक ३७. पद्मापदोपासक; लक्ष्मीच्या चरणाचे भक्त. श्लोक ४३. वस्तुविवेक; तत्त्वाचा किंवा सत्याचा विचार. श्लोक ४५, अजपा; 'हंस' नांवाचा मंत्र; यांत प्राणायामाचा संबंध येतो. श्लोक ४६. पांच्या; (?) श्लोक ४७. श्रीशमुद्रा; विष्णुमुद्रा, वैष्णवांच्या मुद्रा.

पृष्ठ ७०. श्लोक ५०. गोडखे; (?). श्लोक ६१. कातंत; (?).

पृष्ठ ७१. श्लोक ६२. कपालें; चरण १ (?) निग्रहस्थान; पराजय. श्लोक ६३. चरण २–(?).

पृष्ठ ७२. श्लोक ७५. पत्रशाका; पालेभाज्या. श्लोक ७९. विरिंज्या; (?)

पृष्ठ ७३. श्लोक ८२. कर्कर; (?). श्लोक ८६. करजल पुतळी करपुतळी (?). दिवा व काजळ लावलेलें भांडें घेऊन शकुन पहाण्याची तऱ्हा. श्लोक ८७. परदेसीं; 'पदरेसीं' ( एकट्या पदरानें; दुसरें कांहीं पांघरावयास न घेतां ) असें असावें. श्लोक ९५. सभाक्षोभ; सभा पाहून गांगरून जाणें.

पृष्ठ ७५. श्लोक १००. कृष्णार्थ; द्रौपदीकरितां. श्लोक १०१. पांखरूं; गरुड, विष्णूचें वाहन. श्लोक १०८. क्षितिधरकुलोत्तंसकुलजा; गिरिकुलांत श्रेष्ठ अशा कुलांत जन्म पावलेली हिमनगतनया पार्वती; शिवसुरत; शंकराच्या ठिकाणीं रममाण होणारी. श्लोक १०८. शरीरार्धपतिका; शरीरार्धाची स्वामिनी.

पृष्ठ ७६. श्लोक १०९. कृपापारावारा; दयेच्या सागरा. कारुण्य लहरी; 'कारुण्यलहरी' असा एक शब्द घ्यावा. श्लोक ११०. विश्वप्रणितचरित; ज्याचें चरित्र अखिल जगताच्यापुढें आहे असा. या श्लोकाचे पहिले दोन चरण निर्यमक आहेत. पावेसि; पावशील. श्लोक १११. न मनिं; मानूं नको. अंघ्रिकमळीं; पदकमलीं. श्लोक ११२. पहिल्या दोन चरणांत

'सम' अलंकार आहे. दोन पदार्थांचा यथायोग्य योग वर्णिला असतां 'सम' अलंकार होतो. हा योग दोन चांगल्या किंवा वाईट वस्तूंमध्यें असतो.

पृष्ठ ७७. श्लोक ११६. मदन किंवा प्रद्युम्न हा रुक्मिणी व कृष्ण यांचा मुलगा असल्यामुळें, रुक्मिणीनें लग्नाच्या आधीं आपण त्याची माता असा उल्लेख केल्यानें या ठिकाणीं कालविपर्यास झाला आहे. श्लोक ११९. वितर्कावर्ती; वितर्कांच्या भोंवऱ्यांत; श्लोक १२२. प्रकृति कमनीया; स्वभावतां सुंदर असलेली.

पृष्ठ ७८. श्लोक १२३. रागेजसिल; रागावशील. श्लोक १२४. वळसा; घोटाळा. १२६. अवश्यंभावी; अवश्य घडून येणारें. श्लोक १२७. विधुर; विरहावस्था अनुभविणारी. श्लोक १२८. दगदली; त्रासली, श्रमली.

पृष्ठ ७९. श्लोक १३४. चरण १—सूर्याशिवाय मनुष्यांस रात्र कंठावी लागते तशी तुझ्याशिवाय माझी स्थिति झाली आहे. तुझ्याशिवाय मला सुखाचा प्रकाश मिळत नाहीं. अवस; अमावास्या. श्लोक १३८. चरण ४—कृष्णाशिवाय तिच्या जिवाची उलघाल होत होती. श्लोक १३९. प्रमद-विपिनगर्भी; क्रीडोद्यानाच्या मध्यभागीं.

पृष्ठ ८०. श्लोक १४२. ध्रुव व गजेंद्र; (सर्ग १—श्लोक ९ पहा). अंबरीष; हा एक विष्णुभक्त राजा होता. त्याचें सत्त्व पहाण्याकरितां एका द्वादशीचे दिवशीं पहाटेच दुर्वास ऋषि त्याचेकडे गेले व 'स्नान करून भोजनास येतों' असें सांगून नदीतीरावर गेले व सूर्योदयापर्यंत परत आले नाहींत. इकडे सूर्योदयाला एकादशीचें पारणें फेडावयाचें असल्यामुळें राजाला मोठी अडचण पडली. अतिथीला टाकून आपण भोजन करणें योग्य नसल्यामुळें त्यानें एक तुलशीपत्र तोंडांत टाकून पारणें फेडलें, पण दुर्वास परत आल्यावर त्याला तेंही खपलें नाहीं, व त्यानें राजाचा फार छळ केला. शेवटीं, परमेश्वरानें आपलें सुदर्शन चक्र ऋषीच्या पाठीस लावून त्याला अंबरीषापुढें शरण जावयास भाग पाडलें. श्लोक १४५. आठव्या; कृष्णावतार आठवा होता.

पृष्ठ ८१. श्लोक १५२. पृथा; पांडवांची आई, कुंती. चरण ४—

धर्माच्या राजसूययज्ञांत श्रीकृष्णानें उष्टीं काढिलीं त्याला उद्देशून ही ओळ आहे.

पृष्ठ ८२. श्लोक १५७. व्रजयुवति दाठींतहि; 'व्रजयुवतिदाठींतहि' असा एक समास घ्यावा. गोपींच्या दाटींत. श्लोक १६२. मुरकुंडी पडणें; गर्दी होणें.

पृष्ठ ८३. श्लोक. ६६. असवरीं; 'अवसरीं' असें वाचावें.

## सर्ग सातवा.

पृष्ठ ८३. श्लोक १. हृदयगत; मनांतील विचार, मनोगत.

पृष्ठ ८४. श्लोक २. काळांतक; यमाला ठार करणारा. श्लोक ४. कृष्णागमनभवन; श्रीकृष्णाच्या आगमनानें उत्पन्न झालेला. गेला; 'द्विजतिलक' हा कर्ता अध्याहृत. श्लोक ५. सरोव्याजें; सरांच्या मिषानें. द्वंद्वींहुन; दोन नेत्रांतून. श्लोक ६. शुभाशंसी; शुभ दर्शविणारी. नेत्रशफरी; माशाप्रमाणें दिसणारे नेत्र. श्लोक १०. संजीवनसिद्धि; पुनर्जन्माची प्राप्ति.

पृष्ठ ८५. श्लोक ११. निदाघकाळ; (निदाघ, उष्णता), उन्हाळा. श्लोक १८. सांख्य; सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा आणि वेदांत या सहा दर्शनांपैकीं एक. पातंजल; योगशास्त्र. वेदशिरोरहस्यें; वेदांतील मुख्य मुख्य गूढ तत्त्वें. तत्प्राप्ति; परमेश्वरप्राप्ति. सामरस्यें; तन्मय झाल्यानें. श्लोक. २०. चरण ३ व ४ (?). श्लोक २१. गोमती; (चरण १) नदीचें नांव; (चरण २) इंद्रियें व बुद्धि यांचा. हीरांकुरांच्या; हिरकण्यांचा. श्लोक २४. छत्तीस गुण; वधुवरांच्या पत्रिकांत दिसून येणारे गुण. हे गुण एकंदर छत्तीस असतात. त्यांत कांहीं अनुकूल, कांहीं प्रतिकूल असे असतात. कृष्णाच्या व रुक्मिणीच्या पत्रिकेंत सर्वच गुण अनुकूल आहेत हा भाव.

पृष्ठ ८६. श्लोक २५. दौत्यधर्में; दूताच्या कामगिरीनें. श्लोक २७. तदर्थ; कृष्णप्राप्त्यर्थ. श्लोक ३०. चरण ४—जमिनींत टाकलेलें बीं उगवून आलें म्हणजे त्याला फळें येण्याची आशा असते, त्याप्रमाणें माझ्या मनोरथांना आतां अंकुर फुटल्यामुळें ते फलप्रद होण्याच्या मार्गाला लागले आहेत. श्लोक ३२-३९. या श्लोकांत वर्णिलेल्या सुदेवाची स्थिति पाहून द्वारकेला श्रीकृष्णाला भेटून परत आलेल्या सुदामदेवाची आठवण होते.

पृष्ठ ८७. श्लोक ३५. सुवर्णपीठ; सुवर्णासन. श्लोक ३६. वसनांचळानें; वस्त्राच्या, लुगड्याच्या पदरानें. श्लोक ३९. अरणीयुग्म; अग्नि उत्पन्न करण्याची दोन काष्ठें. दृषदुपळ; जातें. श्लोक ४१. अभिमुख; सामोरा.

पृष्ठ ८८. श्लोक ४८. पूर्वींहुन; पहिल्यापासून. श्लोक ५२. चौरडोली=अंबारी. श्लोक ५३. वामे; दुःख करी, दुःखी होई. श्लोक ५४. रह्वाळ; राऊत, घोडेस्वार. श्लोक ५५. सतखे करीती; भात, नारळ, वगैरे जिन्नस ओवाळून टाकतात. श्लोक ५६. राजवीथी; राजमार्ग.

पृष्ठ ८९. श्लोक ५८. तारा; डोळ्यांतील बाहुली; दृष्टि. चरण ४—स्त्रियांची नजर किंवा दृष्टि घरांत ठरेना. श्लोक ६३. भूषा विपर्यास; एक समास पाहिजे; दागिन्यांची अदलाबदल; भलता दागिना भलत्या जागीं घालणें, पादांगद; (पाद+अंगद) पायांतील भूषण. वास्तविक 'अंगद' शब्द मनगटांतील भूषणाला लावतात. श्लोक ६५. कृतविपरीतदशा; ज्यांची मनाची स्थिति चमत्कारिक केली आहे, बदलून टाकली आहे, अशा. निरंजनानें; श्रीकृष्णानें. श्लोक ६९. स्मरवैजयंती; मदनाच्या ध्वजा.

पृष्ठ ९०. श्लोक ७१. वलाया घेणें; इडापिडा बाहेर घालवणें, दृष्ट काढणें (?). श्लोक ८०. असूर्यपश्या; सूर्याचें दर्शनही ज्यांना घडणार नाहीं अशा. स्खळण पावेति; पडतात. चवघी; चतुर्विध मुक्ति. श्लोक ८२. चरण १—हे सखे, ज्याच्यावर स्त्रियांच्या कटाक्षांची अतिशय दाट छाया पडली आहे, ज्याच्याकडे अगणित स्त्रियांचे कटाक्ष लागून राहिले आहेत.

पृष्ठ ९१. श्लोक ८३ मुकुलितमुखी; जिचें तोंड मिटलें होतें, जिच्या मुखांतून एकही शब्द निघत नव्हता अशी. श्लोक ८४. प्रत्युद्गमनविधि; सामोरे जाऊन भेटण्याचा आचार. श्लोक ८७. नृपमूर्धन्य कुमरी; राजाधिराजाची कन्या. चरण ३ व ४—श्रीकृष्ण परमात्म्याच्या परमेश्वरी स्वरूपाची, सर्वत्र अणुरेणुसुद्धां व्यापून उरणाऱ्या स्वरूपाची, ओळख झाल्यामुळें, जिला 'कृष्ण आला, कृष्ण गेला' वगैरे सांगण्यांत कांहीं अर्थ नव्हता.

पृष्ठ ९२. श्लोक ९२. चरण १—मायबापांचा कृष्णाकडे ओढा आहे. श्लोक ९३. चरण ४—अनिष्टद्योतक शिंक येऊन अपशकून झाला. श्लोक ९९. ग्रंथ उकले; या गोष्टीचा धागा लागला; कोडें उलगडलें.

पृष्ठ ९३. श्लोक १०१. दोघांसर पाड; 'दोघां सरपाड' असें पाहिजे.

सरपाड; सारखी योग्यता, समानगुणता. श्लोक १०२. अंप्रिळ (?) श्लोक १०३. दुःखास्पद; दुःखाचें स्थान, दुःखदायक. श्लोक १०४. या व पुढील श्लोकांत रुक्मिणीच्या आईनें तिला सासरीं कसें वागावें याविषयीं फार उत्तम उपदेश केला आहे. श्लोक १०४. तंती लागसी; ओढीला, मार्गाला लागलीस. तंती; ओढ. श्लोक १०५. चरण २—मला तुझ्याविषयीं फार काळजी वाटते. श्लोक १०६. पोटागीची माय; जिच्या पोटांत मुलीविषयीं कालवाकालव होते अशी; आंतड्याला पीळ पडणारी. श्लोक १०८. मात्रा; दोर. श्लोक १०९. तिरांचे माणुस; तिरसट, रागीट माणूस. श्लोक ११०. लांब महाजिभांच्या; अतिशय बोलक्या.

पृष्ठ ९४. श्लोक ११७. चरण ३ व ४—जर तुझ्या मुखांतून अभिमानाचे उद्दाम शब्द आले तर तुझ्या सद्‌गुणांचें मूळच नाहींसें झालें असें समज. श्लोक ११९. सांडी धरणें; हार खाणें. श्लोक १२०. अनासक्तपणा; निरिच्छता. श्लोक १२२. खांडव; खांडववन. ह्या इंद्राच्या अरण्याचा अग्नीनें कृष्ण व अर्जुन यांच्या साहाय्यानें फडशा पाडला. कृष्णा; द्रौपदी. श्लोक १२३. बुद्बुदरूप; बुडबुड्या सारखा. बुडबुडा. श्लोक १२७. चरण २—पापाला पाठमोरी हो; पापाचरणापासून लांब रहा.

पृष्ठ ९५. श्लोक १३०. राजरिशोमणीची; 'राजशिरोमणीची' असें वाचावें. श्लोक १३५. विक्त्रेंदु; 'वक्त्रेंदु' असें वाचावें. अर्थः—तुझा केशकलाप तमोमय प्रदेशाप्रमाणें दिसून त्यांतून मुखरूपी चंद्र रात्रंदिवस प्रकाशतो आहे, असा भास झाल्यामुळें कांचोळीच्या आंत दडून बसलेलें स्तनरूपी चक्रवाक पक्ष्यांचें जोडपें या रात्रीमुळें होणाऱ्या वियोगाच्या कल्पनेनें भिऊन गेलें आहे. श्लोक १३६. भ्रूयुगुळास; भुंवयांस. श्लोक १३७. चरण ३—हलक्या कानानें जर कोणाच्या चहाड्या ऐकणार नाहींस. श्लोक १४१ चरण ३—जोंपर्यंत जिवंत आहों (ज्यावें) तोंपर्यंत दानधर्म करण्याकरितां हात नेहमीं वर केलेला असावा.

पृष्ठ ९६. श्लोक १४२. वेचेंकरून; खर्च करून. श्लोक १४५. चरण१—तूं या संसारांत आसक्ति न धरतां त्याच्याकडे दुर्लक्ष करून ( उपेक्षा बुद्धीनें ) रहा ( विचर ). परुषवचनोच्चारण; कठोर शब्दांचा उच्चार.

पृष्ठ ९७. श्लोक १५२. नीरूपम; ऱ्हस्व 'नि' पाहिजे. श्लोक १५३. सकलबांधवकुळें; 'सकल' हा वृत्त 'न' गण होतो; या ठिकाणीं 'शिखरिणी' वृत्त असल्यामुळें 'न'च्या ऐवजीं 'स' गण पाहिजे. 'सकळें' असें असतें तर 'स' गण झाला असता. श्लोक १५४. प्रणविनित दुच्छिष्ट; (?) या ठिकाणीं कांहींतरी पोथींत लिहिण्यांत चूक असावी असें वाटतें. श्लोक १५५. चरण ४--पतिवंचना करणाऱ्या स्त्रियांची गति वडाच्या शाखाग्रांवर पहावयास सांपडते. त्यांना वटवाघुळाचा जन्म येतो.

पृष्ठ ९८. श्लोक १६०. शिक्षाविधि; शिक्षण, उपदेश, शिकवण.

पृष्ठ ९९. श्लोक १७०. ऐहिकामुष्मिक; इहपरलोकचे. श्लोक १७२. उगऊन द्यावें; स्पष्ट करून सांगावें. श्लोक १७३. तेव्हां; ( चरण १ ). 'शिखरिणी'वृत्त असल्यामुळें पहिला 'य' गण पाहिजे. या दृष्टीनें 'तव्हां' 'त्यव्हां' असें पाहिजे. वक्रेंकरुनि; 'वक्त्रें करुनि' असें पाहिजे; मुखानें.

## सर्ग आठवा.

पृष्ठ १००. श्लोक ४. हिलाटें; मोठेपणा (?). हिलाटें घेति; टेंभा मिरवितात. श्लोक ६. कूडमंत्री; कपटाचा सल्ला देणारा; दगलबाज.

पृष्ठ १०१. श्लोक १३. राहो (चरण २); राहु. दाड; द्राड. श्लोक १७. कुसृष्टि; वाईट कल्पना. श्लोक २१. विंधिला; टोंचला.

पृष्ठ १०२. श्लोक ३५. ताळ पडणें; ताळ सुटणें, मर्यादा नाहींशी होणें. श्लोक ३७. जोठें; (?). श्लोक ३८. शकुनग्रंथि; शुभ शकुनाची गांठ.

पृष्ठ १०३. श्लोक ४०. संवरणार्थ; 'संवरण' याचा अर्थ लपविणें असा आहे; पण तो प्रस्तुत चरणांत चांगलासा लागत नाहीं. स्वयंवराकरितां लग्नाच्या वेळीं माळ घालण्याकरितां, असा अर्थ असावा. आगुल्फ; पायांच्या घोट्यांपर्यंत. श्लोक ४१. विश्वेश्वरि; विश्वस्वामिनी रुक्मिणी. श्लोक ४२. मुक्ताफळस्तोम; मोत्यांचे घोस. श्लोक ४४. कारी; कारी, मुलगी. चरण ३ (?). श्लोक ४५. झोंपाळ्याप्रमाणें अस्थिर वृत्ति. दोला; झोपाळा, झुला. श्लोक ४८. अवेक्षिता; पाहणारा, दृष्टि टाकणारा. नाकीं चुना लावणें; फसविणें, हातावर तुरी देणें. चरण ४–वाईट दुष्ट विचार ज्याचे त्यालाच फळतात; त्यांचीं फळें त्यांच्या पुढेंच दत्त म्हणून उभीं

राहतात. कुडें; दुष्ट विचार, दुष्कृत्य. श्लोक ५०. वारमुख्या; मुख्य मुख्य वारांगना. श्लोक ५२. पदातिफेरा; पायदळाचा घेर. श्लोक ५३. वन्हि-यंत्रें; तोफा.

पृष्ठ १०४. श्लोक ५५. चरण १—सर्व चरण एक समास घ्यावा. कृष्णाच्या चरणकमलांचें ध्यान करणारी. गूढलीला; जीची कृति गुप्त प्रकारची होती अशी. पाणिपादांबुजयुग्म; हात व पाय यांच्या जोड्या. श्लोक ५६. चरण ४—पूर्ण विकास पावलेल्या कमलाप्रमाणें नेत्र असलेली. श्लोक ५७. चरण १—तयेचे; त्या देवीच्या. चरणाब्ज माथा; 'चरणाब्जीं माथां' असें कदाचित् असावें. श्लोक ५९. अतिप्रबुद्धा; अतिशय शहाण्या. श्लोक ६०; अगस्तिपत्नी; लोपामुद्रा. अत्रिपत्नी; अनसूया. मुद्गल; एक ऋषि. अरुंधती; वसिष्ठ ऋषीची पत्नी. पतिव्रतामंडन; पतिव्रता स्त्रियांचा अलंकार. मुनिसत्तम; मुनिश्रेष्ठ. श्लोक ६६. पुन्नाम; पुरुषाचें नांव.

पृष्ठ १०५. श्लोक ६९. मलापकर्षक्लपनीय; मळ धुवून काढण्याकरितां. श्लोक ७१. प्रवाळपीठावर; पोंवळ्यांच्या आसनावर. चरण ३—केशर (काश्मीर) व कस्तुरी समभाग घेऊन. श्लोक ७६. यथास्थानदेशीं; अवयवांच्या योग्य ठिकाणीं.

पृष्ठ १०६; श्लोक ७९. एकांतिक; एकारतीचें. श्लोक ८३. सुवर्ण-पर्याणित; सुवर्णाचें सामान (खोगीर वगैरे) घातलेले. (सं. पर्याण; पल्याण, खोगीर.) श्लोक ८४. मृदूपधानान्वित; मऊ उशांसहित. श्लोक ८७. लोपामुद्रा; अगस्त्य ऋषीची पत्नी. अनसूया; अत्री ऋषीची पत्नी. तुळने; तुलनेला, बरोबरीला. श्लोक ८८. त्रिनयनगृहस्वामिनि; हे त्रिनयनाची म्हणजे शंकराची गृहिणी, पार्वती. कृपापांगें; कृपाकटाक्षानें. प्रणतजनचिंतानळ; तुला नमन करणाऱ्या भक्तांचा चिंतारूप अग्नि. मृदुस्वांते; हे कोमलहृदये. जुगवती; घडवून आणणारी. श्लोक ८९. आनर्ताधिप; आनर्त देशाचा (काठेवाड, यालाच 'सौराष्ट्र' असें पूर्वी नांव असे) अधिपति कृष्ण. अस्मद्विधहृदयसंदेह; आमच्या सारख्यांच्या मनांतील (श्रीकृष्णाशीं इचें लग्न होईल कीं नाहीं याविषयींचा) संशय.

पृष्ठ १०७. श्लोक ९०. स्मितज्योत्स्नाजाळें; सर्वत्र पसरलेल्या हास्यरूपी चांदण्यानें. निजानिलय; तिचें स्थान, देऊळ. कळला; 'कळला'

याच्या जागीं 'फळला' ( फलद्रूप झाला ) असें असावें. श्लोक ९२. पुरोभागीं; देवळाच्या पुढें. अतितत; अतिशय विस्तृत. चिरंटी; नायकीण. नानाविध निवह; नाना प्रकारचे समुदाय. घनवटें; दाटी करी. समुदायांनीं दाटी झाली होती. श्लोक ९३. सकूर्पासक; चोळ्यासहित. श्लोक ९४. उद्धार्तीति; वर करिती. रावविलीं; ( आळित्यानें ) रंगविलीं. श्लोक ९५; स्पृहणियवेषा; वाखाणण्यासारखा पोषाख आहे जिचा अशी. फळेक्षु; (?) सुवर्णपूर्णें; सुवर्णानीं भरलेलीं. सुवर्णवर्णें; सुवर्णासारखीं पिवळीं. कंठसूत्र; गळेसरी. श्लोक ९८. सोदरमुख्यजाया; भावाची पट्टराणी. दुलावी; (?). श्लोक ९९. मेनका; एक अप्सरा. सुरवारमुख्या; मुख्य मुख्य अप्सरा. श्लोक १००. मल्ली कुसुमें; मालतींचीं फुलें. तत्केशसंस्कार; तिची वेणीफणी. सुकेशी व मंजुघोषा; अप्सरांचीं नांवें. विभूषा; दागिने.

पृष्ठ १०८. श्लोक १०१. तिळोत्तमा व रंभा; अप्सरांचीं नावें. ऊटी; उटी लावी. चरण २; (?) चरण ३–रंभा आपला मोठेपणा धरू शकली नाहीं; तिची बडेजाव चालली नाहीं. श्लोक १०२; उर्वशी व घृताची; अप्सरांचीं नांवें. वसीला; वशिला, ओळख. श्लोक १०३. संदेहसोपान; संशयांचा सोपान ( जिना, पायऱ्या ). श्लोक १०४. पहाणी; दृष्टि, पहाण्याची लकब. श्लोक १०५. भरोन धापे; धाप किंवा दम लागल्यामुळें. श्लोक १०६. चरण २–शुष्क, गौण गोष्टीच करीत बसली आहेस. श्लोक १०७. चरण ४–ही माया लावीत गेल्यानें लगट करून चिकटते; लावावी तितकी लागते, व सोडावी तितकी सुटते. श्लोक १०८. आलीकडे; तुझ्यापासून लांब. आत्मीय; खरोखर तुझा असा म्हणविणारा. श्लोक १०९. निसांसी; (?) चरण ३–हें तुझें आचरण कोणत्या प्रकारचें आहे ? तूं असें कसें आचरण करतेंस ? कोण; कोणत्या प्रकारचें. चरण ४–श्रीकृष्ण तुझी वाट पहात आहे. श्लोक ११०; विवेकांजन; विचाररूपी काजळ. उदासपणें; निरासक्तवृत्तीनें. अद्वैत; श्रीकृष्ण परमात्मा. श्लोक १११. पारणा फिटणें; समाधान होणें. 'लोचन पारणा' एक सामासिक शब्द. श्लोक ११३. क्षत्रियाधम; शिशुपाल. हताश; निराश. श्लोक ११४. चरण ३–चिलखतें, शस्त्रें, सैन्य व रथ यांनीं युक्त, सज्ज, होऊन. संनद्ध; चिलखत घातलेला. वाहन; रथ.

पृष्ठ १०९. श्लोक ११५. विविधभार; नाना प्रकारचीं सैन्यें. श्लोक ११७.व्युत्पत्तीला; मूळ स्थानाला, उत्पत्तिस्थानाला; रुक्मिणी ही आदिमाया प्रकृति असून, परमेश्वरापासून प्रकृति उत्पन्न झाल्यामुळें, श्रीकृष्ण परमात्मा हा तिचें मूलस्थान होय. श्रीकृष्णाला जाऊन मिळशील हा भाव. श्लोक ११८. वीरगुंठी; वीराला शोभण्यासारखी गांठ. चरण ३–वदननिहित वंशीं; मुरलीला तोंड लावलेला, मुखाशीं मुरली धरणारा. श्लोक ११९. कौस्तुभ; श्रीकृष्णाचा मणी. वैजयंती; कृष्णाची माला. श्लोक १२०. खगपति; गरुड. श्लोक १२१. न लक्षे; दिसत नाहीं. सत्ता; शक्ति. श्लोक १२२. स्वस्त्यस्तुते; तुझें कल्याण असो.

पृष्ठ ११०. श्लोक १२३. मुळ; मूळ, बोलवणें. श्लोक १२६. पृथिवीपुरुहूतपुत्री; पृथिवीपतीची, राजाची कन्या. विकचपद्मपलाश-नेत्री; प्रफुल्ल कमलदलाप्रमाणें जिचे नेत्र आहेत अशी. चारुशीला; सुशील.

पृष्ठ १११. श्लोक १३०. सकळलोकमनोभिरामा; सर्व लोकांच्या मनाला सुंदर दिसणारी, आवडणारी. चरण २–वैकुंठनाथ श्रीकृष्ण, त्याच्या पदकमलाशीं आसक्त झालेली किंवा मन गुंतलेली. सौंदर्य-सारसनिर्मित; उत्कृष्ट सौंदर्याच्या रसाची तयार केलेली. श्लोक १३१. चरण १–मुखचंद्र हा अमृताचा सिंधु. चरण ४–नाहीं तर हा चंद्र हरिणांकित (हरणाचें चिन्ह असलेला) किंवा डाग असलेला असा कां? श्लोक १३२. अभुक्ता; न वापरलेल्या कोऱ्या (मुक्ता=मोतीं). सीमंतसीमपदवी; केंसांतील भांगाचें स्थान. येकावळीयुत; एकावलीसहित. श्लोक १३३. हृदयारविंदीं; हृत्कमलावर. अंगुळीकाधिरूढा; बोटांत घातलेल्या. श्लोक १३४. आकर्ण; कानांपर्यंत. षट्पदवृंद; भृंगसमूह. श्लोक १३६. व्यंजत्स्तनी; जिचे स्तन स्पष्ट दिसून येण्याइतके उन्नत होते अशी. कळहंसगामिनी; कलहंसासारखी गति असलेली, मंदगामिनी. नितंबार्पितरत्नमेखला; कटिप्रदेशावर रत्नखचित कंबरपट्टा घातलेली. हेम-शृंखळा; सोन्याच्या सांखळ्या.

पृष्ठ ११२. श्लोक १३७. कुंडलमंडितेक्षणा; कुंडलांनीं शोभायमान होणारे नयन असलेली. (वास्तविक 'कुंडल' हा कानांतील दागिना आहे.) शुचिस्मिता; शुभ्रहास्याची. (हास्याचा रंग पांढरा असतो असा कविसंकेत

आहे.) पक्व...धरा; पिकलेल्या तोंडल्याचे भाऊच असे ओंठ असलेली; तिचे ओंठ तोंडल्यासारखे लाल होते हा भाव. **दृष्टिगोचरा होय**; दृष्टीस पडली. श्लोक १३८. **व्रीडावलोकनविमिश्र**; सलज्जावलोकनानें–पहाण्यानें–युक्त. **मनोजफासां**; कामदेवाच्या जाळ्यांत. श्लोक १४०. **भगवदाप्तिस**; परमेश्वरप्राप्तीला. श्लोक १४१. चरण १ व २–डाव्या करकमलानें केश-पाश सांवरून, व कटाक्षांच्या बाणांनीं (अपांग विशिखीं) इतर राजांना दूर करून. श्लोक १४२. **तन्मुखसरोरुह**; तिचें मुखकमल. श्लोक १४३. **उमगीत**; ओळखीत. **मानसा**; मानससरोवराला. **परमहंसकुळावतंसीं**; परमयोग्यांच्या कुलाला ललामभूत होणाऱ्या श्रीकृष्णाच्या ठायीं. या व पुढील दोन श्लोकांतील उत्प्रेक्षा अलंकार फार सुंदर आहेत.

पृष्ठ ११३. श्लोक १४४; **चातकप्रणयिनी**; चातकाची स्त्री. **निदाघ-तप्ता**; उन्हानें संतप्त झालेली. **नवघनाभिमुख**; नवीन मेघाकडे. **तृषार्ता**; तहानेनें पीडित होऊन. श्लोक १४५. **विषयांकुरमालचारा**; केवळ विषयरूपी कोंबांचा चारा (कोंवळा व म्हणून त्याग करण्यास कठीण.) श्लोक १४६; प्रयागतीर्थावरील गंगा, यमुना, सरस्वती या तीन नद्यांच्या संगमाला 'त्रिवेणी संगम' म्हणतात. या संगमावरील वटवृक्षावर पिंड दिला म्हणजे मोक्ष मिळतो अशी समजूत आहे. या श्लोकांत भीमकी व तिच्या सख्या यांचा त्रिवेणी संगम कल्पिला असून श्रीकृष्ण परमात्मा हा (वट महीरुह) वटवृक्ष कल्पिला आहे. हें फार सुंदर रूपक आहे. श्लोक १४९. **मुखेंदुसानुग्रह**; 'मुखेंदु' व 'सानुग्रह' हे दोन निरनिराळे शब्द घ्यावेत. **सानुग्रह**; अनुग्रहपूर्वक.

पृष्ठ ११४. श्लोक १५१. **कुंडलांचा**; या ऐवजीं 'कुड्मलांचा' (फुलांच्या कळ्यांचा) असा शब्द असता तर अर्थ लागता. **धम्मिल्ल**; केशकलाप. **संवेष्टिला**; गळ्याभोंवतीं घातला. **रत्नावतंसद्युति**; रत्नखचित दागिन्यांची प्रभा. श्लोक १५२; **हीरांगदें**; हिरेजडित अंगदें; बाहुभूषणें. श्लोक ३५१; **श्रीवत्सलक्ष्मीस**; श्रीवत्साच्या ऐश्वर्याला (कृष्णाच्या वक्षस्थलावर विशेष शोभा येत होती.) **नाभिसरोजगामा**; नाभिकमलाच्या मध्यभागीं. **त्रिदिव-स्रवंती**; देवनदी जान्हवी (गंगा). श्लोक १५५. **आविर्भवे**; प्रकट होई. चरण २–किंवा शृंगाररसानें अवतार घेतला. श्लोक १५६; अर्थ (?)

श्लोक १५७. **विश्वमनोभिरामा**; अखिल विश्वाच्या मनाला मनोहर वाटणारा. श्लोक १५९. **यदूद्वह**; यदुवंशोद्भव कृष्ण. **तिर्यङ्मुखी**; वाकड्या नजरेनें किंवा चोरून पहाणारी; एकीकडे तोंड फिरलेली. श्लोक १६०; **सौजन्याचा निर्वाह**; सौजन्याची वर्तणूक.

पृष्ठ ११५. श्लोक १६१. **नवोढत्वें**; नवीन लग्न झाल्यामुळें. श्लोक १६२. **पृथुश्रोणिश्रांता**; स्थूल अशा जघनभागामुळें श्रांत झालेली. **उदितमदना**; मनांत कामविकार उभ्दूत झालेली. **खिन्नवदना**; मुखावर घर्मबिंदु असलेली. **सफळनयना**; जिच्या नेत्रांचें पारणें फिटलें आहे अशी. **कुंदवदना**; कुंदकळयांप्रमाणें दांत आहेत जिचे अशी. श्लोक १६४. **सत्वाचें**; प्रेमाच्या सात्विक विकारांचें. श्लोक १६५. **जवदाणें**; (?). **उतटती**; तुटती. **घर्मोदकण**; घर्मबिंदु. श्लोक १६६. **निवाडें**; हौसेनें. श्लोक १६७. **प्रकृतिपुरुषां**; रुक्मिणी ही प्रकृति किंवा माया; व श्रीकृष्ण हा पुरुष किंवा परमात्मा. **प्रपंचाविष्टांचा**; प्रपंचांत शिरलेल्या संसारी जनांचा. **हृदयग्रंथि**; मनाचा संशय किंवा किंवा भीति.

पृष्ठ ११६. श्लोक १६८; **त्रिदशननगरी**; देवनगरी अमरावती. **विमोक्ता बंधाचा**; संसारबंधनांपासून मुक्त करणारा. चरण ४.—आधीं ज्याच्यावर फुलें घातलीं होतीं अशा माथ्यावर, मस्तकावर, ( देवांनीं ) कल्पवृक्षाच्या फुलांची वृष्टि केली. श्लोक १६९. **कुरवंडी करणें**; ओवाळून टाकणें. श्लोक १७०. **विनीतत्वें**; नम्रपणानें. **बद्धांजळि**; हात जोडून. श्लोक १७१. **हाहाहूहूप्रभृति**; 'हाहा' व 'हूहू' हे दोन गंधर्व होते. **स्वारस्यें**, सुरसपणामुळें. **अधरिती**; धिःकार करिती. श्लोक १७३. **स्वपुरगमनोद्योग**, आपल्या नगरीकडे जाण्याचा उद्योग.

पृष्ठ ११७. श्लोक १७५. **सदन**; घर, आधार. श्लोक १७७, **पतितनिवहोद्धारक**; पतितजनांचा उद्धार करणारा. **निवह**; समुदाय. श्लोक १७९. **अनियत**; अनिश्चित. **सदसद्वस्तु**; सत्य व असत्य पदार्थ. **सुखसंदूक**; सुखाची पेटी.

परिशिष्ट

# संस्कृत काव्यांतील कांहीं थोडे समानार्थक उतारे.

## सर्ग दुसरा

संपूर्ण प्रत–श्लोक ३.
शालोपयोगी प्रत–श्लोक २.
} प्रजाः प्रजाः स्वा इव तन्त्रयित्वा ।
(शा. ५.)

सं. प्रत–श्लोक–६.
शा. प्रत–श्लोक ५.
} एकमेव नौ जीवितं द्विधास्थितं पुनःशरीरम् ।
(शा. ६.)

सं. प्रत–श्लोक २७. १ तदीयमानीलमुखं स्तनद्वयम् । (रघु. ३–८.)
२ मुखेन सालक्ष्यत लोध्रपांडुना । (रघु. ३–२.)

सं. प्रत–श्लोक ३०–३२. न मे ह्रिया शंसति किंचिदीप्सितं
स्पृहावती वस्तुषु केषु मागधी ।
इति स्म पृच्छत्यनुवेलमादृतः
प्रिया सखीरुत्तरकोसलेश्वरः ॥ १ ॥ (रघु. ३–५.)

सं. प्रत–श्लोक ३४. नहीष्टमस्य त्रिदिवेऽपि भूपतेरभूदनासाद्यमधिज्य धन्वनः । (रघु. ३–६.)

सं.प्रत–श्लोक ३८.
शा.प्रत–श्लोक २१.
} सर्वोपमाद्रव्यसमुच्चयेन । यथा प्रदेशं विनिवेशितेन ॥
सा निर्मिता विश्वसृजा प्रयत्नात् । एकस्थ सौंदर्य दिदृक्षयेव ॥ १ ॥ (कुमारसं.)

## सर्ग तिसरा

सं. प्रत–श्लोक ३७. पटुपटहध्वनिभिर्विनीतनिद्रः। (रघु. ९).

सं. प्रत–श्लोक १००. हला पश्य नलिनीपत्रांतरितमपि सहचरमपश्यंती आतुरा चक्रवाक्यारटति। (विक्रमो०)

सं. प्रत–श्लोक १०९. प्रजागरात् खिलीभूतस्तस्याः स्वप्ने समागमः ॥
बाष्पस्तु न ददात्येनां द्रष्टुं चित्रगतामपि ॥ १ ॥

सं. प्रत–श्लोक १२३. न पुनरेति गतं चतुरं वयः। (रघु. ९.)

## सर्ग पांचवा

सं. प्रत–श्लोक ८. संक्रीडन्ते मणिभिरमरप्रार्थिता यत्र कन्याः ॥ (मेघ.)

संस्कृत काव्याशीं परिचय असलेल्या वाचकांना आणखी असे अनेक उतारे सांपडतील. स्थलसंकोचास्तव त्या सर्वांचा या ठिकाणीं उल्लेख करतां येत नाहीं. केवळ उदाहरणें म्हणून कांहीं थोडीं स्थळें वर दाखविलीं आहेत.

सामराजविरचित 'रुक्मिणीहरण'

# कठिण शब्दांचे अर्थ.

अ

अकिंचन—गरीब, दीन
अगरु—चंदन
अगोचर—न दिसणारा
अग्रज—ज्येष्ठ, वडील भाऊ
अग्रणी—मुख्य, पुढारी
अग्रण्य—पुढारी
अंग—अवयव
अंगद—एक बाहुभूषण,
अंगना—स्त्री
अचर—स्थावर
अंचल—पदर
अजान—अज्ञाणी
अजिर—अंगण
अंजन—काजळ
अटाळा—माळा
अत्यय—शेवट; नाश
अत्याहित—अत्याचार
अद्वैत—जीव व ब्रह्म यांचें ऐक्य
अधमत्व—हीनता, कमीपणा
अधिप—राजा
अधीर—उतावीळ
अधोक्षज—विष्णु
अध्यपणें—शिकविणें
अंधकारि—अंधक दैत्याचा शत्रु, शंकर
अंधंतम—तमोमय प्रदेश
अनय—अन्यायाचें वर्तन
अनंग—मदन, काम
अनन्य—दुसरीकडे लक्ष जाऊं न देतां
अनभिमत—अप्रियकर, त्रासदायक
अनाभिलषित—निरिच्छ
अनभिज्ञ—अज्ञाणी
अनया—श्रीकृष्ण
अनर्घ्य—मूल्यवान
अनर्ह—अयोग्य, अनुचित कर्म
अनवरत—सतत
अनाप्त—परका, शत्रु
अनार्य—उद्धट, असंभावित
अनिमिष—एकसारखी, पुष्कळ वेळ
अनियत—भलत्या वेळीं
अनिश—एकसारखा, रात्रंदिवस
अनुग्रह—कृपा
अनुपद—पाठोपाठ, तत्काळ
अनुपयोग—निरुपयोग
अनुरक्त—प्रेमबद्ध
अनुराग—प्रेम
अनुसंधान—लक्ष, चित्त
अनुज्ञा—आज्ञा, परवानगी

अनृत–असत्य, खोटें
अन्वय–वंश
अपत्रप–निर्लज्ज
अपर्णा–पार्वती
अपवर्ग–वाईट गोष्टी
अपवाद–निंदा
अपशब्द–दुरुक्ति, शिवी
अपसद–दुरात्मा, दुष्ट नीच
अपांग–कटाक्ष
अपार–अनंत, अमर्यादित
अपूर्त–अपूर्ण
अंबर–वस्त्र
अंबुज–कमल
अभिधा–नांव
अभिलषित–आवडती गोष्ट, इच्छा
अभिनव–नवीन, अपरिचित
अभिराम–सुंदर
अभिज्ञ–कुशल, शहाणा
अभिज्ञान–खूण
अंभोधि–समुद्र
अमासा–दुबळा
अमूप–अमोप, पुष्कळ
अमोघ–न चुकणारा
अयोनिज–विष्णु, ईश्वर
अरवार–हलका
अर्चन–पूजा
अर्णव–समुद्र
अर्थी–याचक
अलक–केंस

अलगट– स्वतंत्र, फाजील
अलिंद–ओटा
अवकाश–रिकामी जागा, पोकळी
अवचट–अकस्मात्
अवतीर्ण–उत्पन्न झालेला
अवद्य–निंदा, निंदास्पद भाषण
अवधारणें-खात्री बाळगणें,लक्षांत ठेवणें
अवरोध–अंतःपूर
अवलंब–आश्रय
अवहेळणें–अवहेळणा, हेटाळणी करणें
अविचारिका- अविचारी स्त्री
अविच्छिन्न–निवळ
अविदग्ध–मूर्ख
अविदित–अज्ञात
अविनय–उद्धटपणा
अविरत–सतत, एकसारखा
अविवेक–अविचार
अविवेकी–मूढ, अविचारी
अविषय–अगोचर, अज्ञेय
अविहित–संपूर्ण, अविभागलेला
अव्यक्त–निराकार, निर्गुण परमात्मा
अव्हाट–आडमार्ग
अशन–खाणें
अंशुक–वस्त्र
अशेष–सर्व
अंस–खांदा
असाधारण–अलौकिक
असार–निःसत्त्व, फोल
असाली–राक्षसीण, कृत्या

असीम—अपरंपार
असोशी—उत्कट इच्छा
अहाळणें—पोळणें
अक्षवाण—ओवाळणें, औक्षण

## आ

आकरोट—अक्रोड
आकळणें—समजणें, ताब्यांत ठेवणें
आकारणें—आकार देणें, आकार येणें
आखंडळ—इंद्र
आगळा—मोठा, श्रेष्ठ, अधिक
आगळा—अर्गळा, अडसर
आचमनीय-चूळ भरून टाकण्याचें पाणी
आतपत्र—छत्री
आतळणें—भेटणें, स्पर्श करणें
आतुडणें—भेटणें
आतंक—भीति
आत्मज—मुलगा
आदरणें—मान देणें, स्वीकारणे
आदर्श—आरसा
आनन—तोंड
आनाय—जाळें
आंदोलणें—हेलकावणें
आंदोलिका—पालखीसारखें एक वाहन
आपगा—नदी
आपण—बाजार
आपती—आपत्ति, संकट
आभा—तेज, कांति
आयु—आयुष्य
आयुध—शस्त्र
आरातिक—आरती
आराधक—पूजा करणारा, भक्त
आराधन—पूजा, प्रसन्न करून घेणें
आलय—घर
आलोडणें—पारंगत होणें, हस्तगत करणें
आवरणें—आवरतें घेणें, आटोपतें घेणें
आवर्त—पाण्यांतील भोंवरा
आवळी—पंक्ती, ओळ
आसक्त—अनुरक्त, मन गुंतलेला
आसक्ति—अनुराग.

## इ

इंगळ—निखारा
इंद्रनील—एक प्रकारचें रत्न
इष्ट—यज्ञयागादि कर्म

## ई

ईशान—शंकर

## उ

उगंड-डा—सुटका, उद्धार
उगवणें—उलगडा करणें
उगला—उगाच, व्यर्थ
उच्छून—फुगलेला, उंचावलेला
उजवणें—लग्न लावणें
उज्ज्वल—चकचकित, प्रकाशमान
उटणें—स्वच्छ करणें, लेप देणें
उटाळणें—उत्पन्न होणें, उठणें, निघणें
उठाण—उन्नतता, उठावदारपणा
उडु—नक्षत्र, तारा
उतटणें—फाटणें
उतती—उदबत्ती

उत्कट—अतिशय, मोठा
उत्पल—कमल
उत्तीर्ण—उतराई
उदधि—सागर, समुद्र
उदन्त—वार्ता
उदास—तटस्थ, निरपेक्ष
उद्धत—उद्धट
उद्योत—प्रकाश
उद्वर्तणें—उटणें वगैरे अंगाला लावणें
उद्वस—उध्वस्त
उद्विग्न—खिन्न
उधंटा—उद्धट आचरणाची
उधार -कमीपणा
उन्नत—उच्च, श्रेष्ठ
उन्माद—कैफ, गर्व
उन्मूळणें—मुळापासून उपटणें
उपकंठ—आसपासचा प्रदेश
उपचडा—उमाळा, आवेग
उपधान—उशी
उपन्यास—विवरण
उपवन—बाग
उपस्थान—जवळ आणणें, पूजा, सेवा
उपायन—नजर, भेट
उपासना—सेवा
उपेक्षणें—दुर्लक्ष करणें, अनादर करणें
उपेक्षा—हेळसांड, दुर्लक्ष
उपेंद्र—विष्णु
उबगणें—कंटाळणें, त्रासणें
उबाळा—त्रास

उमळणें—मुळापासून उपटणें
उमाधव—शंकर
उमासा—उसासा
उल्का—आकाशांतून तुटलेला तारा
उसंत—विश्रांति

ऊ

ऊरु—मांडी
ऊर्मिका—अंगठी

ऋ

ऋजुत्व—सरळपणा
ऋणानुबंध—पूर्वसंबंध, पूर्वजन्मींचा योगायोग

ओ

ओज—तेज
ओदन—भात

औ

औद्धत्य—उद्धटपणा

क

कटकटी—त्रास, श्रम
कटि—कंबर
कदंब—कळंबाचा वृक्षसमुदाय
कनक—सोनें
कपाट—दरवाजा
कपाळी—शंकर
कपोत—कबूतर, पारवा
कपोल—गाल
कबरी—केशकलाप
कमला—लक्ष्मी
करट—गंडस्थल

करनाल—वाद्यविशेष
करपत्र—करवत
करि—करणी
करिणी—हत्तीण
करीणा—हकीगत, इतिहास
कर्णपिशाचिका—गुप्त गोष्ट सांगणारी
कर्णभूषा—कानांत घालण्याचा दागिना बुगड्या, कुडीं वगैरे
कर्पूरमाळा—कापराची माळ
कलाधर—चंद्र
कलापी—मोर
कल्पद्रु—कल्पवृक्ष
कल्पद्रुम—इच्छित वस्तु देणारा वृक्ष, कल्पवृक्ष
कवाड—दरवाजा
कषणें—घासणें
कळि—भांडण
काटणें—कीट चढणें, मलीन होणें
काठी—आधार
कानन—अरण्य
कामना—इच्छा
कामुकी—इच्छा करणारी, लोभी
काश्मीर—केशर
कारुक—चितारी, कारागीर
कार्पण्य—कंजुषपणा
किर्मीरित—नानारंगांची, चित्रविचित्र
किलीं—किल्ली
किशोर—लहानपोर
किसलय—पालवी, कोमल पल्लव
कीर—पोपट
कुच—स्तन
कुचकुच—कुजबूज
कुमार—कार्तिकेय
कुरंगी—हरिणी
कुड्मल—कळी
कूर्पास—चोळी, काचोळी
कूर्पासक—चोळी
कोक—चक्रवाक पक्षी
कोठी—कोठार, साहित्य ठेवण्याची खोली
कोरकें—कोरान्न, कोरडें अन्न
कोरदार—कंगणीदार
कंज—कमल
कांचन—सोनें
कांची—कंबरपट्टा
किंकिणी—लहान घंटा
कुंतल—केंस
कोंचकी—पागोटें
कृतांत—यम
कृपाणी—खंजीर, खड्ग
कृशानु—अग्नि
कृष्णसार—हरीण
क्रंदणें—ओरडणें
क्रम—वेदपठणाचा एक प्रकार
क्लीब—नपुंसक
क्वारी—मुलगी

## ख

खडाणी—लाथ मारणारी गाय

खदिर—कात, खदिरसार
खासा—मुख्य सरदार
खिरणी—एक लहान फळ
खिसमिस—बेदाणा
खोती—मक्ता
खंज—लंगडा
खंजन—पक्षि विशेष
खोंचली—खोंच झाली, दुःखी झाली

ग

गणक—ज्योतिषी, जोशी
गदाग्रज—कृष्ण
गद्य—वृत्तबद्ध रचना नसलेलें लेखन
गंभीर—खोल
गरळा—कडु कारळें किंवा दुसरें एखादें औषध चावून त्याचा तान्ह्या मुलास रस घालतात तो.
गरिमा—पुष्टपणा, मोठेपणा
गाढी—मोठी
गाणेश—गणपतिभक्त
गाथा—गीत; गाणें
गार्हपत्य—अग्नि
गुडी—पताका
गुण—धर्म, भाव
गुह्यक—यक्षकिन्नरांसारखे कुबेर सेवक
गेह—घर
गोडंबी—बिब्याच्या आंतील बी
गोधूम—गहूं
गोपानशी-सी—सज्जाच्या खांबाखालीं येणारा तुळईचा भाग
गोमायु—कोल्हा
गोमेद—एक रत्न
गोसी—गोष्ट
गंगालय—धंगाळ
गंसणें—गवसणें, शोधून काढणें
गोंडाळ—गोंडस
गोंवणें—घेरणें, गुरफटणें, बांधणें
ग्रंथी—गांठ
गृहपति—अग्नि

घ

घट—घागर
घटिका—प्रत्येक घटकेला
घडीत—घडण
घाट—आकार
घालफेडी—गडबड, घालमेल
घालाघाली—गोंधळ, धांदल
घुरट—घाणेरडी
घोंग—मोठें

च

चतुरानन—ब्रह्मदेव
चतुर्वक्त्र—ब्रह्मदेव
चय—समुदाय
चर—जंगम
चलथ चवड, रास, चळथ
चार—चपळ, उनाड
चामर—चवरी
चार—हेर
चिकसा—उटणें, सुगंधी द्रव्य
चित्तांक—गळ्यांतील एक दागिना

चिरीटी—चिरडखोर
चूचुक—स्तनाचें अग्र
चूडा—बांगड्या
चेडें—चेटुक
चैतन्य—परमात्मा, ब्रह्म
चोवा—चंदनाची उटी
चौकी—लहान, चौरंग
चौढाळणें—गोलंकार करणें
चंडातक—चोळी, काचोळी
चंद्रशाला—गच्ची
चिंतामणी—इच्छित वस्तु देणारा मणी
चिंतावणें—चिंता करणें
च्छांदस—च्छांदिष्ट, लहरी

छ

छमीना—शामियाना, डेरा
छाया—कांति, टवटवी, सावली
छुरिका—सुरी

ज

जगती—पृथ्वी
जघन—ढुंगण
जडता—मंदपणा
जनयित्री—माता
जयीं—जेव्हां
जरा—म्हातारपण
जलयंत्र—कारंजें
जव—हातांतील बांगड्यांसारखा दागिना
जवन—वेगवान
जाकळणें—पोळणें, कळवळणें
जानु—गुढगा
जाया—पत्नी
जिवविणें—जिवंत ठेवणें, जगविणें
जिव्हार—अंत:करण, काळीज
जिव्हाळा—झरा, अंत:करण
जेठी—मल्ल, पैलवान
जोहरी—रत्नपारखी
जंगम—चल, एका ठिकाणाहून दुसरीकडे हलवितां येणारा
जंबूक—कोल्हा
जांब—पेला
जांबूनद—सोनें

झ

झळंबणें—पाझरूं लागणें
झळाळी—तेज, चकाकी
झांपडी—झांपड, गुंगी
झांस—धमकावणी, तळमळ

ट

टोप—मुकुट, शिरस्त्राण

ड

डालणें—डावलणें, प्रतिकार करणें, बाजूला लोटणें
डांभा—डौल, गर्व

ढ

ढाल—ढंग, साहसकर्म

त

तकवा—धीर, बळ
तगटी—भरजरी
तटणें—थांबणें, बंद पडणें

तत्त्व–खरी गोष्ट, वस्तुस्थिति
तत्त्वार्थ–सार
तनुता–क्षीणता
तन्वी–नाजुक, सडपातळ अंगाची स्त्री
तमिस्र–अंधकार
तरल–अस्थिर, न ढळणारें, चकाकणारें
तरला–चपल स्त्री
तल्य–बिछाना
ताटस्थ–तटस्थ वृत्ति, औदासिन्य
ताटक–तानवडा, एक कर्णभूषण
तानवडा–एक कर्णभूषण
ताफता–एक उंची रेशमी वस्त्र
तालवृंत–पंखा
तिरकुट–तीळकूट, तीळ कुटून केलेली चटणी
तिवाटी–विधुळवाटी
तिवाशी–गादी, गालिचा
तिळवा–तिळाचा लाडू
तुरंगी–घोडी
तुहिनकर–चंद्र
तोडर–पायांत घालण्याचा एक दागिना
तंती–ओळ, मार्ग
तांखडी–हुशार, शहाणी
तांत्रिक–तंत्रशास्त्रज्ञ
तांबूल–विडा
तोंडखोडी–तोंड टाकून बोलण्याची खोड असणारा
तृष्णा–वासना
त्रपा–लज्जा

थ

थटी–कणगी, सांठविण्याची जागा
थारणें–स्थिर होणें
थोकणें–थांबणें
थोपविणें–थांबविणें

द

दमन–पराभव
दमामा–मोठा नगारा
दरोगीण–दासींवर देखरेख करणारी मुख्य दासी
दल–पान
दळदर–दळदार, जाड
दापणें–दटावणें, दाबणें
दायी–दाई, उपमाता
दारा–पत्नी
दारिका–कन्या
दावें–दोरी
दाशार्ह–यादव
दिनमणी–सूर्य
दिदृक्षा–पाहण्याची इच्छा
दीक्षा–नेहमींची रीत
दुकूल–वस्त्र
दुरदृष्ट–अदृष्ट, दैव
दुरळ–कडक, तीव्र
दुराशा–दुष्ट वासना
दुरित–पाप
दुर्निवार–प्रतिकार करण्यास कठीण.
दुर्वह–वाहण्यास, पार पाडण्यास कठीण

दुलडी–दूड
देखी–दृष्ट
देवई–कृष्णमाता देवकी
देवडें–वांकडें
देवढें–एकाशीं एक लागलेलें
देहली–उंबरठा
दैनंदिन–रोजचें
दैवज्ञ–जोशी, ज्योतिषी
दैवेकरी–दैववान
दोहणें–दूध काढणें
दौवारिक–द्वारपाल, रक्षक
दौश्चित्य–दुष्ट विचार
दृष्ट–वाईट, घातुक नजर
द्युति–कांति
द्वारवती–द्वारावती, द्वारका नगरी
द्विजपति–चंद्र, ब्राह्मणश्रेष्ठ
द्विजराज–चंद्र
द्विधा–दुभंग
द्विपवर–उत्तम हत्ती
द्विरद–हत्ती
द्वैपायन–शुक

ध

धटी–मूल्यवान रेशमी वस्त्र
धन्वी–धनुर्विद्येंत प्रवीण असलेला, धनुर्धारी
धम्मिल्ल–केशकलाप, वेणी
धसणें–घुसणें
धाणें–तृप्त होणें
धाता–प्रकार, मार्ग, ब्रह्मदेव
धात्रा–दाई
धाम–तेज, वसतिस्थान
धुडावणें–धुडकावून लावणें, नाहींसें करणें
ध्वांत–अंधकार

न

नग–दागिना
नर्द–नरद, सोंगटी
नलिका–नळी
नलिनी–कमळ
नवोढा–नव वधू
नाति–नात
नाराच–बाण
नारिकेल–नारळ
नालीक–बाण, बंदूक
नासिका–नाक
निकसी–मऊ, गच्चाळ
निकेत–स्थान
निकेतन–स्थान, घर
निखिल–सर्व
निचय–समुदाय
नितंब–ढुंगण
नितंबिनी–स्त्री
नितंबणें–चकाकणें, शोभणें, सुंदर दिसणें
निदान–रोगपरीक्षा, चिकित्सा, कारण
निदेश–आज्ञा, निरोप
निधान–ठेवा
निधायी–विश्वासांतील स्त्री किंवा दासी

निधि–समुद्र, खजीना, द्रव्याचा सांठा
निपट–खरोखर, सर्वस्वी
नियत–खरोखर
नियोग–काम, आज्ञा
नियोजणें–जुंपणें, लावणें
नियोजिली–ठेवली, योजना केली
नियंता–नियमन करणारा, ताब्यांत ठेवणारा
निरत–तत्पर
निरसत–निरसन
निरतिशय–अतोनात
निरय–नरक
निरवधि–अतिशय
निराकार–आकाररहित
निराळ–आकाश
निरीह–निरिच्छ
निरोधणें–रोखणें, प्रतिबंध करणें
निरंजन–निर्विकल्प, शुद्ध
निर्गम–बाहेर जाणें, सोडून जाणें
निर्द्वंद्व–सुखदुःखरहित
निर्माण–उत्पन्न
निर्वाण–सुटका
निर्वासन–वासनारहित, निरिच्छ
निर्वाह–कार्यक्षमता, अंगीकृत कार्य पार पाडण्याचा निश्चय
निर्विकल्प–अज्ञेय, अतर्क्य
निर्विकारी–विकाररहित
निलज–निर्लज्ज
निलय–घर, वसतिस्थान
निवह–समुदाय
निवाडें–शेवटीं, अखेरीस
निवाणी–खराब, वाईट
निवास–वसति, राहणें
निवेदणें–समर्पण करणें
निवृत्ति–वैराग्य
निश्चेतना–मूर्च्छित
निश्वास–सुस्कारे, उच्छ्वास
निषद्या–जागा, स्थान
निष्किंचन–दारिद्री
निःसहांगी–जिच्या अवयवांना सहन होत नाहीं अशी
निःसंग–तटस्थ, उदासवृत्तीचा
नीरद–मेघ
निराजणें–निरांजन ओंवाळणें
नीवि–निऱ्या, निऱ्याची गांठ
नीशार–मच्छरदाणी, धाबळी
नैपुण्य–प्राविण्य.
नैय्यायिक–न्यायशास्त्र जाणणारा
नैर्ऋत्य–नैर्ऋतेकडची देवता, नैर्ऋतेय
नंदिनी–मुलगी
नांदवणें–पुष्कळ दिवस सुखानें राहूं देणें, टिकविणें
न्याहाली–पराची गादी
न्यून–उणें, कमी

प

पट–वस्त्र, पटका
पटक–वस्त्र
पटह–नगारा, ढोल

पडण—संकट
पण्यांगना—वारांगना,
पतद्ग्रही—तस्त
पद्मराग—माणिक, लाल
पद्य—वृत्तबद्ध रचना.
परब्रह्म—परमात्मा
परभाग—उत्तम गुण
परभारीं—परस्पर
परमहंस—संन्यासी
परमार्थ—आत्मज्ञानाचा किंवा मोक्षाचा विचार
परंपरा—ओळी
परात्पर—सर्वश्रेष्ठ
परामर्ष—विचारपूस, समाचार
परावृत्ति—परत फिरणें
परिचर्या—सेवा
परिचारिका—दासी
परिजन—सेवक, दास
परिणत—ज्ञानवृद्ध
परिधान—वस्त्र नेसणें, पांघरणें
परिपाक—परिणाम, फळ
परिपाटी—रीत, परिपाठ
परिवेषण—वाढप
पल्लव—पदर
पल्ली—पाल
पवणें—प्राप्त होणें, मिळणें
पाखर—घोड्याची किंवा हत्तीची झूल
पाचारणें—बोलावणें
पाची—एक रत्न, पांच, शिपायी, वीर
पाटाउ—उंची रेशमी वस्त्र, पाटाव
पाड—महत्त्व, मोठेपणा
पातित्य—अधःपात
पातें—पापणी
पाद्य—देवास स्नानाचे वेळीं घालण्याचें पाणी
पान—कर्णभूषण विशेष
पाभर—गरीब बिचारें
पायोनिधि—समुद्र
पारणें—समाधान, तृप्ति
पार्थ—राजा, अर्जुन
पार्श्व—भाग, बाजू
पालव—पल्लव, पदर
पाव—पाय
पावक—अग्नि
पावणें—प्रसन्न होणें
पाशपाणी—वरुण
पाळा—वेढा, समुदाय
पिक—कोकिळ पक्षी
पिपासा—तहान
पिपीलिका—मुंगी
पिशाची—डाकिनी, भूत
पिसाळणें—वेड्यासारखें वागणें
पिसें—वेडें
पीठ—आसन
पीयूष—अमृत
पुराण—प्राचीन, जुना
पुरारि—शंकर
पुरोडाश—हविर्द्रव्य

पुलीन—वाळवंट
पुष्पेषु—मदन
पूगीफल—सुपारी
पूर्त—दानधर्माचीं कृत्यें
पेषण—दळणें
पैशुन्य—लबाडी, चहाडखोरपणा
पोखती—पोक्त, प्रौढ
पोल्हार—पैंजण
पौराणिक—पुराण वाचणारा, पुराणीक
पौरुष—पराक्रम, शौर्य
पंचबाण—मदन
पंचेषु—मदन
पंजर—पिंजरा
पंवाडा—पराक्रम
पांजण—नव्या वस्त्रास खळ देणें
पांड्य—एका देशाचें नांव
पोंहची—पोंची ( पुरुषाच्या मनगटावरील एक दागिना)
पौंड्रक—चिन्ह
प्रगट—उघड
प्रगल्भता—प्रौढपणा, शहाणपणा
प्रोच्छन—अंग पुसणें
प्रणति—नमस्कार, नमन
प्रतिवचन—उत्तर
प्रतीहारिका—द्वारपालिका
प्रथित—विख्यात
प्रपंची—संसारिक
प्रमाणगी—परवानगी, हुकूम
प्रमुदित—आनंदित
प्रवर्तणें—आरंभ करणें
प्रवाह—कार्यक्रम
प्रवाळ—पोंवळें
प्रशस्त—विस्तीर्ण ऐसपैस
प्रसाद—काव्याला स्वाभाविकपणें येणारी सुबोधता
प्रसु-सू—माता
प्रस्ताव—पश्चात्ताप
प्रक्षेप—टाकणें, फेकणें
प्राकार—तट
प्राक्तन—दैव
प्रारब्ध—नशीब, दैव
प्राशन—भक्षण
प्रासाद—राजवाडा

## फ

फरा—घेर, आवार
फरास—बिछाईत घालणारा
फांकणें—लांब जाणें
फुलेल—फुलांचें अत्तर, तेल

## ब

बरवा—सुंदर, चांगला
बजागी—हट्टी, भांडखोर
बडिश—बलिश, मासे धरणाऱ्या कोळ्याच्या दोरीला मासा अडकण्याकरितां बांधलेला गळ
बधणें—घडून येणें, जमणें, वश होणें, अनुकूल होणें
बराडी—भिकारी, आशाळभूत
बर्ह—पीस

बलाई—इडापिडा
बहळ—पुष्कळ
बाट—लबाड
बाड—तंबूची कनाथ, पडदा
बाफता- रेशमी वस्त्र
बाहणें—बोलावणें
बाहे–हात
बिजवरा—कपाळावरचा एक दागिना
बिडाल—मांजर
बिदी—रस्ता, गल्ली
बिरडें—गांठ
बीरुद—प्रतिज्ञा, बाणा, ब्रीद
बुझवणें—समजूत करणें
बेसर—नथ
बोज—प्रतिष्ठा, महत्त्व
बोटवा—गव्हला
बंदी—भाट, स्तुतिपाठक
ब्रह्म—चैतन्य, परमात्मा
ब्रह्मांड—विश्व

भ

भव—संसार
भाक—वचन
भान—ज्ञान, कल्पना
भामिनी—रागावलेली स्त्री
भारती—वाणी
भाव—भक्ति, प्रेम, स्वभाव
भावणें—वाटणें
भीरु—भित्री स्त्री
भुजिष्या—दासी
भूत—प्राणी
भूभुज—राजा
भूमीरुह—वृक्ष
भूषा—दागिना
भेकी—बेडकी
भेण—भय
भेरी—नौबत
भेषज—औषध
भोंवणें—फिरणें, घेऱ्या घालणें

म

मणिबंध—मनगट
मधुपर्क—अतिथीची पूजा
मध्य—कंबर
मध्यस्थ—मध्यस्थी
मनस्वी—मन ताब्यांत असलेला
मनोज—मदन, काम
मन्मथ—मदन
मरीच—काळें मिरें
मल्लारी—मल्हारी; खंडोबा
मल्ली—लताविशेष
महर्घ—मूल्यवान
महार्घ—महाग, दुष्प्राप्य
महाप्रस्थान—मृत्यु
महालक्ष्मी—आदिशक्ति महामाया
लक्ष्मी
महिषी—म्हैस
मागती—पुन्हा
माज—कंबर
मातुलिंग—महाळुंग

मातुल—मातुल, मामा
माध्व—मध्वसंप्रदायी
मानणें—वाटणें, आवडणें
मान्य—पूजनीय, सन्माननीय
माया—मोह, अज्ञान
मालती—गव्हल्यासारखा खिरींत घालण्याचा एक पदार्थ
माव—माया, कपट
माष—उडीद
मिहिर—सूर्य
मीन—मासा
मीमांसक—मीमांसा जाणणारे
मुकुलित—मिटलेलें
मुक्ता—मोती
मुक्ताफल—मोती
मुखरणि—मुखरण, मुख्य
मुग्ध—वेडा
मुग्धा—सोळा वर्षांच्या आंतील स्त्री
मुदा—मुद्दा, मुख्य गोष्ट
मुद्रिका—अंगठी
मुरणें—तृप्त होणें
मुष्टिक—बुक्क्या मारून लढणारा
मुसली—बलराम
मुळचिठ्ठी—मूळचिठ्ठी, आमंत्रणपत्रिका
मूर्धन्य—श्रेष्ठ, मुकुटमणि
मूस—आटणी, साचा, घडण
मूळ—बोलावणें
मेखळा—कमरपट्टा
मेचक—मेघ
मेचणें—भिऊन माघार घेणें
मेटें—चौकी, पहारा
मेध्या—हुशार, शहाणी
मोकलणें—पाठविणें, सोडणें
मोगरेल—मोगऱ्याचें तेल
मोट—सांठा
मोर—नाकांतला एक दागिना
मोरछळ—मोरचल, मोराच्या पिसांचा कुंचा किंवा चवरी
मोळा—वागण्याची पद्धत
मंचक—पलंग, झोपाळा
मंत्रवादी—मांत्रिक, मंत्र घालणारा
मंथणें—पराभव करणें; ठार मारणें
मांसल—पुष्ट
मैंद—घातकी, दुष्ट माणूस
मृगाक्षी—हरिणनयना
मृणाल—कमलाचा देंठ
मृषा—खोटें

## य

यज्वा—होमहवन करणारा
याग—यज्ञ
यान—रथ
यायजूक—नेहमीं यज्ञ करणारा
यावा—डौल
युग्म—जोडी, दोन
युगुल—जोडी, द्वय
येकदाणें—एकदाणी
येकावळी—एकावली, एकसराचा हार
येला—वेलची, वेलदोडा

येव–येणें
योग–भेट, प्रसंग, ध्यान
योगनिद्रा–समाधी
योषित्–स्त्री
यंत्र–कांहीं तरी जादु टोण्याची आकृति किंवा कोष्टक

र

रजत–रुपें
रतिपति–मदन
रती–हिरें-मोत्यें वजन करण्याचें अति लहान वजन
रत्नाकर–समुद्र
रथ्या–रस्ता
रमणी–सुंदरी, स्त्री
रय–वेग, गति
रव–आवाज, स्वर
रशना–पट्टा
रस–गोडी, रुचि
रसना–वाणी, जीभ
रसाला–सुरस, रसाळ
रसोद्रेक–रसाळ, रसभरित
रहाणें–रहाणी, वागण्याची पद्धत
रहाळ–परिचय, मार्ग
राका–पौर्णिमा
राजक–राजांचा समुदाय
राजन्य–राजांचा समुदाय
राजस–सुकुमार, सुंदर
रातणें–रममाण होणें
राति–रात्र
रामा–सुंदर स्त्री
राव–राजा
रुक्म–सोनें
रुचि–रंग
रुचिर–सुंदर
रोख–झोंक; मनाचा कल
रोखणें–बंद पाडणें, बंद पडणें
रोचकता–रुचि
ऱ्ही–लज्जा

ल

लभ्य–प्राप्त होण्यासारखी
ललना–स्त्री
लसणें–वैदूर्यमणि, एक रत्न
लक्ष्य–नेम मारण्याची वस्तु; ध्येय
लाग–संधान, प्राप्ति
लागट–लोचट, चिकटणारी
लालस–उत्कंठेनें
लासणें–भाजणें
लाहणें–मिळणें
लिगाड–खोडसाळ
लिप्त–दूषित
लेखा–किंमत, पाड
लेणें–दागिना, धारण करणें
लेवा–लेप
लैंद–दांडगें
लांसी–राक्षसीण

व

वचणें–जाणें
वत्सल–ममताळू

वदान्य—उदार
वनिता—स्त्री
वयस्या—सखि, मैत्रीण
वरदा—कुमारी
वरपंगत—वरकांती, वरवरचा देखावा, वरपांगो
वराकी—गरीब, दुर्दैवी स्त्री
वराडी—वऱ्हाडी, लग्नकार्याकरितां जमलेले लोक
वरान्न—वरण
वरोरू—सुंदर स्त्री
वर्ग्य—बांधव, भाऊबंद
वर्तणें—वर्तन करणें, वागणें
वर्षा—पावसाळा
वल्लभ—लाडका
वल्लरी—वेली
वश्य—अनुकूल
वश्या—वश
वसन—वस्त्र
वसुंधरा—पृथ्वी
वळवट—गव्हले, शेवया वळून केलेले पदार्थ
वक्षोरुह—स्तन
वाक्पति—बृहस्पती
वाखा—नाश, त्रास, पडापडी
वाजपेयी—वाजपेय नांवाचा यज्ञ करणारा
वातायन—खिडकी
वात्सल्य—प्रेम
वादित्र—वाजंत्री
वारणें—निवारण करणें, बाजूला करणें
वारांगना—नायकीण, वेश्या
वारी—पाणी, यात्रा, चालणें
वारुणी—पश्चिम दिशा
वावडणें—भटकणें
वावहणें—पळून जाणें
वासव—इंद्र
वाळक—वाळुक, काकडी
विकणें—मान्य होणें
विकत्थन—प्रौढी, गर्व
विकल्प—संशय, भ्रम
विकसणें—विकास पावणें, वाढणें, उमलणें
विखळ—दुष्ट
विखंडणें—दुःखित करणें
विघड—बिघाड, वियोग
विघडणें—बिघडणें
विचळणें—वेडा होणें
विच्छाय—फिकें, पांढरें
विजवटी—द्वाड; व्रात्य
विटंक—खुराडें
विदग्ध—शहाणा माणूस
विदेश—परदेश
विदेशी—परका
विदेही—विरक्त
विधाता—ब्रह्मदेव
विधि—ब्रह्मदेव
विधेयी—कर्तव्यदक्ष

विनीत--विनयशील, नम्र
विपारी—विरूप, कुरूप
विपंची—वीण
विप्रतिपत्ति—मतभिन्नता
विप्रश्निक—भविष्य सांगणारा; ज्योतिषी
विबुध—देव
विभक्त—भिन्न, निरनिराळीं
विभूति—रक्षा, राख
विमुख—पराङ्मुख, प्रतिकूल
विरमणें—थांबणें, शेवट होणें
विराजणें—शोभणें
विरोदी—विराली
विरोधी—विरोध करणारा
विलपणें—शोक करणें
विलसणें—शोभणें
विलसित—शोभा, सौंदर्य
विलास—सुखोपभोग, क्रीडा
विलुठणें—लोळणें
विलोचन—डोळा
विविक्त—एकांत
विवेक—विचार
विशाखा—एक नक्षत्र
विशिख—बाण
विषण्ण—खिन्न
विषय—भोग्य पदार्थ
विषाद—कंटाळा, निरुत्साह, दुःख
विसंवणें—त्याग करणें, सोडणें
विहित—नेमून दिलेलें
विहिरा—विहीर
विहंगम—पक्षी
विज्ञ—ज्ञानी पुरुष
वीचि—लाट, लहर
वीथि—मार्ग
वेधविणें--चढविणें
वेठ—बिगारी, मजूर
वेत्रधर—भालदार, चोपदार
वेदिका—ओटा
वेदी—यज्ञाचा ओटा
वेधा—ब्रह्मदेव
वैखरी—वाणी
वैदग्ध्य—चातुर्य
वो—अवो, अहो
वोघ--ओघ, प्रवाह
वोचकणें--भिणें
वोटी—ओंटी
वोड—आपत्ति
वोढी—ओढ
वोसिजणें—ओसरणें, कमी होणें
वोळघणें- चढणें, वळणें
वोहट—ओहटी;
वंचणें—फसविणें
वंचना—कपट फसवणूक
वंचविणें—फसविणें
वंद्य—वंदनीय, पूज्य
विंजण—वारा
विंजणा—पंखा
वेंघणें—चढणें
वेंचणें—खर्चणें, खर्च होणें, करणें

वेंचा निवडक भाग, उतारा
वेंटी—पदर, आंटी
वृंद—समुदाय
वृशभ—वृषभ, बैल
वृष—बैल
वृष्णि—यादव
व्यक्त—परमात्म्याचें सगुण, साकार रूप
व्यजन—पंखा
व्यवसित—व्यवसाय
व्यसन—संकट
व्यापक—व्यापून टाकणारें
व्यापार—आयुष्यांतील कृत्यें
व्रज—गोकुळ
व्रत—धार्मिक कर्म

श

शकट—गाडा, गाडी
शची—इंद्राणी
शरण्य—लक्ष्य, शरसंधान करण्याचा पदार्थ
शरीरी—शरीर धारण करणारा पुरुष
शर्वाणी—पार्वती
शलाका—सळई
शल्य—बाण, मनाला टोंचणारी गोष्ट
शशी—चंद्र, कापूर
शाटिका—साडी, पैठणी
शाली—साळी, भात
शाक्त—देवीचा उपासक
शितिकंठ—शंकर
शिबीर—सैन्याचा तळ
शिक्षापन—शिकवण
शील—स्वभाव
शुचिष्मंत—शुद्ध, स्वच्छ
शुष्क—सुकलेलें, म्लान
शूर्प—सूप
शखर—डोक्यावरचा तुरा
शैवल—शेवाळ
शैशव—बाल्यावस्था
शाण—तांबडें
शौरी—कृष्ण
शांभव—शंकरभक्त
शृंगाटक—रस्त्यांतला चौक
श्यामल—सांवळें
श्रवण—कान
श्रेणी—पंक्ति, समुदाय
श्रोत्रिय—वैदिक ब्राह्मण
श्लथ सैल
श्लाघ्य—प्रशंसनीय

स

सक्त—गुंतलेला
सखवार—सुकुमार
सखर—ठाशीव; घट्ट विणीचें
सजण—मित्र, सखा
सजणें—जमणें; घडणें, शोभणें
सतखाका—ओवाळून टाकलेला जिन्नस
सतरंज—बुद्धिबळें
सदन—घर
सद्म—घर

सनातन—चिरकाल टिकणारें, शाश्वत
सप्ताश्व—सूर्य
समीक्षा—शोधपूर्वक पाहणें
सरवळा—गळ्ल्यासारखा खिरींत घालण्याचा एक पदार्थ
सरोज—कमल
सवारणें—शृंगारणें
सहकार—आम्रवृक्ष
सहकारी—पत्नी
सहस्रपत्र- कमल
साची—सुंदर
साजिरा—सुंदर
साडू—बायकोच्या बहिणीचा नवरा
सात्यकि—कृष्णाचा सारथी
साध्वस—भीति
सापत्न—सावत्र, सावत्रभाव
साफल्य—सार्थक
सारंग—हरिण
सायक- बाण
सायी—साऊली
साली -मेहुणी
साव—प्रामाणिक पुरुष
साह्कारी—साह्यकर्ता
सित—टोंक असलेला, कुशाग्र
सिसफूल—केसांत घालण्याचें चंद्राकार फूल
सुकृत—पुण्य
सुखा—सुखकर
सुरवा—विजार, पायचोळणा
सुजि- सूज, वाढ
सुदती—सुंदर स्त्री
सुधांशु—चंद्र
सुपानी—पाणीदार
सुरभि—सुवासिक
सुलज—लज्जावती, लाजाळू
सूकर—वराह, डुकर
सूद—स्वैंपाकी
सेला- शेला
सोदर—भाऊ
सोदरी—बहीण
सोपान—जिना, पायरी
सोमयाजी—सोमयाग करणारा
सोय—आधार, आश्रय
सोयरा—संबंधी, नातेवाईक
सोहळा—उत्सव
सौभाग्य—सुदैव
सौमिक—सोमरसासंबंधी
सौर—सूर्योपासक
सौविदल्ल—जनानखान्यांतील सेवक
संकर्षण—बळराम
संकल्प—विचार, हेतु
संगत—युक्त, सहित
संच—बांधा, पुडा
संतान—अपत्य
संध्या—संधिकाल
संपर्ग—संपर्क, स्पर्श
संभार—साहित्य, समूह
संभ्रम—घोटाळा

२८८४



संमर्द—दाटी गर्दी
संमार्जनी—केरसुणी
संवाहन—पाय चेपणें, चुरणें
संविधान—व्यवस्था, तयारी
संविजन—वारा घालणें
संसृति-संसार
संहारणें—ठार मारणें
संक्षुब्ध—प्रक्षुब्ध, रागावलेला
सांकड—संकट
सांडणी—ओवाळून टाकलेला पदार्थ
सांब-नाडी, शीर
सिंधु-समुद्र
सिंपी—गोकर्ण, बोंडलें, दूध पाजण्याचा शिंपला
सौंगडी—सवंगडी, सोबती
स्पंदन—चलन-वलन, हालचाल
स्यंदन—रथ
स्थगित- विचारांत गढून गेलेली, तल्लीन, लुप्त
स्थविर—म्हातारा
स्थावर—अचल, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं न नेतां येण्याजोगा
स्फुलिंग—ठिणगी
स्फोटन—फोडणें, विदारणें
स्मेर—हास्य
स्वन—नाद, आवाज
स्वाप—निद्रा

## ह

हनोटी—हनुवटी
हय—घोडा
हरिता—दिशा
हरिद्र—हळद
हलधर—बळराम
हळी—हली, बळराम
हाट—बाजार
हातसर—हातांत घालण्याचें मनगट्यासारखें कंकण
हातरोखा—हातानें लिहून दिलेली हुंडी दस्तएवज वगैरे
हारपणें—नाहींसें होणें
हिमकर—चंद्र
हिलाली—मशाल धरणारा
हीरक—हिरा
हुतवह—अग्नि
हुताशन—अग्नि
हुंबरी—गावळ्यांचा एक खेळ
हेजीब—दूत
हेम—सुवर्ण, धन
हेलना—हेटाळणी, अपमान
हेला—हेळसांड, धिक्कार
होरड—हट्ट
हंसतुळिका—हंसाच्या पराची गादी
ह्राद—सरोवर

## क्ष

क्षाळणें—धुणें, शुद्ध करणें
क्षितिधर—पर्वत

REFBK-0002845
REFBK-0002845